लोकलेखा समिती

(२०१०-२०११)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन १९९५-९६ ते २००६-०७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालावरील

चौथा अहवाल

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक २१ एप्रिल, २०११ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०११

लोकलेखा समिती

२०१०-२०११

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन १९९५-९६ ते २००६-०७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालावरील

चौथा अहवाल

लोकलेखा समिती
२०१०-२०११

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट , वि.स.स.

सदस्य

२) श्री.कालिदास कोळंबकर, वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी, वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख, वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर, वि.स.स.
७) श्री. रवि राणा, वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
११) श्री.विलास लांडे, वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले, वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
*(१४) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.,(दि.२० ऑक्टोबर, २०१० रोजी पर्यंत)
(१४ अ) प्रा.राम शिंदे, वि.स.स.(दि.२० ऑक्टोबर,२०१० रोजी पासून)
१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे, वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख, वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप, वि.प.स.
**(२३) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स. (दि.५ डिसेंबर, २०१० रोजी पर्यंत)
२४) श्री. विनोद तावडे, वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत, वि.प.स.

(सदरहू समिती दिनांक २४/२/२०१० रोजी विधानसभा व दिनांक २/३/२०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
२) श्री भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
३) श्री.सु.सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार
४) श्री.ऋतुराज ज.कुडतरकर, अवर सचिव
५) श्री.रामनाथ रा.काठे,अवर सचिव (समिती)
६) श्री.सोमनाथ एन.सानप, कक्ष अधिकारी

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी आपल्या समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष/महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** श्री.राजेंद्र जैन - वि.प.स. यांची दि.५ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदरची जागा रिक्त आहे.**

(दोन)
प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन १९९५-९६ ते सन २००६-०७ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवाला यावर विचार करुन लोकलेखा समितीचा चौथा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सभागृहास सादर करीत आहे.

समितीने दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० रोजी उद्योग विभागाच्या सचिवांची तसेच मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभागाच्या इतर प्रतिनिधींची विधान भवन, मुबंई येथे साक्ष घेतली.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत स्वतंत्ररीत्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा एक भाग आहे. बैठकीच्या कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत परिशिष्ट "दोन" मध्ये देण्यात आले आहे.

समितीने दिनांक १९ एप्रिल, २०११ रोजी झालेल्या बैठकीत समितीचा चौथा प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यास मान्यता दिली.

उक्त अहवालाच्या संदर्भात समितीच्या बैठकीच्यावेळी साक्षीकरीता श्री. ए.एम. खान, प्रधान सचिव उद्योग, उर्जा व कामगार (उद्योग) विभाग श्री.संजय सेठी, सचिव, लघु व मध्यम उद्योग तथा पदसिध्द आयुक्त (उद्योग), श्री.तुकाराम मुंढे, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ हे उपस्थित होते. तसेच श्री.आर.के. सोळंकी, उप महालेखापाल, महाराष्ट्र, मुंबई व श्री.राजेश अग्रवाल, सचिव (ले.व को.), वित्त विभाग हे निमंत्रणावरून बैठकीला उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

त्याचप्रमाणे संबंधीत विभागीय सचिव व विभागीय प्रतिनिधी यांनी समितीसमोर साक्ष देऊन आपली मते व्यक्त केली व समितीला जी महत्वाची माहिती दिली, त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : १९ एप्रिल, २०११

गिरीश बापट,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती

(तीन)

अनुक्रमणिका

अ.क्र. (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
(१)	प्रस्तावना	
(२)	सन १९९५-९६ ते सन २००६-२००७ या वर्षांची लेखापरीक्षण व्यवस्था	
(३)	सन १९९५-९६ ते सन २००६-२००७ पर्यंतच्या आयव्यय पत्रकांचा तुलनात्मक गोषवारा	
(४)	सन १९९५-९६ ते २००६-२००७ या वर्षाचे खादी ग्रामोद्योग मंडळाच्या लेख्यासंबंधीचे महालेखापालांचे आक्षेप व विभागाचा खुलासा	
(५)	परिशिष्ट-१	
(६)	परिशिष्ट-२ समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त	

उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग (उद्योग)
महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९५-९६ ते सन २००६-०७ या वर्षांच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

प्रस्तावना

महाराष्ट्र राज्यात खादी व ग्रामोद्योगाला प्रोत्साहन देऊन त्यांचे संघटन व विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची सन १९६२ मध्ये मुंबई येथे खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० अन्वये स्थापना झाली. मंडळाची मुख्य कर्तव्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. खादी ग्रामोद्योगाची सुरुवात, प्रसार, प्रचार व उत्तेजन देणे ,सहाय्य करणे व सदर उद्योग चालू ठेवणे.
२. संस्था, सहकारी संस्था व व्यक्तिगत उद्योजकांना कर्जवाटप तसेच इतर वित्तीय स्वरुपात मदत करणे.
३. सहकारी संस्थांच्या आस्थापनांना उत्तेजन देणे.
४. प्रशिक्षण देणे.
५. हत्यारे, औजारे व कच्च्या मालाचा पुरवठा करण्याची व्यवस्था करणे.
६. उत्पादनाच्या जाहिरात व विक्रीसाठी मदत करणे.
७. तज्ञांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था करणे.
८. संशोधनाचे काम करणे.

जे उद्योजक/संस्था/सहकारी संस्था प्रत्यक्षपणे कार्यक्रम राबवितात, त्यांना मंडळाकडून कर्ज आणि अनुदानाच्या स्वरुपात सहाय्य केले जाते. मंडळातर्फे हातकागद केंद्र, पुणे, अमरावती आणि परभणी, मधमाशापालन केंद्र, महाबळेश्वर, सुतारी/लोहारी कार्यशाळा, गोकुळ शिरगांव (कोल्हापूर) खादी उत्पादन व अंबर चरखा केंद्र नागपूर, कंबल उत्पादन केंद्र (त्रिमूर्ती वुलन केंद्र) उमरेड (नागपूर) चुना उत्पादन व प्रशिक्षण केंद्र (रत्नागिरी) आणि पणन विभाग, मुंबई ही केंद्रे व्यापारी तत्वावर चालविली जातात. मंडळाचे कार्य सक्षमतेने चालावे म्हणून मंडळात जिल्हा पातळीवर जिल्हा समिती व कार्यकारी अधिकारी म्हणून जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी आहेत.

लेख्यांचे प्रकार

नोव्हेंबर, १९९७ मध्ये सुधारणा केलेल्या अधिनियमातील कलम २५ (एक) प्रमाणे मंडळ आय व व्यय लेखा आणि ताळेबंद पत्रक तयार करते. व्यापारी तत्वावर चालविण्यात येणा-या केंद्राचेदेखील व्यापारी लेखे मंडळ नियमीत प्रपत्रांमध्ये ठेवते.

सन १९९५-९६ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

नियंत्रक व महालेखापरिक्षक याची (कर्तव्ये, अधिकार व सेवेच्या शर्ती) अधिनियम, १९७१ भाग-२०(१) नुसार सन १९९२-९३ ते १९९६-९७ पर्यंत पाच वर्षाच्या कालावधीसाठी मंडळाच्या लेखापरीक्षणाचे काम महालेखाकारांकडे सोपविलेले आहे.

मंडळाचे सन १९९५-९६ चे वार्षिक लेखे मंडळाच्या दिनांक २९ नोव्हेंबर, १९९६ रोजी झालेल्या ३२२ व्या सभेत स्विकारण्यांत आले.

सन १९९६-९७ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

भाग-२०(१) नुसार सन १९९२-९३ ते १९९६-९७ पर्यंत पाच वर्षाच्या कालावधीसाठी मंडळाच्या लेखापरीक्षणाचे काम महालेखाकारांकडे सोपविलेले आहे.

मंडळाचे सन १९९६-९७ चे वार्षिक लेखे मंडळाच्या दिनांक ३० जुलै, १९९७ रोजी झालेल्या ३२९ व्या सभेत स्विकारण्यांत आले.

सन १९९७-९८ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

भाग-२०(१)नुसार सन १९९७-९८ ते २००१-०२ पर्यंत पाच वर्षाच्या कालावधीसाठी मंडळाच्या लेखापरीक्षणाचे काम महालेखाकारांकडे सोपविलेले आहे.

मंडळाचे सन १९९७-९८ चे वार्षिक लेखे मंडळाच्या दिनांक ३० जुलै १९९८ रोजी झालेल्या ३३९ व्या सभेत स्विकारण्यांत आले.

सन १९९८-९९ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

भाग-२०(१)नुसार सन १९९७-९८ ते २००१-२००२ पर्यंत पाच वर्षाच्या कालावधीसाठी मंडळाच्या लेखापरीक्षणाचे काम महालेखाकारांकडे सोपविलेले आहे.

मंडळाचे सन १९९८-९९ चे लेखे, मंडळाच्या दिनांक २२ जून, १९९९ रोजी झालेल्या ३४४ व्या सभेत स्विकारण्यांत आले आहेत.

सन १९९९-२००० वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

भाग-२०(१) नुसार सन १९९७-९८ ते २००१-२००२ पर्यंत पाच वर्षाच्या कालावधीसाठी मंडळाच्या लेखापरीक्षणाचे काम महालेखाकारांकडे सोपविलेले आहे.

मंडळाचे सन १९९९-२००० चे वार्षिक लेखे मंडळाच्या दिनांक १४ सप्टेंबर २००० रोजी झालेल्या सभेत स्विकारण्यांत आले आहेत.

सन २०००-२००१ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याचे काम सन १९९७-९८ ते सन २००१-२००२ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी कलम २०(१) नुसार सोपविण्यांत आले आहे.

मंडळाने दिनांक २१ जून, २००१ रोजी झालेल्या सभेत मंडळाच्या सन २०००-२००१ च्या वार्षिक लेख्यांना मान्यता दिली

सन २००१-२००२ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याचे काम सन १९९७-९८ ते सन २००१-२००२ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी कलम २०(१) नुसार नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविण्यांत आले आहे.

सन २००२-२००३ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याचे काम सन २००२-२००३ ते सन २००६-२००७ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी कलम २०(१) नुसार प्रधान महालेखापाल कार्यालयाकडे सोपविण्यांत आले आहे.

मंडळाने दिनांक ३० सप्टेंबर, २००३ रोजी झालेल्या ३७३ व्या सभेत मंडळाच्या सन २००२-२००३ च्या वार्षिक लेख्यांना मान्यता दिली.

सन २००३-२००४ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याचे काम सन २००२-२००३ ते सन २००६-२००७ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी कलम २०(१) नुसार नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविण्यांत आलेले आहे.

मंडळाचे सन २००३-२००४ चे वार्षिक लेखे दिनांक १७ ऑगस्ट, २००४ रोजी झालेल्या मंडळाच्या ३८० व्या सभेत मंजूर करण्यांत आले आहेत.

सन २००४-२००५ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याचे काम सन २००२-२००३ ते सन २००६-२००७ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी कलम २०(१) नुसार महालेखापाल कार्यालयाकडे सोपविण्यांत आले आहे.

मंडळाने दिनांक २३ फेब्रुवारी, २००६ रोजी झालेल्या ३८२ व्या सभेत मंडळाच्या सन २००४-२००५ च्या वार्षिक लेख्यांना मान्यता दिली.

सन २००५-२००६ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

कलम २० (१) खाली मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सन २००२-०३ ते सन २००६-०७ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता सोपविण्यात आले आहे.

मंडळाने दिनांक २० एप्रिल,२००७ रोजी झालेल्या विशेष सभेमध्ये मंडळाच्या सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यांना मंजूरी दिली होती.

सन २००६-२००७ वर्षाची लेखा परीक्षण व्यवस्था :

कलम २० (१) खाली मंडळाच्या लेख्यांचे लेखा परीक्षण भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सन २००२-०३ ते सन २००६-०७ या पाच वर्षाच्या कालावधीकरिता सोपविण्यात आले आहे.

मंडळाने दि. ११ जानेवारी, २००८ रोजी झालेल्या विशेष सभेमध्ये मंडळाच्या सन २००६-०७ च्या वार्षिक लेख्यांना मंजूरी दिली आहे.

लेखापरीक्षण अहवालासह वार्षिक अहवाल/वार्षिक लेखे विधानमंडळास सादर करणे :

अधिनियमाच्या कलम २३ ते २५ नुसार मंडळाने आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत वार्षिक अहवाल तयार करुन तो शासनास सादर करावयाचा असतो. असा प्रत्येक अहवाल विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे मांडावयाचा आहे. त्याचप्रमाणे लेखा परीक्षकांनी प्रमाणित केलेले मंडळाचे लेखे, त्यावरील लेखापरीक्षण अहवालासह, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे मांडण्यासाठी शासनास दरवर्षी पाठवावयाचे असतात.

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाचे सन १९९५-९६ ते सन २००७-०८ चे वार्षिक लेखा अहवाल सभागृहास खाली दिल्याप्रमाणे सादर करण्यात आले **:-**

			सभागृहास सादर केल्याचा दिनांक
१	**सन १९९५-१९९६**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**३०-०३-१९९८**
२	**सन १९९६-१९९७**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**०६-०८-१९९८**
३	**सन १९९७-१९९८**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**१८-०४-२०००**
४	**सन १९९८-१९९९**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**२७-०७-२०००**
५	**सन १९९९-२०००**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**२६-०३-२००२**
६	**सन २०००-२००१**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**२२-०७-२००३**
७	**सन २००१-२००२**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**०२-०६-२००४**
८	**सन २००२-२००३**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**१६-३-२००५**
९	**सन २००३-२००४**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**३१-७-२००७**
१०	**सन २००४-२००५**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**३१-३-२००८**
११	**सन २००५-२००६**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**२१-१२-२००९**
१२	**सन २००६-२००७**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**६-४-२०१०**
१३	**सन २००७-२००८**	**वार्षिक लेखा आणि लेखा विवरण पत्र**	**२२-४-२०१०**

आय पत्रकांचा गोषवारा

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९५-९६ ते सन २००६-०७ पर्यंतच्या आय पत्रकांचा तुलनात्मक गोषवारा खालीलप्रमाणे दिलेला आहे :-

आयव्यय तपशिल (जमा)	१९९५-९६	१९९६-९७	१९९७-९८	१९९८-९९	१९९९-००	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५	२००५-०६	२००६-०७
आरंभीची शिल्लक	७२६.८३	४५०.५४	३४८.५५	३७८.६०	४०१.८६	७३६.६४	३६१.९८	३८८.६८	१८४.३४	१९६.५६	४९३.३७	४३२.६६
गुंतवणूक	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
खादी आयोगाकडून जमा(मिळालेले)												
अ) कर्ज	०.००	६९१.५३	१०३५.२९	७६५.३८	५३१.०९	१४१.३१	३८३.७६	०.००	०.००	०.००	०.००	०.००
ब) अनुदान	१८३.२३	५३५.००	०.००	२५.१२	२७९.१७	३४.७३	२५.१७	२५९.००	२५१.३९	६५४.२६	७०२.५०	९८२.२१
राज्य शासनाकडून मिळालेले												
अ) कर्ज	१.२३	३.४७	१.२७	४५.००	०.००	०.८४	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
ब) मदत	१२०३.२५	११९७.७६	१५३६.२६	९७१.०२	११९३.८३	१३१२.६७	१३०३.७१	१३९७.३९	१४३५.८२	१८०४.५४	१२८५.२६	२८०१.५६
संस्था/सोसायटीकडील अविनियोगीत रक्कम परत												
अ) कर्ज	०.००	१३.३५	१४.४३	१४.९८	४.७४	१२.८१	१५.५८	१५.६९	८.००	६.६८	१८०.४३	५.६५
ब) अनुदान	२६९.८७	९.६६	०.००	३.९१	१५.१३	११.४९	२८१.८६	०.३५	०.००	१.१२	०.००	०.००
संस्था/सोसायटीकडून कर्ज वसुली	०.००	२४०.२०	१६५.५५	१६५.०१	२१९.९८	२४१.५०	२१२.५१	३३७.३७	१६९.४६	१६६.९४	१५७.८५	१०४.१८
कर्ज व गुंतवणुकीवरील व्याज वसुली	१८०.०६	१७८.५६	२१८.९८	२०६.०१	१९६.४७	२५५.१७	२१६.४१	१९५.७३	२६७.६३	२२४.६२	१२२.३०	९२.५२
खेळता निधी वसुली	०.००	२०९.५८	१४४.२७	१०२.१९	७४.५०	७१.८७	६५.७६	५६.१५	४८.३८	५५.९२	४४.५०	२६.०४
तसलमात व तात्पुरती अनामत	४८४.७६	२९१.३९	४२४.६३	१६४.९४	२७१.७५	२५५.६४	३९८.०९	४२१.५३	३९२.८४	५६५.८०	३९४.९२	४१६.३१
किरकोळ जमा	६.५३	६९.५९	३१.४५	२०.३४	२४.७२	९४.९८	१६.३८	१७.५६	२३.०४	१६.५४	११.३०	११.५३
इतर अनामत	०.००	०.००	३६.९७	२३.२७	०.००	१४.६७	१५.१३	१५.१५	१३.१९	२९.४८	१९.८२	२१.६८
फिरता निधी	४०.६४	१७६.३७	०.००	०.००	०.००	११.७८	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
व्यापारी उलाढाली	०.००	०.००	०.००	०.००	१.७२	०.००	१.०९	२२६.५०	२७८.११	१.१६	०.००	०.००
निलंबन लेखे	१७५.४८	७.०७	(-) ६.९९	(-) १.२५	१४.१९	०.६५	(-) १.१५	(-) ५.२९	०.०१	०.०८	०.००	०.००
निलंबन व वित्तप्रेषण	०.००	०.००	२३०.४३	३३५.६४	२८६.१७	२६४.९२	२६०.९२	२५८.३०	२६४.६३	२७८.७४	३०१.७३	३१६.२५
इतर अनामत वसुली	३१.८८	४७.९०	०.००	१.२४	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.६२	०.००
इतर खाते अनामत	०.००	४६०.००	२२०.८०	९३.००	११८.०८	१.७८	२११.००	३७१.८९	२८८.००	१७८.००	१३९.००	०.०४
एकूण	**३३०३.७६**	**४५८१.९७**	**४४०१.८९**	**३३१४.५८**	**३६३३.४०**	**३४६३.४५**	**३७६८.२०**	**३९५६.७०**	**३६२४.८४**	**४१८०.४४**	**३८५३.६०**	**५२१०.६३**

व्यय पत्रकांचा गोषवारा

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९५-९६ ते सन २००६-०७ पर्यंतच्या व्यय पत्रकांचा तुलनात्मक गोषवारा खालीलप्रमाणे दिलेला आहे :-

व्यय तपशील (खर्च)	१९९५-९६	१९९६-९७	१९९७-९८	१९९८-९९	१९९९-००	२०००-०१	२००१-०२	२००२-०३	२००३-०४	२००४-०५	२००५-०६	२००६-०७
खादी आयोगाच्या कर्जाच्या वसुलीपैकी												
अ) संस्था सोसायटयांना कर्ज वाटप	०.००	५३६.३९	७४२.१२	७६२.५५	५२९.७१	१२६.२८	२१३.२१	०.००	०.००	०.००	०.००	०.००
ब) अविनियोजीत रक्कम परत	५३७.९३	१३.४८	१५.६९	०.१०	१६.२५	१५.८६	९०.७१	२८.१२	१५.३८	८.४२	२.६०	१.६७
खादी आयोगाकडून मिळालेल्या अनुदानापैकी												
अ) संस्थांना वाटप	१०२.२९	०.००	४.४२	१.१७	०.००	८१.४६	५२२.६०	३८४.०३	३८०.२६	४८९.७३	७६३.७६	९८७.५१
ब) व्यवस्थापकीय खर्च	९.११	०.००	०.००	०.००	०.००	३४.७३	२५.१७	०.००	०.००	०.००	०.००	०.००
क) अविनियोजीत रक्कम परत	०.००	६८४.२६	१.०७	०.००	२०७.०४	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
राज्य शासनाकडून मिळालेल्या अनुदानातून अ) व्यवस्थापकीय खर्च	१२६७.७०	१३०६.७६	१२२३.९१	१२२५.०७	१२१२.७७	१२२०.०८	१२९९.८९	१४२९.२५	१३५९.२६	१६७९.७९	१५६६.९९	२१७५.९६
ब) संस्था/सोसायटयांना वाटप	१.५७	०.७६	०.००	०.००	०.८३	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
कोष खरेदी खर्च	२५.८३	४६.७८	१०१.१६	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
खादी आयोगाची कर्जे परतफेड	४.८३	१९३.९७	५१६.८०	१०३.४८	१७१.३८	४२८.४७	१६५.६९	२४३.४६	१६९.४६	१६९.२६	१४७.६७	१०३.९६

सु.बे.यो. शासकीय	०.५७	०.५१	८.५४	०.५०	०.००	१.३१	२७.१३	१.१९	१.२४	२.००	०.६४	०.८८
खादी आयोगास व्याज परतफेड	२११.३१	०.००	१९०.०६	१३३.५८	०.००	३५४.९३	१४७.८८	२६७.५८	१३९.८०	१६२.२४	१३१.०२	०.००
इतर	२.५४	२.७७	३६.२६	४४.०८	३.९६	११.४८	११.२९	१३.१८	३८.५९	९.७८	७५.००	३.६४
व्यापारी उलाढाल	०.००	०.००	१२५.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
इतर अनामत	३२.७३	१००.००	२८५.९२	१११.६०	१५२.६५	११७.७६	३६४.६१	६११.३३	६३४.२९	३.२६	२८.०९	२७.५२
तसलमात व तात्पुरती अनामत	४७६.०३	३१०.५०	३३७.७९	२२६.५०	२४९.८१	२४६.८४	२०५.३०	४३७.३९	३७६.२४	८२७.६९	३६१.१२	४३५.८९
किरकोळ	०.००	४९६.०४	७६.६७	३३.६३	०.००	४८.४९	९.५०	०.००	१.९९	०.००	०.००	७८.९८
निलंबन व वित्तप्रेषण	१८२.१६	१७५.४९	२१२.०८	२०१.७२	२७५.९१	२६७.४१	२७३.४४	२५८.०१	२६३.८८	२७८.४८	२९९.५५	३१३.७८
जिल्हा कचेऱ्यांना तसलमत	(-) २.३८	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००	०.००
खेळता निधी	०.००	३६५.७१	१४८.७९	६८.७५	७६.४५	१४६.३६	२३.१०	९८.८२	४७.८९	५६.४१	४४.५०	२६.०४
अखेर शिल्लक	४५०.५४	३४८.५५	३७८.६०	४०१.८५	७३६.६४	३६१.९८	३८८.६८	१८४.३४	१९६.५६	४९३.३७	४३२.६६	१०५४.८०
एकूण	**३३०३.७६**	**४५८१.९७**	**४४०१.८८**	**३३१४.५८**	**३६३३.४०**	**३४६३.४४**	**३७६८.२०**	**३९५६.७०**	**३६२४.८४**	**४१८०.४३**	**३८५३.६०**	**५२१०.६३**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९५-९६ ते सन २००६-०७ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :-

५.१ लेख्यांबाबत अभिप्राय

१. आरंभीची आणि अखेरची शिल्लक चुकीची दर्शविली

सन १९९४-९५ च्या लेख्यांमध्ये दर्शविलेली अखेरची शिल्लक आणि सन १९९५-९६ च्या लेख्यांमध्ये दर्शविलेली आरंभीची शिल्लक यामध्ये खालीलप्रमाणे फरक आहे.

(रक्कम रु. लाखात)

अ.क्र.	तपशील	अखेरची शिल्लक १९९४-९५	आरंभीची शिल्लक १९९५-९६	फरक
१	सहपत्र ८ संस्था/सोसायटीकडून वसुल झालेले व्याज राज्य शासनास देय	३.५७	१.२४	(-)२.३३
२	सहपत्र-१३ मंडळाची जंगम मालमत्ता	६१.९३	६१.९३	(+) ०.०२

2) पणन विभागाच्या रोकड वहीमध्ये दिनांक ३१ मार्च,१९९६ रोजी रोकड व बँक शिल्लक रु ५५.५० लाख दर्शविली आहे व लेख्यांमध्ये रु ५६.२८ लाख दाखविली आहे.परिणामी रु ०.७८ लाखाने मालमत्ता वाढविलेली दिसत आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या सन १९९६-९७ च्या लेख्यांमध्ये याबाबत आवश्यक ती दुरुस्ती करण्यांत आलेली आहे व मंडळाच्या या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

५.२ **कमी /अधिक तरतूद**

१. पणन विभाग

भांडवली कर्ज व खेळते भांडवली कर्ज यावर रु १३.७० लाखाची जादा व्याजाची तरतूद केली आहे. परिणामी नफा कमी दर्शविला आहे व दायित्व किंमत जादा दिसत आहे.

२. खातेनिहाय केंद्रे

रु.०.६३ लाखाऐवजी रु.०.०७ लाख खेळते भांडवली कर्जावर व्याजाची तरतूद फक्त एकाच खाते निहाय केंद्रासाठी करण्यांत आली. इतर तीन केंद्राच्या बाबतीत रु ०.६८ लाख व्याजाची उपर्जित दायित्वे असून सुध्दा त्याची तरतूद केलेली नाही. परिणामी नफा जास्त व रु १.२४ लाखाने दायित्वे कमी दिसतात.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

सन १९९५-९६ या वर्षात जी व्याजाची रु.१३.७० लाख तरतूद करण्यांत आली होती. त्यामध्ये सन १९९४-९५ या वर्षात न करण्यांत आलेल्या व्याजाच्या तरतूदीचा देखील समावेश आहे. मंडळाच्या या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने भांडवली कर्जावर व्याजाची तरतूद काही खाते निहाय केंद्रामध्ये केली आहे व काही ठिकाणी केलेली नाही. त्याबाबतची कारणे खालील प्रमाणे आहेत :-

१-मधमाशापालन केंद्राचे स्वतःचे भांडवल आहे.

२-चुना उत्पादन केंद्राची मालमत्ता व दायित्वे मंडळाच्या लेख्यांमध्ये समायोजीत करण्यांत आली आहेत.

३-सुतारी लोहारी कार्यशाळेच्या लेख्यांमध्ये भांडवली व्याजाची तरतूद करण्यांत आली आहे.

४-त्रिमूर्ती वुलन केंद्र, उमरेड यांचे भांडवली कर्ज हे बिनव्याजी आहे. त्यामुळे त्यांच्या लेख्यांमध्ये व्याजाची तरतूद करण्यांत आलेली नाही.

मंडळाच्या या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

५.३ जिंदगी/दायित्वे कमी अधिक दर्शविणे -

१. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग नियमावलीतील नियम क्र १८ प्रमाणे मंडळाच्या सर्व किरकोळ जमा राखीव निधीमध्ये जमा करावयाच्या आहेत. परंतु चालू वर्षातील किरकोळ जमा रु ९.६१ लाख राखीव निधीमध्ये जमा केलेले नाही. परिणामी दायित्वे कमी दिसतात.

२. रेशीम योजनेतील रु ५२.६० लाख व साबण उद्योगाअंतर्गत रु.५.८२ लाख या किंमतीची स्थावर व जंगम मालमत्ता संबंधित योजनांच्या ताळेबंदात दर्शविली गेली. परंतु एकत्रित ताळेबंद पत्रकात दाखविली नाही. त्यामुळे रु ५८.४२ लाखाच्या मालमत्तेचे अधोमुल्यन झाल्याचे दिसते.

३. मंडळाने भविष्य निर्वाह निधीची गुंतवणूक रु १२.१० लाखाने खालीलप्रमाणे कमी दर्शविली आहे.

ताळेबंदाप्रमाणे दिनांक १ एप्रिल, १९९५ रोजी आरंभीची शिल्लक	रु. ३,५१,६६,८२७-३७
(+) अधिक चालू वर्षात केलेली गुंतवणूक	रु. ७७,५९,८३६-००
(-) वजा चालू वर्षात केलेले गुंतवणूकीचे रोखीकरण	रु. २३,५९,८३६-००
अखेरची शिल्लक अशी येते	रु. ४,०५,६६,८२७-३७
ताळेबंदामध्ये दर्शविलेली अखेरची शिल्लक	रु. ३,९३,५७,१८६-००
फरक	रु. १२,०९,६४१-३७

मंडळाने या फरकाचा मेळ घालण्याचे मान्य केले आहे.

४. मंडळाच्या ताळेबंदाला जोडलेले सहपत्र १२ मध्ये आदर्श चर्मालय व शेड भुसावळ या मालमत्तेची रु.१३,१०० अशी जी किंमत दर्शविली आहे, ती खरे तर चौरस मिटर मध्ये जागेचे माप आहे. जागेची खरी किंमत आणि जागा खरेदीची तारीख मंडळाकडे उपलब्ध नसल्याने मालमत्तेचे अधोमूल्यन काढता आलेले नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

१-किरकोळ लेखा शिर्षकाखाली जमा झालेली रु.९.६१ लाख रक्कम मंडळाने सन १९९७-९८ या वर्षात राखीव निधीत वर्ग केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

२-मंडळाकडे असलेली रेशीम योजना त्यांच्या ताब्यात असलेल्या मालमत्तेसह दि.१/९/१९९७ पासून शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडे वर्ग करण्यांत आलेली आहे. म्हणून रेशीम योजनेच्या ताब्यात असलेली मालमत्ता मंडळाच्या लेख्यांमध्ये दर्शविण्यांत आली नाही. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

३-भविष्य निर्वाह निधीच्या सन १९९५-९६ मधील आरंभीच्या शिल्लक रक्कमांचा ताळमेळ मंडळाने घातला आहे व महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर या परिच्छेदाबाबत अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने सन १९९७-९८ च्या लेख्यांमध्ये भुसावळ येथील जागेची किंमत योग्य प्रकारे दर्शविली आहे व महालेखापल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.४ बँक ताळमेळ

मार्च, १९९६ अखेर एकूण आठ बँक खात्यांमध्ये रु.१७२.६८ लाखाचा फरक होता. (सन १९९४-९५ अखेर रु.७७.२० लाख) मंडळाने याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यांत येत आहे, असे म्हटले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या सर्व बँक खात्यांतील शिल्लक रक्कमांचा ताळमेळ मंडळाने घातला असून आवश्यक त्या नोदी संबंधीत वर्षाच्या रोखकिर्दीमध्ये घेतलेल्या आहेत. महालेखापाल यांनी मंडळाच्या या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९६-९७ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

लेख्यांबाबत अभिप्राय

५.१ जिंदगी/दायित्वे कमी अधिक दर्शविणे

मार्च, १९९७ अखेर रक्कम रु.६३१८.९१ लाख मंडळाकडून खादी आयोगास कर्जापोटी देय होती. तथापि खादी आयोगाकडून वसुलीपात्र रक्कम रु.८३८.२५ लाख ताळेबंद पत्रकामध्ये इंप्रेस्ट खाली वजा दर्शविल्यामुळे खादी आयोगास निव्वळ दायित्वे रु.५४८०.६६ लाख दिसत आहेत. परिणामी रु.८३८.२५ लाख एवढे दायित्व आणि जिंदगी कमी दिसत आहे.

२. पणन विभागाच्या खतावणीमध्ये ऋणको या शिर्षकाखाली रक्कम रु ६२.४५ लाख शिल्लक दर्शविलेली आहे तर ताळेबंद पत्रकामध्ये रु ५५.५१ लाख शिल्लक दर्शविलेली आहे परिणामी रु.६.९४ लाख एवढी जिंदगी कमी दशविलेली आहे.

ताळेबंद पत्रकासोबत सहपत्र क्र १३ मंडळामधील जंगम मालमत्ता मध्ये पूर्वी निर्लेखित केलेल्या २ वाहनांची उर्वरित रक्कम रु.६९,५८६/- दाखविलेली आहे. परिणामी ताळेबंद पत्रकात जिंदगीची रक्कम ०.७० लाखांनी जास्त दर्शविलेली आहे.

मधमाशापालन केंद्र, महाबळेश्वर यांच्या लेख्यांमध्ये धनकोची एकत्रित रक्कम व रु.१.४१ लाख मध्ये रु.०.८२ लाख पणन विभागास देय दिसत आहे. मात्र पणन विभागाच्या लेख्यांमध्ये मधमाशापालन केंद्राकडून येणे रक्कम रु.०.६८ लाख दिसत आहे. परिणामी पणन विभागाच्या लेख्यांमध्ये ०.१४ लाख एवढी जिंदगी कमी दर्शविलेली आहे.

मधमाशापालन केंद्र, महाबळेश्वर यांच्या ताळेबंद पत्रकामध्ये ऋणकोच्या यादीमध्ये मधाच्या विक्रीपोटी येणे रु.१.८७ लाख एवढे आहे. त्यामध्ये पणन विभागाकडून येणे रक्कम रु.०.८० लाख एवढी समाविष्ट आहे. परंतु ही रक्कम पणन विभागाच्या लेख्यांत धनको यादीमध्ये दर्शविलेली नाही. परिणामी पणन विभागाच्या लेख्यांमध्ये रु.०.८० लाख एवढे दायित्व कमी दाखविलेले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग अधिनियमातील नियम क्र १८ प्रमाणे मंडळामध्ये सर्व किरकोळ जमा रक्कम राखीव निधीमध्ये वर्ग करावयाची आहे. परंतु चालू वर्षी किरकोळ जमा रक्कम रु.३०.८१ लाख राखीव निधीमध्ये वर्ग करुन जमा केलेली नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

१. मंडळाकडून जादा वाटप करण्यांत आलेली रक्कम रुपये ११२.३४ ही मंडळास खादी आयोगाकडून येणे रक्कम आहे. ती रक्कम मंडळाने सन २००४-०५ च्या ताळेबंद पत्रकात खादी आयोगास देणे असलेल्या रक्कमांमध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार न करता येणे बाजूस दर्शविली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

२. मंडळाने सन १९९७-९८ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

३. मंडळाने आवश्यक ती दुरुस्ती, मंडळाच्या सन १९९९-२००० व सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये केलेली आहे. महालेखापाल यांनी मंडळाचा हा अनुपालन अहवाल मान्य केला आहे.

४. मंडळाच्या पणन विभागास मधमाशापालन केंद्राकडून येणे असलेल्या व देणे असलेल्या रक्कमांचा ताळमेळ घालून दोन्ही खातेनिहाय केंद्रांच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

५. वरील प्रमाणे

६. किरकोळ लेखा शिर्षकाखाली जमा असलेली रु.३०.८१ लाख रक्कम मंडळाने सन १९९७-९८ मध्ये राखीव निधी खात्यास वर्ग केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.२ संशयीत ऋणकोसाठी तरतूद

तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीकरिता वसुल न झालेले १०० टक्के ऋणको रक्कमेकरिता हातकागद केंद्र यांचे ताळेबंद पत्रकात रु.३.७५ लाख रक्कमेची तरतूद केलेली होती. या रक्कमेमध्ये मंडळ व मंडळाच्या इतर केंद्रांकडून तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीची येणे बाकी रक्कम रु.१.१६ लाख समाविष्ट आहे. मंडळ व मंडळाच्या केंद्रांकडून येणे असलेल्या रक्कमेपोटी संशयीत ऋणको म्हणून तरतूद करणे समर्थनीय वाटत नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

संशयीत ऋणकोच्या शिर्षाखाली दर्शविण्यांत आलेली जुनी शिल्लक रक्कम ही मंडळाची हातकागद केंद्र, अमरावती व हातकागद केंद्र, परभणी यांच्याशी संबंधित आहे. ही दोन्ही केंद्रे अनुक्रमे दिनांक २५ व २६ नोव्हेंबर, १९९७ पासून बंद आहेत. बंद केंद्रे निर्लेखनाबाबतचा निर्णय अद्यापही मंडळाच्या विचाराधीन असून त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. याबाबत त्वरीत निर्णय घेण्यासाठी मंडळाला सूचित करण्यात आले आहे.

५.३ बँक ताळमेळ

मार्च, १९९६ अखेर एकूण दहा बँक खात्यांमधील रक्कमेस रु.३.०४ कोटी एवढा फरक आहे. ताळमेळ करुन किर्दमध्ये नोंदी घेतलेल्या आहेत असेही मंडळाने म्हटले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

बँकेच्या सर्व खात्यांचा पडताळा मंडळाने पूर्ण केला असून योग्य त्या नोंदी सन १९९७-९८ च्या लेख्यांमध्ये केलेल्या आहेत. महालेखापाल यांनी मंडळाच्या या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९७-९८ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

५.१ ताळेबंद पत्रक :

दायित्वे

ब) **खादी आयोगास परत करावयाची कर्जे :-** लाभार्थींना कर्जे अदा करण्यासाठी मंडळास खादी आयोगाकडून कर्ज प्राप्त झाले.खादी आयोगाकडून प्राप्त झालेल्या कर्ज रक्कमेपेक्षा ५४५.१० लाख रुपये मार्च, १९९८ अखेर जादा रक्कम मंडळाने वाटप केली. सदर रक्कम मंडळाने खादी आयोगास जे दायित्व होते त्यासमोर समायोजित करुन दर्शविली आहे. अशा प्रकारचे समायोजन चुकीचे आहे. कारण एखादया व्यक्तिंकडून येणारे येणे, हे दुसऱ्या व्यक्तीच्या दायित्वासमोर दर्शविणे योग्य नाही.

वर नमूद केलेले चुकीचे समायोजन यापूर्वीच्या सन १९९६-९७ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये देखील दर्शविण्यांत आले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

अशाप्रकारची व्यवस्था करण्यासाठी खादी आयोगाने मंडळास परवानगी दिली होती. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केले नाही

खादी आयोगाने त्यांच्या दिनांक २४/३/९३ च्या पत्रान्वये मंडळास निधी पुन्हा वापरण्यास परवानगी दिलेली आहे.

५.२ राखीव निधी कमी दाखविणे

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग (सुधारणा नियम, १९७१) मधील नियम १८(२) अन्वये मंडळास प्राप्त होणारी सर्व संकीर्ण जमा रक्कम राखीव निधीस वर्ग करावी लागते. सन १९९६-९७ च्या लेखापरीक्षण अहवालात नमूद करुन सुध्दा एकत्रित संकीर्ण जमा रक्कम रु.५७.६४ लाख राखीव निधीस वर्ग करण्यांत आली नाही. त्यामुळे तेवढया रक्कमेने राखीव निधी कमी दिसून येतो. मंडळाने असे कळविले आहे की, (सप्टेंबर, १९९८ मध्ये) जुलै १९९८ मध्ये रु.११.९९ लाख जमा करण्यांत आले आहेत व उर्वरित रक्कम लवकरच जमा करण्यांत येत आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

परिच्छेदामध्ये दर्शविल्याप्रमाणे सन १९९७-९८ मध्ये दर्शविलेली रक्कम रु.४५.६५ लाख सन २०००-२००१ मध्ये राखीव निधीत जमा केलेली आहे.

५.३ पणन विभाग

१) व्यापारी पत्रकामध्ये खरेदी व विक्रीच्या ज्या रक्कमा दर्शविल्या आहेत, त्या विभागाने खरेदी व विक्रीचे जे रजिस्टर ठेवले आहे ते अपूर्ण असल्यामुळे तपासता आल्या नाहीत. तसेच सदर रजिस्टरमध्ये ज्या नोंदी घेण्यांत आल्या आहेत, त्या साक्षांकित केलेल्या नाहीत.

२) व्यापारी पत्रक आणि ताळेबंदामध्ये अखेरचा शिल्लक माल रु.१४.९४ लाख हा सन १९८९-९० पासून पडून असल्याचे नमूद केले आहे. परंतु साठे नोंदवही उपलब्ध न केल्यामुळे त्याची पडताळणी करण्यांत आली नाही.

३) पणन विभागाच्या ताळेबंद पत्रकामध्ये खादी व ग्रामोद्योग आयोगाकडून रुपये ५.४० लाख एवढे व्याज उपदान येणे असल्याबाबत मालमत्ता बाजूस दर्शविण्यांत आले आहे. तथापि सन १९९०-९१ व त्यानंतरचे संबंधित दावे अद्याप खादी आयोगाला सादर करण्यांत आलेले नाहीत (सप्टेंबर १९९८)

४) जिल्हा कार्यालयातील पणन विभागाचे लेखे मुख्य कार्यालयातील पणन विभागाच्या लेख्यांमध्ये समाविष्ट करायला हवेत. मात्र जिल्हा कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, नागपूर व वर्धा येथील पणन विभागाच्या लेख्याचा समावेश करण्यांत आलेला नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

१) सन २०००-०१ पासून मंडळाने खरेदी व विक्रीची रजिस्टर्स साक्षांकित करुन ठेवलेली आहेत.

२) आक्षेपामध्ये दर्शविलेल्या रु १४.९४ लाख रक्कमेच्या शिल्लक साठयाचे वापरण्यायोग्य व वापरण्यास अयोग्य असे वर्गीकरण करुन मंडळाने त्यापैकी रु.२.१६ लाखाच्या वापरण्यायोग्य मालाची विक्री केली व उर्वरित रु.१२.७८ लाख किंमतीचा वापरण्यास अयोग्य माल मंडळाने सन २००२-०३ मध्ये निर्लेखित करुन त्याची योग्य ती नोंद लेख्यांमध्ये घेतली आहे.

३) मंडळाच्या दिनांक ८/५/२००० या दोन प्रस्तावान्वये व्याज उपदानाची उर्वरित मागणी देखील खादी आयोगाकडे केलेली आहे. तसेच याबाबत मंडळामार्फत पाठपुरावा करण्यात येत आहे.

४) आक्षेपामध्ये दर्शविलेले जिल्हास्तरीय पणनचे लेखे मुख्य कार्यालय स्तरावरील पणन विभागाच्या लेख्यांमध्ये मंडळाने सन १९९८-९९ मध्ये समाविष्ट केले आहेत.

५.४ भविष्य निर्वाह निधी

सन १९९७-९८ च्या लेख्यांमध्ये भविष्य निर्वाह निधीची जी आकडेवारी दर्शविण्यांत आलेली आहे ती भविष्य निर्वाह निधीच्या ब्रॉडशीटच्या आकडयांशी जुळत नाही. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

अ.क्र.	बाब	ब्रॉडशीटमधील रक्कम रुपये (लाखात)	लेख्यांमधील रक्कम रुपेय (लाखात)
१	दि.१ एप्रिल, १९९७ अखेर वर्गणीदारांना देय रक्कम	४९५.१२	४३३.९९
२.	वर्गणी व अग्रीम वसुली	१०९.०८	१०७.७७
३.	अंतिम देय रक्कम व तात्पुरती अग्रीम रक्कम	१११.७९	११०.८५
४.	वर्गणीदारांना देय असलेले व्याज	५९.५९	लेख्यांमध्ये तरतूद करण्यांत आलेली नाही.
५.	वर्गणीदारांना देय रक्कम	५५२.०९	रु.५०१.०८ एवढा निधी उपलब्ध. मात्र संभाव्य येणे व्याज येणे बाजूस दर्शविलेले नाही.

लेख्यांमध्ये गुंतवणूकीवरील व्याजाची तरतूद न केल्याने व अग्रीम नुतनीकरण करतांना निव्वळ अग्रीम रक्कमा घेतल्याने वर नमूद केलेला फरक दिसत आहे. असे मंडळाने नमूद करुन याबाबतच्या योग्य त्या दुरुस्त्या सन १९९८-९९ च्या लेख्यांमध्ये करण्यांत येतील असे कळविले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने भविष्य निर्वाह निधीतील रक्कमांचा ताळमेळ घातला असून दिनांक ३१/३/२००२ पासून त्यामध्ये कोणताही फरक नाही.

तसेच सन १९९८-९९ पासून भविष्य निर्वाह निधी वर्गणीदारांना देय असलेल्या व्याजाची तरतूद लेख्यांमध्ये केलेली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९८-९९ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :-

५.१ लेखांकन तत्वे :-

सर्वसाधारण लेखांकन तत्वाच्या तरतूदीनुसार संस्थेच्या आर्थिक बाबीची सत्य व रास्त वस्तुस्थिती दर्शविण्यांत जमा आणि खर्च लेखे, उत्पन्न व खर्च लेखे आणि ताळेबंद पत्रक तयार करणे आवश्यक आहे.मात्र मंडळामध्ये मुंबई खादी आणि ग्रामोद्योग अधिनियमाच्या तरतूदीनुसार जमा आणि खर्च लेखे व ताळेबंदपत्रक तयार करण्यांत येते. जमा आणि खर्च लेखे प्रत्यक्ष रोख रक्कम व्यवहारावरुन तयार करण्यांत येतात. त्यामध्ये उत्पन्न व खर्चाचे अपेक्षित येणे/देणे व्यवहार समाविष्ट नसल्यामुळे मंडळाच्या लेख्यावरुन मंडळाच्या आर्थिक स्थितीचे सत्यचित्र स्पष्ट होत नाही. मंडळाच्या आर्थिक स्थितीचे सत्य बिनचूक चित्र स्पष्ट होण्याकरिता मंडळाने उत्पन्न व खर्च लेखे तयार करावेत असा सल्ला देण्यात येत आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, मंडळ त्यांचे वार्षिक लेखे, आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक मंडळाच्या नियमामध्ये नमूद केलेल्या विहीत नमुन्यात तयार करील. आयव्यय पत्रक ही संज्ञा मंडळाच्या अधिनियमातील १९७७ मधील दुरुस्ती अन्वये नफा तोटा पत्रकाऐवजी आयव्यय पत्रक तयार करण्यात यावे अशी करण्यात आली आहे (या दुरुस्ती पूर्वी पासूनही मंडळामार्फत त्याच्या अकाऊंट मॅन्युअल नुसार आयव्यय पत्रक तयार केले जात होते.) कलम २५ (२) नुसार मंडळाने त्यांच्या व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खाते निहाय केंद्राचे लेखे वाणिज्यीक तत्वावर तयार केलेली आहेत. मंडळाने कायद्यातील स्वायत्त तरतूदीचे याद्वारे पालन केलेले आहे.

केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग आयोग कार्यालयाने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या विहीत नमुन्यानुसार केंद्रीय स्वायत्त संस्थांनी ज्याप्रमाणे लेखे तयार करणे आवश्यक आहे, ती पध्दत सन २००७-०८ या वर्षापासून अवलंबिण्यास सुरुवात केली आहे. ज्या योगे आता उत्पन्न व खर्च पत्रक तयार केले जाते. महालेखाकार यांची सूचना व खादी व ग्रामोद्योग आयोगाने अवलंबिलेली पध्दत विचारात घेता पूर्वीच्या प्रचलित पध्दती ऐवजी हे उत्पन्न व खर्च पत्रक तयार करण्याबाबत मंडळाच्या नियमामध्ये दुरुस्ती करणे प्रस्तावित आहे. ही पध्दत अवलंबिल्यामुळे राज्य शासनावर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडणार नाही, या अटीवर राज्य शासनाच्या अर्थ विभागाने या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यांत आला असून त्यांची मान्यता मिळाल्यानंतर मंडळाच्या नियमामध्ये त्यानुसार आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल. या अनुषंगाने मंडळाच्या लेख्यांमध्ये एखादे सहपत्र किंवा लेखा विषयक टिप्पणी मंडळाच्या लेखांकन पध्दतीमध्ये समाविष्ट करणे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या अधिनियमातील कलम-२५ मध्ये मंडळाचे लेखे व मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे विशिष्ट पध्दतीने तयार करणे बाबत स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे वाणिज्यीक पध्दतीने तयार करण्याबाबत उल्लेख करण्यांत आला आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे देखील व्यापारी तत्वावर ठेवले जातात, याची कृपया नोंद घ्यावी. खादी व ग्रामोद्योग आयोगाने त्यांचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना जी लेखांकन पध्दत अवलंबिली आहे. त्यामध्ये त्यांची मालमत्ता ही खरेदीच्या किंमतीवरच दर्शविली असून त्यावर घसारा आकारण्यांत आलेला नाही. तथापि मंडळाने देखील भविष्यात त्यांची लेखांकन पध्दत संभाव्य येणी व देणी तयार करण्याबाबतच्या शक्यता व अंमलबजावणी पडताळण्याबाबत मंडळाची लेखे ठेवण्याची कार्यपध्दती, निधीची उपलब्धता या संदर्भात महालेखापाल व खादी व ग्रामोद्योग आयोग यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मंडळाकडे विचारणा केली आहे.

५.२ ताळेबंद पत्रक

५.२.१ मालमत्ता :-

१. मंडळाचे लेख्यामध्ये (सहपत्र १३) रु १३०.८७ लाख रक्कमेची जंगम मालमत्ता दाखविली आहे. मात्र मालमत्ता रजिस्टर अपूर्ण होते त्यामुळे तपासणी करणे शक्य झाले नाही.

भांडवली मालमत्तेवरील घसारा :-

शासनाने विहीत केलेल्या लेख्यांच्या नमुन्यामध्ये अधिनियमानुसार मालमत्तेवरील घसारा काढण्याची तरतूद नाही. त्यामुळे मंडळाच्या लेख्यांमध्ये मालमत्तेचे पुस्तकी मुल्य दाखविण्यांत येते आणि पडून असलेली, वापरात नसलेली, दुरुस्तीला अयोग्य आणि खराब झालेली वस्तु वगळण्यांत आलेली नाही आणि भांडवली लेख्यांमधून सुध्दा धसाऱ्याची रक्कम कमी केलेली नाही. त्यामुळे भांडवल व मालमत्ता यांची रक्कम जास्त दिसत नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने मालमत्ता रजिस्टर पूर्ण केले असून सन २००३-०४ चे मंडळाचे लेखे तपासण्यासाठी आलेल्या महालेखापाल यांच्या तपासणी पथकास दाखविले आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.२.२ दायित्वे :-

(१) खादी आयोगास परतफेड करावयाची कर्जे :-

वेगवेगळया योजनेखाली लाभार्थींना वितरण करण्याकरिता मंडळास खादी आयोगाकडून कर्ज प्राप्त होते. खादी आयोगाकडून मिळालेले कर्ज त्यांना परतफेडीसाठी प्राप्त आहे आणि मंडळाने वाटप केलेले कर्ज लाभार्थीकडून वसुलीस प्राप्त आहे. खादी आयोगाकडून प्राप्त कर्ज रक्कम पेक्षा मंडळाने लाभार्थींना वाटप केलेली कर्ज रक्कम खादी आयोगाकडून जास्त येणे बाकी आहे आणि ही रक्कम मंडळाच्या लेख्यांमध्ये मालमत्ता बाजूस खादी आयोगाकडून येणे बाकी दाखविणे आवश्यक आहे. जादा कर्जाच्या चुकीचे समायोजनाबाबत यापूर्वी सन १९९६-९७ आणि १९९७-९८ (परिच्छेद ५.१) च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये आक्षेप घेतलेला आहे. सन १९९८-९९ च्या लेख्यांमध्ये सुध्दा ही रक्कम खादी आयोगास देणे बाकी कर्जामध्ये समायोजन करुन दाखविलेली आहे आणि खादी आयोगास देय रक्कम रु.६५६१.४३ लाख एवढी रक्कम देय असतांनाही रु.६०१६.३३ लाख निव्वळ देय दाखविली आहे. त्यामुळे रु.५४५.१० लाख एवढया रक्कमेने दायित्व व मालमत्ता कमी दिसत आहे.

(२) ग्रामोद्योग कर्जे

ग्रामोद्योग कर्जापोटी खादी आयोगास दि.३१/३/१९९८ अखेर रु.४९१५.३४ लाख देणे शिल्लक होते. तथापि खादी आयोगाने कर्ज शिल्लक रु ४५१०.८ लाख कळविले होते. मार्च, १९९९ अखेर पडताळा अपूर्ण असल्यामुळे

रु.४०४.७६ लाख कर्ज दायित्व रु ४७७९.४२ मध्ये मिळवून दाखविले आहेत. त्यामुळे कर्ज दायित्वाची रक्कम वाढवून दाखविली आहे.

फरक रक्कमेचा पडताळा घेण्यांत येत आहे असे मंडळाकडून सांगण्यांत आले (सप्टेंबर १९९९)

(३) **दायित्वापेक्षा जादा मालमत्ता** दायित्वापेक्षा जादा मालमत्ता रक्कम रु.१६३.२६ लाख मध्ये रु.८.९२ लाख सन १९७८ पूर्वीच फरकाची रक्कम समाविष्ट असून त्याचा पडताळा घेण्यांत आलेला नाही.

(४) राखीव निधी कमी दाखविणे

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० मधील नियम १८/२ अन्वये मंडळास प्राप्त होणारी सर्व संकीर्ण जमा रक्कम राखीव निधीत जमा करावी लागते. सन १९९६-९७ (परिच्छेद ५.१) (vi) आणि सन १९९७-९८ (परिच्छेद ५.२) च्या लेखापरीक्षण अहवालात नमूद करुनसुध्दा एकत्रित संकीर्ण जमा रक्कम रु ४२.५० लाख राखीव निधीत जमा करण्यांत आलेली नाही. त्यामुळे तेवढया रक्कमेने राखीव निधी कमी दिसून येतो व मंडळाचे देणे देखील कमी दिसते.

शासनाकडून अनुदानाची रक्कम उशिरा मिळत असल्यामुळे संकीर्ण जमा रक्कम तात्पुरत्या स्वरुपात प्रशासकीय खर्चाकरीता वापरण्यात येते. मात्र शासनाकडून निधी प्राप्त होताच ही रक्कम परत केली जाते असे मंडळाकडून सांगण्यात आले. (सप्टेंबर, १९९९) परंतु ही बाब वरील नमूद सांविधिक नियमाच्या विरुध्द आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

१) खादी आयोग व मंडळ यांच्या येणे व देणे रक्कमांचा ताळमेळ घालण्याचे काम मंडळाकडून चालू आहे. ज्या रक्कमांमध्ये तफावत आढळून आली, त्याच्या योग्य तपासणीचे काम चालू आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही..

२) खादी आयोग व मंडळ यांच्या येणे व देणे रक्कमांचा ताळमेळ घालण्याचे काम मंडळाकडून चालू आहे. ज्या रक्कमांमध्ये तफावत आढळून आली आहे त्याच्या योग्य तपासणीचे काम चालू आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही..

३) मंडळाच्या जंगम मालमत्तेमध्ये असलेला फरक मंडळाने सन २००५-०६ च्या लेख्यांमध्ये योग्य त्या शिर्षाखली समायोजित केला आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

४) किरकोळ लेखा शिर्षकाखाली दि.३१/३/२००४ अखेर जमा झालेली सर्व रक्कम रु.३७.७२ लाख ही सन २००३-०४ या वर्षी मंडळाने राखीव निधी खात्यास वर्ग केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.२.३ लेख्यामध्ये दिसणारी वजा शिल्लक :-

(अ) अखर्चित अनुदानाची शिल्लक रक्कम

खादी आयोगाकडून प्राप्त अखर्चित अनुदान रुपये (-) ४१.४६ लाख दाखविले आहे. व्याज उपदान व प्रशासकीय खर्चापोटी रु ४९.१७ लाख वजा शिल्लकेमुळे ही रक्कम दिसत आहे. सदरची वजा रक्कम इंप्रेस्ट (खादी) या शिर्षकाखाली नोंद न झाल्यामुळे सन १९९२-९३ पासून गैरवर्गीकृत झालेली आहे. सन १९९९-२००० च्या लेख्यांमध्ये योग्य ते समायोजन करण्यांत येईल असे मंडळाकडून सांगण्यांत आले (सप्टेंबर, १९९९).

(ब) धनको

१) ठेव इंम्प्रेस्टची रक्कम रुपये (-) १४.०८ लाख चुकीने गैरवर्गीकरणामुळे धनको शिल्लक रक्कम रु १२२.४४ लाख मध्ये समायोजित केली आहे. त्यामुळे धनकोची शिल्लक रक्कम बिनचूक दर्शविण्यांत आलेली नाही. सन १९९९-२००० च्या लेख्यांमध्ये दुरुस्ती करुन समायोजन करण्याचे मंडळाने मान्य केले आहे.

२) धनको रक्कमेमध्ये रु.२८.३२ लाख निलंबन लेख्याची रक्कमसुध्दा समाविष्ट आहे. ही रक्कम खादी आयोग (रु १७.१३ लाख) राज्य शासन (नॉर्मल) (रु.२.८८ लाख) आणि राज्य शासन (रेशीम) (रु.८.३१ लाख) संबंधित असून उद्योगवार तपशील जिल्हा कार्यालयाकडून उपलब्ध नसल्यामुळे निलंबन लेख्याखाती शिल्लक आहेत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

१) आक्षेपामध्ये दर्शविलेल्या (-) रक्कमेबाबतची योग्य ती दुरुस्ती मंडळाने सन १९९९-२००० च्या लेख्यांमध्ये केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही..

२) आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे मंडळाने सन १९९९-२००० च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही..

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या रक्कमेपैकी रु.२.८८ लाख हे राज्य शासन निधीचे असून रु.८.३१ लाख हे रेशीम योजनेचे होते. ते सन २०००-०१ च्या लेख्यांमध्ये त्याचे मंडळाने योग्य ते समायोजन केले आहे तसेच निलंबन लेखा शिर्षकाखाली असलेली रु.१४.१३ लाख रक्कम संबंधित शिर्षकाखाली त्वरीत समायोजित करण्याबाबत मंडळास आदेश देण्यांत येत आहे.

५.२.४ अंबर चरखा केंद्र लेखे

खादी आयोगाकडून पुरस्कृत प्रत्येक केंद्रावर २५ चरखे याप्रमाणे एकूण ८२ अंबर चरखा केंद्राची सन १९८९-९० मध्ये स्थापना केली. या केंद्राचे लेखे एकत्रित केले नसून ते मंडळाच्या लेख्यामध्ये समाविष्ट केलेले नाहीत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने सन १९८९-९० या साली ही योजना प्रायोगिक तत्वावर सुरु केली होती. त्यासाठी केंद्रप्रमुख म्हणून तात्पुरत्या स्वरुपात एकत्रित वेतनावर कर्मचा-यांची नियुक्ती करण्यांत आली होती. तथापि अपु-या निधीमुळे प्रायोगिक तत्वावर चालू केलेली ही योजना मंडळाने सन १९९२-९३ मध्ये बंद केली. केंद्र प्रमुखांना केंद्राच्या दैनंदिन व्यवहारासाठी ज्या रक्कमा दिल्या, त्या संबंधित वर्षाच्या मंडळाच्या लेख्यांमध्ये खर्ची टाकल्या आहेत. मात्र या रक्कमांमधून केंद्र प्रमुखांनी केलेल्या बाबनिहाय खर्चाची नोंद मंडळाच्या लेख्यांमध्ये घेण्यांत आली नाही. कारण ही योजना बंद झाल्यामुळे सदर केंद्र प्रमुखांच्या सेवा त्वरित खंडीत करण्यांत आल्या. तसेच काही केंद्र प्रमुखांनी मंडळाच्या नियमित सेवेत घेणेबाबत न्यायालयात दावा दाखल केल्यामुळे व त्यांनी असहकाराची भूमिका घेतल्यामुळे त्यांच्याकडून वरील बाबनिहाय खर्चाचा तपशील संकलीत करण्यामध्ये अडचणी आल्या. आता मंडळाने संबंधित जिल्हा कार्यालयांकडून खर्चाचा तपशील संकलीत केला असून त्याची योग्य ती छाननी करुन तो सन २००८-०९ च्या लेख्यांमध्ये मंडळाकडून समायोजित केला जाईल.

५.३ खाते निहाय केंद्राचे लेखे :-

५.३.१ हातकागद संस्था पुणे

१) दिनांक ३१ मार्च, १९९८ अखेर जादा संबंधित ऋणको राखीव निधीची तरतूद केलेली रक्कम रु.२.७७ लाख सन १९९८-९९ मध्ये स्थळ टिपणीव्दारे नमूद न करता परत उत्पन्नापोटी जमा घेतली आहे. त्यामुळे तेवढया रक्कमेने नफ्यामध्ये वाढ झाली आहे.

संशयीत ऋणकोकरिता राखीव तरतूद रु १.९१ लाख ताळेबंद पत्रकात दायित्वे बाजूस दाखविण्याऐवजी ही रक्कम संकीर्ण ऋणकोच्या एकूण रक्कमेमधून कमी केली आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

याबाबत मंडळाने आवश्यक ती कार्यवाही पूर्ण केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.३.२ मधमाशापालन संचालनालय, महाबळेश्वर

१) सन १९९७-९८ वर्षाकरिता मुदतठेव रक्कमेवरील येणे व्याज रु ०.१२ लाख सन १९९८-९९ च्या उत्पन्नामध्ये अंतर्भूत केले आहे. मात्र सन १९९८-९९ वर्षाकरिता मुदत ठेवीवरील येणे व्याज रु ०.०८ लाख उत्पन्नापोटी जमा केलेले नाही. त्यामुळे उत्पन्न रु ०.०४ लाखाने जास्त आणि मालमत्ता व येणे रु ०.०८ लाखाने कमी दाखविले आहे.

२) सन १९९८-९९ च्या लेख्यांमागे मागील वर्षाच्या संबंधित वाहन व देखभाल व इंधन खर्च रु ०.०८ लाख विचारात घेतला आहे. मात्र चालू वर्षाचा खर्च रु ०.०५ लाख विचारात घेतलेला नाही. त्यामुळे रु ००.०७ लाख जास्त उत्पन्न दिसत आहे.

३) खादी सवलती पोटी येणे रक्कम रु.०.२४ लाख नफा तोटा लेख्यांत विचारात घेतलेली नाही. त्यामुळे तेवढया रक्कमेने चालू वर्षाचा नफा कमी दिसत आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे मंडळाने आता योग्य ती पध्दत अवलंबिली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.३.३ पणन विभाग, मुंबई

१. जिल्हा कार्यालयातील पणन विभागाचे लेखे मंडळाचे पणन विभागाच्या लेख्यांमध्ये समाविष्ट केलेले नाहीत.
२. व्यापारी पत्रकामध्ये खरेदी (रु २७.२८ लाख) आणि विक्री (रु २७.१९ लाख) दर्शविली आहे. खरेदी आणि विक्रीचे रजिस्टर अपूर्ण असल्यामुळे रक्कमा तपासता आल्या नाहीत.
३. शिल्लक माल रु.१४.८१ लाख हा सन १९८९-९० पासून पडून असून लेख्यांमध्ये दाखविण्यांत आला आहे. परंतु स्टॉक रजिस्टर उपलब्ध न केल्यामुळे त्याची पडताळणी लेखा परीक्षणामध्ये करता आली नाही..
४. शिल्लक साठा रु.१४.८१ लाखापैकी १) यापूर्वी विक्री केलेल्या मधाची किंमत रु.४.६० समायोजन केलेली नाही. २) मच्छरदाणी जाळे आणि मच्छरदाणी कापड निकाली काढण्यांत आले असून रु.५.८६ लेख्यांमधून निर्लेखित करावयाचे आहे. त्यामुळे चालू मालमत्ता रु १.०४६ लाखाने जादा दाखविण्यांत आली आहे. त्यामुळे विक्रीतील उत्पन्न व तोटा अनुक्रमे रु ४.६० लाख व ५.८६ लाखाने कमी दाखविण्यांत आला आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

१) जिल्हा कार्यालयातील पणनचे लेखे मुख्य कार्यालयाच्या लेख्यांमध्ये मंडळाने समाविष्ट केले आहेत. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

२) मंडळाने सन २०००-२००१ पासून खरेदी व विक्रीची रजिस्टर ठेवलेली आहेत व महालेखापाल यांनी तेव्हापासून पुन्हा हा आक्षेप घेतलेला नाही.

३) मंडळाने स्टॉक रजिस्टर अद्यावत ठेवले असून महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही..

४) आक्षेपामध्ये दर्शविलेल्या मालमत्तेच्या सर्व रक्कमांची नोंद मंडळाने सन २०००-०१ च्या लेख्यांमध्ये योग्यरित्या घेतली आहे व महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५) व्याज उपदानाच्या रक्कमांचे दावे मंडळाने दि.८/५/२००० रोजी खादी आयोगास पाठविले आहेत व महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९९-२००० या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत :-

५.१ लेखांकन तत्वे

५.१.१ मंडळाच्या सन १९९८-९९ या वर्षाच्या लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवाल परिच्छेद ५.१ मध्ये स्पष्टीकरण देऊनसुध्दा मंडळाने (व्यापारी तत्वावर चालणारी खातेनिहाय केंद्रांखेरीज) जमा आणि खर्च लेखे व ताळेबंदपत्रक रोख तत्वावर तयार केलेले आहे. म्हणून मंडळास पुन्हा सल्ला देण्यांत येतो की, मडळाचे लेखे (ॲक्रुअल) तत्वावर तयार करुन उत्पन्न व खर्च पध्दतीने लेखे ठेवण्यांत यावेत.

५.१.२ लेखाविषयक महत्वाची धोरणे :-

मंडळाचे लेखे रोख/ॲक्चुअल तत्वावर आधारीत आहेत. जंगम व स्थावर मालमत्ता व वस्तुंची किंमत ठरविण्याची तत्वे, घसारा आकारणी, गुंतवणूक इत्यादी बाबी कोणत्या सर्वसाधारण सार्थ ठरणा-या लेखांकन धोरणानुसार तयार करण्यांत येतात आणि मंडळाची पत/दर्जा ठरविणे एखाद्या कायद्यामधून सूट घेणे, चालू दायित्वे बाबत उपाय इत्यादी बाबी करिता लेख्यांवरील टिप्पणी मंडळाच्या लेख्यासोबत जोडणे आवश्यक आहे. परंतु मंडळाने सन १९९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये परिच्छेद क्र ५.१ मध्ये भाष्य केलेले असतांना सुध्दा सदरची टिप्पणी लेख्यासोबत जोडलेली नाही. म्हणून मंडळास पुन्हा एकदा सल्ला देण्यांत येतो की, त्यांनी लेखांकन तत्वासह लेख्यांसोबत नोट ऑन अकाऊंट जोडावी.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, मंडळ त्यांचे वार्षिक लेखे, आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक मंडळाच्या नियमामध्ये नमूद केलेल्या विहीत नमुन्यात तयार करील. आयव्यय पत्रक ही संज्ञा मंडळाच्या अधिनियमातील १९७७ मधील दुरुस्ती अन्वये नफा तोटा पत्रकाऐवजी आयव्यय पत्रक तयार करण्यात यावे अशी करण्यात आली आहे (या दुरुस्ती पूर्वी पासूनही मंडळामार्फत त्याच्या अकाऊंट मॅन्युअल नुसार आयव्यय पत्रक तयार केले जात होते.) कलम २५ (२) नुसार मंडळाने त्यांच्या व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खाते निहाय केंद्राचे लेखे वाणिज्यीक तत्वावर तयार केलेले आहे. मंडळाने कायद्यातील स्वायत्त तरतूदीचे याद्वारे पालन केलेले आहे.

केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग आयोग कार्यालयाने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या विहीत नमुन्यानुसार केंद्रीय स्वायत्त संस्थांनी ज्याप्रमाणे लेखे तयार करणे आवश्यक आहे, ती पध्दत सन २००७-०८ या वर्षापासून अवलंबिण्यास सुरुवात केली आहे. ज्या योगे आता उत्पन्न व खर्च पत्रक तयार केले जाते. महालेखाकार यांची सूचना व खादी व ग्रामोद्योग आयोगाने अवलंबिलेली पध्दत विचारात घेता पूर्वीच्या प्रचलीत पध्दती ऐवजी हे उत्पन्न व खर्च पत्रक तयार करण्याबाबत मंडळाच्या नियमामध्ये दुरुस्ती करणे प्रस्तावित आहे. ही पध्दत अवलंबिल्यामुळे राज्य शासनावर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडणार नाही. या अटीवर राज्य शासनाच्या अर्थ विभागाने या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यांत आला असून त्यांची मान्यता मिळाल्यानंतर मंडळाच्या नियमामध्ये त्यानुसार आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल या अनुषंगाने मंडळाच्या लेख्यांमध्ये एखादे सहपत्र किंवा लेखा विषयक टिप्पणी मंडळाच्या लेखाकंन पध्दतीमध्ये समाविष्ट करणे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या अधिनियमातील कलम-२५ मध्ये मंडळाचे लेखे व मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे विशिष्ट पध्दतीने तयार करणे बाबत स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे वाणिज्यीक पध्दतीने तयार करण्याबाबत उल्लेख करण्यांत आला आह. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखेदेखील व्यापारी तत्वावर ठेवले जातात याची कृपया नोंद घ्यावी. खादी व ग्रामोद्योग आयोगाने त्यांचे सन २००७-०८ चे लेखे

तयार करतांना जी लेखांकन पध्दत अवलंबिली आहे, त्यामध्ये त्यांची मालमत्ता ही खरेदीच्या किंमतीवरच दर्शविली असून त्यावर घसारा आकारण्यांत आलेला नाही. तथापि मंडळाने देखील भविष्यात त्यांची लेखांकन पध्दत संभाव्य येणी व देणी तयार करण्याबाबतची शक्यता व अंमलबजावणी पडताळण्याबाबत मंडळाची लेखे ठेवण्याची कार्यपध्दती, निधीची उपलब्धता या संदर्भात महालेखापाल व खादी व ग्रामोद्याग आयोग यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मंडळाकडे विचारणा केली आहे.

५.२ ताळेबंद पत्रक

५.२.१ मालमत्ता

भांडवली मालमत्तेवरील घसारा

१) सन १९९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवाल परिच्छेद ५.२ (१) मध्ये निदर्शनास आणूनसुध्दा मंडळाने लेख्यामध्ये पुस्तकी किंमत दाखविणे चालू ठेवलेले आहे. पडून असलेली व वापरात नसलेली ,दुरुस्तीला अयोग्य आणि खराब वस्तू एकूण मालमत्तेमधून वगळण्यांत आलेली नाही. आणि भांडवली लेख्यामधून सुध्दा घसा-याची रक्कम कमी केलेली नाही. त्यामुळे भांडवल व मालमत्ता यांची रक्कम लेख्यामध्ये जास्त दर्शविण्यांत आली आहे.

२) लेखापरीक्षण अहवाल सन १९९८-९९ मधील परिच्छेद क्रमांक ५.२.१ (i) मध्ये भाष्य केलेले आहे. तरीसुध्दा मंडळाच्या लेख्यामध्ये जंगम मालमत्ता (सहपत्र १३ मध्ये) रुपये १३१.९३ लाख असून मालमत्ता रजिस्टर अपूर्ण असल्यामुळे तपासणी करता आलेली नाही.

३) मंडळाच्या जंगम मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी करण्यांत आली नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने स्थावर मालमत्ता रजिस्टर सन २००३-०४ या वर्षी पूर्ण केले असून महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने जंगम मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी केली असून मालमत्ता रजिस्टर सन २००३-०४ या वर्षात पूर्ण केले असून महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

४) **स्थावर मालमत्ता**

अ) मंडळाने उद्योग भवन, नागपूर येथे १९४.०५ चौरस मीटरएवढी जागा महाराष्ट्र राज्य उद्योग विकास महामंडळाकडून रुपये ११.३१ लाख एवढया रक्कमेस सन १९९९-२००० मध्ये खरेदी केलेली आहे. तथापि मंडळाच्या लेख्यांमध्ये सदर मालमत्तेची किंमत रुपये ७.८६ लाख दर्शविलेली आहे. त्यामुळे रुपये ३.४५ लाख एवढया रक्कमेने मालमत्ता किंमत कमी दाखविलेली आहे.

ब) मंडळाकडील रेशीम विभाग वर्ग झाल्यामुळे जून, १९९८ मध्ये सासवड, जिल्हा पुणे येथील जमीन/ईमारत किंमत रक्कम रुपये ७.६३ लाख शासनाकडे वर्ग केलेली आहे. परंतु सदरची मालमत्ता मंडळाच्या लेख्यांमध्ये अद्यापही दाखविण्यांत येत आहे. त्यामुळे रुपये ७.६३ लाखाने मालमत्ता जादा दर्शविण्यांत आलेली आहे.

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या मुद्यांबाबतची दुरुस्ती मंडळाने सन २०००-०१ च्या लेख्यांमध्ये केली असून महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.२.२ (दायित्वे)

अ अविनियोजीत शिल्लक अनुदान

१) खादी आयोगाकडून प्राप्त अविनियोजीत रक्कम रुपये ६.६६ लाख नॉर्मल योजनाखाली दाखविलेली आहे ही रक्कम खादी आयोगास देय नाही. त्यामुळे सदरच्या रक्कमेएवढी दायित्वाची रक्कम वाढवून दाखविली आहे.

२) खादी आयोगाकडून इंप्रेस्ट व व्याज उपदानापोटी प्राप्त झालेल्या रक्कमेचे लेख्यांमध्ये चुकीचे वर्गीकरण झाल्यामुळे व्याज उपदानापोटी वजा रक्कम रुपये २९.८८ लाख शिल्लक दिसत आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

दोन्ही शीर्षाच्या तपशिलवार तपासणीनंतर रु.६.६६ लाख रक्कम नॉर्मल इम्प्रेस्ट या शीर्षामध्ये पूर्वीच समाविष्ट झाल्याचे आढळून आले. आता यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्यात आली आहे. रु (-).२३.२२ लाख फरकाची रक्कम सन २०००-०१ च्या लेख्यामध्ये दर्शविली आहे.

खालीलप्रमाणे दर्शविलेल्या व्याज उपदानाच्या चुकीच्या वर्गीकरणामुळे (-) रु.२९.८८ लाख दिसून येत होते.

१. पणन विभागास वर्ग केलेले रु १५.०० लाख, सन १९९९-२००० मध्ये पुन्हा खादी आयोग निधीस वर्ग केले व्याज उपदानाची अखर्चित रक्कम रु ७८.४१ लाख ही चुकीने सहपत्र-४ मध्ये दर्शविण्यात आली होती. जी सहपत्र -५ ला वर्ग करण्यांत आली सहपत्र ९ मध्ये निलंबन लेखा शिर्षकाखाली दाखविण्यात आलेल्या रु ८.९४ लाख रक्कमेचा शोध घेवून ही व्याज उपदानाची रक्कम सहपत्र-५ मध्ये दर्शविण्यांत आली या समायोजनामुळे व्याज उपदान या शीर्षाखाली अंतिम शिल्लक सन २०००-२००१ मध्ये रु.१.५० लाख दिसून येत आहे.

ब) निलंबन लेखे

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी लाभार्थीकडून वसुली केलेली रक्कम मुख्य कार्यालयाकडे पाठवितेवेळी उद्योगनिहाय माहिती न दिल्यामुळे ती रक्कम या शिर्षकाखाली नोंद घेण्यांत येते. ही रक्कम खादी आयोग/राज्य शासन यांना देय आहे.

लेखापरीक्षण अहवाल सन १९९८-९९ परिच्छेद क्र.५.२.३ (ब) (ii) मध्ये निलंबन लेख्याखाली दि.३१ मार्च, १९९९ अखेर शिल्लक रक्कम रुपये २८.३२ लाख बाबत भाष्य केलेले असून सुध्दा मंडळाने निलंबनाखालील रक्कमेचा निपटारा करण्याऐवजी वाढ झालेली असून दि.३१ मार्च, २००० अखेर रुपये ४२.५२ लाख निलंबन शिर्षकाखालील शिल्लक आहे. त्यामुळे धनकोची शिल्लक रक्कम बिनचूक दर्शविण्यांत आलेली नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

निलंबन लेखा शिर्षकामधील रक्कम सन २००७-०८ अखेर मंडळाने रु.९.०३ लाख एवढी कमी केली आहे. ही रक्कम त्वरित निरंक करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

५.२.३ इतर निधीचे लेखे (१ टक्का विकास निधी)

१ टक्का विकास निधीचे लेखे ॲक्रुअल पध्दतीने ठेवलेले आहेत. दिनांक ३१ मार्च, २००० अखेर गुंतवणूकीवर एकूण रुपये २.९९ लाख व्याजाची रक्कम असून त्यामध्ये रुपये १.८० लाख येणे बाकी व्याज रक्कम आहे. ही रक्कम लेख्यामध्ये विचारात घेतलेली नाही. त्यामुळे चालू मालमत्ता रक्कम कमी दिसत आहे. त्याचप्रमाणे सन १९९९-२००० मध्ये रु ०.३९ लाख एवढया रक्कमेच्या उत्पन्नापेक्षा जादा खर्च विचारात घेता लेख्यांमध्ये रुपये १.४१ लाख एवढी रक्कम खर्चापेक्षा उत्पन्न कमी दाखविलेले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या १ टक्का सेवा आकाराच्या लेख्यांमध्ये सन २०००-०१ मध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.२.४ व्यापारी तत्वावर चालणारी खाते निहाय केंद्रे

अ) बंद खाते निहाय केंद्रे

(एक) ३ ते २१ वर्षाच्या कालावधीत खालील सहा खाते निहाय केंद्रे बंद आहेत.

१) न्यू मॉडेल चरखा केंद्र, तासगांव, जिल्हा सांगली

२) न्यू मॉडेल चरखा केंद्र, मुंबई

३) चुना उत्पादन प्रशिक्षण केंद्र, रत्नागिरी

४) पणन विभाग, मुंबई

५) हातकागद संस्था, अमरावती

६) हातकागद संस्था परभणी कार्यरत नसून बंद आहेत.

या केंद्रांचे स्वतंत्र लेखे (उत्पादन/व्यापारी पत्रक, नफा व तोटा पत्रक आणि ताळेबंद पत्रक) तयार करुन मंडळाच्या लेख्यांसह जोडलेले आहेत. त्याचप्रमाणे मंडळाच्या एकत्रित ताळेबंदामध्ये प्रतिबिंबीत झालेले आहेत. मंडळाने लेखे बंद करण्याबाबत आणि दायित्वे व मालमत्ता मंडळाच्या लेख्यांमध्ये वर्ग करण्याबाबत अद्याप कार्यवाही केलेली नाही.

(दोन) मंडळाच्या पणन विभागाचे ताळेबंद पत्रकात रुपये १२.३१ लाख किंमतीच्या शिल्लक साठयामध्ये रुपये ९.१५ लाख एवढया किंमतीचा साठा निर्लेखित करावयाचा आहे. यामध्ये मध विक्री पोटी झालेला तोटा (रुपये ४.६० लाख), विल्हेवाट लावलेली मच्छरदाणीची जाळी (रुपये ३.३७ लाख), सन १९९३-९४ मध्ये जादा किंमत दाखविलेला शिल्लक साठा (रुपये १.१८ लाख) समाविष्ट आहे. यामुळे शिल्लक साठा किंमत रुपये ९.१५ लाख जादा दिसत आहे.

ब) **कंबल उत्पादन केंद्र, उमरेड**

कंबल शिल्लक साठा रक्कम रुपये १.०६ लाखामध्ये १४६ खराब कंबलची रक्कम रुपये ०.३८ लाख रक्कमेचा समावेश आहे. ही रक्कम निर्लेखित करावयाची आहे. त्यामुळे शिल्लक साठा किंमत ०.३८ लाखाने जादा दाखविण्यांत आली आहे.

क) मधमाशापालन संचालनालय, महाबळेश्वर

१) गुंतवणूकीवरील येणे बाकी व्याज रुपये ०.०३ लाख विचारात न घेतल्यामुळे चालू वर्षाचा नफा कमी दिसत आहे आणि तेवढया रक्कमेने दि.३१ मार्च, २००० अखेरची चालू मालमत्ता कमी दाखविली आहे.

२) लेख्यामध्ये गुंतवणूकीपोटी रुपये १५.४३ लाख दर्शविले आहेत. मात्र प्रत्यक्षात रुपये १५.५६ लाख गुंतवणूक केली आहे. त्यामुळे रुपये ०.१३ लाखाने मालमत्ता किंमत कमी दाखविलेली आहे.

३) घसारा निधीवरील प्राप्त व्याज रक्कम रुपये ०.०८ लाख चुकीने नफा तोटा पत्रकी जमा दाखविलेली आहे, त्यामुळे तेवढया रक्कमेमध्ये नफा वाढवून दाखविला आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

बंद असलेल्या केंद्रांपैकी दोन केंद्राचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. उर्वरित ४ केंद्रांबाबतचा निर्णय मंडळाने अद्याप घेतलेला नाही. म्हणून त्यांचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये दर्शविण्यात आले आहेत. याबाबतचा निर्णय त्वरित घेणेबाबत मंडळाला सूचित करण्यात आले आहे.

पणन योजनेमधील शिल्लक माल मंडळाने सन २००२-०३ मध्ये निर्लेखित केला आहे व त्याची लेख्यांमध्ये योग्य ती नोंद घेतली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

कंबल उत्पादन केंद्राचा खराब कंबल मालाचा शिल्लक साठा मंडळाने सन २०००-०१ मध्ये निर्लेखित केला आहे. त्याप्रमाणे मंडळाच्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मुदत ठेवीवर प्राप्त होणारे संभाव्य व्याज सन २०००-०१ च्या लेख्यांमध्ये योग्यरित्या दर्शविले आहे महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

याबाबत योग्य ती दुरूस्ती मंडळाने सन २०००-०१ च्या लेख्यांमध्ये केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन २०००-०१ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

५.१ लेखा पध्दतीबाबत

५.१.१ सन १९९९-२००० च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.१ येथे अभिप्राय दिला असतांना देखील (व्यापारी तत्वावर चालविण्यांत येणारी खातेनिहाय केंद्रांशिवाय) त्यानुसार मंडळाने त्यांचे लेखे हे भविष्यात प्राप्त होणा-या व देय असणाऱ्या (accrual basis) लेख्यांमध्ये समाविष्ट न करता केवळ रोख तत्वावर (cash basis) झालेले व्यवहार समाविष्ट करुन आयव्यय पत्रक व ताळेबंद तयार करण्यांत आले आहे.

५.१.२ अ) लेखा पध्दतीची वैशिष्टये

सर्वसाधारण लेखे ठेवण्याच्या पध्दतीनुसार लेखे तयार करतांना हे लेखे फक्त रोखीने झालेले व्यवहार समाविष्ट करुन तयार केले आहेत (cash basis) की अद्याप प्राप्त न झालेल्या परंतु भविष्यात प्राप्त होणा-या रक्कमा व तसेच अद्याप खर्ची न टाकलेल्या परंतु भविष्यात खर्ची टाकाव्या लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमा (accrual basis) यांचा समावेश करुन तयार केले आहेत का, कायम स्वरुपी मालमत्ता व शिल्लक मालांची किंमत दाखविणारे तक्ते घसाऱ्याची आकारणी, गुंतवणूकीची माहिती याशिवाय संस्थेची सद्यस्थिती कायदेशीर तरतूदीतून सूट मिळत असल्यास अशा बाबींचा तपशील आकस्मिक बाबींवरील खर्चासाठी केलेली तरतूद इत्यादी बाबी या एका लेखा टिपणीत लखांची खास वैशिष्टये म्हणून लेख्यांच्या शेवटी परिशिष्ट स्वरुपात जोडणे आवश्यक आहे. याबाबत सन १९९९-२००० च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र. ५.१.२ मध्ये अभिप्राय दिलेला असतांनाही सन २०००-०१ लेखे त्यानुसार तयार करण्यांत आलेले नाहीत.

मंडळाने या संदर्भात (जुलै, २००१ मध्ये) असे सांगितले की, कंपनी कायदा १९५६ खाली ज्या संस्था नोंदविण्यांत आलेल्या आहेत, अशा संस्थानीच लेख्यांबाबतची वैशिष्ट्ये/तत्वे याबाबतची माहिती देणे आवश्यक आहे. तथापि मंडळ ही एक कंपनी नसून ते विधानसभेने केलेल्या अधिनियमाखाली स्थापन करण्यांत आले आहे.

तथापि हे उत्तर पटणारे नाही. कारण आयव्यय पत्रकात फक्त रोखीने झालेल्या व्यवहारांचा समावेश करण्यांत येतो व त्यात येणे असलेल्या/देय असलेल्या रक्कमांचा तसेच गुंतवणूकीवरील येणे असलेल्या, परंतु अद्याप प्राप्त न झालेल्या व्याजांच्या रक्कमा, तसेच खादी आयोग/राज्य शासनाकडून अद्याप मिळावयाच्या खर्च व अनुदानाच्या रक्कमा त्या वर्षात समायोजन होऊ न शकणाऱ्या आस्थापना बाबींवरील खर्चाच्या रक्कमा इत्यादी बाबींचा समावेश करण्यांत येत नाही. त्यामुळे मंडळाच्या लेख्यांद्वारे मंडळाच्या आर्थिक स्थितीचे खरेखुरे व सत्य दर्शन होत नाही त्यामुळे मंडळास पुन्हा सल्ला देण्यांत येत आहे की, मंडळाच्या आर्थिक स्थितीचे सत्य व खरेखुरे दर्शन व्हावे यासाठी मंडळाने आयव्यय पत्रक तयार करतांना त्यात अद्याप प्राप्त न झालेल्या, परंतु भविष्यात प्राप्त होणा-या रक्कमा व तसेच अद्याप खर्ची न टाकलेल्या परंतु भविष्यात खर्ची टाकाव्या लागणा-या खर्चाच्या रक्कमा (accrual basis) यांचाही समावेश करुन मंडळाने स्पष्ट व पारदर्शक लेखे तयार करावेत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, मंडळ त्यांचे वार्षिक लेखे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक मंडळाच्या नियमामध्ये नमूद

केलेल्या विहीत नमुन्यात तयार करील आयव्यय पत्रक ही संज्ञा मंडळाच्या अधिनियमातील १९७७ मधील दुरुस्ती अन्वये नफा तोटा पत्रकाऐवजी आयव्यय पत्रक तयार करण्यात यावे अशी करण्यात आली आहे (या दुरुस्ती पूर्वी पासूनही मंडळामार्फत त्याच्या अकाऊंट मॅन्युअल नुसार आयव्यय पत्रक तयार केले जात होते.) कलम २५ (२) नुसार मंडळाने त्यांच्या व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खाते निहाय केंद्राचे लेखे वाणिज्यीक तत्वावर तयार केलेले आहे. मंडळाने कायद्यातील स्वायत्त तरतूदींचे याद्वारे पालन केलेले आहे.

केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग आयोग कार्यालयाने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या विहीत नमुन्यानुसार केंद्रीय स्वायत्त संस्थांनी ज्याप्रमाणे लेखे तयार करणे आवश्यक आहे ती पध्दत सन २००७-०८ या वर्षापासून अवलंबिण्यास सुरुवात केली आहे. ज्या योगे आता **उत्पन्न व खर्च** पत्रक तयार केले जाते. महालेखाकार यांची सूचना व खादी व ग्रामोद्योग आयोगाने अवलंबिलेली पध्दत विचारात घेता पूर्वीच्या प्रचलीत पध्दती ऐवजी हे **उत्पन्न व खर्च पत्रक** तयार करण्याबाबत मंडळाच्या नियमामध्ये दुरुस्ती करणे प्रस्तावित आहे. ही पध्दत अवलंबिल्यामुळे राज्य शासनावर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडणार नाही. या अटीवर राज्य शासनाच्या अर्थ विभागाने या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आला असून त्यांची मान्यता मिळाल्यानंतर मंडळाच्या नियमामध्ये त्यानुसार आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल. या अनुषंगाने मंडळाच्या लेख्यांमध्ये एखादे सहपत्र किंवा लेखा विषयक टिप्पणी मंडळाच्या लेखांकन पध्दतीमध्ये समाविष्ट करणे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या अधिनियमातील कलम-२५ मध्ये मंडळाचे लेखे व मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे विशिष्ट पध्दतीने तयार करणे बाबत स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. मंडळाच्या खातेनिहाय केंद्रांचे लेखे वाणिज्यिक पध्दतीने तयार करण्याबाबत उल्लेख करण्यांत आला आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे देखील व्यापारी तत्वावर ठेवले जातात याची कृपया नोंद घ्यावी. खादी व ग्रामोद्योग आयोगाने त्यांचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना जी लेखांकन पध्दत अवलंबिली आहे, त्यामध्ये त्यांची मालमत्ता ही खरेदीच्या किंमतीवरच दर्शविली असून त्यावर **घसारा** आकारण्यांत आलेला नाही. तथापि मंडळाने देखील भविष्यात त्यांची लेखांकन पध्दत संभाव्य येणे व देणी (Accrual) तयार करण्याबाबतची शक्यता व अंमलबजावणी पडताळण्याबाबत मंडळाची लेखे ठेवण्याची कार्यपध्दती, निधीची उपलब्धता या संदर्भात महालेखापाल व खादी व ग्रामोद्याग आयोग यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मंडळाकडे विचारणा केली आहे.

ब) अयोग्य लेखा पध्दती :-

मंडळाने राखीव निधी,कर्मचारी भलाई निधी इ.लेखे ठेवतांना 'जमा खतावणी' आणि खर्च खतावणी दाखविण्यासाठी वेगवेगळी रजिस्टर्स ठेवलेली आहेत. वर्षभरात प्राप्त झालेल्या सर्व रक्कमा या जमा खतावणीमध्ये दाखविण्यांत आल्या असून खर्चाच्या सर्व रक्कमांचा समावेश हा खर्च खतावणी मध्ये करण्यांत आला आहे. तथापि या किर्दीमध्ये आरंभीची व अखेरची शिल्लक काढून ती दाखविण्यांत आलेली नाही.

मंडळाने (सप्टेंबर, २००१ मध्ये) कळविले आहे की, याबाबतच्या तक्त्यामध्ये (शेडयुल्समध्ये) आरंभीची शिल्लक व अखेरची शिल्लक दाखविण्यांत आलेली असल्यामुळे सर्वसाधारण किर्दीमध्ये आरंभीची व अखेरची शिल्लक दर्शविली जात नाही. तथापि हे उत्तर पटणारे नाही. कारण मूळ रेकॉर्डमध्ये (खतावणीमध्ये) आरंभीची व अखेरची शिल्लक न दाखविता केवळ वर्षभरातील व्यवहार दाखविण्यांत आल्यामुळे या निधीमध्ये किती रक्कमा शिल्लक आहेत, याबाबतचे चित्र स्पष्ट होत नाही. त्यामुळे तक्त्यांमध्ये (शेडयूल्समध्ये) दाखविण्यांत आलेली आरंभीची शिल्लक व अखेरची शिल्लक या रक्कमांचा खरेपणा हा मूळ रेकॉर्डमधील रक्कमांशी तुलना करुन पडताळून पहाणे शक्य होत नाही.

त्याचप्रमाणे लेख्यांत बदल (adjustments) नोंदविण्यासाठी आवश्क ती जर्नल एन्ट्री न करता प्रत्यक्ष रक्कमा या त्या प्रमाणात कमी अधिक करुन दाखविण्यांत येतात. उदा. कायम स्वरुपी मालमत्ता खरेदी केली असल्यास किंवा ती वर्षभरात निकाली काढली असल्यास हे बदल कायमस्वरुपी मालमत्तेच्या लेख्यांमध्ये बदलाच्या रक्कमा कमी

अधिक करुन दाखविण्यांत येतात. लेख्यांमधील बदल (adjustments) दाखविण्यासाठी मंडळ सध्या अवलंबित असलेली पध्दत ही चुकीची असून त्याऐवजी असे बदल (adjustments) नोंदविण्यासाठी सक्षम अधिकाऱ्यांनी संमत केलेली जर्नल एन्ट्री लेख्यांमध्ये समाविष्ट करावी असा मंडळास सल्ला देण्यांत येत आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

सन २००८-०९ या वर्षापासून जमा व खर्च नोंद वहीमध्ये आरंभीची व अखेरची शिल्लक दर्शविण्यास मंडळाने सुरुवात केली आहे. मंडळाचे लेखे हे रोख पध्दतीने ठेवले जात असल्यामुळे रक्कमा लेख्यांमध्ये कमी अधिक करण्यासाठी जनरल एंट्री केली जात नाही.

५.२ ताळेबंद पत्रक

५.२.१ मालमत्ता व येणी

१) भांडवल मालमत्तेवरील घसारा

मालमत्तेच्या लेख्यांमध्ये दाखविण्यांत आलेल्या किंमती या त्यांच्या पुस्तकातील किंमती दाखविण्यांत येत असून त्यात निकामी, दुरुस्ती शक्य नसलेल्या, दुसरीकडे हलविणे शक्य नसलेल्या तसेच निरुपयोगी ठरविलेल्या वस्तुंचा समावेश करण्यांत आला असून तो करतांना सन १९९९-२००० च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.२.१ मध्ये सुचविण्यांत आल्याप्रमाणे या भांडवली लेख्यांमध्ये कपातीनुसार घसाऱ्याच्या रक्कमा दर्शविण्यांत आलेल्या नाहीत. दि.३१ मार्च, २००१ रोजी मंडळाच्या स्थावर व जंगम मालमत्तेची किंमत रु.१८३.६५ लाख इतकी घसारा न धरता दर्शविण्यांत आली आहे. त्यामुळे मंडळाच्या भांडवल व मालमत्ता या दोन्हीच्या किंमती त्या प्रमाणात जास्त दर्शविण्यांत आल्या आहेत.

मंडळाने त्यांच्या उत्तरात (जुलै, २००१) असे नमूद केले आहे की, शासनाने संमत केलेल्या लेख्यांच्या तक्त्यामध्ये घसाऱ्यासाठी तरतूद करण्यांत आलेली नाही आणि त्यामुळे भांडवली लेखे घसाऱ्या इतकी कमी करणे शक्य झालेले नाही.

मंडळाचे हे उत्तर समाधानकारक नाही. कारण घसारा न आकारल्यामुळे मालमत्ता आणि भांडवलाच्या रक्कमा या जादा दाखविण्यात आल्या आहेत.

२) स्थावर मालमत्ता (शेडयूल १२)-मालमत्तेच्या किंमती कमी दाखविणे बाबत

बोरिवली येथील (सहपत्र-१२ मधील अ.क्र.१५) मधील इमारतीची किंमत रु १९.४१ लाखांमध्ये या इमारतीसाठी आदा करण्यांत आलेल्या म्युनिसिपल चार्जेसची थकबाकी रु ३.१८ लाखाचा समावेश करण्यांत आलेला नाही. हा खर्च ही इमारत ताब्यात घेण्यासाठी झालेला असून तो खर्च एप्रिल, १९८५ ते फेब्रुवारी, १९९२ म्हणजेच फेब्रुवारी, १९९२ मध्ये ही इमारत ताब्यात घेण्यापूर्वीच्या कालावधीत झालेला आहे. त्यामुळे ही रक्कम रु ३.१८ लाखाचा समावेश या इमारतीच्या किंमतीमध्ये करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे त्या प्रमाणात मालमत्ता कमी दाखविण्यांत आली आहे.

३) स्थावर मालमत्ता - मालमत्तेच्या किंमतीतील विसंगती बाबत

दिनांक ३१ मार्च, २००१ च्या लेख्यांमध्ये पुणे येथील वसतिगृहाच्या इमारतीची किंमत रु ०.९४ लाख दाखविण्यांत आलेली असून या इमारतीचा समावेश मालमत्ता रजिस्टरमध्ये करण्यांत आलेला नसून लेखापरीक्षणाच्या वेळी या इमारतीची सविस्तर माहिती ही देण्यांत आली नाही. त्यामुळे या इमारतीच्या किंमतीच्या सत्यतेबाबत लेखापरीक्षणात तपासणी करता आली नाही.

परिशिष्ट-१२ मध्ये पुणे येथील स्थावर मालमत्तेच्या दाखविण्यांत आलेल्या बाबी व त्यांच्या किंमती या लेखापरीक्षणात ज्या नोंदी दाखविण्यांत आल्या त्याच्याशी जुळत नाही. परिशिष्ट-१२ मधील अ.क्र. १,३ व ५ आणि ६

येथील मालमत्तेच्या किंमती रु २.४३ लाख इतक्या होतात. तर ऑडिटला उपलब्ध करुन देण्यांत आलेल्या रेकॉर्डमध्ये त्यांच्या किंमती त्यांच्या किंमती रु १९.४४ लाख इतक्या दाखविण्यांत आल्या आहेत.

लेखापरीक्षणाच्या वेळी देण्यांत आलेल्या रेकॉर्डनुसार पंढरपूर प्रदर्शनासाठी बांधण्यांत आलेल्या इमारतींची किंमत रु ४.०० लाख दाखविण्यांत आली आहे. तर परिशिष्ट-१२ मध्ये या इमारतीची किंमत रु ६.३५ लाख इतकी दाखविण्यांत आली आहे. यामुळे मंडळाचे लेखे हे स्थावर मालमत्तेच्या किंमती बरोबर दाखवित नाही हे दिसून येते.

४) मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.२.१(२) मध्ये सूचना देण्यांत आलेल्या असतांनाही जनरल मालमत्तेचे रजिस्टर पूर्ण झालेले नसल्यामुळे लेख्यांमध्ये (शेडयूल-१३) रु. १३७.५९ लाखाची जी जंगम मालमत्ता दाखविण्यांत आली आहे, त्याची खातरजमा करणे शक्य झाले नाही.

सन १९९९-२००० च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक ५.२.१.(३)मध्ये सूचित करण्यांत आले असूनही जंगम मालमत्तेची तपासणी करण्याचे काम करण्यांत आले नव्हते.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

पुणे येथील वसतिगृह इमारतीची नोंद मंडळाने सन २००२-०३ मध्ये घेतली आहे. व महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाच्या मालमत्ता रजिस्टरमध्ये योग्य त्या दुरुस्त्या करुन सन २००२-०३ मध्ये रजिस्टर्स अद्ययावत केली आहेत. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

पंढरपूर प्रदर्शन येथे बांधलेल्या इमारती ऑडिटला दाखविलेली किंमत ही तात्पुरती किंमत होती. मात्र त्याचा प्रत्यक्ष खर्च हा रु.६.३५ लाख असून तो मंडळाने लेख्यांमध्ये बरोबर दर्शविला आहे.

जंगम मालमत्तेची रजिस्टर मंडळाने सन २००३-०४ या वर्षात पूर्ण केली आहेत व महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मालमत्तेची रजिस्टर मंडळाने सन २००३-०४ या वर्षात पूर्ण केली आहेत व महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

५.२.२ नॉर्मल योजनेखाली कर्जाची थकबाकी-मालमत्तेच्या किंमतीत वाढ

खादी आयोगाच्या नॉर्मल योजनेखाली मंडळास निधी उपलब्ध करुन देण्यांत आला असून मंडळाने हा निधी सन १९७८-७९ ते १९९४-९५ या कालावधीत वेगवेगळया औद्योगिक युनिटसना वाटप केला आहे. यातील कर्जाच्या रक्कमा ४ टक्के व्याजासह तसेच कर्जदाराने कर्जे परतफेड न केल्यामुळे रक्कमा थकीत झाल्यास त्यावर ५ टक्के दंडव्याजासह वसुल करावयाच्या आहेत. सहपत्र-१६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एकूण ३६ उद्योगांच्या दि.३१ मार्च,२००१ अखेर एकूण रु.४०.२२ कोटी थकीत रक्कमा असल्याचे दिसून येते व त्यामध्ये सन १९७८-७९ पासूनच्या थकबाकीचा समावेश आहे. तथापि, त्याची सविस्तर माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही.

या शेडयूलमध्ये फक्त एकूण बाकी किती आणि या वर्षात केलेल्या वसुलीच्या रक्कमा दाखविण्यांत आलेल्या आहेत. मंडळ त्यांचे लेखे हे भविष्यात प्राप्त होणाऱ्या व देय असणाऱ्या रक्कमा (Accrual Basis) हिशोबात न घेता रोख पध्दतीवर (Cash Basis) ठेवीत असून बुडीत कर्जाच्या रक्कमा ठरविण्यासाठी कोणत्याही पध्दतीचा अवलंब मंडळाने केलेला नाही. मंडळ येणे बाकी असलेल्या सर्व रक्कमा ही त्यांची मालमत्ता असल्याचे जरी दाखवित असले तरी थकबाकीच्या वसुलीची माहिती त्यांच्याकडे नसल्यामुळे त्याचा परिणाम मंडळाच्या मालमत्तेच्या किंमतीत वाढ होण्यांत झालेला आहे. त्यामुळे मंडळाच्या लेख्यांमध्ये मालमत्तेचे सत्य परिस्थितीचे दर्शन होत नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

थकीत रक्कमांचा पूर्ण तपशील मंडळाकडे उपलब्ध आहे. रु ४०.२२ कोटी थकीत रक्कमेपैकी मंडळाने रु ६.८७ कोटी रक्कमेची वसुली मागील ७ वर्षात केली असून दिनांक ३१ मार्च, २००८ अखेर रु ३३.३५ कोटी वसुली शिल्लक आहे.

थकीत वसुली रक्कमांवर व्याजाची परिगणना मंडळाकडून प्रत्येक वर्षी केली जात असून ती सहपत्र २० मध्ये दर्शविली जात आहे. सन २०००-०१ मध्ये देखील व्याजाची परिगणना केली असून ती रु. १.५३ कोटी त्या वर्षीच्या लेख्यांमध्ये सहपत्र-२० मध्ये स्वतंत्ररित्या दर्शविली आहे. जर कर्जदार थकीत मुददल व व्याजाची एक रक्कमी परतफेड करत असेल तर त्यास दंडव्याज माफ करावे असा निर्णय मंडळाने घेतला आहे. म्हणून मंडळाकडून दंडव्याजाची परिगणना केली जात नाही. खादी आयोग कोणत्याही प्रकारच्या थकीत रक्कमा निर्लेखित करण्यास मंडळास परवानगी देत नाही. म्हणून अशा सर्व रक्कमा लेख्यांमध्ये दर्शवाव्या लागतात या सर्व रक्कमांचा तपशील मंडळाकडे उपलब्ध आहे.

५.२.३ येणे बाकी कर्जावर वरील रक्कमांवर मिळणारे व्याज कमी दाखविणे

ताळेबंदात कर्जाच्या बाकी रक्कमांवर रु १३६९.३४ लाख इतक्या रक्कमेचे व्याज वसुल करणे बाकी असल्याचे दाखविण्यांत आले असून त्यात खादी आयोग निधी व राज्य शासनाचा निधी यांचाही समावेश करण्यांत आला आहे. त्यामध्ये कन्सोर्टीयम बँक फायनान्स योजनेखालील लाभधारकांनी त्यांच्याकडून येणेबाकी असलेल्या रक्कमा रु २८४.६८ लाख रक्कमेवर येणे असलेल्या व्याजाचा समावेश करण्यांत आलेला नाही.त्यामुळे याचा परिणाम हा मालमत्ता आणि येणी रक्कमा त्या प्रमाणात कमी दाखविण्यांत झाला आहे.

त्याचप्रमाणे खादी आयोगाच्या नॉर्मल योजनेखाली आणि कारागिर रोजगार हमी योजनेखाली थकबाकीवर ५ टक्के दंडव्याज आकारावयाचे आहे. दंडव्याजाच्या या रक्कमा काढण्यांत आलेल्या नसून त्यामुळे त्यांचा समावेश लेख्यांमध्ये करण्यांत न आल्याने मालमत्तेच्या व जबाबदा-यां यांच्या रक्कमा त्या प्रमाणात कमी दाखविण्यांत आल्या आहेत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने सी.बी.सी.योजनेमधील येणे व्याज रक्कमेची योजना चालू झाल्या पासूनची परिगणना केली असून ती दि.३१/३/२००८ अखेर रु ४.९२ कोटी इतकी असून सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये सहपत्र २० येथे दर्शविली आहे.

५.२.४ वार्षिक लेख्यांमध्ये संचालक (रेशीम)यांचेकडून येणे असलेल्या रक्कमा न दाखविणेबाबत

शासनाने शासन निर्णय क्र सीएसडी-१०९४/(६१५३)/उद्योग-५ दिनांक २०/८/१९९७ अन्वये राज्यातील रेशीम विकासाचे काम मंडळाकडून काढून घेऊन ते करण्यासाठी रेशीम संचालनालयाची स्थापना केली. मंडळाचे नांवे असलेली मालमत्ता जी रेशीम संचालनलयाच्या ताब्यात होती, त्याबाबत असे ठरले की, या मालमत्तेपैकी सातारा जिल्हयातील वाई येथे असलेली मंडळाची मालमत्ता ही रेशीम संचालनालयाकडे राहील. परंतु या केंद्रावर मंडळाने केलेल्या खर्चाचा परतावा रेशीम संचालनालय करेल. याप्रमाणे मंडळाला रेशीम संचालनालयाकडून रु ३८.२९ लाख (विकासात्मक कामासाठी रु. २८.६३ लाख व रु ९.६६ लाखांची मशिनरी)इतकी रक्कम येणे आहे, परंतु ही रक्कम लेख्यांध्ये दाखविण्यांत आली नाही. मंडळ हे भविष्यात येणे असलेल्या किंवा देणे असलेल्या रक्कमांवर आधारीत (Accrual Basis) लेखे ठेवीत नसल्याने व तसे याबाबत लेख्याच्या शेवटी कोणतीही टिप्पणी जोडलेली नसल्यामुळे याचा परिणाम त्या प्रमाणात मंडळाची मालमत्ता कमी दाखविण्यांत झालेला आहे. मंडळाने (सप्टेंबर, २००१ मध्ये) दिलेल्या उत्तरात असे नमूद केले आहे की, या खर्चाचा परतावा रेशीम संचालनालयाकडून घेण्यासाठ कोणतीही कार्यवाही झालेली नव्हती.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महाराष्ट्र शासनाच्या दिनांक २७/८/१९९७ च्या शासन निर्णयान्वये मंडळाकडील रेशीम योजना शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाकडे योजनेतील रेशीम विभागाच्या ताब्यात असलेली मालमत्ता व दायित्वांसह वर्ग करण्यांत आली, त्यामुळे वाई केंद्रासाठी केलेला खर्च रु ३८.२९ लाख रक्कमेची प्रतिपूर्ती शासनाच्या सहकार विभागाकडून मंडळाने केली नाही.

५.२.५मालमत्ता व देणे तपशील

(अ) खादी आयोगास परत करावयाची कर्जे :-

मंडळाला खादी आयोगाकडून वेगवेगळया उद्योगाखालील लाभधारकांना वाटप करण्यासाठी कर्ज स्वरुपात निधी प्राप्त झाला होता. मंडळास हे कर्ज वसुल करुन खादी आयोगास परत करावयाचे असते मंडळाने लाभधारकांना वाटप केलेले कर्ज त्यांच्याकडून वसुल करावयाचे असते. ते लेख्यांमध्ये मालमत्ता व येणे बाजूस दर्शविले जाते.

दि.३१ मार्च,२००१ अखेर मंडळाने खादी आयोगाकडून प्राप्त झालेल्या निधीशिवाय रु.११२.३४ लाख जादा कर्ज लाभधारकांना वाटप केले आहे. या जादा वाटप केलेल्या रक्कमेचे समायोजन खादी आयोगास परत करावयाच्या रकमेपोटी करण्यांत आले असून मंडळाने खादी आयोगास परत करावयाची एकूण रक्कम रु.५८०२.९५ लाख इतकी असून ती न दाखवता त्या ऐवजी उरलेली निव्वळ रक्कम रु.५६९०.६१ लाख एवढी दि.३१-३-२००१ अखेर दर्शविण्यांत आली आहे. जादा रक्कम रु.११२.३४ लाख ही भागधारकांना वाटल्याची व तसेच भांडवल व येणे तपशीलात खादी आयोगाकडून येणे असल्याची रक्कम म्हणून दाखविण्यांत आली आहे. अशा रितीने रक्कम न दाखविण्यास सन १९९७-९८ व १९९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवालात स्पष्टपणे अभिप्राय देण्यांत आलेले असूनही मंडळाने अशा रितीने रक्कमा ताळेबंदात दाखविलेल्या आहेत. त्यामुळे भांडवल व येणे तपशील आणि मालमत्ता व देणे तपशील या दोन्ही बाबी ताळेबंदात रु ११२.३४ ने कमी दाखविण्यांत आलेल्या आहेत.

(ब) निलंबन लेखा

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी वैयक्तिक लाभधारकांकडून रक्कमा वसुल करुन मंडळाकडे पाठवितांना या वसुलीचा उद्योगनिहाय तपशील दिला नसल्यास अशा रक्कमा निलंबन या लेखा शिर्षकाखाली जमा करण्यांत येतात. या रक्कमा खादी आयोग/राज्य शासनास परत करावयाच्या असतात.

सन १९९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.२.३(ब) (२) व सन १९९९-२००० च्या परिच्छेद क्र.५.२.२(२) (ब) मध्ये अभिप्राय दिला असतांनादेखील दि.३१ मार्च,२००१ अखेर रु.२२.९९ लाख एवढी रक्कम अद्याप निलंबन लेख्यांमध्ये शिल्लक दर्शविण्यांत आलेली आहे.

(क) राखीव निधी लेख्यांत कमी रक्कम दाखविणे

मंडळाच्या दिनांक ३१ मार्च, २००१ च्या एकत्रित ताळेबंद पत्रकामध्ये किरकोळ जमा राखीव निधी लेख्यामध्ये वर्ग करावयाची रक्कम रु.२४.०१ लाख इतकी दर्शविण्यांत आली आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ विनियम, १९६० मधील विनियम क्रमांक १८(२) नुसार मंडळाच्या किरकोळ प्राप्तीच्या रक्कमा या राखीव निधीत जमा करावयाच्या असतात रु.२४.०१ लाखाच्या जमा झालेल्या किरकोळ प्राप्तीच्या रक्कमा या राखीव निधीमध्ये जमा न करण्यांत आल्यामुळे भांडवल व देणीच्या रक्कमा त्याप्रमाणे कमी दाखविण्यांत आल्या आहेत.

(ड). दिनांक २९/९/२००१ रोजी (महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संमत केलेल्या टिप्पणीनुसार) अविनियोजीत रक्कम व त्यावरील व्याज यांची मिळून खादी आयोगास परत करावयाची एकूण जमा झालेली रककम रु २.७६ कोटी इतकी होती. तथापि दिनांक ३१/३/२००१ च्या ताळेबंदानुसार अविनियोजीत रक्कम व त्यावरील व्याज मिळून खादी आयोगास परत करावयाची एकूण रक्कम रु २.८८ कोटी इतकी दाखविण्यांत आली आहे. तसेच फेब्रुवारी २००१ ते मार्च,२००१ पर्यत कोणतेही व्यवहार घडलेले नसल्यामुळे त्याप्रमाणात

ताळेबंदातील भांडवल व देणे व मालमत्ता व येणे रक्कमा रु ०.१२ कोटीने जास्त दाखविण्यांत आलेल्या आहेत. व अखर्चित रक्कम देखील रु.०.१२ कोटीने जास्त दर्शविली आहे. तसेच कॅशबुक शिवाय अन्य कोणतेही रजिस्टर ठेवलेले नसल्यामुळे ताळेबंद पत्रकामध्ये केलेल्या दुरुस्तीची पडताळणी करता येत नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाकडून जादा वाटप करण्यांत आलेली रक्कम रु ११२.३४ लाख ही मंडळास खादी आयोगाकडून येणे रक्कम आहे. ही रक्कम मंडळाने सन २००४-०५ च्या लेख्यांमध्ये खादी आयोगास देणे असलल्या रक्कमेमध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार न करता ताळेबंद पत्रकात येणे बाजूस दर्शविली आहे.

दिनांक ३१ मार्च, २००८ अखेर निलंबन लेखा या लेखाशिर्षकात रु ९.०३ लाख रक्कम शिल्लक आहे. सदर रक्कम त्वरित योग्य त्या शिर्षकाखाली वर्ग करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

मंडळाने सन २००३-०४ या वर्षात किरकोळ जमा शिर्षकाखाली जमा झालेली रक्कम रु २४.०१ लाख राखीव निधी खात्याकडे वर्ग केली आहे. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये योग्य ती कार्यवाही केली आहे व मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

५.२.६ व्यापारी तत्वावर चालविण्यांत येणाऱ्या मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे

(अ) बंद असलेली खाते निहाय केंद्रे

सन १९९९-२००० च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.२.४(अ) येथे बंद केंद्राचे लेखे बंद करुन त्यांचे भांडवल व मालमत्ता मंडळाच्या लेख्यांमध्ये समाविष्ट करण्याबाबत स्पष्ट अभिप्राय दिले असतांनादेखील हातकागद संस्थेची अमरावती व परभणी येथील केंद्रे जरी नोव्हेंबर,१९९७ मध्ये बंद झाली असली तरी त्यांचे स्वतंत्र लेखे अद्यापही तयार करण्यांत येत असून ते मंडळाच्या लेख्यांच्या शेवटी जोडण्यांत आले आहेत.

(ब) सुतारी लोहारी कार्यशाळा, गोकुळ शिरगांव, कोल्हापूर

१. सन १९८९-९० मध्ये करण्यांत आलेल्या एकूण प्रारंभिक खर्चाची रक्कम रु ३.४७ लाख ही सन १९८९-९० पासून दरवर्षी कमी करुन शिल्लक असलेल्या रक्कमेच्या ५ टक्के या प्रमाणात लेख्यांमधून कमी करण्यात येत आहे. याप्रमाणे दरवर्षी कमी करण्यांत आलेली रक्कम ही दरवर्षी नफा व तोटा पत्रकात प्रारंभिक खर्चाची कमी करण्यांत आलेली अशी न दाखविता घसारा खर्च म्हणून दाखविण्यांत येत आहे.
२. ऑक्टोबर, १९८६ पासून देय असलेली वेतनातील फरकाची रक्कम रु २१,५३०/- ही किरकोळ देणी या शिर्षकाखाली समाविष्ट करण्यांत आली असून ती नफा व तोटा खाती खर्ची घालण्यांत आली आहे. तथापि (डिसेंबर २००१ मध्ये) वेतनातील फरकांची कोणतीही रक्कम देण्यांत येऊ नये असा विभागाने निर्णय घेतला. त्यामुळे **किरकोळ** देणी या शिर्षकातून रु २१,५३०/- ही रक्कम कमी करणे आवश्यक होते. तथापि त्याप्रमाणे ती कमी करण्यांत आलेली नाही. याचा परिणाम किरकोळ देणी ही जास्त प्रमाणात व नफा त्या प्रमाणात कमी दाखविण्यात झाला आहे.

(ड) हातकागद संस्था, पुणे

(१) संचालक,हातकागद संस्था, पुणे यांचे वेतन व भत्ते

संचालक, हातकागद संस्था, पुणे यांचे पूर्ण वेतन व भत्ते हे राज्य निधीमधून चालविल्या जाणाऱ्या संशोधन विभागा खाती खर्ची घालण्यांत आले आहेत. तथापि संचालक यांच्या सेवेपैकी बरीच सेवा ही उत्पादन विभागाच्या कामाशी संबंधीत असल्यामुळे या रक्कमेपैकी काही ठराविक रक्कम ही संस्थेच्या नफा तोटा खाती खर्ची घालणे आवश्यक होते. त्याप्रमाणे कार्यवाही न करण्यांत आल्यामुळे याचा परिणाम हा उत्पादन विभागाचा नफा जास्त प्रमाणात दाखविण्यांत झाला आहे.

(२) सहया न केलेली लेखा पुस्तके

खतावणी, जर्नल विक्री रजिस्टर आणि स्टॉक खतावणी उत्पादन रजिस्टर इ उत्पादन विभागांशी संबंधित असलेल्या सर्व लेखा पुस्तकांवर सक्षम अधिकाऱ्यांनी सहया केलेल्या नाहीत. तसेच मासिक बेरजा आणि शिल्लक रक्कमा या पेन्सिलने दाखविण्यांत आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे शासकीय निधीच्या लेख्यांवर देखील सहया करण्यांत आलेल्या नाहीत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

बंद असलेली युनिट निर्लेखित करण्याबाबत मडळाने अद्याप अंतिम निर्णय घेतलेला नाही म्हणून या बंद केंद्राचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये दर्शविले जातात. याबाबत त्वरीत निर्णय घेण्याबाबतच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या मुद्यांची मंडळाने सन २००१-०२ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे व मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

हातकागद संस्था, पुणे येथे हातकागदाचे प्रशिक्षण, संशोधन विस्तार वउत्पादन असे चार विभाग कार्यरत आहेत. यामधील केवळ उत्पादन विभाग हा व्यापारी तत्वावर चालविला जातो. जो या पूर्ण संस्थेचा एक भाग आहे. खादी आयोगाकडून निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींना या ठिकाणी प्रशिक्षण व प्रात्यक्षिक दाखविले जाते. मागील अनेक वर्षापासून उत्पादन विभाग तोटयात आहे. संचालक, हातकागद हे प्रामुख्याने संशोधन, विस्तार व प्रशिक्षण विभागाचे काम पहातात. उत्पादन विभागाचे काम पहाण्यासाठी स्वतंत्र व्यवस्थापकाची नियुक्ती केलेली असते. म्हणून संचालकांच्या वेतनाचा काही भाग उत्पादन विभागाच्या खर्चात मंडळाकडून दाखविला जात नाही. त्यामुळे मंडळाच्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

मंडळाने योग्य ती कार्यवाही सन २००१-२००२ मध्ये केली आहे. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

५.२.७ पणन विभागाची खाती

१ मंडळाच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २००१ रोजी झालेल्या सभेत जिल्हा पातळीवरील पणन खाती बंद करुन ती मुख्यालयाच्या पणन विभागाच्या खात्यांमध्ये समाविष्ट करण्यांत यावीत असा निर्णय घेण्यांत आला. तथापि जिल्हा पातळीवरील पणन कार्यक्रमाची खाती स्वतंत्रपणे तयार करण्यांत आली नव्हती किंवा मुख्यालयाच्या पणन विभागाच्या लेख्यांमध्ये त्याचा समावेश करण्यांत आला नव्हता. जिल्हा पातळीवरील पणन कार्यक्रम जरी बंद करण्यात आला असला तरी दिनांक ३१ मार्च, २००१ अखेर जिल्हा कार्यालयाकडून येणे असलेली रक्कम व ती वसुल करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची माहिती देण्यांत आलेली नाही.

२. सन २०००-२००१ मध्ये रुपये २.०० लाख खादीची विक्री करण्यांत येऊन त्या प्रमाणात शिल्लक साठ्याची रक्कम कमी करण्यांत आली तरी एकूण विक्रीमध्ये या रक्कमेचा समावेश न करण्यांत आल्यामुळे याचा परिणाम एकूण विक्रीची रक्कम त्याप्रमाणात कमी दाखविण्यांत आल्यामुळे तितका तोटा होण्यांत झाला आहे

३. रु.१०.३१ लाखाच्या शिल्लक साठयामध्ये मध विक्रीत झालेले नुकसान (रु ४.६० लाख)आणि मच्छरदाण्या विक्रीत झालेला तोटा (रु.३.३७ लाख) लेख्यांमधून काढून टाकण्यासाठी रक्कम रु ९.१५ लाख आणि जादा दाखविण्यांत आलेला साठा (रु.१.१८ लाख) या सन १९९३-९४ मध्ये दाखविलेल्या रक्कमांचा समावेश आहे. सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क ५.२.४. (१) मध्ये अशा प्रमाणे रक्कमा न दाखविण्याबाबत स्पष्ट अभिप्राय देण्यांत आलेले असूनही या रक्कमा शिल्लक साठयामध्ये दाखविण्यांत आल्यामुळे शिल्लक साठयाची रक्कम ही रु ९.१५ लाखाने जास्त दाखविण्यांत आली आहे.

४. कंबल उत्पादन केंद्र उमरेड यांना मार्च,१९९८ मध्ये दिलेली तात्पुरती अनामत रक्कम रु.२.०० लाख व हातकागद संस्था, पुणे यांना मार्च, २००० मध्ये दिलेली रक्कम रु.२.२० लाख अद्याप वसुल करण्यांत आलेली नाही.

५. रक्कम रु.९.४२ लाखाच्या गुंतवणूकीवरील येणे असलेल्या व्याजाची सन १९९९-२००० मधील रक्कम (रु २.१२ लाख)आणि सन २०००-२००१ मधील येणे असलेली व्याजाची रक्कम (रु.१.१३ लाख) या व्याजाच्या दोन्ही रक्कमा ताळेबंदात येणे असलेल्या व्याजाच्या रक्कमा म्हणून दाखवण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे चालू मालमत्तेची किंमत आणि त्या वर्षातील नफा या दोन्ही रक्कमा रु ३२.२५ लाखाने कमी दाखविण्यात आल्या आहेत.

६. जेव्हा पुरवठादारांकडून त्यांना देण्यांत आलेल्या मागणी आदेशाच्य संदर्भात दंड अथवा कमिशनच्या रक्कमा या एकूण येणे असलेली सर्व शिल्लक रक्कम म्हणून प्राप्त होतात तेव्हा या पुरवठादाराच्या खाती ऑर्डरची पूर्ण रक्कम जमा न करता फक्त त्या त्या वेळेस मिळालेली दंड अथवा व्याजाची रक्कम जमा करण्यांत आली आहे. त्याचप्रमाणे धनकोची खाती देखील खरेदीच्या पूर्ण रक्कमेने खर्ची न घालता वरीलप्रमाणे फक्त दंड आणि व्याजाच्या रक्कमा त्यांच्या खाती खर्ची घालण्यांत आल्या आहेत. त्यामुळे पणन विभागाच्या ताळेबंदात ऋणको व धनको यांच्या दाखविण्यांत आलेल्या रक्कमा बरोबर नाहीत.

७. सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालात स्पष्टपणे अभिप्राय दिला असतांना देखील सन १९९०-९१ च्या ताळेबंद पत्रकातील भांडवली कर्जावरील व्याजाची रु.९.५३ लाखाची तरतूद आणि खेळते भांडवल कर्जावरील व्याजाची रु.२६.८६ लाख तरतूद या दोन्हीही रक्कमा ताळेबंद पत्रकात अद्याप देणे म्हणून दर्शविल्या आहेत.

८. पणन विभागाच्या लेख्यांमध्ये जर्नल एन्ट्रीने नफा व तोटा खाती रु.३.७५ लाख खर्ची घालून ही रक्कम ऋणकोच्या खाती जमा करण्यांत आली आहे. त्याचे कारण देतांना असे सांगण्यांत आले की,या रक्कमा जरी पूर्वीच प्राप्त होवून रोख किर्दीमध्ये जमा करण्यांत आल्या असल्या तरी नजरचुकीने वेगवेगळया ऋणकोच्या खाती जमा करण्याचे राहून गेल्यामुळे, त्या आता या ऋणकोच्या खाती जमा करण्यांत आल्या आहेत.

या सर्व रक्कमा मागील वर्षाच्या संदर्भातील असल्यामुळे त्या चालू वर्षाच्या नफा व तोटा खाती खर्ची घातल्यामुळे चालू वर्षाची तोटयाची रक्कम जास्त झाली आहे.

९. त्याचप्रमाणे एका पुरवठादाराच्या खाती जमा असलेली रु.४१,७६३/- ही रक्कम त्यांच्या खाती खर्ची टाकून ती चालू वर्षाच्या नफा तोटा खाती जमा करण्यांत आली आहे. त्यामुळे चालू वर्षाच्या नफा-तोटा खात्यातील तोटयाची रक्कम त्याप्रमाणात कमी झाल्याने मागील वर्षाची जमा रक्कम चालू वर्षाच्या नफा व तोटा खाती जमा दाखविणे योग्य नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

१) मंडळाच्या जिल्हा कार्यालयातील पणनचे लेखे मंडळाने सन १९९८-९९ मध्ये पणनच्या मुख्य कार्यालयामधील लेख्यांमध्ये समाविष्ट केले आहेत. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

२) मंडळाच्या सन २००१-०२ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यांत आली आहे. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

३) मंळाने सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे व मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

४) पणन विभागाच्या लेख्यांमधून मंडळाने त्यांच्याच खातेनिहाय केंद्रांना ही अनामत रक्कम दिलेली आहे. उमरेड केंद्र निर्लेखन व पुणे संस्था खाजगीकरणाबाबत निर्णय घेतेवेळी पणन विभागातून त्यांना दिलेल्या अनामत रक्कमा वसुल करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

५) संभाव्य येणे व्याज पणनच्या सन २००१-०२ च्या लेख्यांमध्ये मंडळाने दर्शविलेले आहे. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

६) पणन विभागाच्या लेख्यांमध्ये संकीर्ण धनको व संकिर्ण ऋणको दर्शविण्याबाबत मंडळाने अवलंबिलेली पध्दत योग्य असून मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

७) मंडळाने कर्जावर करण्यांत आलेली व्याजाची तरतूद सन २००७-०८ मध्ये पणन विभागाच्या संग्रही नफ्यामध्ये समायोजित केली आहे.

८) व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या केंद्रासाठी मंडळाने योग्य लेखांकन धोरण आता अवलंबिलेले आहे व भविष्यात याबाबत योग्य ती खबरदारी घेण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत

लाभधारकांकडून अद्याप गोळा न केलेली प्रलंबित विनियोग पत्रके

सन १९९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवालात परिच्छेद क्र.५.२.२ (५) आणि सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.२.२.(क) येथे स्पष्ट अभिप्राय दिला असतांना देखील सन २०००-२००१ पर्यंत कर्ज व मदतीच्या स्वरुपात देण्यांत आलेल्या आर्थिक सहाय्यापैकी रु.५९६.५३ लाखाची १२३५ लाभधारकांकडून खालील तपशीलाप्रमाणे विनियोग पत्रके गोळा करण्याचे काम प्रलंबित होते. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

वर्ष	एकूण लाभधारक	कर्ज व अनुदान वाटप रक्कम	विनियोग पत्रके प्राप्त		प्रलंबित विनियोग पत्रके दि.३० जून,२००१ अखेर	
		(लाखांत)	लाभधारक संख्या	रक्कम रुपये लाखांत	लाभधारक संख्या	रक्कम रुपये लाखांत
१९९६-९७	१००६	५०१.१५	९५१	४८२.८६	५५	१८.२९
१९९७-९८	११८५	७४३.३३	११३३	६९७.६३	५२	४५.७०
१९९८-९९	१६६९	७६४.५२	१४५८	६९९.०७	२११	९५.४५
१९९९-२०००	१२८०	५२९.७१	७५१	२६७.६७	५२९	२६२.०४
२०००-०१	३८८	१७५.०५	---	---	३८८	१७५.०५
एकूण	**५५२८**	**२७१३.७६**	**४२९३**	**२११७.२३**	**१२३५**	**५९६.५३**

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

गोळा केलेल्या विनियोग पत्रकांची माहिती मंडळाने ऑडिटला दिली आहे. दिनांक ३१/३/२००३ अखेर केवळ १८२ विनियोग पत्रके गोळा करणे बाकी आहे. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन २००१-२००२ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

५.१ लेखा पध्दतीबाबत

५.१.१ सन १९९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये परिच्छेद क्र.५.१ मध्ये सूचित केलेले असतांनादेखील (व्यापारी तत्वावर चालविण्यांत येणाऱ्या खातेनिहाय केंद्रांशिवाय) त्यानुसार मंडळाने त्यांचे लेखे हे भविष्यात प्राप्त होणाऱ्या व देय होणाऱ्या व देय असणाऱ्या रक्कमां (accrual basis) लेख्यांमध्ये समाविष्ट न करता केवळ रोख तत्वावर (cash basis) झालेले व्यवहार समाविष्ट करुन आयव्यय पत्रक व ताळेबंद तयार करण्यात आले आहेत.

५.१.२ वैशिष्टयपूर्ण लेखापध्दती

सर्वसाधारणपणे लेखे ठेवण्याची जी पध्दती आहे, ती मंडळाने लेखे तयार करतांना वापरलेली आढळून येत नाही. सर्वसाधारणपणे लेखे ठेवण्याची पध्दत म्हणजे उदा. अद्याप प्राप्त न झालेल्या परंतु भविष्यात प्राप्त होणा-या रक्कमा तसेच अद्याप खर्ची न टाकलेल्या परंतु भविष्यात खर्ची टाकाव्या लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमा (accrual basis) यांचा समावेश करुन तयार केले आहेत. कायम स्वरुपी मालमत्ता व शिल्लक मालाची किंमत दाखविणारे तक्ते, घसाऱ्याची आकारणी, गुंतवणूकीची माहिती याशिवाय संस्थेची सद्यस्थिती, कायदेशीर तरतूदीमधून सूट मिळत असल्यास अशा बाबींचा तपशिल, आकस्मिक बाबीवरील खर्चासाठी केलेली तरतूद इत्यादी बाबी या एका "लेखा टिप्पणीत" लेख्यांची खास वैशिष्टये म्हणून लेख्यांच्या शेवटी परिशिष्ट स्वरुपात जोडणे आवश्यक आहे. याबाबत सन

१९९९-२००० व २०००-०१ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये अभिप्राय दिलेला असतांनाही मंडळाने चालू वर्षाचे लेखे तयार करतांना या बाबीची दखल घेतलेली नाही.

मंडळाने या संदर्भात (नोव्हेंबर, २००२ मध्ये) असे सांगितले की, कंपनी कायदा १९५६ खाली ज्या संस्था नोंदविण्यांत आलेल्या आहेत, अशा संस्थांनीच लेख्यांबाबतची वैशिष्ट्ये/तत्वे याबाबतची माहिती देणे आवश्यक आहे. तथापि मंडळ ही एक कंपनी नसून ते विधानसभेने केलेल्या अधिनियमाखाली स्थापन करण्यांत आलेले मंडळ आहे.

तथापि हे उत्तर पटणारे नाही. कारण जी संस्था लेखे ठेवते, त्यांनी लेखे कशा प्रकारे तयार केले आहेत ते व्यवस्थित समजण्यासाठी लेख्यांची खास वैशिष्टये नमूद करणे आवश्यक आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मधील तरतूदीनुसार मंडळाचे लेखे रोख पध्दतीने ठेवले जातात. सन १९७७ मध्ये या अधिनियमात सुधारणा करण्यांत आली होती. या सुधारणेपूर्वीच्या कालावधीत उत्पन्न व खर्च पध्दत हा शब्दप्रयोग प्रचलित असल्याचे दिसून येत असले तरीसुध्दा प्रत्यक्षात मंडळाचे लेखे रोख पध्दतीने सुरुवातीपासूनच ठेवले जात होते. खादी व ग्रामोद्योग मंडळाने १९६० पासून जारी केलेल्या अकाऊंट मॅन्युअल मध्येही रोख पध्दतीचाच उल्लेख केलेला आहे.

मंडळाच्या अधिनियमावर आधारभूत, १९७० मधील मंडळाच्या नियमांमध्ये लेखांकन पध्दतीबाबतचा नमुना विहीत करण्यांत आला आहे. (सोबत नमुना) त्यानुसार सन २००६-०७ च्या वार्षिक लेख्यांच्या लेखापरीक्षण अखेरपर्यंत महालेखाकार यांच्या लेखापरीक्षण प्रमाणपत्रात मंडळाच्या लेख्यांचे सत्य व रास्त परिस्थितीचे दर्शन होते असे प्रत्येक वर्षी नमूद करण्यांत आले आहे.

वरील परिस्थितीमध्ये पूर्वीच्या लेखांकन पध्दतीमध्ये कोणतीही सुधारणा करणे शक्य होणार नाही, कारण मंडळ अधिनियमातील तरतूदीनुसार सध्या ती अवलंबिली जात आहे. महालेखाकार यांनीही मंडळाची यापूर्वीच्या लेख्यांबाबतची परिस्थिती मान्य केली आहे.

५.२ ताळेबंदपत्रक

५.२.१ मालमत्ता व येणी

भांडवली मालमत्तेवरील घसाऱ्याबाबत

दि.३१/३/२००२ अखेर मंडळाच्या लेख्यांमध्ये रु.१.९६ करोड स्थावर व जंगम मालमत्ता दर्शविली आहे ती घसारा वजा न करता खरेदीच्या किंमतीवर दर्शविली आहे. ही अनियमितता सन १९९९-२०००, २०००-२००१ च्या लेखा अहवालात मंडळाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यामुळे भांडवल व मालमत्ता तेवढया प्रमाणात जास्त दर्शविण्यांत आली आहे.

(२) स्थावर मालमत्तेच्या किंमती कमी दाखविणेबाबत

अ) बोरिवली येथील सर्व्हे क्रमांक १५ मधील इमारतीच्या किंमत रु.१९.४१ लाखामध्ये या इमारतीसाठी आदा करण्यांत आलेल्या म्युनिसिपल चार्जेसची थकबाकी रु ३.१८ लाखाचा समावेश करण्यांत आलेला नाही. हा खर्चही इमारत ताब्यात घेण्यापूर्वी झालेला असून ते एप्रिल, १९८५ ते फेब्रुवारी, १९९२ म्हणजेच फेब्रुवारी, १९९२ मध्ये ही इमारत ताब्यात घेण्यापूर्वीच्या कालावधीत झालेला आहे. त्यामुळे ही रक्कम रु ३.१८ लाखाचा समावेश या इमारतीच्या किंमतीमध्ये करणे आवश्यक होते. परंतु तसे न केल्यामुळे त्या प्रमाणात मालमत्ता कमी दाखविण्यांत आली आहे.

(ब) सन २०००-०१ च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.२.१ (ii) (ब) मध्ये नमूद केले असतांना देखील पुणे येथील वसतिगृह इमारतीची किंमत रेकॉर्डप्रमाणे रु १९.४४ लाख असतांना ती लेख्यांमध्ये रु २.४३ लाख दर्शविण्यांत आली आहे. त्यामुळे स्थावर मालमत्ता रु १७.०१ लाखाने कमी दर्शविण्यांत आली आहे.

पुढील वर्षाच्या लेख्यांमध्ये योग्य ती सुधारणा केली जाईल असे मंडळाने उत्तर दिले होते. मात्र हमी देऊन देखील चुकीची दुरुस्ती करण्यांत आलेली नाही.

५.२.१ **३ मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी**

(अ). सन १९९९-२००० आणि २०००-२००१ च्या लेखापरीक्षण अहवालामधील परिच्छेद क्रमांक ५.२.१ (दोन) आणि परिच्छेद क्रमांक ५.२.१ (चार) (अ) मध्ये आक्षेप घेण्यांत आलेला असतांनाही मालमत्तेचे रजिस्टर पूर्ण झालेले नसल्यामुळे लेख्यांमध्ये दर्शविलेल्या रु १५०.२० लाख जंगम मालमत्तेची खातरजमा करणे शक्य झाले नाही.

(ब). सन १९९९-२००० व सन २०००-२००१ चा परिच्छेद क्र अनुक्रमे ५.२.१ (दोन) आणि परिच्छेद क्रमांक ५.२.१ (चार) (ब) मध्ये अभिप्राय दिले असतांना देखील मंडळाच्या स्थावर व जंगम मालमत्तेची खातरजमा करता आलेली नाही.

रजिस्टर पूर्ण करण्याचे काम चालू आहे. सन २००२-०३ च्या तपासणीच्या वेळी दाखविण्यांत येईल असे मंडळाने उत्तर दिले आहे.

मंडळाने मालमत्ता रजिस्टर पूर्ण करण्याची योग्य ती खबरदारी घ्यावी.

४. स्थावर मालमत्ता - मालमत्तेची किंमत कमी दर्शविणे

मंडळ स्थापनेपासून म्हणजेच सन १९६२ पासून मंडळाकडे महाबळेश्वर येथे बंगला क्रमांक १,४ व ५ ही मालमत्ता आहे. सदर मालमत्तेची किंमत ठरविली नसल्यामुळे मंडळाने सदर मालमत्तेचा लेख्यांमध्ये समावेश केलेला नाही. त्यामुळे तितक्या प्रमाणात मंडळाची मालमत्ता कमी दर्शविण्यांत आलेली आहे.

मंडळाचे कार्य हे सेवा स्वरुपाचे आहे. सदर मालमत्तेची किंमत शून्य असल्यामुळे तिची किंमत करणे जरुरीचे नाही, असे मंडळाने डिसेंबर, २००२ मध्ये दिलेल्या उत्तरात म्हटले आहे.

मंडळाचे हे उत्तर समर्थनीय नाही. कारण मंडळ हे त्या मालमत्तेचे कायदेशीर ताबेदार असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जिल्हाधिकारी यांचेकडून मालमत्तेची किंमत ठरवून घेऊन मालमत्ता रजिस्टरला त्यांची नोंद घेणे जरुरीचे आहे.

५. संकीर्ण ऋणकोच्या येणे रक्कमा खात्री करुन न घेणे

दिनांक ३१ मार्च, २००२ अखेर संकीर्ण ऋणको म्हणून शिल्लक असलेल्या रु ९५.७९ लाख या रक्कमा संबंधीत व्यक्ति तसेच खात्याकडून संमत केलेल्या नाहीत. या रक्कमेमध्ये रु ३.५० लाख या रक्कमेचाही समावेश आहे की, जी सन १९७९-८० पासून प्रलंबित असून ती २० वर्षापूर्वीची आहे. जर रक्कम वसुल होण्यायोग्य नसेल तर ती निर्लेखीत करावी.

याबाबतची कार्यवाही चालू असून प्रकरण निकाली काढीत आहोत असे ऑक्टोबर २००२ मध्ये मंडळाने कळविले.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या बोरीवली येथील जागेचा महानगरपालिका कर रु.३.१८ रुपये सन २००२-०३ मध्ये मंडळाने भांडवली लेख्यांमध्ये समायोजित केला आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

सन २००१-०२ च्या लेख्यांच्या लेखापरीक्षणाचे वेळी मंडळाच्या २४ ब पुणे येथील जागेची किंमत रु १.३७ लाख लेख्यांमध्ये दर्शविण्यांत आली नव्हती ती आता सन २००३-०४ मध्ये दर्शविण्यांत आली आहे. त्यामुळे २४ ब

पुणे येथील विविध मालमत्तांची एकूण किंमत ऑडिटने दर्शविल्याप्रमाणे रु १९.४४ लाख नसून ती रु २.४३ लाख रु १.३७ लाख रु ३.८० लाख एवढीच आहे. व ती मालमत्ता रजिस्टर व लेख्यांप्रमाणे बरोबर आहे.

मंडळाकडील उपलब्ध तपशिलानुसार २४-ब, पुणे येथील जमिनीची किंमत रु.१.३७ लाख इतकी असून ती लेख्यामध्ये दर्शविली नव्हती त्याजागी एकूण ४ बांधकामे आहेत. त्यापैकी वस्तीगृह मंडळाने बांधले असून त्यांची किंमत रु. ०.९४ लाख आहे.

मंडळाने मालमत्तेचे रजिस्टर अद्ययावत केले असून सन २००३-०४ चे मंडळाचे लेखे तपासण्यासाठी आलेल्या ऑडिट पथकास दाखविण्यांत आले आहे.

महाबळेश्वर येथील बंगल्याचे अधिकार अभिलेखाच्या नोंदी करण्याच्या दृष्टीने मंडळाने जिल्हाधिकारी, सातारा यांचेसोबत पत्रव्यवहार केला आहे.हे प्रकरण अंतिम निर्णयाप्रत त्वरीत आण्याबाबत मंडळास सूचना देण्यात आल्या आहेत.

ही मालमत्ता शासनाने विनामूल्य हस्तांतरीत केली आहे. म्हणून या मालमत्तेची किंमत या लेख्यामध्ये दर्शविलेली नाही.

राज्य निधी खात्याचे संकीर्ण ऋणको हे ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र १९ मध्ये दर्शविले आहेत. मात्र खातेनिहाय केंद्राचे संकीर्ण ऋणको हे खातेनिहाय केंद्राच्या एकत्रित ताळेबंद पत्रकामध्ये दर्शविले आहेत व पुन्हा ते मंडळाच्या सन १९७९-८० मध्ये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग संघ पुणे यांना रु ३.५० लाख इतकी रक्कम देण्यात आली आहे व सदर यूनिट बंद आहे. ही रक्कम निर्लेखीत करणे गरजेचे आहे. संबंधीत देणेदाराकडून ते ही रक्कम मंडळास देणे लागतात याबाबत संमतीपत्र तातडीने उपलब्ध करुन घेण्याबाबत मंडळास सूचना देण्यात आल्या आहेत.

५.२.२ भांडवल व देणे

अ) १) **निलंबन लेखा**

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी वैयक्तिक लाभधारकांकडून रक्कमा वसुल करुन मंडळाकडे पाठवितांना या वसुलीचा तपशील दिला नसल्यास अशा रक्कमा या निलंबन लेखा शिर्षकाखाली ठेवल्या जातात. या रक्कमा खादी आयोग/राज्य शासनास परत करावयाच्या असतात.

सन १९९८-९९ च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.२.३(ब) (२) व सन १९९९-२००० च्या परिच्छेद क्र.५.२.२(२) (ब) मध्ये अभिप्राय दिला असतांना देखील दि.३१ मार्च,२००२ अखेर रु.१९.९८ लाख एवढी रक्कम पडून आहे.

सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये निलंबन लेखा निकाली काढू असे मंडळाने नमूद केले आहे.

२) राखीव निधी लेख्यांत कमी रक्कम दाखविणे

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ विनियम १९६० मधील विनियम क्रमांक १८(२)नुसार मंडळाच्या किरकोळ प्राप्तीच्या रक्कमा या राखीव निधीत जमा करावयाची तरतूद आहे.

सन २०००-२००१ च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक ५.२.५ (सी) मध्ये अभिप्राय देऊन देखील दिनांक ३१ मार्च, २००२ च्या एकत्रित ताळेबंद पत्रकामध्ये रु. २४.२६ लाख किरकोळ जमा रक्कम राखीव निधीमध्ये जमा करण्यांत आलेली नाही.

याबाबत कार्यवाही करीत आहोत असे मंडळाने ऑक्टोबर, २००२ मध्ये कळविले आहे.

३) खादी ग्रामोद्योग आयोगाकडून अनुदान म्हणून प्राप्त झालेली अखर्चित रक्कम (सहपत्र -५)रुपये ३२९ लाख निधी तात्पुरता वर्ग करणे

खादी व ग्रामोद्योग आयोगाकडून दिनांक ३१ मार्च, २००३ अखेर प्राप्त झालेल्या अनुदानापैकी रु ३४५.६१ लाख अखर्चित रक्कम शिल्लक असल्याचे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रकातील सहपत्र ५ पाहता असे दिसून येते. त्यापैकी रु ३२९.८२ लाख अशी मोठया प्रमाणातील रक्कम राज्यनिधीस तात्पुरती अनामत म्हणून दिल्याचे दिसून येते. याबाबत मंडळाने खुलासा केला आहे की, खादी आयोगाच्या निधीतील जी रक्कम मंडळाकडे पडून आहे, ती कर्मचा-

यांचे पगार व भत्ते आदा करण्यासाठी वर्ग करण्यांत आली आहे व ती राज्य शासनाकडून भरपाई करुन मिळणार आहे. राज्य शासन भरपाई करेल या अपेक्षेवर पगार व भत्त्यासाठी खादी आयोगाचा हा निधी वर्ग करण्यांत आला आहे. मंडळाने ताळेबंद पत्रकात लेख्यांवरील भाष्य या टिप्पणीत हे जाहीर करणे जरुरीचे आहे व हा निधी खादी आयोगाचा असल्यामुळे तो तात्पुरता वर्ग करण्यास त्यांची संमती घेणे जरुरीचे आहे.

४) राज्य शासनास परत करावयाची कर्जे

सन २००१-०२ मध्ये रु २७.१३ लाख राज्य शासनास परत करण्यांत आले आहेत. सहपत्र ७ मध्ये राज्य शासनास परत करावयाची कर्जे या रु ८८.६३ लाखापासून ही रक्कम कमी करण्यांत आलेली नाही. त्यामुळे रु. २७.१३ लाखाने देणे जास्त असल्याचे दिसून येते.

५) नॉर्मल योजनेतील मुदतबाहय कर्जे रु. ३८.८९ कोटी त्यावरील व्याज/दंडव्याज रु ७७.१६ लाखाने येणे वाढवून दाखविणे

ताळेबंद पत्रकातील सहपत्र १६ पहाता एकूण ३६ उद्योगांचे रु ३८.९० करोड
कर्ज नॉर्मल योजनेखाली दिनांक ३१ मार्च, २००२ रोजी थकीत झाल्याचे दिसून येते. कर्ज प्रकरणातील अटीनुसार मुदतबाहय झालेल्या थकीत कर्जास नेहमीच्या ४ टक्के व्याजाव्यतिरिक्त ५ टक्के दंडव्याज आकारले जाईल अशी अट आहे. मंडळाने ते आकारले नाही. परिगणीत केले नाही व येणे देखील दाखविलेले नाही.

थकीत कर्जाची वार्षिक शिल्लक हिशेब पत्रके पहाता काही संस्था/सोसायटया अवसायनात गेलेल्या आहेत. ६ जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती पहाता ९७ सोसायटया अवसायनांत गेलेल्या आहेत. त्यांच्याकडून मुददल व व्याज मिळून रु ७७.१६ लाख येणे दिसून येते. या संस्थांकडे कोणत्याही प्रकारची मालमत्ता शिल्लक नसल्यामुळे थकीत रक्कम वसुल होऊ शकत नाही. या संस्थांची नोंदणी देखील फार पूर्वी रदद झालेली असून त्यांचे रेकॉर्ड देखील नष्ट झालेले आहे. ही कर्जे साशंक असल्याबाबत मंडळाने लेख्यांवरील भाष्य म्हणून टिप्पणीव्दारे निदर्शनास आणून दिलेले नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात मालमत्ता जास्त दर्शविली आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

दिनांक ३१ मार्च, २००८ अखेर निलंबन लेखा शिर्षकाखाली रु ९.०३ लाख रक्कम शिल्लक असून ती संबंधित शिर्षकाखाली वर्ग करण्याबाबत मंडळास सूचना देण्यात आल्या आहेत.

किरकोळ लेखा शिर्षकाखाली जमा झालेले रु २४.१५ लाख सन २००३-०४ मध्ये राखीव निधीत वर्ग केले आहेत व महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने हा विषय शासनाच्या सहकार व वस्त्रोद्योग विभागाच्या निदर्शनास आणला असून शासनाच्या सहकार विभागाने मंडळास आक्षेपामधील रक्कम देण्याचे मान्य केले आहे. ही बाब मंडळाने मंडळाच्या सन २००२-०३ च्या लेखाविषयक टिपणीमध्ये नमूद केली आहे. तसेच ही बाब खादी आयोगाच्या देखील निदर्शनास आणून दिलेली आहे.मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

शासनास परत केलेली सन २००१-०२ ची कर्जची रक्कम रु.२७.१३ लाख नसून ती रु.१.२८ लाख होती. मंडळाच्या सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये सहपत्र-७ मध्ये योग्य ती दुरुस्ती मंडळाने केली आहे.

मंडळाने कर्जवसुलीच्या नियमानुसार सदर ९७ थकबाकीदारांवर व इतर थकबाकीदारांवरही सक्तीची वसुली (आर आर सी) दाखल केली आहे. याबाबत जुनी थकीत कर्जे निर्लेखित करण्याच्या दृष्टीने खादी आयोगाशी पत्रव्यवहार करण्याच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत. याबाबतची नोंद लेखाविषयक टिप्पणीमध्ये घेण्याबाबत कळविले आहे.

थकीत कर्जावर नेहमीच्या ४ टक्के दराने व्याजाची परिगणना करुन ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र २० मध्ये नियमितरित्या दर्शविले जाते. मात्र थकीत कर्जदाराने मुद्दल व व्याज एक रक्कमी परतफेड केल्यास दंडव्याज मंडळाकडून माफ केले जाते म्हणून ते लेख्यांमध्ये दर्शविले जात नाही.

५.३ जिंदगी जादा मालमत्ता

जिंदगी जादा मालमत्ता खाली रु ८.९२ लाख मालमत्ता जिंदगीपेक्षा जास्त दिसून येते. मात्र २४ वर्षात अद्याप या फरकाचा ताळमेळ घातलेला नाही.

हा फरक निकाली काढण्यासाठी योग्य ते प्रयत्न चालू आहेत असे मंडळाने नोव्हेंबर २००२ मध्ये कळविले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

जंगम मालमत्तेमध्ये असलेल्या फरकाच्या रकमेचा मंडळाने सन २००५-०६ मध्ये (सहपत्र ११) योग्य तो ताळमेळ घातलेला आहे.

५.३ १.पणन विभागाचे लेखे

(अ) कंबल उत्पादन केंद्र, उमरेड यांचेकडे रुपये २.०० लाख व हातकागद संस्था, पुणे यांचेकडे रु २.२० लाख अनुक्रमे मार्च, १९९८ व मार्च, २००० पासून तात्पुरती अनामत म्हणून प्रलंबित आहेत. सन २०००-२००१ च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक ५.२.७ (४) नुसार अभिप्राय देऊन देखील मंडळाने ही अनामत वसुल करण्यांबाबत कोणतीही कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे रु ४.२० लाखाच्या प्रमाणात मालमत्ता जास्त दिसून येते.

या तात्पुरत्या अनामत रक्कमा वसुल करण्याची कार्यवाही चालू करीत आहोत व ही रक्कम लवकरच वसुल होईल असे मंडळाने डिसेंबर, २००२ मध्ये सांगितले आहे.

(ब) भांडवली कर्जावर व्याजाची तरतूद रु९.५३ लाख व खेळते भांडवल कर्जावर व्याजाची तरतूद रु २६.८६ लाख केलेली असून ती सन १९९०-९१ पासून जिंदगी बाजूस पडून आहे.

मंडळाने डिसेंबर, २००२ मध्ये सांगितले आहे की, पणन कार्यक्रम राबविण्यासाठी रु. ८०.१० लाख खादी आयोगाकडून अनामत घेण्यांत आली होती व सदर रक्कम खादी आयोगास परत करण्यांत आली आहे. आजतागायत आयोगाने व्याजाची मागणी केलेली नाही. तथापि मंडळाने ४ टक्के या दराने व्याजाची तरतूद केलेली आहे. खादी आयोगाने व्याजाची मागणी केलेली नाही म्हणून सदर रक्कम जिंदगी म्हणून जास्त दिवस ठेवता येणार नाही. ही रक्कम लेख्यांमधून काढणे जरुरीचे आहे. त्यामुळे रु ३६.३९ लाखाने जिंदगी जास्त दिसून येते.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या पणन विभागाने या अनामत रक्कमा आर्थिक अडचणीमध्ये असलेल्या मंडळाच्या इतर खातेनिहाय केंद्रांना दिलेल्या आहेत. सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

पणन विभागाच्या व्याजापोटी केलेल्या तरतूदीच्या रक्कमांचे पणन विभागाच्या संचित नफयामध्ये मंडळाने सन २००७-०८ मध्ये समायोजन केले आहे.

५.४ रु ७.७२ लाखाने अखेरचा साठा जास्त दर्शविण्यांत आला आहे.

पणन विभागाच्या अखेरच्या ताळेबंद पत्रकामध्ये मालमत्ता बाजूस अखेरचा साठा रु १०.३१ लाख दर्शविण्यांत आला आहे. मात्र साठा रजिस्टरला रु २.५९ लाख असा दर्शविला आहे. म्हणजेच रु. ७.७२ लाखाने अखेरचा साठा जास्त दर्शविण्यांत आला आहे.

मंडळाने ऑक्टोबर, २००२ मध्ये उत्तरात नमूद केले आहे की, मालामध्ये नुकसान झाल्यामुळे हा फरक पडलेला आहे सन २००२-२००३ चे लेखे बनवितांना हा फरक निर्लेखित केला जाईल.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

५.५ जिंदगी व मालमत्ता रु ९५.१२ लाखाने कमी दर्शविणे

राज्य शासन अनुदानाखाली सहपत्र-६ मध्ये अखेरची शिल्लक (-) रु २६८.७८ लाख दर्शविली आहे. तिच्यामध्ये (-) रुपये ३६३.९० लाख प्रशासकीय खर्चासाठी असलेल्या अनियोजित (Non Plan) खर्चासाठी जमा झालेला निधी एकत्रित केल्याचे दिसते. मंडळाकडे असलेले अविनियोजित अनुदान या शिर्षकाखाली रु. ९५.१२ लाख जिंदगी बाजूस ही अविनियोजित रक्कम दर्शवून रु ३६३.९० लाख मालमत्ता बाजूस शासनाकडून रक्कम येणे या शिर्षकाखाली दर्शविणे जरुरीचे होते. अशी चुकीने दर्शविल्यामुळे जिंदगी व मालमता या रु ९५.१२ लाखाने त्या प्रमाणात कमी अधिक दिसतात.

सन २००२-२००३ चे लेखे तयार करतांना योग्य ती दुरुस्ती केली जाईल असे मंडळाने कळविले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

योजना व योजनेतर रक्कमा या सन २००३-०४ च्या लेख्यांमध्ये सहपत्र ६ मध्ये स्वतंत्ररित्या दर्शवून आवश्यक ती दुरुस्ती मंडळाने केली आहे.

५.६ बंद असलेल्या खाते निहाय केंद्राचे लेखे

खाली दर्शविलेली ४ खातेनिहाय केंद्रे मागील ४ ते २० वर्षापासून बंद आहेत.

१. हातकागद केंद्र, अमरावती
२. हातकागद केंद्र, परभणी
३. कंबल उत्पादन केंद्र उमरेड, जि.नागपूर
४. खाते निहाय केंद्र, मुंबई

सन १९९९-२००० च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्रमांक ५.२.४ (अ) व २०००-२००१ च्या अहवालातील परिच्छेद क्र ५.२.६ (अ) येथे अभिप्राय दिलेले असतांना देखील अद्याप वरील बंद केंद्राचे लेखे निकाली काढण्याबाबत त्यांची जिंदगी व मालमत्ता मंडळाच्या लेख्यांमध्ये वर्ग करण्याबाबत कोणतीही कार्यवाही मंडळाने केल्याचे दिसून येत नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाची बंद असलेली खातेनिहाय केंद्रे निर्लेखित करण्याबाबत अद्याप मंडळाने अंतिम निर्णय घेतलेला नसल्यामुळे सदर केंद्राचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये दर्शविले जातात. ही केंद्रे निर्लेखित करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन २००२-२००३ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

मंडळाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करण्याचे काम सन २००२-२००३ ते सन २००६-२००७ या पाच वर्षाच्या कालावधीसाठी नियंत्रक व महालेखापरीक्षक (कर्तव्ये, अधिकार आणि सेवाशर्ती) अधिनियम, १९७१ मधील कलम २०(१) नुसार प्रधान महालेखापाल कार्यालयाकडे सोपविण्यांत आले आहे.

मंडळाने दिनांक ३० सप्टेंबर, २००३ रोजी झालेल्या ३७३ व्या सभेत मंडळाच्या सन २००२-२००३ च्या वार्षिक लेख्यांना मान्यता दिली.

लेख्यांबाबत अभिप्राय

२.१ मालमत्ता

१. सहपत्र १८ मध्ये पश्चिम घाट विकास योजने अंतर्गत अवर्गीकृत रक्कम रु २२०६१/- वजा दर्शविली असल्यामुळे त्या प्रमाणात मालमत्ता व येणे कमी दिसून येतात.

भांडवली मालमत्तेवरील घसाऱ्या बाबत

दि.३१/३/२००३ अखेर मंडळाच्या लेख्यांमध्ये रु.१.९६ करोड स्थावर व जंगम मालमत्ता दर्शविली आहे ती घसारा वजा न करता खरेदीच्या किंमतीवर दर्शविली आहे. ही अनियमीतता सन १९९९-२०००,२०००-०१ व २००१-०२ च्या लेखा अहवालात मंडळाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यामुळे भांडवल व मालमत्ता तेवढया प्रमाणात जास्त दर्शविण्यांत आली आहेत.

२.१.२ स्थावर मालमत्ता कमी दर्शविणे

१) मंडळाची २३३०० चौ.फूट मापाची रु.१.३७ लाख किंमतीची जमिन पुणे येथे आहे. सदर जमिन मंडळाने लेख्यांमध्ये दर्शविली नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात मालमत्ता कमी दर्शविली आहे.

२) मंडळाच्या स्थापनेपासून म्हणजेच सन १९६२ पासून महाबळेश्वर येथील बंगला क्र.१,४ व ५ ही मंडळाची मालमत्ता आहे. मंडळाने सदर मालमत्तेची किंमत अद्याप ठरविली नाही व लेख्यांमध्येसुध्दा दर्शविली नाही. मालमत्तेची किंमत ठरविली नसल्यामुळे ते शक्य झाले नाही. त्यामुळे मालमत्ता तेवढया प्रमाणात कमी दर्शविली . याबाबत सन २००१-०२ च्या लेखा अहवालामध्ये अभिप्राय देण्यांत आले आहेत.

या कामाची जबाबदारी संचालक, महाबळेश्वर, जिल्हा सातारा यांच्यावर सोपविली असून त्यावर लवकरच कार्यवाही करीत आहोत असे मंडळाने (डिसेंबर, २००३ मध्ये) उत्तरामध्ये कळविले आहे.

२.१.३ मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी

१. सन १९९९-२०००, सन २०००-०१ व सन २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये अभिप्राय दिले असतांना देखील मालमत्ता रजिस्टर पूर्ण नसल्यामुळे लेख्यांमध्ये दर्शविलेल्या रु.१.४६ करोडच्या मालमत्तेची तपासणी करणे शक्य झाले नाही.

२. सन १९९९-२०००,२०००-०१ व सन २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये अभिप्राय देवून देखील मंडळाच्या स्थावर व जंगम मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी करण्यांत आलेली नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, मंडळ त्यांचे वार्षिक लेखे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक मंडळाच्या नियमामध्ये नमूद केलेल्या विहीत नमुन्यात तयार करील आयव्यय पत्रक ही संज्ञा मंडळाच्या अधिनियम, १९७७ मधील दुरुस्ती अन्वये नफा तोटा पत्रकाऐवजी आयव्यय पत्रक तयार करण्यात यावे अशी करण्यात आली आहे (या दुरुस्ती पूर्वी पासूनही मंडळामार्फत त्याच्या अकाऊंट मॅन्युअल नुसार आयव्यय पत्रक तयार केले जात होते.) कलम २५ (२) नुसार मंडळाने त्यांच्या व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खाते निहाय केंद्रांचे लेखे वाणिज्यीक तत्वावर तयार केलेले आहे. मंडळाने कायद्यातील स्वायत्त तरतूदीचे याद्वारे पालन केलेले आहे.

केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग आयोग कार्यालयाने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या विहीत नमुन्यानुसार केंद्रीय स्वायत्त संस्थांनी ज्याप्रमाणे लेखे तयार करणे आवश्यक आहे, ती पध्दत सन २००७-०८ या वर्षापासून अवलंबिण्यास सुरुवात केली आहे. ज्या योगे आता उत्पन्न व खर्च_पत्रक तयार केले जाते. महालेखाकार यांची सूचना व खादी व ग्रामोद्योग आयोगाने अवलंबिलेली पध्दत विचारात घेता पूर्वीच्या प्रचलित पध्दती ऐवजी हे उत्पन्न व खर्च पत्रक तयार करण्याबाबत मंडळाच्या नियमामध्ये दुरुस्ती करणे प्रस्तावित आहे. ही पध्दत अवलंबिल्यामुळे राज्य शासनावर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडणार नाही या अटीवर राज्य शासनाच्या अर्थ विभागाने या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयाकडे मंजुरीसाठी पाठविण्यांत आला असून त्यांची मान्यता मिळाल्यानंतर मंडळाच्या नियमामध्ये त्यानुसार आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल. या अनुषंगाने मंडळाच्या लेख्यांमध्ये एखादे सहपत्र किंवा लेखा विषयक टिपणी मंडळाच्या लेखांकन पध्दतीमध्ये समाविष्ट करणे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या अधिनियमातील कलम-२५ मध्ये मंडळाचे लेखे व मंडळाच्या खातेनिहाय केंद्रांचे लेखे विशिष्ट पध्दतीने तयार करणे बाबत स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे वाणिज्यीक पध्दतीने तयार करण्याबाबत उल्लेख करण्यांत आला आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या खातेनिहाय केंद्रांचे लेखे देखील व्यापारी तत्वावर ठेवले जातात. खादी व ग्रामोद्योग आयोगाने त्यांचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना जी लेखांकन पध्दत अवलंबिली आहे, त्यामध्ये त्यांची मालमत्ता ही खरेदीच्या किंमतीवरच दर्शविली असून त्यावर घसारा आकारण्यांत आलेल्या नाही. तथापि मंडळानेदेखील भविष्यात त्यांची लेखांकन पध्दत संभाव्य येणे व देणी (Accrual) तयार करण्याबाबतच्या शक्यता व अंमलबजावणी पडताळण्याबाबत मंडळाची लेखे ठेवण्याची कार्यपध्दती, निधीची उपलब्धता या संदर्भात महालेखापाल व खादी व ग्रामोद्योग आयोग यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मंडळाकडे विचारणा केली आहे.

सन २००३-०४ च्या लेख्यांमधील ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र-१२ मधील अ.क्र.-१५ येथे मंडळाने दुरुस्ती केली आहे.

महाबळेश्वर येथील बंगल्यांची किंमत निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी, सातारा यांच्याशी मंडळाकडून पत्रव्यवहार चालू आहे. सदर बंगल्यांची किंमत त्वरीत निश्चित करुन घेण्याबाबत मंडळास कळविण्यांत आले आहे.

१) संचालक, संचालनालय यांनी जिल्हाधिकारी, सातारा यांना लेखी कळविले आहे.

२) अधिकार अभिलेख प्राप्त करण्याबाबत मंडळाने जंगम मालमत्ता रजिस्टर पूर्ण केले असून सन २००३-०४ च्या महालेखापाल यांच्या तपासणी पथकाने दाखविले आहे. मागील वर्षाची अखेरची शिल्लक व त्यामध्ये नवीन खरेदी व निर्लेखन यांची नोंद घेऊन मंडळाने संबंधीत वर्षाचे लेखे त्यावेळी पूर्ण केले होते.

स्थावर मालमत्तेचे रजिस्टर मंडळाने पूर्ण करुन सन २००३-०४ च्या महालेखापाल यांच्या तपासणी पथकास दाखविले आहे. मात्र सन २००२-०३ या वर्षात स्थावर मालमत्तेची कोणतीही नवीन खरेदी व निर्लेखन झाले नसल्यामुळे मंडळास लेखे बनविण्यांत कोणतीही अडचण आली नाही.

२.२ भांडवल व देणी

२.२.१ राखीव निधी कमी दाखविणे

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ विनिमय १९६० मधील विनियम क्रमांक १८(२)नुसार मंडळाच्या किरकोळ प्राप्तीच्या रक्कमा राखीव निधीत जमा करण्याची तरतूद आहे.

१-सन २००२-०३ मध्ये प्राप्त झालेली रु.१०.९२ लाख किरकोळ प्राप्तीची रक्कम (सहपत्र १०)राखीव निधीस वर्ग करण्यांत आलेली नाही. त्यामुळे राखीव निधी त्या प्रमाणात कमी दिसून येतो.

२-मंडळाच्या एकत्रित ताळेबंद पत्रकानुसार दिनांक ३१ मार्च, २००३ अखेर किरकोळ जमा खाती रु २४.२६ लाख जमा झाल्याचे दिसतात. (मात्र प्रत्यक्ष शिल्लक रु ३५.१८ लाख आहे) सन २०००-०१ व सन २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये अभिप्राय देऊन देखील सदर रक्कम राखीव निधीत वर्ग करण्यांत आलेली नाही.

२.२.२ जिंदगी व मालमत्ता रु.४४.७४ लाखाने कमी दाखविणे

सन २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेद क्र.५.५ मध्ये अनुदानाची शिल्लक रक्कम चुकीची दर्शविल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. सहपत्र-६ मध्ये राज्य शासन निधीची शिल्लक (-) रु.३.०४ करोड दर्शविली आहे. ही रक्कम प्लॅन योजनेखाली प्राप्त झालेल्या रु.४४.७४ लाख अविनियोजित रक्कम व योजनेतर योजनेखाली (-) रु.३.४९ करोड प्रशासकीय खर्च यामध्ये एकत्रित केली आहे. याठिकाणी योजनेतर खर्च एकत्रित केल्याचे दिसून येते. रु.४४.७४ लाख अखर्खित शिल्लक रक्कम देणे बाजूस "राज्य शासन अखर्चीत शिल्लक" म्हणून दर्शविणे व रु.३.४९ करोड येणे बाजूस "राज्य शासनाकडून येणे" म्हणून दर्शविणे जरुरीचे होते. अशा रक्कमा अयोग्यरित्या दर्शविल्यामुळे देणे व येणे बाजू त्या प्रमाणात कमी दिसून येतात.

२.२.३ जिंदगी जादा मालमत्ता

सहपत्र-११ पहाता जिंदगी मालमत्ता याखाली रु ८.९२ लाख मालमत्ता जिंदगीपेक्षा जास्त दिसून येते. मात्र २५ वर्षात अद्याप या फरकाचा ताळमेळ घातलेला नाही. सन २००१-०२ च्या अहवालामध्ये परिच्छेद क्र.५.३ मध्ये ही बाब निदर्शनास आणून देखील अद्याप फरक निकाली काढलेला नाही.

२.२.४ निलंबन लेखा

लाभधारकांकडून जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी जी वसुली करतात, ती योजनेचा तपशिल न देता मुख्य कार्यालयास पाठवितात. अशा रक्कमा या शिर्षकाखाली ठेवल्या जातात. या रक्कमा खादी आयोग/राज्य शासनास देय आहेत. सन १९९८-९९ ते सन २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये ही बाब निदर्शनास आणून दिली असतांनादेखील दि.३१ मार्च,२००३ अखेर निलंबन लेखा शिर्षकाखाली रु.१४.६९ लाख पडून आहेत.

२.२.५ खादी ग्रामोद्योग आयोगाकडून अनुदान म्हणून प्राप्त झालेली अखर्चित रक्कम रु.३.३८ करोड निधी तात्पुरता वर्ग करणे :-

मंडळाचे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रकातील दि.३१ मार्च, २००३ अखेर खादी ग्रामोद्योग आयोगाकडून जो निधी प्राप्त झाला आहे, त्यापैकी रु.३.६३ करोड अविनियोजीत दिसून येतात त्यापैकी रु ३.३८ करोड अशी मोठया प्रमाणातील रक्कम राज्य निधीस तात्पुरती अनामत दिल्याचे दिसून येते. याबाबत मंडळाने खुलासा केला आहे की, खादी आयोगाच्या निधीतील जी रक्कम मंडळाकडे पडून आहे ती कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी तात्पुरती वळती केली असून ती राज्य शासनाकडून येणे आहे. राज्य शासनाकडून निधीची प्रतिपूर्ती होईल या अपेक्षेवर खादी आयोगाचा जो निधी पगार व भत्यासाठी वापरला आहे त्यास खादी आयोगाची मंजुरी घेणे जरुरीचे होते. सन २००१-०२ च्या लेखा अहवालात भाष्य केले असतांना देखील अद्याप याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

२.२.६ नॉर्मल योजनेतील मुदतबाहय कर्जे रु ३७.६९ करोड येणे वाढवून दाखविणे

खादी व ग्रामोद्योग आयोगाचे नॉर्मल योजनेचे एकूण ३६ उद्योगाचे रु.३७.६९ करोड कर्ज नॉर्मल योजनेखाली दि.३१ मार्च, २००३ अखेर थकीत असल्याचे दिसते. कर्ज मंजुरीच्या अटीनुसार जर कर्ज थकीत झाले तर नियमित ४ टक्के व्याजापेक्षा ५ टक्के दंडव्याज वसुल करावे अशी अट आहे. सन २००१-०२ च्या लेख्यांमध्ये भाष्य करुन देखील मंडळाने हे दंडव्याज आकारले नाही ,परिगणीत केले नाही व येणे म्हणून लेख्यांमध्ये देखील दर्शविले नाही.

मंडळाचे लेखे हे रोखीने पध्दतीने ठेवले जातात ॲक्रुअल पध्दतीने ठेवले जात नाहीत. त्यामुळे लाभार्थी कडून येणे असलेले व्याज व दंडव्याज लेख्यांमध्ये दर्शविले जात नाही असे मंडळाने (डिसेंबर, २००३ मध्ये) कळविले आहे.

मंडळाचा खुलासा समर्थनिय नाही म्हणून ंमडळास पुनःश्च सल्ला देण्यांत येतो की, मंडळाने ॲक्रुअल पध्दतीने लेखे ठेवावेत व अशा प्रकारची व्याज व दंडव्याजाबाबतची वसुली परिगणीत करुन वार्षिक लेख्यांमध्ये दर्शवावी.

२.२.७ अवर्गीकृत वजा शिल्लकः-

नॉर्मल योजनेतील खादी ग्रामोद्योग आयेगास परत करावयाची कर्ज रक्कम सहपत्र-२ मध्ये मंडळ सन १९९९-२००० पासून रु १.६३ करोड तसलमात खाली वजा शिल्लक दर्शवित असून सध्या अंतिम फरक जिंदगी बाजूस (-) रु. १.१२ करोड दर्शविला आहे. रु १.६३ करोड रुपयाने जिंदगी जादा दर्शविली आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

किरकोळ लेखा शिर्षकाखाली जमा असलेली रु. १०.९२ लाख रक्कम मंडळाने सन २००२-०३ या वर्षी राखीव निधीकडे वर्ग केली आहे. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

किरकोळ लेखा शिर्षकाखाली जमा झाले रु ३५.१८ लाख रक्कम मंडळाने सन २००३-०४ या वर्षात राखीव निधीस वर्ग केली आहे. मंडळाचा अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

ऑडीटच्या सल्ल्याप्रमाणे सन २००३-०४ पासून योजना व योजनेतर रक्कमा या ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र-६ मध्ये दर्शवून मंडळाने योग्य ती दुरुस्ती केली आहे.

मालमत्तेमधील फरक मंडळाने सन २००५-०६ च्या लेख्यांमध्ये सहपत्र-११ मध्ये निकाली काढला आहे.
दिनांक ३१ मार्च ,२००८ अखेर निलंबन लेखा शिर्षकामध्ये रु ९.०३ लाख एवढी रक्कम शिल्लक असून ती त्वरीत संबधित शिर्षकाखाली वर्ग करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत दिल्या आहेत

अखर्चित शिल्लक रकमेमध्ये खादी आयोगाकडून मिळालेल्या अखर्चित अनुदानाच्या रक्कमा व राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती केली जाईल या अपेक्षेवर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यावर खर्च केलेल्या रक्कमांचा समावेश आहे. खादी आयोगाकडून खातेनिहाय केंद्रांसाठी प्राप्त झालेला निधी व मंडळाकडे सुरक्षा अनामत, शासन हमी शुल्क, यामधून कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यांसाठी खर्च केलेल्या रक्कमा, राज्य शासन तात्पुरती अनामत या शीर्षाखाली ठेवल्या आहेत त्यामध्ये कोणत्याही योजना अनुदान रकमेचा समोवश नाही.

राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती करुन घ्यावयाच्या रकमेचा प्रस्ताव शासनाच्या सहकार विभागाकडे पाठविला असून त्यांनी हे दायित्व स्वीकारले आहे. खादी आयोगाचा खाते निहाय प्राप्त झालेला निधी तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र वर्ग केल्याबाबत खादी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

मंडळाने असा निर्णय घेतला आहे की, जर थकीत कर्जदार मुद्दल अधिक व्याजाची रक्कम एक रक्कमी परतफेड करण्यास तयार असल्यास त्यास दंडव्याज माफ करण्यात यावे त्यामुळे काही लाभार्थी एक रक्कमी परतफेड करण्यास तयार झालेले आहेत. म्हणून दंडव्याजाची परिगणना केली जात नाही.

आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे खादी आयोगाकडून येणे असलेली रक्कम आयोगास देय असलेली रक्कम रु.१.१२ कोटीही आयोगास देय असलेल्या इतर रक्कमांमध्ये फेरफार न करता ताळेंबंद पत्रकाच्या येणे बाजूस सन २००४-०५ मध्ये दर्शविली आहे.

३ खातेनिहाय केंद्राचे लेखे

३.१ पणन विभागाचे लेखे

मालमत्ता व येणी

१) पणन विभागाच्या लेख्यांत मधमाशापालन संस्थेकडून रु.२.८० लाख येणे असल्याचे दर्शविले आहे. तथापि मधमाशापालन केंद्राच्या लेख्यांमध्ये केवळ रु.१.६० लाख पणन विभागास देणे दर्शविले आहे. म्हणजेच रु.१.२० लाखाने पणन विभागाचे येणे जास्त दर्शविले आहे.

जिंदगी

चालू देणी व तरतूद या शिर्षकाखाली जिल्हा कार्यालयाकडून वसुली म्हणून रु २६,३५१/- दर्शविण्यांत आले आहेत. त्यामध्ये रु. २१,५५३/- शासन मुद्रणालयाकडून परत आलेली रक्कम जी खादी ग्रामोद्योग युनिटला परत दिली व रु २२५०/- जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी जालना व चंद्रपूर यांचेकडून परत आलेल्या रक्कमांचा त्यात समावेश आहे. त्यामुळे एकूण रु २३,८०३/- ही देणे रक्कम नाही. त्यामुळे तेवढ्या रक्कमेने जिंदगी जास्त दर्शविलेली आहे.

ताळेबंद पत्रकात येणे बाजूस संकीर्ण ऋणकोखाली मालाचा पुरवठा केल्याबददल रु.४१.९३ लाख येणे दर्शविले आहे. एक मध्यवर्ती संस्था म्हणून मंडळ खरेदीदार व विक्रीदार यांच्यामध्ये काम करते व लोकरी वस्तुवर ५ टक्के व इतर वस्तुंवर २ टक्के सेवा आकार आकारते. या रु.२९.२१ लाख येणे शिल्लक रक्कमेवर सेवा आकाराची परिगणना केली असता, ती रु.०.६८ लाख होते. तथापि ही रक्कम सेवा आकार वसुल करण्यासाठी म्हणून नफा तोटा पत्रकात दर्शविलेली नाही. तसेच ताळेबंदपत्रकात येणे म्हणून देखील दर्शविली नाही. त्यामुळे तेवढया रक्कमेने मालमत्ता व येणे कमी दर्शविले आहे.

प्रत्यक्ष वसुली होईल, त्या प्रमाणात सेवा आकार वसुल केला जातो असे मंडळाने (डिसेंबर,२००३ मध्ये) कळविले आहे.

मंडळाचे उत्तर समर्थनीय नाही. कारण पणन विभागाचे लेखे हे ॲक्रुअल पध्दतीने ठेवले जातात.

कंबल उत्पादन केंद्रास दिलेली रु.२.०० लाख व हातकागद केंद्र,पुणे यांना दिलेली रु.२.२० लाख तात्पुरती अनामत रक्कम अनुक्रमे मार्च, १९९८ व मार्च, २००० पासून प्रलंबीत आहे. सन २०००-२००१ व २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये आक्षेप घेतलेला असतांना देखील अद्याप सदर रक्कम वसुल/वळती करण्याबाबत मंडळाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

सन १९९९-२०००, २०००-०१ व २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये आक्षेप घेतलेला असतांना देखील भांडवली कर्जाच्या व्याजासाठी तरतूद केलेली रक्कम रु.९.५३ लाख व खेळते भांडवल कर्जावरील व्याजासाठी तरतूद केलेली रु.२६.८६ लाख रक्कम सन १९९०-९१ पासून ताळेबंद पत्रकामध्ये देणे बाजूस पडून आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

पणन विभागास येणे असलेल्या व मधमाशापालन केंद्राने देणे असलेल्या रक्कमांचा मंडळाने ताळमेळ घातला असून सन २००७-०८ च्या दोन्ही संस्थांच्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

याबाबत योग्य ती दुरुस्ती मंडळाने सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये केली आहे.

ऑडीटने सूचना केल्याप्रमाणे सन २००८-०९ पासून आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

मंडळाने त्यांच्याच खातेनिहाय केंद्रांना या अनामती दिल्या आहेत. तरी त्या त्वरीत वसुल करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

व्याजाची तरतूद करुन ठेवलेली सर्व रक्कम सन २००७-०८ च्या पणन विभागाच्या संचित नफ्यामध्ये समायोजित केली आहे.

३.२ खादी व अंबर चरखा केंद्राचे लेखे (खादी उत्पादन केंद्र) नागपूर

अ) व्यवस्थापकीय अनुदान रु.१६,०००/- सन २००२-०३ मध्ये परत केले नसतांना देखील दि.३१ मार्च, २००३ च्या लेख्यांमध्ये भांडवली बाजूस दर्शविण्यांत आले नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात देणी कमी दर्शविली आहेत.

ब) रु.७१,६०५/- हा खर्च तेरीज पत्राकामध्ये दर्शविला आहे. मात्र नफा व तोटा पत्रकात दर्शविला नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात खर्च कमी दर्शविल्यामुळे तेवढया प्रमाणात मालमत्ता व येणी कमी दिसून येतात.

क) तेरीज पत्रकामध्ये खादी विक्रीची किंमत रु.५,५१,९७४.५९ दर्शविलेली आहे. मात्र लेख्यांमध्ये ती रु.५,२८,०६०.९५ एवढी दर्शविली आहे. त्यामुळे रु.२३,९१४.०० रुपये विक्री व ताळेबंद पत्रकामध्ये भांडवल व देणी तेवढया प्रमाणात कमी दर्शविली आहे. पर्यायाने जिंदगी तेवढया प्रमाणात कमी दिसते.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

याबाबतची योग्य ती दुरुस्ती जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, नागपूर यांनी खादी उत्पादन केंद्राच्या सन २००३-०४ च्या लेख्यांमध्ये मंडळाने कळविल्यानुसार केली आहे.

आक्षेपामधील मुद्यांबाबत तपासणी करुन सन २००८-०९ चे लेखे अंतिम करताना योग्य ती दुरुस्ती करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

३.३ बंद असलेल्या खाते निहाय केंद्राचे लेखे

मंडळाची खालील चार खाते निहाय केंद्रे मागील ४ ते २० वर्षापासून बंद आहेत.

१) हातकागद केंद्र,अमरावती

२) हातकागद केंद्र, परभणी

३) कंबल उत्पादन केंद्र, नागपूर

४) खाते निहाय केंद्र, मुंबई

सन १९९९-२०००, २०००-०१ व २००१-०२ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये आक्षेप घेतलेला असताना देखील या केंद्राचे लेखे बंद करण्याबाबत तसेच सदर केंद्राची जिंदगी व मालमत्ता मंडळाच्या लेख्यांमध्ये वर्ग करण्याबाबत कोणतीही कार्यवाही अद्याप करण्यांत आलेली नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

बंद असलेली खातेनिहाय केंद्रे निर्लेखित करण्याबाबत मंडळाने निर्णय घेतलेला नाही. म्हणून सदर बंद केंद्राचे लेखे मंडळाच्यालेख्यांमध्ये दर्शविले जातात. तरी या केंद्राबाबत त्वरीत योग्य तो निर्णय घेण्याबात मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

४ सर्वसाधारण

४.१ लेखा पध्दतीबाबत :-

सन १९९९-२०००,२०००-०१ व २००१-०२ च्या मागील लेखा परीक्षण अहवालामध्ये सुचित केले असतांनाही (व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खातेनिहाय केंद्राव्यतिरिक्त) मंडळाने त्यांचे लेखे भविष्यात प्राप्त होणा-या व देय असणाऱ्या रक्कमा (ॲक्रुअल) लेख्यांमध्ये समाविष्ट न करता फक्त (रोख तत्वावर) झालेले व्यवहार समाविष्ट करुन आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक तयार करण्यांत आले आहे.

आयव्यय पत्रक हा केवळ प्रत्यक्षात झालेल्या रोख व्यवहाराचा सारांश आहे. त्यामध्ये जमा व खर्चाचा तपशील नाही. तसेच त्यामध्ये गुंतवणूकीवर प्राप्त होणारे व्याज, खादी आयोग/राज्य शासन यांना परत करावयाची प्रलंबित कर्जे व प्रलंबित कर्जावरील व्याज यांचा समावेश नसतो. त्यामुळे मंडळाच्या लेख्यांमधून मंडळाच्या अर्थिक स्थितीचे खरे व सत्य चित्रण होत नाही.

४.१.२ वैशिष्टयपूर्ण लेखा पध्दती

सन २००२-०३ पासून मंडळाने लेख्यांसोबत "लेख्यांबाबत भाष्य" ही टिप्पणी जोडण्यास सुरुवात केली आहे. मात्र त्यामध्ये स्थावर मालमत्तेची किंमत ठरविणे, त्यावर घसारा आकारणे, गुंतवणूकी, शासन करांपासून मिळणारी सूट, आकस्मिक देण्यांबाबत मिळणारी सुट याबाबत टिप्पणीमध्ये उल्लेख केलेला नाही. टिप्पणीमधील माहिती अपूर्ण आहे.

मंडळाची एकूण ८ खातेनिहाय केंद्रे आहेत. मात्र केवळ ४ चालू असलेल्या केंद्रांचाच त्यामध्ये उल्लेख केला आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, मंडळ त्यांचे वार्षिक लेखे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक मंडळाच्या नियमामध्ये नमूद केलेल्या विहीत नमुन्यात तयार करील आयव्यय पत्रक ही संज्ञा मंडळाच्या अधिनियम, १९७७ मधील दुरुस्ती अन्वये नफा तोटा पत्रकाऐवजी आयव्यय पत्रक तयार करण्यात यावे अशी करण्यात आली आहे (या दुरुस्ती पूर्वी पासूनही मंडळामार्फत त्याच्या अकाऊंट मॅन्युअल नुसार आयव्यय पत्रक तयार केले जात होते.) कलम २५ (२) नुसार मंडळाने त्यांच्या व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खाते निहाय केंद्राचे लेखे वाणिज्यिक तत्वावर तयार केलेले आहे. मंडळाने कायद्यातील स्वायत्त तरतूदीचे याद्वारे पालन केलेले आहे.

केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग आयोग कार्यालयाने भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या विहीत नमुन्यानुसार केंद्रीय स्वायत्त संस्थांनी ज्याप्रमाणे लेखे तयार करणे आवश्यक आहे ती पध्दत सन २००७-०८ या वर्षापासून अवलंबिण्यास सुरुवात केली आहे. ज्या योगे आता उत्पन्न व खर्च पत्रक तयार केले जाते. महालेखाकार यांची सूचना व खादी व ग्रामोद्योग आयोगाने अवलंबिलेली पध्दत विचारात घेता पूर्वीच्या प्रचलित पध्दती ऐवजी हे उत्पन्न व खर्च पत्रक तयार करण्याबाबत मंडळाच्या नियमामध्ये दुरुस्ती करणे प्रस्तावित आहे. ही पध्दत अवलंबिल्यामुळे राज्य शासनावर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडणार नाही या अटीवर राज्य शासनाच्या अर्थ विभागाने या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यांत आला असून त्यांची मान्यता मिळाल्यानंतर मंडळाच्या नियमामध्ये त्यानुसार आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल या अनुषंगाने मंडळाच्या लेख्यांमध्ये एखादे सहपत्र किंवा लेखा विषयक टिपणी मंडळाच्या लेखांकन पध्दतीमध्ये समाविष्ट करणे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या अधिनियमातील कलम-२५ मध्ये मंडळाचे लेखे व मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे विशिष्ट पध्दतीने तयार करणे बाबत स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे वाणिज्यीक पध्दतीने तयार करण्याबाबत उल्लेख करण्यांत आला आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखेदेखील व्यापारी तत्वावर ठेवले जातात याची कृपया नोंद घ्यावी. खादी व ग्रामोद्योग आयोगाने त्यांचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना जी लेखांकन पध्दत अवलंबीली आहे त्यामध्ये त्यांची मालमत्ता ही खरेदीच्या किंमतीवरच दर्शविली असून त्यावर घसारा आकारण्यांत आलेल्या नाही. तथापि मंडळानेदेखील भविष्यात त्यांची लेखांकन पध्दत संभाव्य येणे व देणी (Accrual) तयार करण्याबाबतच्या शक्यता व अंमलबजावणी पडताळण्याबाबत मंडळाची लेखे ठेवण्याची कार्यपध्दती, निधीची उपलब्धता या संदर्भात महालेखापाल आणि खादी व ग्रामोद्याग आयोग यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मंडळाकडे विचारणा केली आहे.

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या सर्व मुद्यांचा समवेश मंडळाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांसोबत जोडलेल्या लेखाविषयक टिप्पणीमध्ये मंडळाने केला आहे.

भविष्यात याबाबत खबरदारी घेण्याबबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

लेखापरीक्षण अभिप्रायाचा सारांश.

वरील परिच्छेदामध्ये दिलेल्या अभिप्रायाचा सारांश असा आहे की, दिनांक ३१ मार्च, २००३ अखेर जिंदगी ही रु. ११९.३१ लाखाने जास्त व मालमत्ता व येणे रु. ३५०.०७ लाखाने कमी दर्शविण्यांत आल्याचे दिसते.

अनुपालन अहवाल देण्यास कमी प्रतिसाद

वरील सर्व मुददे एप्रिल २००४ मध्ये मंडळास कळवून देखील (जुलै २००४)पर्यंत अनुपालन अहवाल प्राप्त झाला नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन २००३-२००४ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

२.लेख्यांवरील भाष्य

२.१ मालमत्ता व येणी

२.१.१ भांडवल व देणी तसेच मालमत्ता व येणी चुकीची दर्शविणे - सहपत्र-७ मध्ये राज्य शासनास देणे असलेले कर्ज या शिर्षकाखाली रु.८५.९८ लाख ताळेबंद पत्रकात देणे म्हणून दर्शविले आहे. मात्र सहपत्र-१८ मध्ये संस्था व सोसाटयांकडून वसूल करावयाचे कर्ज म्हणून येणे बाजूस रु.७०.५७ लाख दर्शविले आहे. याबाबत मंडळाने कळविले आहे की, हे कर्ज मंडळ स्थापनेपूर्वीचे म्हणजेच सन १९६२ पूर्वीचे आहे. त्यामुळे त्याचा तपशिल मंडळाकडे उपलब्ध नाही कर्जाचा कोणताही तपशिल उपलब्ध नसताना मागील ३२ वर्ष येणी व देणी लेख्यांमध्ये दर्शविणे म्हणजेच तेवढया प्रमाणात जिंदगी व मालमत्ता जास्त दर्शविली आहे.

२.१.२ वजा शिल्लक

खादी आयोगास परत करावयाचे कर्ज (नॉर्मल) या शिर्षकाखाली सहपत्र-२ मध्ये तसलमात ची रक्कम रु.१.६३ करोड सन १९९९-२००० पासून (-) वजा शिल्लक म्हणून दर्शविली जात आहे.

याबाबत मंडळाने (नोव्हेंबर, २००४) मध्ये कळविले आहे की,सदर रक्कम ही मंडळाने विविध योजनांसाठी वापरली असून ती मंडळास खादी आयोगाकडून येणे आहे व सदर रक्कम मागील २७ वर्षापासून वजा शिल्लक म्हणून दर्शविली जात आहे. या ठिकाणी ही रक्कम ताळेबंद पत्रकात येणे बाजूस दर्शविणे जरुरीचे असतांना तसे न केल्यामुळे भांडवल आणि देणी व मालमत्ता व येणी रु.१.६३ करोडनें दोन्ही बाजूस आलेली आहेत.

सहपत्र-१८ मध्ये "पश्चिम घाट विकास योजना" या शिर्षकाखाली (-) रु.०.४५ लाख दर्शविली आहे.त्यामुळे तेवढया प्रमाणात येणी कमी दर्शविली आहेत. मंडळाच्या सन २००२-०३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये भाष्य करुन देखील अद्याप योग्य ती कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

२.१.३ भांडवली मालमत्तेवर घसारा आकारणे

मंडळाची स्थावर जंगम मालमत्ता ही त्यावर घसारा न आकारता रु.२.०० करोड या मुळ किंमती एवढी दर्शविली आहे. ही अनियमीतता यापूर्वी सन १९९९-२००० व सन २००२-०३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये निदर्शनास आणून दिलेली आहे. त्यामुळे भांडवल व मालमत्ता त्या प्रमाणात जास्त झालेली आहे.

२.१.४ स्थावर मालमत्तेची किंमत कमी दर्शविणे

हातकागद उत्पादन केंद्र-अमरावती व हातकागद उत्पादन केंद्र,परभणी यांच्या लेख्यांमध्ये जमिन विकासासाठी झालेला खर्च रु.०.३५ लाख लेख्यांमध्ये मालमत्ता म्हणून दर्शविला आहे. मात्र ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र-१४ मध्ये न दर्शविल्यामुळे तेवढया प्रमाणात मालमत्ता कमी दिसून येते.

२.१.५ अंबर चरखा केंद्राच्या लेख्यांचा समावेश न करणे- जिंदगी व मालमत्ता कमी दर्शविणे

भांडवली खर्च कर्ज या योजने अंतर्गत सन १९८९-९० मध्ये एकूण ८२ अंबर चरखा केंद्र स्थापन करण्यांत आली होती. प्रत्येक केंद्रासाठी २५ चरखे याप्रमाणात रु.३९.६७ लाख किंमतीचे चरखे हे कर्ज स्वरुपात चरखे खादी आयोगाकडून देण्यांत आले होते.सदर लेख्यांचे कर्ज लेख्यांमध्ये देखील नाही त्यामुळे तेवढया प्रमाणात दायित्व व मालमत्ता कमी दर्शविली आहे. सन १९९८-९९ च्या लेखा अहवालामध्ये ही बाब निदर्शनास आणून दिली असतांना देखील मंडळाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

२.१.६ खुप जुनी तसलमात शिल्लक तपशिलाशिवाय लेख्यांमध्ये दर्शविणे

रु.१.१७ लाखाची तसलमात शिल्लक सहपत्र-१६ मध्ये सन १९९६-९७ पासून जिल्हा

ग्रामोद्योग अधिकारी यांच्याकडे असल्याचे दर्शविले आहे. याबाबत जिल्हानिहाय महिती मंडळाकडे उपलब्ध नाही. तेच जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी देखील त्यांच्या मासिक आयव्यय पत्रकामध्ये ही तसलमात शिल्लक दर्शवीत नाहीत.

२.१.७ कार्यवाही न झालेली निलंबन शिल्लक

ताळेबंद पत्रकामध्ये मालमत्ता व येणे बाजुस रु.०.३७ लाख निलंबन लेखा या शिर्षकाखाली मागील तीन वर्षा पासून दिसून येतात. त्यामध्ये खातेनिहाय केंद्राचे रु.०.१९ लाख व मुख्य कार्यालय मुंबईचे रु.०.१८ लाख आहेत. ही रक्कम निलंबन लेखा म्हणून का दर्शविली याबाबतची माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही.

२.१.८ तपशिल उपलब्ध नसलेले गुजरात खादी व ग्रामोद्योग मंडळाकडील कर्जे

ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र-१६ मध्ये गुजरात खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून रु.०.५१ लाख कर्ज येणे सन १९७२-७३ पासून येणे म्हणून दिसून येते की, ज्या कर्जाचा तपालि मंडळाकडे उपलब्ध नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

खूप जुन्या वसुलपात्र रक्कमांचा शोध घेणे मंडळास शक्य नसल्यास त्या निर्लेखित करण्याबाबत योग्य ती मान्यता घेण्याबाबतचा सल्ला मंडळास देण्यात आला आहे.

आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे खादी आयोगाकडून येणे असलेली रक्कम खादी आयोगास देय असलेल्या रक्कमांमध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार न करता सन २००४-०५ च्या ताळेबंद पत्रकात मंडळाने येणे बाजूस दर्शविली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

मुंबई खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की मंडळ त्यांचे वार्षिक लेखे आयव्यय पत्रक व ताळेबंद पत्रक मंडळाच्या नियमामध्ये नमूद केलेल्या विहित नमुन्यात तयार करील आयव्यय पत्रक ही संज्ञा मंडळाच्या अधिनियमातील १९७७ मधील दुरुस्ती अन्वये नफा तोटा पत्रक ऐवजी आयव्यय पत्रक तयार करण्यात यावे अशी करण्यात आली आहे (या दुरुस्ती पूर्वी पासूनही मंडळामार्फत त्याच्या अकाऊंट मॅन्युअल नुसार आयव्यय पत्रक तयार केले जात होते.) कलम २५ (२) नुसार मंडळाने त्यांच्या व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खाते निहाय केंद्राचे लेखे वाणिज्यिक तत्वावर तयार केलेले आहे. मंडळाने कायद्यातील स्वायत्त तरतूदीचे याद्वारे पलन केलेले आहे.

केंद्र शासनाच्या खादी ग्रामोद्योग आयोग कार्यालयाने भ्ज्ञारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी सुचविलेल्या विहीत नमुन्यानुसार केंद्रीय स्वायत्त संस्थांनी ज्याप्रमाणे लेखे तयार करणे आवश्यक आहे ती पध्दत सन २००७-०८ या वर्षापासून अवलंबिण्यास सुरुवात केली आहे. ज्या योगे आता उत्पन्न व खर्च पत्रक तयार केले जाते.

महालेखाकार यांची सूचना व खादी व ग्रामोद्योग आयोगाने अवलंबिलेली पध्दत विचारात घेता पूर्वीच्या प्रचलित पध्दती ऐवजी हे उत्पन्न व खर्च पत्रक तयार करण्याबाबत मंडळाच्या नियमामध्ये दुरुस्ती करणे प्रस्तावित आहे. ही पध्दत अवलंबिल्यामुळे राज्य शासनावर अतिरिक्त खर्चाचा बोजा पडणार नाही या अटीवर राज्य शासनाच्या अर्थ विभागाने या प्रस्तावास तत्वतः मान्यता दिली आहे. हा प्रस्ताव महालेखापाल, मुंबई यांच्या कार्यालयास मंजुरीसाठी पाठविण्यांत आला असून त्यांची मान्यता मिळाल्यानंतर मंडळाच्या नियमामध्ये त्यानुसार आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल या अनुषंगाने मंडळाच्या लेख्यांमध्ये एखादे सहपत्र किंवा लेखा विषयक टिप्पणी मंडळाच्या लेखांकन पध्दतीमध्ये समाविष्ट करणे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या अधिनियमातील कलम-२५ मध्ये मंडळाचे लेखे व मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे विशिष्ट पध्दतीने तयार करणे बाबत स्पष्ट उल्लेख करण्यांत आला आहे. मंडळाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखे वाणिज्यिक पध्दतीने तयार करण्याबाबत उल्लेख करण्यांत आला आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या खातेनिहाय केंद्राचे लेखेदेखील व्यापारी तत्वावर ठेवले जातात याची कृपया नोंद घ्यावी. खादी व ग्रामोद्योग आयोगाने त्यांचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना जी लेखांकन पध्दत अवलंबिली आहे, त्यामध्ये त्यांची मालमत्ता ही खरेदीच्या किंमतीवरच दर्शविली असून त्यावर घसारा आकारण्यांत आलेल्या नाही. तथापि मंडळाने देखील भविष्यात त्यांची लेखांकन पध्दत संभाव्य येणे व देणी (Accrual) तयार करण्याबाबतच्या शक्यता व अंमलबजावणी पडताळण्याबाबत मंडळाची लेखे ठेवण्याची कार्यपध्दती, निधीची उपलब्धता या संदर्भात महालेखापाल व खादी व ग्रामोद्योग आयोग यांच्या सल्ल्यानुसार कार्यवाही करण्याबाबत मंडळाकडे विचारणा केली आहे.

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या हातकागद केंद्र, अमरावती व परभणी येथील भूविकासाया रक्कमा मंडळाने सन २००३-०४ च्या लेख्यांमध्ये ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र १४ मध्ये पूर्वीपासूनच समाविष्ट केलेल्या आहेत.

मंडळाने अंबर चरखा योजना सन १९८९-९० मध्ये प्रायोगिक तत्वावर सुरु केली होती. त्यावेळी प्रत्येक केंद्रावर केंद्रप्रमुख म्हणून एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात कर्मचा-यांची नियुक्ती करण्यांत आली होती. मात्र निधी अभावी ही योजना २-३ वर्षात बंद करावी लागली. या केंद्राचे दैनंदिन व्यवहार पूर्ण करण्यासाठी लागणारा निधी मंडळाच्या मुख्य कचेरीकडून दिला जात होता व हा खर्च संबंधीत वर्षांच्या लेख्यांमध्ये दर्शविला जात होता. मात्र या रक्कमेमधून केंद्रप्रमुखांनी प्रत्यक्ष केलेल्या बाबनिहाय खर्चाचा तपशील मंडळाकडे उपलब्ध होऊ शकला नाही. कारण तात्पुरत्या स्वरुपातील नियुक्त केंदप्रमुखांच्या सेवा खंडीत केल्याने, तसेच त्यामधील काही केंद्र प्रमुखांनी मंडळात कायम करण्यासाठी कोर्टात दावा दाखल केल्याने व त्यांनी असहकाराचे धोरण स्विकारल्याने त्यांचेकडून हिशोबाचा तपशील घेता आला नाही. त्यामुळे हा खर्च मंडळाच्या लेख्यांत समाविष्ट करण्यास विलंब झाला. आता या बाबत संबंधित जिल्हा कार्यालयांकडून माहिती प्राप्त करुन घेऊन हे हिशोब मंडळाच्या पुढील वर्षाच्या लेख्यांमध्ये दर्शविण्याच्या मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

सदर रक्कम अद्यापही तपशीलाशिवाय लेख्यांमध्ये दर्शविली जात आहे. ही बाब लवकरांत लवकर निकाली काढण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

निलंबन लेखा शिर्षाखालील रक्कमा त्वरीत करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

मंडळाच्या लेख्यांमध्ये दर्शविण्यांत आलेली ही रक्कम मंडळाच्या स्थापनेपूर्वीपासून दर्शविण्यांत येत आहे. तिचा तपशील मंडळाकडे उपलब्ध नाही. ही रक्कम निर्लेखित करण्याबाबत खादी आयोगाशी पत्रव्यवहार करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत येत आहेत.

२.२ भांडवल देणी

२.२.१ भांडवलापेक्षा मालमत्ता जादा दर्शविणे

सहपत्र-११ मध्ये एप्रिल,१९७८ पासून रु.८.९२ लाखाचा फरक दिसत असून भांडवलापेक्षा मालमत्ता जास्त म्हणून दर्शविण्यांत येत आहे. मंडळाच्या सन २००१-०२ व २००२-०३ च्या लेखा अहवालामध्ये भाष्य करुनदेखीलअद्याप सदर फरक निकाली काढण्यांत आलेला नाही.

२.२.२ निलंबन लेखा

लाभार्थीकडून केलेली वसुली ही जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी त्याचा उद्योगाचा तपशील न देता मुख्य कार्यालयास पाठवितात. अशा रक्कमा हया निलंबन लेखा शिर्षकाखाली ठेवल्या जातात. ही रक्कम खादी आयोग/ राज्य शासनास देय असते. याबाबत मंडळाच्या सन १९९०-२००० ते २००२-०३ च्या लेखा अहवालामध्ये भाष्य करुन देखील निलंबन लेखा शिर्षकाखाली रु.१४.७० लाख दिसून येतात. त्यामुळे जिंदगी व मालमत्ता तेवढया प्रमाणात जास्त दर्शविली आहे.

२.२.३ खादी आयोगाच्या अनुदानाची मंडळाकडे शिल्लक असलेली अखर्चित रक्कम निधी तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र वळविणे :- खादी आयोगाच्या अनुदानाची मंडळाकडे शिल्लक असलेली अखर्चीत रक्कम सहपत्र-५ निधी तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र वळविणे :-

खादी ग्रामोद्योग आयोगाकडून प्राप्त झालेल्या अनुदानापैकी रु.२.९६ कोटी मंडळाकडे अखर्चीत असल्याचे ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र-५ वरुन दिसते. त्यामध्ये रु.२.७८ करोड "राज्य शासन तात्पुरती अनामत" या रकमेचा समावेश आहे. सन १९९९-२००० पूर्वी मंडळाकडे प्राप्त झालेला खादी आयोग निधी, बयाना रक्कम, सुरक्षा अनामत अशा शिल्लक असलेल्या रक्कमांमधून कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते अदा केले आहेत व ही रक्कम मंडळास शासनाकडून येणे आहे. खादी आयोगाची ही रक्कम तात्पुरती वर्ग करतांना त्यास आयोगाची मंजुरी घेणे जरुरीचे होते. मंडळाकडे ज्या ठेवी होत्या त्या वर्ग करण्याबाबत मंडळाने कोणताही खुलासा केलेला नाही. याबाबत सन २००१-०२ व २००२-०३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये भाष्य करुन देखील अद्याप त्यावर कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही.

२.२.४ नॉर्मल योजनेची थकीत कर्जे

ताळेबंद पत्रकाचे सहपत्र-१६ पहाता,३५ प्रकारच्या उद्योगांना खादी आयोगाच्या नॉर्मल योजनेचे कर्ज वाटप केले असून त्यापैकी रु.३६.६३ करोडचे कर्ज संस्था व सोसायटयांकडे थकीत असल्याचे दिसून येते. कर्ज रक्कम थकीत झाल्यास नियमीत ४ टक्के व्याजाबरोबर ५ टक्के दंडव्याज आकारावे अशी अट कर्ज प्रकरणामध्ये घातलेली आहे. याबाबत सन २००१-०२ व २००२-०३ च्या लेखा परीक्षण अहवालामध्ये भाष्य केले असतांना देखील मंडळाने हे दंडव्याज आकारले नाही. परिगणीत केले नाही व लेख्यांमध्ये येणे म्हणून दर्शविले नाही.

मंडळ त्यांचे लेखे हे रोख तत्वावर ठेवत आहे व हे लेखांकन पध्दतीच्या विरुध्द आहे. त्यामुळे त्यामध्ये थकीत येणे रक्कमांचा तपशिल नसतो (मुद्दल तसेच व्याज) त्यामुळे कर्ज वसुलीवर व्यवस्थीत नियंत्रण ठेवण्यासाठी मंडळाने त्यांचे लेखे संभाव्य येणी व देणी पध्दतीवर ठेवावेत (Accrual Basis)

२.२.५ आकस्मित देणी लेख्यावरील टिपणीमध्ये न दर्शविणे

मंडळाच्या कायम सेवेमध्ये सामावून घेण्याबाबत मंडळाविरुध्द मंडळाच्या ५० माजी कर्मचा-यांनी न्यायालयामध्ये दावा दाखल केल्याचे दिसते. मात्र अशा आकस्मिक देण्यांबाबत मंडळाच्या लेख्यावरील टिप्पणीत कोणतेही भाष्य करण्यात आलेले नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

जंगम मालमत्तेतील संबंधित फरक सन २००५-०६ च्या लेख्यांमध्ये मंडळाने समायोजित केला आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

निलंबन लेखा शीर्षाखाली दिनांक ३१/३/०८ अखेर रु ९.०३ लाख शिल्लक आहे. ही रक्कम त्वरीत निरंक करण्याबाबत मंडळास सूचना देण्यात आल्या आहेत.

अखर्चित शिल्लक रक्कमेमध्ये खादी आयोगाकडून मिळालेल्या अखर्चित अनुदानाच्या रक्कमा व राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती केली जाईल या अपेक्षेवर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यांवर खर्च केलेल्या रक्कमांचा समावेश आहे. खादी आयोगाकडून खातेनिहाय केंद्रासाठी प्राप्त झालेला निधी व मंडळाकडे सुरक्षा अनामत, शासनहमी शुल्क, यामधून कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी खर्च केलेल्या रक्कमा, राज्य शासन तात्पुरती अनामत या शीर्षाखाली ठेवल्या आहेत त्यामध्ये कोणत्याही योजना अनुदान रकमेचा समोवश नाही.

राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती करुन घ्यावयाचा रकमेचा प्रस्ताव शासनाच्या सहकार विभागाकडे पाठविला असून त्यांनी हे दायित्व स्वीकारले आहे. खादी आयोगाचा खाते निहाय प्राप्त झालेला निधी तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र वर्ग केल्याची बाब खादी आयोगाच्या निदर्शनास आणून दिली आहे.

थकीत असलेल्या कर्जावर ४ऽ व्याजाची परिगणना मंडळाकडून केली जात असून ती ताळेबंद पत्रकाच्या सहपत्र २० मध्ये पूर्वीपासून दर्शविली जात आहे. मंडळाने असा निर्णय घेतला आहे की जर थकीत कर्जदार मुद्दल अधिक व्याजाची रक्कम एक रक्कमी परतफेड करण्यास तयार असल्यास त्यास दंडव्याज माफ करण्यात यावे काही लाभार्थी यानुसार एक रक्कमी परतफेड करण्यास तयार झाले आहेत. म्हणून मंडळ दंडव्याजाची परिगणना करीत नाही.

ज्या पध्दतीवर आधरीत लेखे तयार केले जावेत, त्याचा अभिप्राय परिच्छेद २.३.१ च्या अभिप्रायाप्रमाणे आकस्मिक देण्यांबाबतचा उल्लेख मंडळाच्या सन २००५-०६ च्या लेख्यांसोबत जोडलेल्या लेखाविषयक टिप्पणीमध्ये मंडळाने केला आहे. मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

३ मंडळाचे इतर निधी

३.१ भविष्य निर्वाह निधीची जमा कमी दर्शविणे

सन २००३-०४ या वर्षात भविष्य निर्वाह निधी सभासदांच्या वर्गणीवर बचत खात्यावर प्राप्त झालेले व्याज रु.०.७६ लाख लेख्यांमध्ये दर्शविले नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात जमा कमी दर्शविली आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपांमध्ये दर्शविलेल्या रक्कमाबाबतची योग्य ती दुरुस्ती मंडळाने, त्यांच्या सन २००५-२००६ च्या लेख्यांमध्ये केली असून मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

४ खातेनिहाय केद्रांचे लेखे

४.१ पणन विभागाचे लेखे

४.१.१ मालमत्ता व येणी

सन २००२-०३ या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये निदर्शनास आणून दिले असतांनादेखील संकीर्ण ऋणको म्हणून जी रु.५२.६१ लाख माल पुरवठयाची रक्कम येणे दर्शविली आहे. त्यामधील रु.२९.२१ लाख हे सन १९९६ नंतरचे आहेत. ठराविक मालाचा पुरवठा केल्यानंतर मध्यस्थ म्हणून त्यावर घोंगडयांवर ५ टक्के व इतर वस्तुंवर २ टक्के सेवा आकार मंडळ आकारते. हया रु.२९.२१ लाखाच्या मालावरील सेवा आकाराची परिगणना केली असता ती रु.०.६८ लाख होते. तथापि ही रक्कम लेख्यांमध्ये येणे म्हणून दर्शविली नाही त्यामुळे तेवढया प्रमाणात येणी कमी दर्शविली आहेत.

पणन विभागाच्या संकीर्ण ऋणकोच्या यादीमध्ये मधमाशापालन केंद्राकडून रु.२.८० लाख येणे दर्शविले आहे. मात्र मधमाशापालन केंद्राच्या संकीर्ण धनकोच्या यादीमध्ये पणन विभागास केवळ रु.०.०५ लाख देणे स्विकृत केले आहे. त्यामुळे पणन विभागाच्या लेख्यांमध्ये रु.२.७५ लाखाने येणे जास्त दर्शविले आहे.

४.१.२ भांडवल व देणी

तात्पुरती येणी व तरतूदी या शिर्षकामध्ये जिल्हा कार्यालयाकडून आलेली वसुली म्हणून रु.०.२६ लाख दर्शविले आहेत. त्यामध्ये रु.०.२२ लाख शासन मुद्रणालयाकडून आलेली व खादी आयोगास देणे असलेली कमिशनची रक्कम व जिल्हा कार्यालय, जालना व चंद्रपूर यांच्याकडून आलेल्या रु.०.०२ या रक्कमेचा समावेश आहे. यापूर्वीच्या सन २००२-०३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये भाष्य केले असतांनादेखील अद्याप या चुकीची दुरुस्ती केलेली नाही त्यामुळे रु.०.२४ लाखाने देणे जास्त दिसून येते.

सन २०००-०१ व सन २००२-०३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये निदर्शनास आणून दिले असतांना देखील भांडवली कर्जावर केलेली रु.९.५३ लाख व्याजाची तरतूद व खेळते भांडवल कर्जावर केलेली रु.२६.८६ लाख व्याजाची तरतूद सन १९९०-९१ पासून कार्यवाहीविना पडून आहे.

सन २००२-०३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये निदर्शनास आणून दिले असतांनादेखील मार्च,१९९८ मध्ये कंबल उत्पादन केंद्रास दिलेली रु.२.०० लाख तात्पुरती अनामत व हातकागद संस्था,पुणे यांना मार्च,२००० मध्ये दिलेली प्रलंबीत आहे. ही रक्कम वसुल/परतावा करण्याबाबत कोणतीही कार्यवाही मंडळाकडून करण्यांत आलेली नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

सन २००८-०९ चे लेखे अंतिम करते वेळी संकीर्ण ऋणकोंकडून येणे असलेली सेवा आकाराची रक्कम यापुढे पणन विभागाच्या लेख्यांमध्ये दर्शविण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

पणन विभागास येणे असलेल्या व मधमाशापालन केंद्र, महाबळेश्वर यांनी पणन विभागास देणे असलेल्या रक्कमांचा ताळमेळ घालून दोन्ही खातेनिहाय केंद्राच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

पणन विभागाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे योग्य ती दुरुस्ती मंडळाने केली आहे.

व्याजाची तरतूद करुन ठेवलेल्या रक्कमा पणन विभागाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये संचित नफ्यामध्ये मंडळाने समायोजित केल्या आहेत आता याबाबतची कार्यवाही मंडळाने पूर्ण केली आहे.

मंडळाने पणन विभागाकडून आर्थिकदृष्टया अडचणीत असलेल्या केंद्रांना जी अनामत रक्कम दिली आहे, ती वसुल करण्याबाबत मंडळास सूचना दिल्या आहेत.

४.२ खादी व अंबर चरख्या केंद्राचे लेखे (नफा व तोटा पत्रक)

खादीच्या दरातील चढउतार निधी रुपये १३,१४०/- हा नफातोटा पत्रकात खर्ची न टाकता ताळेबंद पत्रकात वाढविण्यांत आला आहे. त्यामुळे रु.०.१३ लाखाने नफा जास्त दर्शविला आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या अनुपालन अहवालावर महालेखापाल यांनी अधिक भाष्य केलेले नाही.

४.३ हातकागद उत्पादन केंद्र, पुणे चे लेखे

४.३.१ मालमत्ता व येणी

१) ग्रंथालयामध्ये असलेली रु.०.६५ लाख रक्कमेची पुस्तके लेख्यांमध्ये दर्शविली नाहीत. त्यामुळे तेवढया प्रमाणात मालमत्ता कमी दर्शविली.

२) युनायटेड नॅशनल डेव्हलपमेंट फंड योजनेअंतर्गत संस्थेस रु.२९.६६ लाखाचे अनुदान प्राप्त झाले होते. (युएनडीपी) संस्थेने त्यामधून रु.२१.४३ लाखाची यंत्रसामुग्री खरेदी केली व शिल्लक रु.८.२३ लाख रक्कम आयोगास परत केली.

तथापि मंडळाने ताळेबंदपत्रकात ही रु.२९.६६ लाख रक्कम देणी बाजूस देणे म्हणून व मालमत्ता बाजूस रु.२१.४३ लाख मालमत्ता म्हणून दर्शविली नाही. ही वस्तुस्थिती 'लेख्यांवरील टिप्पणीमध्ये' देखील नमुद केली नाही. त्यामुळे रु.२९.६६ लाखाने देणी व रु.२१.४३ लाखाने मालमत्ता कमी दर्शविली आहे.

४.३.२ भांडवल व देणी

सन १९७५-९० या कालावधीत मंडळाने हातकागद संस्था, पुणे यांना रु.१४.८० लाख कर्ज दिलेले होते. त्यापैकी फक्त रु.४.९२ लाख हातकागद संस्था,पुणे यांनी मंडळास परत केले. मात्र शिल्लक रक्कम रु.१२.५६ लाख व त्यावरील व्याज रु.८.७२ लाख व दंडव्याज रु.८.७४ लाख असे एकूण रु.३०.०२ लाख अद्याप हातकागद संस्था मंडळास देणे आहे. मात्र हातकागद संस्थेच्या लेख्यांमध्ये केवळ रु.६.३६ लाख मंडळाकडून घेतलेले कर्ज दर्शविले आहे. त्यामुळे हातकागद केंद्राच्या लेख्यांमध्ये रु.२३.६६ लाख देणे कमी दर्शविले असून मंडळाच्या लेख्यांमध्ये रु.३०.०२ लाखाने येणे कमी दर्शविले आहे.

हातकागद संस्था,पुणे यांच्या सन २००२-०३ व २००३-०४ च्या नफा व तोटा पत्रकामध्ये मंडळाच्या कर्जावरील देणे व्याज म्हणून रु.०.३६ लाख दर्शविले आहे. मात्र कोणत्याही प्रकारची रक्कम मंडळास अदा केली नाही. ही रक्कम तरतूद असल्यामुळे तेवढया प्रमाणात ताळेबंद पत्रकात देणे दर्शविणे जरुरीचे आहे. मात्र तसे न केल्यामुळे तेवढया प्रमाणात देणी कमी दर्शविली आहेत.

हातकागद संस्थेच्या वार्षिक लेख्यांमध्ये र.४.३५ वसुलीयोग्य विक्रीकराच्या रक्कमेचे समायोजन न करता नफा तोटा पत्रकामध्ये रु.६.५१ लाख इतक्या रकमेची विक्रीकराची तरतूद करण्यांत आली. तरी जादा तरतूद केल्यामुळे रु.४.३५ लाखाने देणे जास्त झाले.

दि.३ नोव्हेंबर,१९९९ रोजी मंडळाने निर्णय घेतला आहे की, हातकागद संस्था, पुणे ही आपल्या कामगारांना जेवढा बोनस अदा करील तेवढी रक्कम लाभांश म्हणून मंडळास प्रत्येक वर्षी अदा करील. मंडळाच्या या निर्णयास अनुसरुन दि.३१ मार्च,२००४ अखेर होत असलेली रु.१८.३० लाख लाभांशाची रक्कम संस्थेने त्यांच्या लेख्यांमध्ये देणे म्हणून दर्शविली नाही व मंडळाने देखील ताळेबंद पत्रका मध्ये येणे म्हणून दर्शविली नाही. त्यामुळे हातकागद संस्थेच्या लेख्यांमध्ये तेवढया प्रमाणात देणी कमी दर्शविली असून मंडळाच्या लेख्यांमध्ये येणे कमी दर्शविले आहे.

कामगारांची व संस्थेने भरण्याची सी पी एफ ची डिसेंबर, २००३ ते फेब्रूवारी, २००४ अखेरची वर्गणी रु.२.२० लाख जी भविष्य निर्वाह निधी आयुक्त यांच्या कार्यालयात मार्च, २००४ अखेरपर्यंत भरण्यांत आलेली नाही, हे देणे लेख्यांमध्ये देखील दर्शविले नाही. तसेच त्याची तरतूद देखील करण्यांत आली नाही. त्यामुळे भांडवल व देणी तेवढया प्रमाणात कमी दर्शविल्याचे दिसून येते.

हातकागद संस्था, पुणे यांनी कोणाच्याही परवानगीशिवाय सन २०००-०१ पासून रु.७०.०० लाख रकमेचा फंड तयार केला. नफा तोटा पत्रकातील या रकमेचा कोणता विनियोग केला नाही किंवा तेवढया प्रमाणात लेख्यांमध्ये गुंतवणूक देखील दर्शविली नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये सहपत्र-१३ मध्ये योग्य ती नोंद घेतली आहे.

आक्षेपांमध्ये दर्शविलेल्या रु २१.४३ लाखाच्या यंत्र सामुग्रीची नोंद मंडळाच्या सन २००६-०७ लेख्यांमध्ये सहपत्र १३ मधील अ.क्र.३ येथे मंडळाने दर्शविली आहे. याबाबतीत कार्यवाही पूर्ण झाली आहे.

खादी आयोगाच्या नॉर्मल योजनेमधून जिल्हा कार्यालय पुणे यांच्यामार्फत हे कर्ज हातकागद संस्था, पुणे यांना दिलेले आहे. मंडळाचे येणे कर्ज मंडळाच्या ताळेबंद पत्रकामधील सहपत्र-१६ मध्ये दर्शविलेला वसुल करावयाच्या कर्जामध्ये समाविष्ट केलेले आहे व ताळेबंद पत्रकामध्ये येणे म्हणून दर्शविले आहे. तसेच त्यावरील व्याजाची ४% परिगणना देखील नियमरित्या करुन सहपत्र-२० मध्ये दर्शविली जात आहे.

मंडळाने व्याजाची तरतूद करुन नियमितपणे लेख्यांमध्ये दर्शविण्याच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

मंडळाने सन २००४-०५ या वर्षात प्रलंबित असलेला सर्व विक्रीकर अदा केला आहे महालेखापालांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

हातकागद उत्पादन केंद्र जेव्हा नफयात होते त्यावेळी केंद्रामधील कामगारांना जेवढी रक्कम बोनस स्वरुपात वितरित केली जाईल तेवढी रक्कम त्यांनी मंउळास लाभांश स्वरुपात द्यावी असा ठराव मंडळाने केला होता. मात्र मागील १० वर्षापासून हे केंद्र सतत तोटयात असल्याने ते मंडळास लाभांश देऊ शकले नाही. तरी मंडळाने दिनांक ३/११/९९ रोजीच्या ज्या ठरावाने हा निर्णय घेतला होता, त्यात दुरुस्ती करण्याबाबत मंडळास कळविण्यांत येत आहे. मंडळाचे लेखे हे रोख पध्दतीने ठेवले जात असल्यामुळे येणे व्याजाची रक्कम लेख्यांमध्ये दर्शविली जात नाही.

हातकागद संस्थेच्या उत्पादन विभागात जे कामगार कार्यरत आहेत, ते उत्पादनाशी निगडीत असल्यामुळे त्यांची भविष्य निर्वाह निधीची वर्गणी रु २.८८ लाख व्यापारी पत्रकात खर्ची टाकली आहे व प्रशासकीय कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीची वर्गणी रु ०.६८ लाख सन २००४-०५ च्या लेख्यांतील नफा तोटा पत्रकात खर्ची टाकलेली आहे. व योग्य ती कार्यवाही मंडळाने केली आहे.

हातकागद उत्पादन केंद्र मागील काही वर्षापासून तोटयात असल्यामुळे नफ्यातून उभारण्यांत आलेला निधी केंद्राच्या दैनंदिन व्यवहारासाठी उपयोगात आणल्याने त्या निधीतून मुदत ठेव गुंतवणूक करण्यांत आली नाही.

४.३.३ नफा तोटा पत्रक

सन २००१-०२ च्या लेख्यांमध्ये केंद्रीय मधमाशा संशोधन केंद्र, पुणे यांना पाणीपटटी देणे म्हणून रु.३.७१ लाखाची चुकीची तरतूद केली होती. सदर रक्कम चालू वर्षात स्थळ टिप म्हणून दर्शवित व्यापारी पत्रकात जमा दर्शवून समयोजित केली आहे. त्यामुळे सन २००३-०४ मध्ये जमा व नफा तेवढया प्रमाणात वाढवून दर्शविला आहे.

वाटर मार्क चार्ज चुकीचे दर्शविणे

वाटर मार्क चार्जेस खाली संस्थेने रु.०.९५ लाख खर्च केला असून संस्थेकडे याच प्रयोजनासाठी रु.०.७६ लाख जमा झालेले आहेत. मात्र त्यांनी केवळ रु.०.१९ लाख एवढाच खर्च लेख्यांमध्ये दर्शविला .त्यामुळे रु.०.७६ लाखाने जमा व खर्च कमी दर्शविला आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या मुद्यांबाबत मंडळाने योग्य ती कार्यवाही सन २००४-०५ च्या लेख्यामध्ये केली असून महालेखापालांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

याबाबत भविष्यात योग्य ती टिप देण्याचे मंडळाने मान्य केले असल्याने महालेखापालांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

४.४ मधमाशापालन केंद्र-महाबळेश्वरचे लेखे

४.४.१ भांडवल व देणी

घसारा निधी चुकीच्या पध्दतीने भांडवली लेख्यांमध्ये समाविष्ट करणे

मधमाशापालन केंद्राचे सन २००३-०४ चे लेखे पहाता असे दिसून आले की,संचालनालयाने सन २०००-०१ पर्यत रु.१.३८ लाखाचा घसारा निधी नफयामधून काही विशिष्ट कारणासाठी तयार केला होता. मात्र सन २००१-०२ पासून हा फंड लेख्यांमध्ये दर्शविला नाही हा सर्व निधी रु.१.३८ लाख भांडवल खात्यामध्ये समायोजित केला त्यामुळे

भांडवली लेखा वाढला व घसारा निधी निर्लेखीत झाला. घसारा निधी हा विशिष्ट कामासाठी ठेवलेला निधी असून त्याचे भांडवली खात्यामधील समायोजन अयोग्य आहे.

४.४.३ मालमत्ता व येणी

जमीन व इमारत लेख्यांमध्ये न दर्शविणे

राज्य शासनाकडून सन १९९५ साली १.५९ हेक्टर जमीन त्यावरील बांधकामासह मंडळाकडे वर्ग करण्यांत आली. त्यानंतर सन २००३-०४ या वर्षी सदर जागेवर रु.६.२६ लाखाचे (हॉल रु.३.७७ लाख व मधप्रक्रिया केंद्र रु.२.४९ लाख) बांधकाम करण्यांत आले. याचा जमीन व इमारत यामध्ये समावेश न केल्यामुळे तेवढया प्रमाणात स्थावर मालमत्ता कमी दर्शविली आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २००६-०७ या वर्षात घसारा निधी स्वतंत्र दर्शविला असून तेवढयाच रक्कमेची मुदतठेव गुंतवणूक मंडळाने केली आहे. मंडळाने योग्य ती कार्यवाही केली आहे.

मधप्रक्रिया केंद्राच्या बांधकामाची रक्कम रु २.९४ लाख मंडळाने सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये सहपत्र १३ अ.क्र.२३ वर दर्शविली आहे. महालेखापालांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

४.५ सुतारी,लोहारी कार्यशाळा, गोकुळ शिरगांव, कोल्हापूरचे लेखे

४.५.१ मालमत्ता व येणी

संकीर्ण ऋणको चुकीची दर्शविणे

संकीर्ण ऋणको रु.१४.६९ लाखाच्या यादीमध्ये रु.०.९८ लाख व्यवसाय कर दर्शविला आहे. मात्र अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूर यांनी हा व्यवसाय कर देण्याचे नाकारले आहे. कारण दर निश्चिती मध्ये व्यवसाय करात सूट देण्यांत आली होती. संकीर्ण ऋणको बरोबर येणे निश्चित न केल्यामुळे संकीर्ण ऋणको व येणे रु.०.९८ लाखाने जास्त दर्शविले आहे.

४.५.२ भांडवल व देणी

पुरवठा आदेशाप्रित्यर्थ घेतलेली अनामत कमी दर्शविणे

मधाच्या पेटया पुरवठा करण्याप्रित्यर्थ स्विकारलेल्या रु.७.५१ लाख रक्कमेपैकी केवळ रु.५.२० लाख लेख्यांमध्ये दर्शविले असल्यामुळे रु.२.३१ लाखाने भांडवल व देणी कमी दर्शविली आहेत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २००८-०९ चे लेखे तयार करतांना योग्य ती दुरुस्ती करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

महालेखापाल यांनी आक्षेपामध्ये दर्शविलेली अनामत रक्कम ही रु ७.५१ लाख नसून ती रु ७.१६ लाख एवढी आहे. त्यापैकी रु ०.७१ लाख ही फर्निचरच्या पुरवठयाप्रित्यर्थ प्राप्त झालेली अनामत रक्कम असून तेवढया रक्कमेचा फर्निचर पुरवठा देखील केंद्राकडून करण्यांत आला आहे.

उर्वरित रु ६.४५ लाख रक्कमेपैकी रु १.२५ लाखाच्या मधपेटयांचा केंद्राने सन २००३-०४ मध्ये पुरवठा केला असल्यामुळे केवळ रु ५.२० लाख रक्कम अनामत म्हणून केंद्राने ताळेबंद पत्रकात दर्शविली होती.

४.६ बंद असलेल्या खातेनिहाय केंद्रांच्या लेख्यांबाबत

खालील दर्शविलेली ४ खातेनिहाय केंद्रे मागील ४ ते २० वर्षापासून सलग बंद आहेत

१) हातकागद केंद्र, अमरावती

२) हातकागद केंद्र, परभणी

३) कंबल उत्पादन केंद्र, उमरेड, नागपूर

४) खाते निहाय केंद्र, मुंबई

सन १९९९-२००० ते सन २००२-०३ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये अभिप्राय दिले असतांनादेखील या केंद्राचे लेखे बंद करुन या केंद्राचे भांडवल व देणे, तसेच मालमत्ता व येणी मंडळाच्या लेख्यांमध्ये अद्याप वर्ग करण्यांत आलेली नाहीत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

बंद असलेली केंद्रे निर्लेखित करण्याबाबत मंडळाने अद्याप निर्णय घेतलेला नसल्यामुळे सदर बंद केंद्रांचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये दर्शविले जातात तरी, सदर केंद्रांबाबत योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

५ संकीर्ण

५.१ लेखांकन तत्वे

सन १९९९-२००० ते सन २००२-०३ (व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या केंद्राव्यतिरिक्त) च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये भाष्य करुन देखील मंडळाचे लेखे व ताळेबंद पत्रक हे संभाव्य येणी व देणी (Accrual Basis) पध्दतीवर तयार न करता रोख पध्दतीने तयार करणे चालू ठेवले आहे (Cash Basis)

५.२ वैशिष्यपूर्ण लेखा पध्दती:-

मंडळाने सन २००३-०४ पासून जरी लेखांसोबत लेखांविषयक टिपणी जोडली असली तरी त्यामध्ये स्थावर मालमत्तेची किंमत ठरविणे, शासनाच्या करामधून मंडळास मिळणा-या सवलती, याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. मंडळाची एकूण ८ खातेनिहाय केंद्रे आहेत परंतू फक्त ४ चालू केंद्राचीच स्थिती दर्शविली आहे. तसेच मंडळास लागू असलेला आयकर/कायदेशीर ठराव याबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. याबाबत सन २००२-०३ च्या लेख्यांमध्ये देखील भाष्य करण्यांतआलेले आहे.

५.३ व्यापारी तत्वावर चालविण्यांत येणा-या केंद्राच्या घसा-याच्या दरात भिन्नता :-

व्यापारी तत्वावर चालविल्या जाणा-या केंद्राया घसा-याची मालमत्तेची किंमत कमी करणे ही पध्दत वापरली जाते. त्यामध्ये समान बाबींसाठी समान दराने घसारा आकारला जात नाही. मंडळाने त्यांच्या सर्व केंद्रांना बाबनिहाय समान दराने घसारा आकारण्या बाबतच्या सूचना दिलेल्या आहेत असे कळविले आहे (नोव्हेंबर, २००५)

५.४ अंतर्गत लेखापरीक्षण कक्षासाठी चार पदे मंजूर असतांना (दोन ज्येष्ठ लेखापरीक्षक व २ कनिष्ठ लेखापरीक्षक) केवळ ३ कर्मचारी (१ ऑडीट ऑफीसर, १ लेखापरीक्षक, व १ कनिष्ठ सहाय्यक) अंतर्गत लेखापरीक्षण कक्षामध्ये नियुक्त केले आहेत. सदर कर्मचारी हे त्यांचे नियमीत काम सांभाळून अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम पहातात. त्यामुळे त्याचे योग्य परिणाम दिसून येत नाहीत. तसेच अंतर्गत लेखापरीक्षण कक्षाने मुख्य कार्यालयाचे अंतर्गत लेखापरीक्षण केलेले नाही.

अंतर्गत लेखापरीक्षण कक्षासाठी चार पदे मंजूर असतांना (दोन ज्येष्ठ लेखापरीक्षक व २ कनिष्ठ लेखापरीक्षक) केवळ ३ कर्मचारी (१ ऑडीट ऑफीसर, १ लेखापरीक्षक, व १ कनिष्ठ सहाय्यक) अंतर्गत लेखापरीक्षण कक्षामध्ये नियुक्त केले आहेत. सदर कर्मचारी हे त्यांचे नियमित काम सांभाळून अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम पहातात. त्यामुळे त्याचे योग्य परिणाम दिसून येत नाहीत. तसेच अंतर्गत लेखापरीक्षण कक्षाने मुख्य कार्यालयाचे अंतर्गत लेखापरीक्षण केलेले नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मधील तरतूदीनुसार मंडळाचे लेखे रोख पध्दतीने ठेवले जातात. सन १९७७ मध्ये या अधिनियमात सुधारणा करण्यांत आली होती. या सुधारणेपूर्वीच्या कालावधीत उत्पन्न व खर्च पध्दत हा शब्दप्रयोग प्रचलित असलेचे दिसून येत असले तरीसुध्दा प्रत्यक्षात मंडळाचे लेखे रोख पध्दतीने सुरुवातीपासूनच ठेवले जात होते. खादी व ग्रामोद्योग मंडळाने १९६० पासून जारी केलेल्या अकाऊंट मॅन्युअल मध्येही रोख पध्दतीचाच अवलंब केलेला आहे.

मंडळाच्या अधिनियमावर आधारभूत, १९७० मधील मंडळाच्या नियमांमध्ये लेखांकन पध्दतीबाबतचा नमुना विहीत करण्यांत आला आहे. त्यानुसार सन २००६-०७ च्या वार्षिक लेख्यांच्या लेखापरीक्षण अखेरपर्यंत महालेखाकार यांच्या लेखापरीक्षण प्रमाणपत्रात मंडळाच्या लेख्याचे सत्य व रास्त परिस्थितीचे दर्शन होते असे प्रत्येक वर्षी नमूद करण्यांत आले आहे.

सन २००५-०६ पासून याबाबत मंडळाने योग्य ती कार्यवाही केलेली आहे. महालेखापालांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने आता स्वतंत्र लेखापरीक्षण कक्ष स्थापन केला आहे व मंडळाच्या मुख्यकार्यालयाचे अंतर्गत लेखा परीक्षण देखील सन २००८-०९ मध्ये पूर्ण केले आहे.

६ लेखा अभिप्रायांचे अभिप्राय

वरील अभिप्रायांचा सारांश असा की, दि.३१ मार्च,२००४ अखेर मालमत्ता व येणी रु.२७६.६३ लाखाने कमी व भांडवल व देणी रु.२७४.५७ लाखाने कमी दर्शविण्यांत आल्याचे दिसते. तसेच जमा रु.३.१७ लाखाने जास्त व खर्च रु.३.०९ लाखाने कमी दर्शविल्याचे दिसून आले.

७ अनुपालन अहवाल देण्यास कमी प्रतिसाद

वरील सर्व मुद्दे मंडळास ऑगस्ट, २००५ मध्ये पाठवून देखील नोव्हेंबर,२००५ अखेर अनुपालन अहवाल प्राप्त झाला नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

स्वतंत्र लेखापरीक्षण अहवालाचा अनुपालन अहवाल विहीत मुदतीत देण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन २००४-०५ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

२ लेख्यांबाबत अभिप्राय

२.१ मालमत्ता व येणी

२.१.१ मालमत्ता व दायित्वे चुकीची दाखविणे

मंडळाने दायित्वांच्या बाजूला राज्य शासनास देय कर्ज म्हणून रुपये ८४.६७ लाख दाखविले आहेत. सोसायटया इत्यादीकडून वसुल करावयाची कर्जे म्हणून रुपय्रे ६९.२६ लाख येणे दाखविले आहेत. कर्जे १९६२ च्या पूर्वीच्या कालावधीची असून वसुलीचा सविस्तर तपशील मंडळाकडे उपलब्ध नाही. या रक्कमा तपशीलाशिवाय ३३ वर्षे दायित्वे व मालमत्ता म्हणून दाखविल्या गेल्यामुळे त्या प्रमाणात दायित्वे व येणी जादा दाखविण्यांत आली आहेत.

२.१.२ ऋण शिल्लक रक्कमा

(-) रुपये १.४१ लाखाची रक्कम पश्चिम घाट विकास योजनेत दाखविण्यांत आली आहे. त्यामुळे मत्ता त्या प्रमाणात कमी झाल्या आहेत.

मंडळाने जानेवारी, २००७ मध्ये उत्तरात असे नमूद केले की, मधमाशापालन उद्योगाखाली शेतक-यांना कर्जे वाटण्यांत आली होती. सहपत्र १८ मधील वजा शिल्लक रक्कमा या मुददल व व्याजाच्या रक्कमा एकत्रित दाखविल्यामुळे आल्या आहेत. येथून पुढे मात्र त्या वेगवेगळया दाखविण्यांत येतील.

२.१.३ भांडवली मालमत्तेवरील घसाऱ्या बाबत

मंडळाच्या स्थिर व अस्थिर मालमत्ता या त्यांच्या पुस्तकी किंमतीइतक्या रुपये २.०९ कोटी (सहपत्र १२ व १३) घसा-याशिवाय दाखविण्यांत आल्या आहेत. भांडवल आणि मालमत्तेचे लेखे त्या प्रमाणात जादा आणि घसारा लेखा कमी दाखविण्यांत आल्या आहेत. याबाबत मंडळाने (जानेवारी २००७) आपल्या उत्तरात नमूद केले आहे की, घसारा दाखविल्यास घसारा निधी आणि त्याची गुंतवणूकही दाखवावी लागेल. व त्यामुळे घसा-याची तरतूद करण्यांत आलेली नाही. मंडळास विशिष्ट उदिदष्टांसाठी शासनाकडून निधी उपलब्ध होत असतो. आणि वर्षाच्या अखेरीस यातील अविनियोजीत रक्कम शासनास परत करावी लागत असल्यामुळे मंडळास अशी गुंतवणूक करणे शक्य होणार नाही. त्यामुळे मतांवर घसा-याची तरतूद करण्यांत आलेली नाही.

घसा-याची तरतूद न केल्यामुळे मंडळाचे लेखे सत्य व रास्त परिस्थिती दाखविणार नसल्याने मंडळाचे हे उत्तर पटणारे नाही. या निधीच्या गुंतवणूकीबाबत मंडळाने शासनाकडे स्वतंत्रपणे संदर्भ करावा.

२.१.४ अंबर चरखा केंद्रे हिशेबात न धरणे - मालमत्ता व दायित्वे कमी दाखविणे

सन १९८९-९० मध्ये भांडवली खर्च कर्ज कार्यक्रमाखाली ८२ अंबर चरखा केंद्रे स्थापन करण्यांत आली होती. प्रत्येक केंद्राला २५ चरखे या प्रमाणे खादी व ग्रामोद्योग आयोगाने रुपये ३९.६७ लाख कर्जाच्या रुपात चरखे पुरविले. परंतु हे चरखे खादी आयोगाकडून कर्ज म्हणून दायित्वांमध्ये किंवा मालमत्तेमध्ये देखील दाखविण्यांत आलेले नाहीत. त्यामुळे मालमत्ता व दायित्वे दोन्ही त्या प्रमाणात कमी दाखविण्यांत आली आहेत.

२.१.५ खूप जन्या इंप्रेस्टच्या शिल्लक रक्कमा कोणत्याही तपशीलाशिवाय समाविष्ट करणे

जिल्हा ग्रामोद्योग अधिका-यांकडे रुपये १.१२ लाखाच्या इंप्रेस्टच्या रक्कमा सन १९९६-९७ पासून प्रलंबित असल्याचे सहपत्र- १६ मध्ये दाखविण्यांत आले आहे. मंडळाकडे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी निहाय शिल्लक रक्कमांचा तपशील नाही तसेच जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी च्या मासिक लेख्यांमध्ये इंप्रेस्टची रक्कम शिल्लक दाखविण्यांत आलेली नाही.

२.१.६ गुजरात खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे असलेले तपशील रहीत कर्ज

सहपत्र- १६ मध्ये गुजरात खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे सन १९७२-७३ पासून रुपये ०.५१ लाखांचे कर्ज येणे असल्याचे दाखविण्यांत आले असून त्याबाबत मंडळाकडे कोणताही तपशील उपलब्ध नाही.

२.१.७ निलंबन लेख्यातील शिल्लक रक्कमा

खाते निहाय केंद्रांकडे (रुपये ०.११ लाख) आणि मुख्य कार्यालय ,मुंबई कडील (रुपये ०.१८ लाख) मिळून एकूण रुपये ०.२९ लाखाचा निलंबन लेखा मागील चार वर्षापासून मत्तांच्या बाजूस ताळेबंदात दाखविण्यांत येत आहे.

मंडळाने उत्तरात नमूद केले आहे की, रुपये ११,००० ची रक्कम ही सन १९९६-९७ मध्ये बंद पडलेल्या दोन संस्थांच्या बाबतीतील असून मंडळाच्या अन्य रक्कमांबरोबर या रक्कमेचा हिशोब पूर्ण करण्यांत येईल. मुख्य

कार्यालयाच्या नांवे दाखविण्यांत आलेल्या रुपये १८,००० च्या रक्कमेचा हिशोब योग्य पडताळणीनंतर पूर्ण करण्यांत येईल.

२.१.८ स्थावर मालमत्ता

मंडळाने सात मालमत्ता भाडे तत्वावर घेतल्या आहेत. मालमत्तांच्या किंमतीचा अंदाज घेऊन त्याचा समावेश ताळेबंदामध्ये करणे आवश्यक होते. या भाडे तत्वांवरील मालमत्तांच्या किंमती कमी दाखविण्यांत आल्या आहेत.

यावर मंडळाचे असे म्हणणे होते की, या मालमत्ता शासनाने किंवा खाजगी संस्थांनी मंडळास भाडे तत्वावर दिल्या असून त्या मंडळाच्या मालकीच्या नाहीत.

या मालमत्ता सध्या मंडळाच्या ताब्यात असून त्यांचा वापर मंडळ करीत असल्याने मंडळाचे हे म्हणणे बरोबर नाही.

२.१.९ रोख व बँक शिल्लक

रोख व बँक शिल्लक रक्कम रुपये ६१३.७३ लाखामध्ये राज्य शासनाच्या निधीतील रुपये १८९.९७ रक्कमेचा समावेश होता. (बँक ऑफ महाराष्ट्र मधील खाते क्रमांक ४३६५) तथापि जून, २००१ आणि मार्च, २००४ मध्ये बँकेत जमा केलेले रुपये ०.५० लाखाचे दोन धनादेश खात्यात जमा झालेले नव्हते. तसेच मार्च, २००१ आणि मार्च, २००५ दरम्यान मंडळाने अदा केलेले रुपये ०.४४ लाखाचे ७ धनादेंश प्रदानासाठी बँकेकडे अद्यापपर्यंत (एप्रिल, २००६) सादर करण्यांत आले नव्हते. हे धनादेंश मुदतबाहय झाल्याने व तसेच संबंधित व्यक्ती/संस्थांनी या धनादेंशांऐवजी नवीन धनादेंशची मागणी केलेली नसल्यामुळे हिशेबामध्ये या नोंदी रदद करणे आवश्यक होते. परंतु या नोंदी रदद न केल्या गेल्यामुळे त्याचा परिणाम हातातील रोख रुपये ०.५० लाखाने आणि खर्च रुपये ०.४४ लाखाने जादा दाखविण्यांत आली.

या संदर्भात पुढील वर्षाच्या लेख्यांमध्ये आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन मंडळाने दिले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या रक्कमा या मंडळ स्थापनेपूर्वीच्या आहेत. त्यामुळे त्या बाबतची माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही. तरी अशा रक्कमा निर्लेखित करता येतील किंवा कसे, याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

या रक्कमांबाबत योग्य ती दुरुस्ती मंडळाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये मंडळाने केली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या १९६० च्या अधिनियमातील कलम २५(१) मधील तरतूदीनुसार मंडळाचे लेखे रोख पध्दतीने ठेवले जातात.सन १९७७ मध्ये या अधिनियमात सुधारणा करण्यांत आली होती. या सुधारणेपूर्वीच्या कालावधीत उत्पन्न व खर्च पध्दत हा शब्दप्रयोग प्रचलित असल्याचे दिसून येत असले तरीसुध्दा प्रत्यक्षात मंडळाचे लेखे रोख पध्दतीने सुरुवातीपासूनच ठेवले जात होते. खादी व ग्रामोद्योग मंडळाने १९६० पासून जारी केलेल्या अकाऊंट मॅन्युअल मध्येही रोख पध्दतीचाच उल्लेख केलेला आहे.

मंडळाच्या अधिनियमावर आधारभूत १९७० मधील मंडळाच्या नियमांमध्ये लेखांकन पध्दतीबाबतचा नमुना विहीत करण्यांत आला आहे. त्यानुसार सन २००६-०७ च्या वार्षिक लेख्यांच्या लेखापरीक्षणा अखेरपर्यंत महालेखाकार यांच्या लेखा परीक्षण प्रमाणपत्रात मंडळाच्या लेख्याचे सत्य व रास्त परिस्थितीचे दर्शन होते असे प्रत्येक वर्षी नमूद करण्यांत आले आहे.

वरील परिस्थितीमध्ये पूर्वीच्या लेखांकन पध्दतीमध्ये कोणतीही सुधारणा करणे शक्य होणार नाही, कारण मंडळ अधिनियमातील तरतूदीनुसार ती अवलंबिली जात आहे. महालेखाकार यांनीही मंडळाची यापूर्वीच्या लेख्यांबाबतची परिस्थिती मान्य केली आहे.

आता भारताचे नियंत्रक व महालेखाकार यांनी खादी व ग्रामोद्योग आयोग (भारत सरकार) यांच्यासह अन्य केंद्रीय स्वायत्त संस्थांसाठी विशिष्ट लेखापध्दत आखून दिली असून खादी व ग्रामोद्योग आयोगाने सन २००७-०८ या आर्थिक वर्षापासून नवीन लेखांकन पध्दत अंमलात आणली आहे.

उपरोक्त परिस्थितीवर आधारित ना नफा तत्वावर चालणा-या संस्था व अन्य संस्थांनीही सर्वसाधारणत: नवीन लेखांकन पध्दत उत्पन्न व खर्च तत्वावर ठेवण्याचे अवलंबिले आहे. हीच पध्दत भविष्यात मंडळामार्फतही अंमलात आणण्यासाठी योग्य कार्यवाही करण्यांत येईल.

मंडळाचे सन २००८-०९ चे लेखे तयार करतांना आक्षेपामध्ये दर्शविलेल्या मुद्यांबाबत कार्यवाही करण्याचे आदेश मंडळास देण्यांत आले आहेत.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने नॉर्मल योजना सन १९९४ -९५ पासून बंद केली आहे. सदर रक्कमा संबंधितांकडून वसुल करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

आक्षेपामध्ये दर्शविण्यांत आलेल्या कर्जाऊ रक्कमा या मंडळ स्थापनेपूर्वीच्या आहेत. सदर रक्कमा निर्लेखित करण्याबाबत खादी आयोगाबरोबर संपर्क साधून निर्णय घेण्याबाबतच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

निलंबन लेखा शिर्षकाखाली असलेल्या रक्कमा संबंधित लेखा शिर्षकाखाली वर्ग करुन निलंबन लेखा त्वरीत निरंक करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

भाडे तत्वावरील जागा असल्यामुळे मंडळाने त्याची किंमत लेख्यांमध्ये दर्शविलेली नाही.

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या बँक खात्यांचे बँक पडताळणी पत्रक सन २००६-०७ या वर्षात मंडळाने पूर्ण केले आहे.

२.२ दायित्वे

२.२.१ मंडळाकडील अविनियोजीत रक्कमा

खादी आयोग व राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या मदतीच्या रक्कमांपैकी रुपये ५.७६ कोटीची रक्कम अविनियोजीत राहिल्याचे ताळेबंदात दाखविण्यांत आले. यामध्ये राज्य शासन निधी तात्पुरता अग्रीम म्हणून दाखविलेल्या रुपये २.७८ कोटींचा देखील समावेश होता. विकासात्मक कार्यासाठी प्राप्त झालेला निधी मोठया प्रमाणावर अविनियोजीत ठेवण्याची कारणे मंडळाने सादर केली नाहीत.

मंडळाने असे सांगितले की, या रक्कमा अविनियोजीत रक्कमा नसून शासनाकडून निधी प्राप्त होईपर्यंत कर्मचा-यांना त्यांचे वेतन देण्यासाठी म्हणून खादी आयोगाच्या निधीतून वापरलेल्या रक्कमा आहेत. लेख्यांची सत्य स्थिती दिसून येण्याकरिता वरील परिस्थिती लेख्यांमध्ये उघड करणे गरजेचे आहे.

२.२.२ भाग -५ धनको

निलंबन लेखा

या शिर्षकाखाली जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी लाभधारकांकडून वसुल केलेली परंतु वसुलीचा योजनानिहाय तपशील न देता मंडळास पाठविलेली रक्कम दाखविण्यांत आली आहे. ही रक्कम रुपये १२.४७

लाख जरी खादी आयोग/राज्य शासन (नॉर्मल) यांना देय होती तरी ती निलंबन शिर्षकाखाली दाखविण्यांत आली असून त्यामुळे त्या प्रमाणात दायित्वे जादा दाखविण्यांत आली आहेत.

मंडळाने उत्तरात असे नमूद केले आहे की, यापैकी रुपये ३.३० लाखाची पडताळणी करण्यांत आली असून ही रक्कम खादी आयोगास २००५-२००६ मध्ये प्रदान करण्यांत आली आहे. उरलेल्या रक्कमेची पडताळणी करण्यांत येईल व मग ती देखील या शिर्षकामधून काढण्यांत येईल.

भाग-५ धनकोखाली प्राप्त झालेल्या आणि परतावा करण्यासाठी योग्य असलेल्या ठेवी रुपये ६५.६९ लाख दाखविण्यांत आल्या होत्या. यामध्ये १९९७-९८ पासून दाखविण्यांत येत असलेल्या रुपये ३.११ लाख (ईएमडीचे रुपये २.७४ लाख आणि नीरा अनामत रुपये ०.३७ लाख) रकमेचा समावेश असून याबाबत कोणताही तपशील उपलब्ध नव्हता. अशा परिस्थितीत या रक्कमाचा गेल्या सात वर्षात हिशोब पुरा होऊ न शकल्यामुळे त्या लेख्यामधूनपुरांकित (राईट बॅक) करण्याची गरज होती, हे केले गेले नाही व त्यामुळे रुपये ३.११ लाखांनी दायित्वे जादा आणि संकीर्ण उत्पन्न कमी दाखविण्यांत आले.

मंडळाने नमूद केले की, २००६-०७ चे लेखे अंतिम करतांना या रक्कमा संकीर्ण उत्पन्नात जमा करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल.

२.२.३ दायित्वापेक्षा जादा मालमत्ता

दायित्वापेक्षा जादा मालमत्ता या सहपत्र- ११ मध्ये सन १९७८ पासून रुपये ८.९२ लाखांचा फरक दाखविण्यांत येत आहे.

मंडळाने नमूद केले की, सन २००५-०६ च्या लेख्यांमध्ये आवश्यक ते समायोजन करण्यांत आले आहे.

२.२.४ नॉर्मल योजनेखालील थकीतबाकीची रक्कम

खादी आयोगाच्या नॉर्मल योजनेच्या ३५ उद्योगांखालील सोसायटया/संस्था यांच्याकडून रुपये ३५.४६ कोटी कर्जाची थकीतबाकी येणे होती. कर्जाच्या अटीनुसार थकीत कर्जावर नेहमीच्या चार टक्के व्याजाशिवाय पाच टक्के दराने दंडात्मक व्याज देखील आकारता येते. सन २००१-०२ ते २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालांमध्ये याप्रमाणे सूचना केलेल्या असतांना देखील त्यानुसार व्याज आकारणी मंडळाने केली नाही व ते वसुलीयोग्य म्हणून दाखविलेही नाही. थकीत रक्कमांवरील व्याज व दंडाचे व्याज न दाखविल्यामुळे त्या प्रमाणात ऋणको कमी दाखविण्यांत आले आहे. लेखापरीक्षणात हे व्याज आणि दंडात्मक व्याज काढणे शक्य झाले नाही. कारण त्यासाठी थकबाकीची वर्षनिहाय विगतवारी व तसेच व्याज दर उपलब्ध करुन देण्यांत आले नव्हते.

सर्वसाधारणपणे स्विकारण्यांत आलेल्या लेखा तत्वांच्या विरुध्द मंडळाने लेखे रोख तत्वावर ठेवले असल्याने एकूण थकीतबाकी कर्जाची रक्कम किती आहे याचे पूर्ण चित्र उभे राहू शकले नाही.

मंडळाने उत्तरात असे नमूद केले की, दंडात्मक व्याजाची आकारणी रक्कमेचा गैरवापर झाला तरच करण्यांत यावी आणि व्यवसाय यशस्वीपणे न चालवता आल्यामुळे कर्ज परतफेडीस विलंब झाला तर अशी आकारणी न करण्याचे खादी आयोगाने निर्देश दिले आहेत त्यामुळे लेख्यांमध्ये दंडात्मक व्याज दाखविण्यांत आलेले नाही.

मंडळाने वरील वस्तुस्थिती लेख्यांवरील टिप्पण्यांमध्ये प्रकट करणे आवश्यक होते.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

अखर्चित शिल्लक रकमेमध्ये खादी आयोगाकडून मिळालेल्या अखर्चित अनुदानाच्या रक्कमा व राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती केली जाईल या अपेक्षेवर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्यांवर खर्च केलेल्या रक्कमांचा समावेश आहे. खादी आयोगाकडून खातेनिहाय केंद्रासाठी प्राप्त झालेला निधी व मंडळाकडे सुरक्षा अनामत, शासनहमी शुल्क, यामधून कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्यासाठी खर्च केलेल्या रक्कमा, राज्य शासन तात्पुरती अनामत या शीर्षाखाली ठेवल्या आहेत त्यामध्ये कोणत्याही योजना अनुदान रकमेचा समोवश नाही.

राज्य शासनाकडून प्रतिपूर्ती करुन घ्यावयाच्या रक्कमेचा प्रस्ताव शासनाच्या सहकार विभागाकडे पाठविला असून त्यांनी हे दायित्व स्वीकारले आहे. खादी आयोगाचा खाते निहाय प्राप्त झालेला निधी तात्पुरत्या स्वरुपात इतरत्र वर्ग केल्याबाबत खादी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

दिनांक ३१/३/२००८ अखेर निलंबन या लेखाशिर्षकाखाली रु ९.०३ लाख रक्कम शिल्लक आहे. तरी या रक्कमा संबंधित लेखा शिर्षकामध्ये वर्ग करुन लेखा शिर्षक "निरंक" करण्याबाबतच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

मुदतठेव शिर्षकामध्ये ज्या कालबाहय रक्कमा आहेत, त्याबाबतची योग्य ती तपासणी करुन त्या राखीव निधीस वर्ग करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

या फरक रक्कमांचा शोध घेऊन त्या जंगम मालमत्तेमध्ये समायोजित करण्याची कार्यवाही मंडळाने सन २००५-०६ या वर्षात पूर्ण केली आहे. आता आवश्यक ती कार्यवाही पूर्ण झाली आहे

नियमीत कर्जाची वसुली करतांना नॉर्मल व्याजाबरोबर दंडव्याजाची देखील वसुली केली जाते. मात्र थकीत कर्ज जर उद्योजक एक रक्कमी मुददल व व्याजासह परत करण्यास तयार असेल, तर त्यास दंडव्याज माफ करण्याबाबत खादी आयोगाने मंडळास परवानगी दिलेली आहे. म्हणून मंडळ दंडव्याजाची परिगणना करुन ते लेख्यांमध्ये दर्शवित नाही.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

३ खातेनिहाय केंद्राचे लेखे

३.१ पणन विभागाचे लेखे

३.१.१ मालमत्ता व येणी

मंडळ १९९६ नंतर केलेल्या वस्तुंच्या पुरवठयावर घोंगडयांकरिता पाच टक्के आणि इतर वस्तूवर दोन टक्के या प्रमाणे नोडल केंद्र म्हणून दिलेल्या सेवांकरिता सेवा आकार वसुल करते. ताळेबंदावरुन दि.३१ मार्च, २००१ रोजी रुपये १५.४१ लाख असलेली संकीर्ण ऋणकोंची रक्कम दि.३१ मार्च २००५ रोजी रुपये ६१.५५ लाखापर्यंत वाढली आहे. ही रुपये ४६.१४ लाखाची वाढ सन २००१-०५ मध्ये झालेली विक्री दाखविते. घोंगडया आणि इतर वस्तूंची विभागणी लेखापरीक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन देण्यांत आली नव्हती. तथापि वसुलीयोग्य रक्कम न दाखविल्यामुळे येणी कमी दाखविण्यांत आली. या संदर्भात सन २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालात सूचना देण्यांत आलेल्या असून देखील त्यानुसार सुधारणात्मक उपाय योजना मंडळाने केली नाही.

महाबळेश्वर येथील मधमाशापालन केंद्रांच्या लेख्यांमध्ये संकीर्ण ऋणकोंची रक्कम रुपये २.८० लाख होती. तथापि मधमाशापालन केंद्राच्या पणन शाखेच्या लेख्यांमध्ये यापैकी फक्त रुपये ०.०५ लाख मंडळाच्या पणन विभागाचे संकीर्ण धनको दाखविण्यांत आलेले असल्यामुळे पणन शाखेच्या लेख्यांमध्ये रुपये २.७५ लाखांनी मत्ता जादा दाखविण्यांत आल्या.

३.१.२ भांडवल व देणी

सन २०००-०१ ते २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालात निदर्शनास आणून देण्यांत आलेले असतांना देखील भांडवली कर्ज रुपये ९.५३ लाख आणि खेळते भांडवल कर्ज रुपये २६.८६ लाखांवरील १९९०-९१ पासून प्रलंबित व्याजाच्या तरतूदीचे हिशेब पूर्ण करण्यांत आले नव्हते.

मंडळाने असे नमूद केले की, याबाबत खादी आयोगाशी चर्चा करण्यांत येईल आणि त्यांच्याकडून आवश्यक ते स्पष्टीकरण घेतल्यानंतर दायित्व संपुष्टात आणण्यांत येईल.

सन २००२-०३ आणि सन २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालात निदर्शनास आणून देण्यांत आलेले असतांना देखील कंबल उत्पादन केंद्र, उमरेड, नागपूर आणि हातकागद संस्था, पुणे यांना मार्च १९९८ आणि मार्च २००० मध्ये

दिलेले अनुक्रमे रुपये २ लाख आणि रुपये १०.५८ लाखाचे तात्पुरते अग्रीमही अद्यापि बाकी होते आणि या अग्रीमांची वसुली/प्रतिपूर्ती करण्यासाठी मंडळाने कोणतीच कार्यवाही केली नाही.

मंडळाने असे नमूद केले की, तात्पुरते अग्रीम मंजूर करणे ही मंडळाची अंतर्गत समायोजन करण्याची एक बाब आहे.

मंडळाचे वरील उत्तर हे स्विकारार्ह नसून याबाबतीत लेख्यांमध्ये उचित प्रकारे समायोजन होण्याची गरज आहे.

३.२ हातकागद संस्थेचे लेखे

३.२.१ मालमत्ता

सन २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालात निदर्शनास आणून देण्यांत आलेले असतांना देखील युएनडीपी खाली मिळालेली मदत रुपये २९.६६ लाख ही दायित्वाच्या बाजूला आणि रुपये २१.४३ लाखाची विकत घेतलेली यंत्रसामुग्री ही ताळेबंदात मंडळाने मालमत्ता बाजूला दाखविली नाही. ही बाब लेख्यांवरील टिपण्या मध्ये प्रकट करण्यांत आलेली नाही यामुळे दायित्वे रुपये २९.६६ लाखांनी व मालमत्ता रुपये २१.४३ लाखांनी कमी दाखविण्यांत आल्या.

या बाबतीत मंडळाने असे आश्वासन दिले की, सन २००६-०७ चे लेखे अंतिम करतांना स्थावर मत्तांमध्ये आवश्यक ते समायोजन करण्यांत येईल.

३.२.२ दायित्वे

मंडळाने दि.३ नोव्हेंबर, १९९९ रोजी पारित केलेल्या एका ठरावाने असा निर्णय घेतला की, संचालक, हातकागद संस्था, पुणे यांनी दरवर्षी कामगारांना वाटलेल्या बोनस एवढी रक्कम मंडळास लाभांश म्हणून द्यावी. मंडळाच्या या ठरावामुळे मार्च, २००५ अखेर एकूण दायित्वाची रक्कम रुपये २१.२७ लाख इतकी होते. परंतु हे हातकागद संस्था, पुणे यांच्या लेख्यांमध्ये दाखविण्यांत आलेले नाही. याचा परिणाम हातकागद संस्था, पुणे यांच्या लेख्यांमध्ये दायित्वे आणि मंडळाच्या लेख्यामध्ये येणे त्या प्रमाणात कमी दाखविण्यांत आले आहेत.

मंडळाने आपल्या उत्तरात असे नमूद केले आहे की मागील ४-५ वर्षे हातकागद संस्थेला तोटा होत असल्यामुळे संस्थेला मंडळास लाभांश देणे शक्य झाले नाही. नोव्हेंबर १९९९ मध्ये पारित करण्यांत आलेला लाभांश देण्याबाबतचा निर्णय मंडळापुढे फेर विचारार्थ सादर करण्यांत येईल.

ही वस्तुस्थिती लेख्यांमध्ये प्रकट करणे आवश्यक होते.

कर्मचारी व मंडळाची वर्गणी मिळून रुपये १०.९८ लाख भविष्य निर्वाह निधीखाली सन २००४-०५ मध्ये देय होते. तथापि मार्च २००५ पर्यंत फक्त रुपये ५.७७ लाख अदा करण्यांत आले व त्यामुळे हातकागद संस्था, पुणे यांनी भविष्य निर्वाह निधी आयुक्त, पुणे यांना रुपये ५.२१ लाख रक्कम देणे शिल्लक राहिली. या दायित्वासाठी तरतूद करण्यांत आली नव्हती व ती लेख्यांमध्ये प्रकट देखील करण्यांत आली नव्हती त्यामुळे दायित्व व प्रदाने त्या प्रमाणात कमी दाखविण्यांत आली.

मंडळाने नमूद केले की, या बाबत सन २००५-०६ च्या लेख्यांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करण्यांत आल्या आहेत.

हातकागद संस्था, पुणे यांनी कोणत्याही अधिकाराशिवाय सन २०००-०१ मध्ये रुपये ७० लाखांचा निधी निर्माण केला. यासाठी तेव्हापासून नफा व तोटा लेख्यांमध्ये कोणतीही गुंतवणूक दाखविण्यांत आली नाही.

याबाबत मंडळाने आपल्या उत्तरात असे नमूद केले की, मागील ५-६ वर्षे ही संस्था तोटयात असल्यामुळे कोणतीही गुंतवणूक करण्यांत आली नाही.

३.३ महाबळेश्वर येथील मधमाशापालन संस्थेचे लेखे

३.३.१ जमीन व इमारत लेख्यात न दाखविणे

राज्य शासनाने १९९५ मध्ये १.५९ हेक्टर जमिन त्यावरील बांधकामासह मंडळाला हस्तांतरीत केली होती. त्यावर सन २००३-०४ मध्ये रुपये २.४९ लाखांचे एक मध प्रक्रिया केंद्र उभारले. याचा समावेश जमिन व इमारतीमध्ये करण्यांत आला नव्हता व त्यामुळे या स्थावर मत्तेची किंमत त्या प्रमाणात कमी दाखविण्यांत आली. सन २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालात ही बाब निदर्शनास आणून देण्यांत आलेली असतांना देखील मंडळाकडून या बाबतीत सुधारणात्मक उपाययोजना करण्यांत आली नाही.

३.३.२ भांडवल व देणी

घसारा निधीचे भांडवली लेख्यांमध्ये चुकीचे विलिनीकरण

सन २०००-०१ पर्यंत संचालनालयाने काही विशिष्ट प्रयोजनांसाठी नफा व तोटा लेख्यामधून रुपये १.३८ लाखाचे विनियोजन करुन घसारा निधी निर्माण केला. तथापि सन २००१-०२ मध्ये रुपये १.३८ लाखांचा घसारा निधी भांडवल लेख्यांमध्ये विलीन करण्यांत आला ज्यामुळे मंडळाच्या भांडवली लेख्यांमध्ये वाढ झाली. तर घसारा निधी लेखा निर्लेखित करण्यांत आला. घसारा निधी हा विशिष्ट प्रयोजनासाठीचा स्वतंत्र निधी असल्यामुळे त्याचे भांडवली लेख्यांमध्ये झालेले विलिनीकरण चुकीचे होते. याबाबत सन २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालात अभिप्राय देण्यांत आलेला असतांना देखील मंडळाकडून याबाबतीत सुधारणात्मक उपाययोजना करण्यांत आली नव्हती.

याबाबत सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये यापूर्वीच आवश्यक दुरुस्ती करण्यांत आली असल्याचे मंडळाने कळविले आहे.

३.४कोल्हापूर येथील सुतार व लोहार युनिटचे लेखे

३.४.१ भांडवल व देणी

ऑर्डरसाठी दिलेला अग्रीम कमी दाखविणे

सन २००३-०४ मध्ये १४५० मधपेटया (प्रत्येकी रुपये ८२५/- प्रमाणे) आणि ९० मध सयंत्रासाठी (प्रत्येकी रुपये ६६५/- प्रमाणे) रुपये १२.५६ लाख युनिटला मिळाले होते. तथापि मार्च, २००५ पर्यंत युनिटने रुपये ४.४५ लाखांच्या फक्त ५३१ मधपेटया आणि ११ मध संयंत्रे पुरविली होती. त्यामुळे शिल्लक दायित्व रुपये ८.११ लाखाचे असतांना ताळेबंदामध्ये फक्त रुपये ६.११ लाख म्हणजेच रुपये २.०० लाखांनी दायित्व कमी दाखविण्यांत आले.

३.५ कंबल उत्पादन केंद्र, उमरेड, नागपूर

या केंद्राचे हिशोब जरी व्यापारी तत्वावर ठेवण्यांत आले असले तरी, रुपये ०.४२ लाखांच्या डेडस्टॉक व मशिनरीवरील घसारा आकारण्यांत आला नव्हता. त्यामुळे त्याप्रमाणात या मालमत्तेची किंमत जादा दाखविण्यांत आली.

मागील १० वर्षे हे युनिट बंद असल्यामुळे घसारा आकारण्यांत आला नाही. असे लाखांच्या डेडस्टॉक व मशिनरीवरील घसारा आकारण्यांत आला नव्हता. त्यामुळे त्याप्रमाणात या मालमत्तेची किंमत जादा दाखविण्यांत आली असे मंडळाने आपल्या उत्तरात कळविले.

मंडळाचे हे उत्तर स्विकारार्ह नाही. कारण मालमत्तेच्या होणा-या झिजेकरिता घसा-याची तरतूद करणे आवश्यकच होते. युनिट बंद होते किंवा नसले तरी देखील लेख्यांमध्ये समाविष्ट असलेल्या मालमत्तेकरिता घसा-याची तरतूद करणे आवश्यक होते.

३.६ चालू नसलेल्या खाते निहाय केंद्राचे लेखे

खालील खातेनिहाय केंद्रे चार ते वीस वर्षाच्या कालावधीकरिता चालू नव्हती.

१) हातकागद केंद्र, अमरावती

२) हातकागद केंद्र परभणी

३) कंबल उत्पादन केंद्र, उमरेड, नागपूर

४) खाते निहाय केंद्र ,मुंबई

सन १९९९-२००० ते २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालांमध्ये सूचना दिल्या असतांना देखील वरील बंद युनिटसचे लेखे पूर्ण करण्याकरिता आणि त्यांची मालमत्ता व दायित्वे मंडळाच्या लेख्यांमध्ये वर्ग करण्याकरिता कोणतीही कार्यवाही सुरु करण्यांत आली नाही.

या बाबतीत मंडळाने असे उत्तर दिले की, वरील युनिटसचे लेखे बंद करणे आणि त्यांची मालमत्ता/दायित्वे मंडळाच्या लेख्यांमध्ये विलीन करणे या बाबी संपूर्ण मंडळाची पुर्नस्थापना झाल्यानंतर मंडळापुढे निर्णयासाठी ठेवण्यांत येतील व मंडळाच्या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करण्यांत येईल.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

महालेखापाल यांनी आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे सन २००८-०९ पासून योग्य ती कार्यवाही करण्याच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये याबाबत योग्य ती कारवाई केली

मंडळाने सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये याबाबत योग्य ती दुरुस्ती केली आहे.

मंडळाच्या खातेनिहाय केंद्रांना दिलेल्या अनामती त्वरीत वसुल करण्याबाबत मंडळाला सूचना देण्यांत आल्या आहेत.

आक्षेपात दर्शविलेल्या मशिनरीची किंमत सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये दर्शविली आहे. हातकागद केंद्र नफ्यात असतांना हा निर्णय मंडळाने सन १९९९ मध्ये घेतला होता. मागील १० वर्षापासून केंद्र सतत तोटयात असल्याने या निर्णयाचा पुनर्विचार करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

हातकागद संस्थेची आर्थिक परिस्थिती विचारात घेऊन सन १९९९ मध्ये संस्थेच्या कर्मचाऱ्यांना जेवढा बोनस दिला जाईल तेवढी रक्कम मंडळास लाभांश स्वरुपात देण्याबाबतचा निर्णय मंडळाने घेतला होता. मात्र संस्थेस मोठा आर्थिक तोटा झाल्यामुळे संस्था मंडळास लाभांश देऊ शकली नाही. या संदर्भात मंडळाने सन १९९९ मध्ये घेतलेल्या निर्णयाबाबत पुनर्विचार करण्याबाबत मंडळास सूचना देण्यांत आल्या आहेत.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

हातकागद संस्थेमधील कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेची योग्य ती तरतूद संस्थेने सन २००५-०६ च्या लेख्यांमध्ये मंडळाने केलेली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे हातकागद संस्था मागील काही वर्षे सतत तोटयात असल्याने सदर निधी दैनंदिन व्यवहारासाठी वापरला आहे. सबब तो मुदत ठेवीत गुंतविता आलेला नाही.

मध प्रक्रिया केंद्रासाठी केलेल्या रु. २.४९ लाखाचा खर्च मंडळाच्या सन २००६-०७ च्या लेख्यात दर्शविण्यांत आला आहे.

आक्षेपात दर्शविल्याप्रमाणे मंडळाने सन २००६-०७ च्या मधमशापालन संस्थेच्या लेख्यांमध्ये स्वतंत्र घसारा निधी दर्शविला आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मधपेटया तयार करण्यासाठी ज्या अनामती घेण्यांत आल्या होत्या, त्या सर्व रक्कमेच्या मधपेटया केंद्राने सन २००५-०६ मध्ये तयार करुन त्याचा पुरवठा मंडळाने केला आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

आक्षेपामध्ये दर्शविल्याप्रमाणे कंबल उत्पादन केंद्र, नागपूर यांच्या मालमत्तेवर सन २००६-०७ पासून घसारा आकारला जात आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

बंद खातेनिहाय केंद्रे त्वरीत निर्लेखित करण्याबाबतच्या सूचना मंडळास देण्यात आल्या आहेत.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

४ संकीर्ण

४.१ महत्वाची लेखा धोरणे

लेख्यांवरील टिपण्या मध्ये स्थावर मालमत्तेचे मुल्यांकन, वैधानिक कायद्यांपासून असल्यास सूट इत्यादी बाबत असलेली लेखा धोरणे नमूद करण्यांत आलेली नव्हती. एकूण आठ खातेनिहाय केंद्रे होती. परंतु चालू असलेल्या फक्त चार केंद्रांचाच त्यात समावेश करण्यांत आला होता. तथापि प्राप्तीकर/वैधानिकदृष्टया आवश्यक बाबी या युनिटसना लागू आहेत किंवा नाहीत, हे नमूद करण्यांत आलेले नव्हते. सन २००२-०३ आणि २००३-०४ च्या लेखापरीक्षण अहवालामध्ये या बाबतीत सूचना दिल्या असताना देखील या बाबी संबंधात कोणत्याही खुलाशाचा समावेश चालू वर्षाच्या लेख्यांवरील टिप्पण्यांमध्ये करण्यांत आला नव्हता.

याबाबत मंडळातर्फे आपल्या उत्तरात असे कळविण्यांत आले की, ही केंद्रे व्यापारी तत्वावर चालविण्यांत येत होती आणि कर भरण्याबाबतच्या आवश्यक टिपण्या या संबंधित युनिटच्या स्वतःच्या रेकॉर्डमध्ये असल्यामुळे त्यांचा असा उल्लेख लेख्यांवरील टिपण्यांमध्ये करण्याची गरज नव्हती.

या केंद्राचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये समाविष्ट करण्यांत येत असल्यामुळे ही वस्तुस्थिती मंडळाच्या लेख्यांमध्ये नमूद करणे आवश्यक होते.

४.२ मंडळाच्या व्यापारी केंद्रांवरील घसारा आकारणीत विसंगती

निरनिराळया व्यापारी केंद्रांनी घसारा काढण्यासाठी वजावट पध्दत स्विकारली आहे. परंतु निरनिराळया युनिटसनी घसारा काढण्यासाठी आकारलेला दर एकाच बाबीसाठी एकसारखा नव्हता. मंडळाने दिलेल्या उत्तरात नमूद केले आहे की, घसारा काढण्यासाठी आकारलेल्या दरात समानता ठेवण्याकरिता सर्व केंद्रांना सूचना देण्यांत आल्या आहेत.

४.३ अंतर्गत लेखा परीक्षण व अंतर्गत नियंत्रण यंत्रणा

लेखापरीक्षकांची चार पदे मंजूर असतांना अंतर्गत लेखापरीक्षणाच्या कामासाठी तीनच कर्मचारी देण्यांत आले होते. त्यांच्या नित्याच्या कामाशिवाय त्यांच्याकडे हे काम सोपविण्यांत आले होते. लेखापरीक्षणाच्या कामासाठी वेगळा असा कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यांत आलेला नव्हता तर लेखापरीक्षणाचा कार्यक्रम आखण्यांत आल्यानंतर दरवेळी नियमित कर्मचा-यांमधूनच वेगळे अधिकारी/कर्मचारी कसेही निवडून त्यांना या कामासाठी नामनिर्देशित करण्यांत येत होते. कॅलेंडर वर्ष २००५ पासून मुख्य कार्यालयातील लेखा विभागाचे अंतर्गत लेखापरीक्षण सुरु करण्याचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मंजूर केला होता, परंतु त्याची अंमलबजावणी एप्रिल, २००६ पर्यंत झाली नव्हती. मुख्य कार्यालयातील सर्वच शाखांना अंतर्गत लेखापरीक्षण लागू करावयाचे किंवा नाही, याबाबत अंतिम निर्णय एप्रिल, २००६ पर्यंत घेण्यांत आलेला नव्हता. विभागीय अधिका-यांनी त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या जिल्हयांचे अंतर्गत लेखापरीक्षण करावयाचे होते. तरी, असे लेखापरीक्षण पूर्ण केल्याचा व आक्षेप पाठविण्यांत आल्याचा कोणताही रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यांत आला नाही. अशा रितीने मंडळात कार्यरत असलेली व्यवस्था समाधानकारक असल्याचे आढळून आले नाही.

मंडळाने आपल्या उत्तरात असे नमूद केले की, एप्रिल २००६ मध्ये एक स्वतंत्र लेखापरीक्षण विभाग सुरु करण्यांत आलेला आहे. फेब्रुवारी २००७ पर्यंत मंडळाच्या सर्व युनिटसचे लेखापरीक्षण पूर्ण करण्यांत येईल.

४.४ लेखा परीक्षणातून निष्पन्न झालेली माहिती

या आधीच्या परिच्छेदांमध्ये नमूद केलेल्या अभिप्रायांवरुन एकूण मालमत्ता व येणी रुपये ८४.६३ लाखांनी आणि दायित्वे रुपये ८२.२३ लाखांनी ३१ मार्च, २००५ रोजी कमी दाखविण्यांत आली आहेत. तर जमा रक्कमा व प्रदान केलेल्या रक्कमा अनुक्रमे रुपये ३.११ लाख व रुपये ४.७७ लाखांनी दि.३१ मार्च, २००५ रोजी संपलेल्या वर्षात कमी दाखविण्यांत आल्या आहेत.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या सर्व मुद्दयांचा समावेश करुन स्पष्टस्थिती मंडळाने लेख्यांसोबत जोडल्या जाणाऱ्या **लेख्यांवरील टिपणीमध्ये** करण्यांबाबतच्या सूचना मंडळास देण्यांत आल्या आहेत.

सर्व खातेनिहाय केंद्राच्या मालमत्तेवर बाबनिहाय समान दराने घसारा आकारण्याची कारवाई मंडळाने सन २००६-०७ या वर्षापासून सुरु केली आहे.

मंडळाने सर्व जिल्हा कार्यालयांचे सन २००५-०६ वर्षा अखेर पर्यंतचे अंतर्गत लेखापरीक्षण दि. ३१/३/२००७ अखेर पूर्ण केले आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन २००५-०६ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

२ लेख्यांवर अभिप्राय

२.१ मालमत्ता

२.१.१ (क) खातेनिहाय योजना - (१०) खादी अंबर चरखा, नागपूर रुपये २२.७१ लाख

चरखे चालू ठेवण्यासाठी भाडयाने घेतलेल्या गोदामांचे रु.०.०८ लाख थकीत भाडे लेख्यांमध्ये न दर्शविल्यामुळे चालू देणी तेवढया प्रमाणात कमी दिसून येतात.

सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये सदर भाडयाबाबत तरतूद केली जाईल, असे मंडळाने कळविले आहे.

२.१.२ चालू देणी

मंडळाच्या आदर्शनगर, वरळी येथील जागेचे भुईभाडे रुपये ०.५५ लाख म्हाडाला देणे आहे व त्याचा लेख्यांमध्ये समावेश केलेला नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात चालू देणी कमी दिसून येतात.

मंडळाचे लेखे हे आय-व्यय पध्दतीने ठेवले जात असल्यामुळे प्रलंबित भुईभाडे लेख्यांमध्ये दर्शविले नाही, असे मंडळाने नमूद कले आहे.

मंडळाचे उत्तर समर्थनीय नाही. कारण प्रलंबित देणी लेख्यांमध्ये दर्शविली नाहीत तर मंडळाच्या लेख्यांची खरी स्थिती दिसून येणार नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

खातेनिहाय केंद्र, मुंबईच्या सन २००६-०७ च्या वार्षिक लेख्यांमध्ये चरख्याचे प्रलंबित गोडवून भाडे अदा करण्यासाठी रु.१४०००/- ची तरतूद करण्यांत आलेली आहे. (सन २००५-०६ साठी रु. ८०००/- आणि सन २००६-०७ साठी रु.६०००/-)

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केले नाही.

मंडळाचे वार्षिक लेखे हे आय-व्यय पध्दतीने ठेवले जात असल्यामुळे कोणत्याही प्रकारची येणी किंवा देणी लेख्यांमध्ये दर्शविली जात नाहीत. सदर बाब २००८-०९ चे लेखे महालेखापाल यांना सादर करतेवेळी लेखांकनाची विशिष्ट पध्दत त्यामध्ये समाविष्ट केलेली आहे.

२.२.१ मालमत्ता

(ब) सोसायटयांकडून वसुल करणे असलेले कर्ज.

(क) राज्य शासन कर्ज रुपये ६७.५४ लाख (सहपत्र-१८) व राज्य शासनास देणे असलेले कर्ज रुपये ८४.६७ लाख (सहपत्र-७)

मंडळाने भांडवल व देणे बाजूस रुपये ८४.६७ लाख राज्य शासनास कर्ज देणे म्हणून दर्शविले आहे. (सहपत्र-७) त्यमध्ये अनुक्रमे रुपये ६.९३ लाख व रुपये ६.४७ लाख हे सन १९६२ पूर्वीचे आहे की, ज्याची कोणत्याही प्रकारची कागदपत्रे मंडळाकडे उपलब्ध नाहीत.

२.२.२ मंडळाची जंगम मालम-ता रुपये १.५४ कोटी

वरील मालम-तेमध्ये रुपये ५.६० लाख रकमेची वाहने व रुपये १३.१६ लाख रकमेच्या २० संगणकाचा समावेश आहे की, जी नादुरुस्त आहेत. त्यामुळे मंडळाची मालम-ता रुपये १८.७६ लाखाने जास्त दर्शविल्याचे दिसून येते.

वरील वाहने व संगणक निर्लेखित करण्याची कार्यवाही चालू आहे व कार्यवाही पूर्ण होताच ती मंडळाच्या मालम-तेमधून कमी केली जातील असे मंडळाने कळविले आहे.

२.२.३ खाते निहाय केंद्राची जंगम मालम-ता रुपये १३.१४ लाख

खादी व ग्रामोद्योग आयोगाने सन १९८९ -९० मध्ये भांडवली खर्च या कार्यक्रमा अंतर्गत रुपये ३८.२५ लाख रकमेचे चरखे वस्तूच्या स्वरुपात कर्ज म्हणून मंडळास दिले.मात्र ते लेख्यांमध्ये न दर्शविल्यामुळे तेवढया प्रमाणात भांडवल व मालम-ता कमी दिसून येते.

रेकॉर्ड तपासूनअभिप्राय दिले जातील असे मंडळाने कळविले आहे.

२.२.४ राज्य शासनाकडून वसूल करावयाचे कर्ज रुपये ६७.५४ लाख

या रकमेमध्ये पश्चिम घाट विकास योजनेमधील (-) रुपये २.९७ लाख रकमेचा समावेश आहे. त्यामुळे तेवढया प्रमाणात मालम-ता कमी झाल्याचे दिसून येते.

जिल्हा कार्यालयाकडून माहिती प्राप्त करुन घेऊन योग्य ती दुरुस्ती करत आहोत, असे मंडळाने कळविले आहे.

२.२.५ गुजरात मंडळाकडून वसूल करावयाची कर्ज वसुली रुपये ०.५१ लाख

सहपत्र-१६ मध्ये गुजरात खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून रुपये ०.५१ लाखाचे कर्ज सन १९७२-७३ पासून वसुल करणे असल्याचे दिसून येते. मात्र याबाबतची कोणतीही माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही.

२.२.६ सोसायटयांकडून वसूल करावयाचे कर्ज इ. जिल्हा ग्रामोद्योग अधिकरी यांच्याकडे असलेला इंप्रेस्ट रुपये १.१२ लाख

सन १९९६-९७ पासून जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांच्याकडे रुपये १.१२ लाख रुपयेचा इंप्रेस्ट पडून असल्याचे दिसून येते. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी निहाय यादी मंडळाकडे उपलब्ध नाही. तसेच जि.ग्रा.अ. यांच्या मासिक आयव्यय पत्रकामध्ये सदर रक्कम देखील दर्शविली जात नाही.

सर्व बाबींची खातरजमा केल्यानंतर योग्य ती दुरुस्ती केली जाईल, असे मंडळाने कळविले आहे.

२.२.७ संकीर्ण ऋणको

खातेनिहाय केंद्र- ताळेबंद पत्रक रुपये १.६३ कोटी

वरील रक्कमेमध्ये ६ खातेनिहाय केंद्रांचे एकूण रुपये ४०.६० लाख समाविष्ट आहेत व मागील पाच वर्षापासून तीच रक्कम ऋणकोच्या कोणत्याही मंजूरीशिवाय पुढे ओढली जात आहे.

ही रक्कम खातेनिहाय केंद्राच्या एकत्रित लेख्यांवरुन घेतलेली आहे व ऋणकोचे संम्मतीपत्र केंद्राकडे आहे, असे मंडळाने नमूद केले आहे.

मंडळाचे उ-तर समर्थनीय नाही, सहा केंद्रापैकी ३ केंद्रे सन २००० पासून बंद आहेत व पणन विभागाच्या रेकॉर्डची तपासणी केली असता असे कोणत्याही प्रकारचे सम्मतीपत्र आढळून आले नाही.

२.२.८ मुख्य कार्यालय, मुंबई रुपये ३.६१ लाख

वरील रक्कमेमध्ये महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग लि.पुणे यांना सन १९७९-८० व १९८०-८१ मध्ये अनामत दिलेल्या रुपये ३.५० लाख या रकमेचा समावेश आहे. सदर संस्था मागील १५ वर्षापासून बंद आहे. तसेच त्यामधील रुपये०.०८ लाखही रक्कम खूप जुनी असून,त्याबाबतची कोणतीही माहिती उपलब्ध नाही.

२.२.९ रोख व बँक शिल्लक रुपये ८.९३ कोटी

वरील रकमेमध्ये राज्य शासनाकडून प्राप्त झालेल्या रुपये ८४.७१ लाख या रकमेचा समावेश आहे. (बँक खाते क्र.४३६५, बँक ऑफ महाराष्ट्र) या खात्यामध्ये मार्च,२००१ व मार्च,२००५ या कालावधीत रुपये ०.४४ लाख रकमेचे एकूण ७ धनादेश अदा केले आहेत. मात्र आज दिनांकअखेर पर्यन्त ते बँकेत खर्ची पडलेले नाहीत. सदर धनादेश कालबाहय झाले असून, अद्याप संबंधित पार्टी धनादेशाची तारीख वाढ करण्यासाठी आलेली नाही.सदर रक्कमापुन्हा लेख्यांमध्ये जमा करुन घेणे जरुरीचे आहे. मात्र दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे खर्च रुपये ०.४४ लाख रकमेने संबंधित वर्षात जास्त झाल्याचे दिसून येतो.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

आक्षेपामध्ये दर्शविलेल्या रक्कमा सन १९६२ पासून मंडळ स्थापनेपूर्वीच्या असल्याने त्याबाबतचे रेकॉर्ड उपलब्ध होत नाही. तथापि सदर रक्कम निर्लेखित करता येईल का ही बाब तपासून पहावी.

मंडळामध्ये असलेली निकामी ३ वाहने रु.५.६० लाख (सन २००७-०८व २००८-०९) व २० संगणक रु.१३.१६ लाख सन २००८-०९ मध्ये निर्लेखित केली आहेत.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केले नाही.

खादी आयोगाकडून चरख्यांच्या स्वरुपात प्राप्त झालेले कर्ज रु.३८.२५ लाख हे खादी केंद्रांना व बलुतेदार संस्थांना चरख्याच्या स्वरुपात रक्कम रु.३८.२५ लाख कर्ज म्हणून वाटप करण्यांत आले होते व या रक्कमा खातेनिहाय केंद्राच्या ताळेबंद पत्रकात मालम-ता व येणे बाजूस वसुल पात्र कर्ज म्हणून दर्शविले असून, भांडवल व देणे बाजूस खादी आयोगास देय कर्ज म्हणून दर्शविले आहे. त्यामुळे भांडवल व मालम-ता योग्य प्रमाणात दर्शविलेली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने या बाबतीत योग्य ते समायोजन सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये केले आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने या बाबतीत योग्य ती कार्यवाही सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये केलेली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

सदरच्या रक्कमा या १९६० पूर्वी पासूनच्या आहेत. त्यामुळे त्याबाबतचे रेकॉर्ड उपलब्ध होत नाही.

या बाबत आवश्यक ती कार्यवाही खादी आयोग व गुजरात खादी बोर्ड यांच्याशी संपर्क साधून करावी, असे निर्देश मंडळास देण्यात आले आहेत.

जिल्हा ग्रामोद्योग अधिका-यांनी इंप्रेस्ट रक्कम परत केल्यामुळे त्यांच्या मासिक आयव्यय पत्रकात सदर रक्कम दिसून येत नाही. परंतु रक्कमा परत करतांना योग्य ते लेखा शिर्ष न दर्शविल्यामुळे सदर रक्कमा या लेखा शिर्षाखाली प्रलंबीत आहेत. जिल्हा ग्रामोद्योग अधिका-यांना योग्य ते लेखाशिर्ष कळविणेबाबत परत एकदा निर्देश देण्यात आले आहेत. सदर तपशिल प्राप्त होताच या शिर्षाखालील रक्कमा समायोजित करण्यात येतील.

दि. ३१ मार्च, २०१० अखेर रु.१.०९ लाखाची शिल्लक आहे.

मंडळाने खाते निहाय केंद्राच्या सर्व प्रमुखाना ऋणकोकडून स्विकृती पत्र घेणेबाबत सूचना दिल्या असून, पुढील लेखा परीक्षणाचेवेळी महालेखापालाना सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

सदर संस्था जरी १५ वर्षापूर्वी बंद झाली असली तरी सदर संस्थेची मालमत्ता मह मालम-ता अजूनही अस्तित्वात आहे. त्यामुळे अनामतीची रक्कम वसूल होऊ शकेल, म्हणून अग्रीमाची रक्कम रु. ३.६१ लाख एवढी रक्कम मंडळाच्या लेख्यात अजूनही दर्शविण्यात येते.

मंडळाने योग्य ती दुरुस्ती सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये केली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केले नाही.

३.१ पणन विभाग

३.१.१ भांडवल व देणी

३.१.१.१ चालू देणी व तरतूद

(ब) भांडवली कर्जावर केलेली रुपये ९.५३ लाख व्याजाची तरतूद

(क) खेळत्या भांडवलावर केलेली रुपये २६.८६ लाख व्याजाची तरतूद

सन २०००-०१ ते २००४-०५ च्या लेखा अहवालामध्ये कळवूनदेखील भांडवली कर्जावर केलेली रुपये ९.५३ लाख व्याजाची तरतूद तसेच खेळते भांडवल कर्जावर केलेली रुपये २६.८६ व्याजाची तरतूद सन १९९०-९१ पासून अद्याप पडून आहे.

याबाबत खादी आयोगाकडे विचारणा केलेली आहे. मात्र अद्याप उ-तर प्राप्त झालेले नाही, असे मंडळाने कळविले आहे.

३.१.२ मालम-ता-चालू मालम-ता, कर्ज व अनामती

३.१.२.१ संकीर्ण ऋणको रुपये ९७.९३ लाख

(अ) रक्कम रुपये ६.१९ लाखाचे देयक आरोग्य सेवा, पुणे (संकीर्ण ऋणको) व आनंदी सेवा केंद्र, नेरुळ (संकीर्ण धनको) यांच्या खात्यामध्ये दोन वेळा खतावल्यामुळे येणे व देणे रक्कमा तेवढया प्रमाणात जास्त झालेल्या आहेत.

याबाबत योग्य ती खातरजमा करुन लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती करत आहोत,असे मंडळाने कळविले आहे.

(ब) रुपये २.८० लाख मूळ किमंत असलेली माणसांना खाण्यास अयोग्य असलेला मध पणन विभाग, मुंबई यांच्याकडून मधमाशापालन, महाबळेश्वर यांना पाठविला होता. हा मध योग्य ती विल्हेवाट लावून आलेली रक्कम पणन विभागास पाठविली.मात्र पणन विभाग सातत्याने सदर रक्कम मधमाशापालन , महाबळेश्वर यांच्याकडून येणे दर्शवित आहे. त्यामुळे पणन विभागाच्या लेख्यामध्ये तेवढया प्रमाणात येणे जास्त दिसून येते.

सन २००६-०७ चे लेखे तयार करतांना योग्य ती दुरुस्ती करत आहोत, असे मंडळाने कळविले आहे.

(क) सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून रक्कम रुपये ०.३७ लाख (मार्च,२००६) माल पुरवठयाबद्दल (डिसेंबर,२००५)प्राप्त झाले, सदर रक्कम संकीर्ण ऋणकोमध्ये जमा केली. मात्र या खात्यामध्ये येणे दर्शविले नसल्यामुळे तेवढया प्रमाणात संकीर्ण ऋणको कमी असल्याचे दिसून येतात.

पुन्हा डिसेंबर, २००५ मध्ये माल प्राप्त झाला व रक्कम जून,२००६ मध्ये आदा केली. मात्र सदर रक्कम संकीर्ण धनकोमध्ये न दर्शविल्यामुळे संकीर्ण धनको तेवढया प्रमाणात कमी दर्शविल्याचे दिसून येते.

(ड) तसेच सिव्हील सर्जन जनरल हॉस्पीटल, गडचिरोली यांच्याकडून रुपये ०.७६ लाख रक्कम प्राप्त झाली. (मार्च, २००६) हा माल सन २००६-०७ मध्ये पुरवठा केला होता. ही रक्कम संकीर्ण ऋणको मध्ये जमा करुन घेतली . मात्र सिव्हील सर्जन गडचिरोली यांच्या नावे रक्कम न टाकल्यामुळे तेवढया प्रमाणात संकीर्ण ऋणको कमी असल्याचे दिसून येते.

जर सन २००५-०६ मध्ये रक्कम प्राप्त झाली आहे मात्र पार्टीला सन २००६-०७ मध्ये रक्कम अदा केली असेल तर देणे बाजूस अनामत प्राप्त म्हणून दर्शविणे जरुरीचे होते. असे न दर्शविल्यामुळे देणे तेवढया प्रमाणात कमी दर्शविल्याचे दिसून येते.

३.१.१.२ कंबल उत्पादन केंद्र, उमरेड यांना दिलेली अनामत रु.२.०० लाख व हातकागद उत्पादन केंद्र, पुणे यांना दिलेली अनामत रु.१३.५८लाख

सन २००२-०३ व २००४-०५ च्या लेखा अहवालामध्ये निदर्शनास आणूनदेखील कंबल उत्पादन केंद्र,उमरेड व हातकागद केंद्र, पुणे यांना दिलेली तात्पुरती अनामत अनुक्रमे रु.२.०० लाख व रु.१३.५८ लाख सन मार्च,१९९८ व मार्च,२००० पासून अद्याप वसुल झालेली नाही. ही रक्कम वसूल करण्यासाठी/वळती करुन घेण्यासाठी मंडळाने कोणत्याही प्रकारचे प्रयत्न केलेल नाहीत.

सदर रक्कम वसुल करण्याबाबतची कार्यवाही करत आहोत, असे मंडळाने नमूद केले आहे.

३.२ हातकागद संस्था, पुणे

३.२.१ मालम-ता

३.२.१.१ स्थावर मालम-ता रु.१०.९२ लाख

(अ) हातकागद संस्थेसाठी मशिनरी खरेदी करण्यास मंडळाला खादी आयोगाकडून रु.२९.६६ लाख मदत प्राप्त झाली होती. त्यापैकी रु.२१.४३ लाखाची मशिनरी खरेदी केली. (शिल्लक रक्कम परत केली) मात्र सदर मदत लेख्यांमध्ये दर्शविली नाही. त्यामुळे रु.२१.४३ लाखाने भांडवल व मालम-ता कमी दिसून येते.

ही रक्कम मंडळाच्या सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये दर्शविली आहे असे मंडळाने नमूद केले आहे. तसेच मंडळाने असे देखील नमूद केले आहे की, सदर रक्कम मंडळाने स्विकारली आहे. तिचा हातकागद संस्थेशी कोणताही संबंध नाही. म्हणून मशिनरीची किमंत मंडळाच्या जंगम मालमत्तेच्या सहपत्र-१३ मध्ये मंडळाच्या सन २००६-०७ लेख्यांमध्ये दर्शविली आहे.

मंडळाचे उ-तर बरोबर नाही, मशिनरी हातकागद केंद्र, पुणेसाठी खरेदी केलेली असल्यामुळे त्यांच्याच लेख्यांमध्ये दर्शविणे जरुरीचे आहे.

३.२.१.२ घसारा रु.१.४५ लाख

ठरवून दिलेल्या दरापेक्षा जास्त दराने मालम-तेवर घसारा आकारल्यामुळे रु.०.५८ लाखाने मालम-ता कमी झ ाल्याचे दिसून येते.

आता ठरवून दिलेल्या दराने घसारा आकारला जात आहे असे मंडळाने नमूद केले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने पणन विभागाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केले नाही.

अ) याबाबत पणन विभागाच्या सन २००७-०८ च्या लेख्यामध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

ब) याबाबत पणन विभागाच्या सन २००७-०८ च्या लेख्यामध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

क) याबाबत पणन विभागाच्या सन २००७-०८ च्या लेख्यामध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

ड) याबाबत पणन विभागाच्या सन २००७-०८ च्या लेख्यामध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

कंबल उत्पादन केंद्र बंद आहे. त्यामुळे अनामत रक्कम वसुल करणे शक्य नाही.

हातकागद संस्था, पुणे (उत्पादन विभाग) येथील युनिट जून,२०१० पासून भाडे तत्वावर देण्यांत आले आहे. त्यामुळे सदर युनिटला दिलेली अनामत रक्कम वसुल करण्यांची कार्यवाही सुरु आहे.

हातकागद संस्था, पुणे येथे संशोधन व प्रशिक्षण विभाग तसेच उत्पादन विभाग असून, हे दोन स्वतंत्र विभाग आहेत. संशोधन व प्रशिक्षण विभाग नॉर्मल योजनेखाली येतो. तर उत्पादन विभाग हा मंडळाच्या स्वत:च्या मालकीचा आहे.

खादी आयोगाच्या यु.एन.डी.पी. योजने अंतर्गत रु.२१.४३ लक्ष रकमेची मशिनरी संशोधन विभागासाठी प्राप्त झालेली आहे. त्यामुळे मशिनरीची किंमत मंडळाच्या सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये जंगम मालमत्ता सहपत्र १३ मध्ये दर्शविली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाच्या खातेनिहाय केंद्राच्या स्थावर व जंगम मालम-तेवर विहीत दराने सन २००६-०७ पासून घसारा आकारणी करण्यात येत आहे.

३.३ मधमाशापालन संचालनालय, महाबळेश्वर

३.३.१ मालमत्ता

३.३.१.१ स्थावर मालमत्ता

मध प्रक्रिया केंद्रासाठी केलेल रु.२.४९ लाखाचे बांधकाम स्थावर मालम-तेमध्ये न दर्शविल्यामुळे तेवढया प्रमाणात स्थावर मालम-ता कमी दिसून येते. ही बाब सन २००३-०४ व सन २००४-०५ च्या लेखा अहवालामध्ये नमूद करुन देखील मंडळाने त्यावर ठोस कार्यवाही केलेली नाही.

ही मालमत्ता मंडळाच्या सन २००६-०७ च्या लेख्यांमध्ये दर्शविली जाईल, असे मंडळाने नमूद केले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मध केंद्रासाठी नॉर्मल योजनेचे मंडळाच्या जागेवर रु.२.४९ लाखाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्याची नोंद सन २००६-०७ च्या स्थावर मालम-तेत घेतली आहे. (सहपत्र-१२) (स्थावर मालम-ता) पृ.क्र.३६ व अ.क्र २३

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

३.४ खातेनिहाय केंद्र,मुंबई

३.४.१ मालम-ता-मागील ताळेबंद पत्रकानुसार रु.३.५२ लाख कर्ज वसुली

दिनांक ३१ मार्च,२००६ अखेर रु.३.५२ लाख कर्ज वसुली दर्शविली आहे. मात्र त्याबाबतची माहिती उपलब्ध नाही. याबाबत शहानिशा करत आहोत, असे मंडळाने कळविले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाने खातेनिहाय केंद्राकडून अंबर चरखा केंद्र, फायबर केंद्र, मधकेंद्र इत्यादि केंद्राकडून वसूल केलेल्या रक्कमांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

वर्ष	वसुल रक्कम	शिल्लक रक्कम
२००१-०२	२५१६००/-	१४४७४२३.१८
२००२-०३	२००००००/-	१२४७४२३.१८
२००३-०४	५३०००/-	७१७४२३.१८
२००४-०५	३६५४५२/-	३५१९७१.१८
२००५-०६	--	३५१९९६.१८
२००६-०७	--	३५१९९६.१८
२००७-०८	--	३५१९९६.१८
२००८-०९	--	३५१९९६.१८
२००९-१०	१९२७९२/-	१५९२०४.१८

४. संकीर्ण

४.१ मालम-तेची प्रत्यक्ष पडताळणी

मंडळाने सन २००५-०६ मध्ये मालम-तेची प्रत्यक्ष पडताळणी केलेली नाही.

सन २००६-०७ मध्ये मालम-तेची पडताळणी केली असल्याबाबत मंडळाने कळविले आहे.

महत्वाची लेखा धोरणे

लेख्यांवरील टिपणीमध्ये स्थावर मालमत्तेचे मुल्यांकन वैधानिक कायद्यानुसार असल्यास, शासकीय सूट इत्यादी बाबतची लेखाधोरणे नमूद करण्यात आलेली नाहीत. एकूण आठ खातेनिहाय केंद्रापैकी फक्त चालू असलेल्या चार केंद्रांचाच समावेश करण्यात आलेला आहे. प्राप्तीकर/वैधानिकदृष्टया आवश्यक बाबी या युनिटला लागू आहेत किंवा नाही, हे नमूद करण्यात आलेले नाही. सन २००३-०४ व सन२००४-०५ च्या लेखा परीक्षण अहवालामध्ये याबाबत सूचना दिल्या असतांनादेखील या बाबीसंबंधात कोणत्याही खुलाशाचा समावेश चालू वर्षाच्या लेख्यावरील टिपणीमध्ये छ करण्यात आलेला नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

सन २००६-०७ च्या लेखा तपासणीच्यावेळी मालम-ता तपासणी प्रमाणपत्र महालेखाकार यांच्या तपासणी पथकात दाखविण्यांत आले आहे.

या सर्व मुद्यांचा सन २००७-०८ या वर्षाच्या लेखा धोरणाच्या टिपणीत समावेश करण्यात आला आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

४.३ अंतर्गत लेखा परीक्षण व अंतर्गत नियंत्रण यंत्रणा

सर्व जिल्हा कार्यालयाचे सन २००५-०६ या वर्षाचे अंतर्गत लेखा परीक्षण अंतर्गत लेखापरीक्षण शाखेकडून पूर्ण करण्यात आलेले आहे. मात्र अद्याप मुख्यकार्यालयाचे अंतर्गत लेखा परीक्षण करण्यांत आलेले नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या मुख्य कार्यालयाचे सन २००६-०७ या वर्षाचे अंतर्गत लेखा परीक्षण सन २००८-०९ या वर्षात पूर्ण केले आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

४.४ घसा-याविषयी तरतूद केलेली नाही

व्यापारी तत्वावर चालविल्या जाणा-या खातेनिहाय केंद्राव्यतिरिक्त असलेल्या मालम-तेवर मंडळ घसारा आकारत नाही. मंडळाचे असे म्हणणे आहे की, मंडळाला राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होते व त्याच वर्षी ते खर्च करावे लागते, म्हणून मंडळाचे लेखे आयव्यय पध्दतीने ठेवले जातात व हे लेख्यांवरील टिपणीमध्ये दर्शविले आहे. तथापि, हे म्हणणे समर्थनीय नाही. कारण घसा-याची तरतूद न केल्यामुळे मंडळाच्या लेख्याचे स्पष्ट व खरे स्वरुप दर्शवत नाही.

४.५ खादी आयोगाकडून प्राप्त झालेल्या व खादी आयोगास परत करावयाच्या रक्कमांचा ताळमेळ घातलेला नाही.

नॉर्मल योजनेखाली खादी आयोगाकडून प्राप्त झालेल्या व खादी आयोगास परत करावयाच्या कर्ज रक्कमांमध्ये दिनांक ३१ मार्च,२००२ पासून रुपये १.१२ कोटी रुपयांच्या फरकाचा अद्याप ताळमेळ घातलेला नाही. ताळमेळ घालण्याचे काम चालू आहे, असे मंडळाने कळविल आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

खादी आयोगाबरोबर रक्कमांचा नियमितपणे ताळमेळ घेतला जातो. खादी आयोगाने दिनांक २९-३-९३ च्या पत्रान्वये वसुलीच्या रक्कमा परत वापरण्यास परवानगी दिली होती. त्या रक्कमांचे योग्य ते समायोजन न केल्यामुळे सदरचा फरक दिसत आहे. या रक्कमांचे योग्य ते समायोजन सन २०१०-११ या आर्थिक वर्षात करण्याचे निर्देश मंडळाला देण्यात आले आहेत.

५ लेखा परीक्षण अभिप्रायामधून दिसून आलेले परिणाम

अहवालामध्ये दर्शविलेल्या मागील आक्षेपांमुळे दिनांक ३१ मार्च,२००६ अखेर मालम-ता व येणे ही रुपये ३९.१० लाख व भांडवल व देणी ही रुपये ५५.२५ लाखाने कमी दर्शविल्याचा निव्वळ परिणाम दिसून आला.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखे ज्ञापनात पुढील प्रमाणे खुलासा केला आहे :-

याबाबत परिच्छेद क्र.१.५ ते ५ मध्ये स्वतंत्र अभिप्राय नोंदविले आहेत. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन २००६-०७ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

लेखापरीक्षण अहवालासह वार्षिक अहवाल/वार्षिक लेखे विधान मंडळास सादर करणे :

अधिनियमाच्या कलम २३ ते २५ नुसार मंडळाने आर्थिक वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत वार्षिक अहवाल तयार करुन तो शासनास सादर करावयाचा असतो. असा प्रत्येक अहवाल विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे मांडावयाचा आहे. त्याच प्रमाणे, लेखा परीक्षकानी प्रमाणित केलेले मंडळाचे लेखे, त्यावरील लेखा परीक्षण अहवालासह, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहापुढे मांडण्यासाठी शासनास दरवर्षी पाठवावयाचे असतात.

मंडळाचे सन २००४-०५ वर्षाचे लेखे दि. ३१ मार्च,२००८ रोजी विधान मंडळास सादर करण्यात आले. मंडळाच्या सन २००५-०६ वर्षाचा ऑडीट रिपोर्ट छपाईमध्ये असल्यामुळे विधान मंडळास सादर करण्यांत आलेला नाही.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाचा सन २००४-०५, २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ चा वार्षिक अहवाल अनुक्रमे दि.२८ मार्च, २००७, २१ डिसेंबर, २००९, १९ एप्रिल, २०१० व २२ एप्रिल, २०१० रोजी विधान मंडळास सादर करण्यांत आले.

सन २००५-०६, २००६-०७ व २००७-०८ चे वार्षिक लेखे अनुक्रमे दि. २१-१२-२००९, ६-४-२०१० व २२-४-२०१० रोजी विधान मंडळास सादर करण्यांत आले.

२ मंडळाच्या लेख्यांवरील अभिप्राय

२.१ भांडवल व देणे

२.१.१ (सी) संस्था/सोसायटयांकडून अविनियोजीत म्हणून वसुल केलेली व राज्य शासनास देय असलेली रक्कम रुपये ३३.४९ लाख

(डी) राज्य शासनाकडून प्राप्त झालेले (नियोजन) मात्र मंडळाकडे अखर्चित असलेले अनुदान रु. ४.४४ करोड

विशेष घटक योजनेखाली प्राप्त झालेल्या रु.१.६३ करोड रकमेचा वरील रकमेमध्ये समावेश आहे. तथापि, ऑडीटला दिलेल्या माहितीप्रमाणे शिल्लक फक्त रु.१.६६ करोड होती. म्हणजेच देणी रु.३ लाखाने कमी दर्शविली आहे. फरक रकमेचा पडताळा घेऊन सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये दुरुस्ती केली जाईल, असे मंडळाने कळविले आहे.

२.१.२ चालू देणी

आदर्शनगर, वरळी येथील जागेचे म्हाडा कार्यालयास देणे असलेले भुईभाडे रुपये १.६९ लाख लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेले नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात चालू देणी कमी दर्शविली आहेत.

मंडळाचे लेखे हे आय-व्यय पध्दतीने ठेवले जात असल्यामुळे ही बाब लेख्यांमध्ये दर्शविली नसल्याचे मंडळाने मान्य केले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

मंडळाच्या सन २००७-०८ च्या लेख्यामध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

मंडळाचे लेखे हे आयव्यय पध्दतीने ठेवले जात असल्यामुळे रु.१.६१ लाख देय भुईभाडयाची तरतूद करण्यांत आलेली नाही.

सन २००८-०९ पासून सदरची बाब 'लेखांकनाची विशिष्ट पध्दत' यामध्ये स्पष्टपणे नमूद केली आहे.

२.२ मालमत्ता

२.२.१ (अ) राज्य शासनास देय असलेली कर्जे रु.८४.३७ लाख

(ब) संस्थांकडून वसूल करावयाची कर्जे

(क) राज्य शासनाची कर्जे रुपये ६५.५१ लाख

मंडळाने भांडवल व देणे बाजूस राज्य शासनास देय असलेले कर्ज म्हणून रुपये ८४.३७ लाख दर्शविले आहे. (सहपत्र-७) व येणे बाजूस रुपये ६५.५१ लाख संस्थांकडून वसुल करावयाचे कर्ज म्हणून दर्शविले आहे. (सहपत्र-१८) ही सर्व कर्जे सन १९६२ पूर्वीची आहेत व त्याचा कोणताही तपशील मंडळाकडे` उपलब्ध नाहीत.

२.२.२ (ब) मंडळाची जंगम मालम-ता रुपये १.८१ लाख

वरील मालम-तेमध्ये रुपये ५.६० लाख किमंतीची ३ वाहने व रुपये १३.१६ लाख किमंतीच्या २० संगणकांचा समावेश आहे. ही सर्व मालमत्ता निकामी आहे. त्यामुळे मालमत्ता रुपये १८.७६ लाखाने जास्त दर्शविली आहे.

एक वाहन जानेवारी, २००८ मध्ये निर्लेखित केले आहे व उर्वरित वाहने संगणक निर्लेखित करण्याची कार्यवाही चालू आहे, असे मंडळाने कळविले आहे.

२.२.३ ब) खाते निहाय केंद्र चालू मालम-ता रुपये १२.९३ लाख

मागील वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये अभिप्राय नोंदविले असतांनादेखील खादी व ग्रामोद्योग आयोगाने सन १९८८-८९ मध्ये भांडवली खर्च योजनेखाली वस्तू स्वरुपात कर्ज म्हणून दिलेले रु.३८.२५ लाख किमंतीचे चरखे लेख्यांमध्ये दर्शविले नाहीत. त्यामुळे मालमत्ता देणे या दोन्ही बाजू तेवढया प्रमाणात कमी दर्शविल्या आहेत.
या संबंधीचे रेकॉर्ड तपासून आवश्यक ती कार्यवाही करत आहोत असे मंडळाने कळविले आहे.

२.२.४ सोसायटयांकडून वसूल करावयाची कर्जे इत्यादी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांच्याकडे असलेली तसलमात रुपये १.१२ लाख

सहपत्र-१६ मध्ये सन १९९६-९७ पासून रु.१.१२ लाख तसलमात जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांच्याकडे प्रलंबित असल्याचे दिसते. या रकमेची जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी निहाय माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही. तसेच जि.ग्रा.अ.सदर रक्कम त्यांच्या मासिक आयव्यय पत्रकामध्ये दर्शवित नाहीत.

आवश्यक ती दुरुस्ती मंडळाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये करत आहोत, असे मंडळाने कळविले आहे.

२.२.५ सोसायटयांकडून वसूल करावयाची कर्ज इत्यादी राज्य शासनाकडील कर्ज रुपये ६५.५१ लाख

वरील रकमेमध्ये पश्चिम घाट विकास योजनेमधील कर्जाचे मुद्दल अधिक व्याज हे सहपत्र -१८ मध्ये एकत्र खतावल्यामुळे आलेल्या (-) ४.८४ या रकमेचा समावेश आहे. यामधील व्याजाची रक्कम सहपत्र-८ मध्ये न खतावल्यामुळे तेवढया प्रमाणात मालम-ता व येणे जास्त दिसून येते.

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन याबाबत योग्य ती दुरुस्ती करत आहोत, असे मंडळाने कळविले आहे.

२.२.६ संकीर्ण ऋणको

खातेनिहाय योजना ताळेबंद पत्रक रुपये २.१६ करोड

(१) सहा खातेनिहाय केंद्रांच्या देणेदारांकडून कोणत्याही प्रकारचे संमतीपत्र घेतले नसतांना मागील ६ वर्षापासून संकीर्ण ऋणको म्हणून दर्शविण्यात येणा-या रुपये ४०.६० लाख रक्कमेचा वरील रकमेमध्ये समावेश आहे.
सर्व खातेनिहाय केंद्रांना देणेदारांकडून संमतीपत्र घेण्याबाबतच्या सूचना दिल्या असल्याबाबत मंडळाने कळविले आहे.
(२) तसेच वरील रकमेमध्ये पणन विभागाच्या रुपये १६३.३६ लाख संकीर्ण ऋणको रकमेचा समावेश आहे. मात्र पणन विभागाच्या ताळेबंद पत्रकामध्ये रुपये १६६.८३ संकीर्ण ऋणको म्हणून दर्शविले आहेत. याचा अर्थ एकत्रीत ताळेबंद पत्रकामध्ये रुपये ३.४७ ने येणे कमी दर्शविले आहे. पणन विभागाच्या ताळेबंद पत्रकामध्ये दर्शविलेले रुपये ३.४७ लाख पुरवठयापोटी घेतलेली अनामत म्हणून दर्शविलेले देणे एकत्रित ताळेबंद पत्रकामध्ये दर्शविलेले नाही. त्यामुळे एकत्रित ताळेबंद पत्रकामध्ये तेवढया प्रमाणात देणे कमी दर्शविले आहे.
मंडळाचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना योग्य ती दुरुस्ती करत आहोत, असे मंडळाने कळविले आहे.

२.२.७ संकीर्ण ऋणको(देणेकरी)

मुख्य कार्यालय,मुंबई रुपये ३.६१ लाख

सन १९७९-८० व १९८०-८१ मध्ये महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग लि.पुणे यांना दिलेल्या रुपये ३.५० लाख रकमेचा वरील रकमेमध्ये समावेश आहे की जी संस्था मागील १५ वर्षापासून बंद आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

सदर रक्कमा हया १९६२ पासूनच्या म्हणजे मंडळ स्थापनेपासूनच्या आहेत. त्यामुळे त्याचे त्याचे अभिलेखे उपलब्ध होवू शकत नाही.

सदर रक्कमा निर्लेखित करता येतील अगर कसे याबाबत तपासणी करण्यात येत आहे.

मंडळाची तीन वाहने रक्कम रु.५.६० लाख सन २००७-०८ मध्ये निर्लेखित केली आहेत. तसेच २० संगणक रक्कम रु.१३.१६ लाख सन २००८-०९ मध्ये निर्लेखित केली आहेत.

मंडळाच्या अनुपालनावर महालेखापालानी अधिक भाष्य केलेले नाही.

खादी आयोगाकडून चरख्यांच्या स्वरुपात प्राप्त झालेले कर्ज रु.३८.२५ लाख हे खादी केंद्राना व बलुतेदार संस्थांना चरख्याच्या स्वरुपात कर्ज म्हणून वाटप करण्यांत आले होते व या रक्कमा खातेनिहाय केंद्राच्या ताळेबंद पत्रकात मालम-ता व येणे बाजूस वसुल पात्र कर्ज म्हणून दर्शविले असून, भांडवल व देणे बाजूस खादी आयोगास देय कर्ज म्हणून दर्शविले आहे. त्यामुळे भांडवल व मालम-ता कमी दर्शविलेली नाही.

सदर आक्षेप २००५-०६ या वर्षीही घेण्यांत आला होता व हे स्पष्टीकरण त्यावेळी देण्यांत आले होते. महालेखापालानी त्यावर अधिक भाष्य केले नव्हते.३

जिल्हा ग्रामोद्योग अधिका-यांनी तसलमत रक्कम परत केल्यामुळे त्यांच्या मासिक आयव्यय पत्रकात सदर रक्कम दिसून येत नाही. परंतु रक्कमा परत करतांना योग्य ते लेखा शिर्ष न दर्शविल्यामुळे सदर रक्कमा या लेखा शिर्षाखाली प्रलंबीत आहेत. जिल्हा ग्रामोद्योग अधिका-यांना योग्य ते लेखाशिर्ष कळविणेबाबत परत एकदा निर्देश देण्यात आले आहेत. सदर तपशिल प्राप्त होताच या शिर्षाखालील रक्कमा समायोजित करण्यात येतील.

दि. ३१ मार्च, २०१० अखेर रु.१.०९ लाखाची शिल्लक आहे.

मंडळाने २००७-०८ या वित्तीय वर्षाच्या लेख्यामध्ये दुरुस्ती केली आहे.

मंडळाच्या अनुपालानावर महालेखापालांनी अधिक भाष्य केलेले नाही.

मंडळाने खाते निहाय केंद्राच्या सर्व प्रमुखाना ऋणकोकडून स्विकृती पत्र घेणेबाबत सूचना दिल्या असून पुढील लेखा परीक्षणाचेवेळी महालेखापालांना सादर करण्यांचे निर्देश दिले आहेत.

सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये दुरुस्ती झालेली आहे.

मंडळाच्या अनुपालानावर महालेखापालांनी अधिक भाष्य केलेले नाही.

महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग संघ लि. पुणे या संस्थेस सन १९७९ ते १९८१ या कालावधीत रु.३.५० लाख अनामत दिलेली आहे. सदर संस्था जरी १५ वर्षापुर्वी बंद झाला असला तरी सदर संस्थेची मालमत्ता अजूनही अस्तित्वात आहे. त्यामुळे अनामतीची रक्कम वसूल होऊ शकेल या अपेक्षेने सदर रक्कम मंडळाच्या लेख्यात अजूनही दर्शविण्यात येते.

३ मंडळाच्या इतर निधीचे ताळेबंद पत्रकावरील अभिप्राय

३.१ भविष्य निर्वाह निधी

३.१.१ मालम-ता व येणे

सन २००६-०७ मधील संभाव्य येणे व्याज रु.३०.२७ लाख

मंडळामधील रु. १.६८ करोड मुदत ठेव गुंतवणूकीवरील संभाव्य येणे असणा-या रु. १५.४३ लाख व्याजाचा वरील रकमेमध्ये समावेश नाही. त्यामुळे तेवढया प्रमाणात येणी कमी दर्शविली आहेत.
मंडळाचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना योग्य ती दुरुस्ती केली जाईल, असे मंडळाने कळविले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

याबाबत योग्य ती दुरुस्ती मंडळाने सन २००७-०८ च्या लेख्यामध्ये केली आहे.

मंडळाच्या अनुपालानावर महालेखापालांनी अधिक भाष्य केलेले नाही.

४ खातेनिहाय केंद्राचे लेखे

४.१ पणन विभाग

४.१.१ भांडवल व देणी

चालू देणी व तरतूद

(ब) भांडवली कर्जावर केलेली रुपये ९.५३ लाख व्याजाची तरतूद

(क) खेळते भांडवल कर्जावरील व्याजाची तरतूद रुपये २६.८६ लाख

सन २०००-०१ ते २००५-०६ या वर्षाच्या लेखापरीक्षण अहवालामध्ये उल्लेख केला असतांनादेखील भांडवली कर्जावर केलली रु.९.५३ व्याजाची तरतूद व खेळते भांडवल कर्जावर केलेली व्याजाची तरतूद रु.२६.८६ लाख रक्कम प्रलंबीत ठेवली असून, १९९०-९१ पासून त्यावर कार्यवाही केलेली नाही.

मंडळाचे सन २००७-०८ चे लेखे तयार करतांना योग्य ती कार्यवाही करत आहोत,असे मंडळाने कळविले आहे.

४.१.२ मालम-ता व येणी

संकीर्ण ऋणको रुपये १.६७ करोड

अ) रद्द केलेल्या रु.६.१९ लाख रकमेच्या देयकाची संकीर्ण ऋणकोच्या यादीमध्ये आरोग्य सेवा पुणे यांच्या नावासमोर व संकीर्ण धनकोच्या यादीमध्ये मे. आनंदी सेवा केंद्र, नेरुळ यांच्या नावासमोर खतावणी केल्यामुळे येणे व देणे तेवढया प्रमाणात जास्त दिसून येते.

(ब) मानवास खाण्यास अयोग्य असलेला रु.२.८० लाख (मुळ रक्कम) रकमेची मध पणन विभागामार्फत मधमाशापालन केंद्र, महाबळेश्वर येथे पाठविला. सदर मधाची विल्हेवाट लावून त्यामधून आलेली रक्कम संचालक, महाबळेश्वर यांनी पणन विभागास परत पाठविली. मात्र पणन विभाग सतत ही रक्कम मधमाशापालन, महाबळेश्वर यांच्याकडून येणे म्हणून दर्शवित आहे. त्यामुळे तेवढया प्रमाणात येणे जास्त दिसून येते.

सन २००५-०६ च्या लेखा अहवालामध्ये अभिप्राय देऊनदेखील सदर चूक दुरुस्त करण्यात आलेली नाही. मंडळाच्या सन २००७-०८ च्या लेख्यांमध्ये सदर चुकीची दुरुस्ती करत आहोत, असे मंडळाने कळविले आहे.

४.२ सुतारी लोहारी कार्यशाळा, कोल्हापूर

४.२.१ भांडवल व देणी

पुरवठया प्रित्यर्थ घेतलेली अनामत रु.७.४० लाख

मधपेटया व मधयंत्रे पुरवठा करण्यासाठी सुतारी/लोहारी कार्यशाळा यांनी रु.६.९९ लाख अनामत घेतली. मात्र लेख्यांमध्ये पुरवठया प्रित्यर्थ घेतलेली अनामत म्हणून केवळ रु.६.२१ लाख दर्शविले. पुरवठा करण्यासाठी जो कच्चा माल खरेदी केला त्याची तपशीलवार माहिती मंडळाकडे उपलब्ध नाही.

तपशिलवार माहिती प्राप्त करुन घेऊन पुरविली जाईल, असे मंडळाने कळविले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

सन २००७-०८ च्या वार्षिक लेख्यामध्ये योग्य ती नोंद घेण्यांत आली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

सन २००७-०८ च्या वार्षिक लेख्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यांत आलेली आहे. महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

सन २००७-०८ च्या वार्षिक लेख्यामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्यांत आलेली आहे.

महालेखापाल यांनी मंडळाच्या अनुपालन अहवालावर अधिक भाष्य केलेले नाही.

रुपये ६.९९ लाख इतका अग्रिम केवळ मधपेटया बनविण्यांसाठी देण्यांत आलु नव्हतु. मधपेटयासाठी दिलेला अग्रिम रु.६.२१ लाख इतका होता व उर्वरीत अग्रिम रु.०.७८ लाख हा फर्निचरसाठी देण्यांत आला होता. याबाबतचे अभिलेख लेखापरीक्षण पथकाला सन २००८-०९ च्या लेखा परीक्षणाच्यावेळी सादर करण्यांत आले.

५ सर्वसाधारण

५.१ महत्वाची लेखे धोरणे

लेख्यांवरील टिपणीमध्ये स्थावर मालमत्तेचे मुल्यांकन वैधानिक कायद्यानुसार काही शासकीय सूट इत्यादी बाबतची लेखाधोरणे नमूद करण्यात आलेली नाहीत. प्राप्तीकर/वैधानिकदृष्टया आवश्यक बाबी मंडळाच्या खातेनिहाय केंद्राना लागू नाहीत हे नमूद करण्यात आलेले नाही. याबाबत मंडळाच्या सन २००२-०३ व सन २००५-०६ च्या लेख्यांमध्ये अभिप्राय नोंदविले आहेत. मात्र याबाबींचा समावेश चालू वर्षाच्या लेख्यावरील टिपणीमध्ये करण्यात आलेला नाही.

सन २००७-०८ चे लेखे अंतिम करतांना लेख्यांवरील टिपणीमध्ये या मुद्यांचा समावेश केला जाईल.

५.१ घसा-याची तरतूद न करणे

व्यापारी तत्वावर चालविल्या जाणाऱ्या खातेनिहाय केंद्राव्यतिरिक्त असलेल्या मालमत्तेवर मंडळ घसारा आकारत नाही. मंडळाला राज्य शासनाकडून अनुदान प्राप्त होते व त्याच वर्षी ते खर्च करावे लागते. म्हणून मंडळाचे लेखे आयव्यय पध्दतीने ठेवले जातात व ही बाब लेख्यांवरील टिपणीमध्येदर्शविली आहे असे मंडळाने नमूद केले आहे. तथापि हे म्हणणे समर्थनीय नाही. कारण मालमत्तेवर घसारा न आकारल्यामुळे मंडळाच्या लेख्यांचे स्पष्ट व खरे स्वरुप दिसून येत नाही.

पूर्वीच्या लेखा अहवालामध्ये हा मुद्दा असून तो यापूर्वीच कायदे मंडळापुढे ठेवला आहे. यावर लोकलेखा समितीचे जे अभिप्राय येतील, त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल असे मंडळाने कळविल आहे.

५.३ खादी व ग्रामोद्योग आयोगाकडून प्राप्त झालेली कर्ज रक्कम व परतफेड केलेली रक्कम याचा ताळमेळ घातलेला नाही.

खादी आयोगाकडून प्राप्त झालेल्या व खादी आयोगास परतफेड केलेल्या कर्ज रकमेमध्ये रुपये १.१२ करोडचा फरक आहे. मात्र दि.३१ मार्च, २००२ पासून अद्याप त्याचा ताळमेळ घातलेला नाही. फरकाचा ताळमेळ घालण्याचे काम चालू आहे, असे मंडळाने कळविले आहे.

५.४ निलंबन लेखा

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांनी वसूल केलेली व खादी आयोगास/राज्य शासनास परत करण्याची रु.९.१७ लाख रक्कम निलंबन लेखा शिर्षकाखाली ठेवली (देणी) (सहपत्र ९) मंडळाने या रक्कमा कोणत्या उद्योगाच्या आहेत, याबाबतचा शोध घेवून त्या खादी आयोग/राज्य शासनास पाठविणे गरजेचे होते.

याबाबतची कार्यवाही चालू आहे असे मंडळाने कळविले आहे.

तसलमात व तात्पुरती अनामत

लेख्यांमध्ये किरकोळ अनामत (इतर अनामत) या शिर्षकाखाली वजा शिल्लक (-) रु.१.३९ लाख दर्शविली आहे व सदर रकमेची पडताळणी करणे गरजेचे आहे.

याबाबत कार्यवाही चालू आहे, असे मंडळाने कळविले आहे.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे :-

या सर्व मुद्यांचा २००७-०८ या वर्षाच्या लेखाधोरणाच्या टिपणीत समावेश करण्यात आला आहे.

मंडळाच्या अनुपालानावर महालेखापालांनी अधिक भाष्य केलेले नाही.

सन २००८-०९ पासून मंडळाने वार्षिक लेख्यामध्ये लेखांकनाची विशिष्ट पध्दत समाविष्ट केली आहे.

मंडळाच्या अनुपालानावर महालेखापालांनी अधिक भाष्य केलेले नाही.

खादी आयोगाबरोबर रक्कमांचा नियमितपणे ताळमेळ घातला जातो. खादी आयोगाने दिनांक २९-३-९३ च्या पत्रान्वये वसुलीच्या रक्कमा परत वापरण्यास परवानगी दिली होती. त्या रक्कमांचे योग्य ते समायोजन न केल्यामुळे सदरचा फरक दिसत आहे. या रक्कमांचे योग्य ते समायोजन सन २०१०-११ या आर्थिक वर्षात करण्याचे निर्देश मंडळाला देण्यात आले आहेत.

या शीर्षाखाली रु.९.१७ लाख इतक्या प्रलंबीत रक्कमेमधून दिनांक ३१-३-२०१० अखेर रु.०.२३ लाख इतक्या रक्कमेचे समायोजन करण्यांत आले असून दिनांक ३१-३-२०१० अखेर रु.८.९४ लाख इतकी रक्कमु कमी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सन २००७-०८ च्या वार्षिक लेख्यामध्ये याबाबतची दुरुस्ती करण्यात आली आहे.

मंडळाच्या अनुपालानावर महालेखापालांनी अधिक भाष्य केलेले नाही.

६ लेखापरीक्षण अभिप्रायातून दिसून आलेले परिणाम

अहवालामध्ये दर्शविलेल्या मागील आक्षेपामुळे दिनांक ३१ मार्च, २००७ अखेर मालमत्ता व येणी रु.३४.२४ लाखाने व भांडवल व देणी रु.४०.२२ लाखाने कमी दर्शविल्याचा निव्वळ परिणाम दिसून आला.

विभागाने समितीस सादर केलेल्या लेखे ज्ञापनात पुढील प्रमाणे खुलासा केला आहे :-

याबाबत परिच्छेद क्र.१.५ ते ५ मध्ये स्वतंत्र अभिप्राय नोंदविले आहेत.

साक्ष :

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या सन १९९५-९६ ते सन २००६-०७ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा परीक्षा अहवालांसंदर्भात प्रधान सचिव, उद्योग विभाग सचिव, लघु व मध्यम उद्योग तथा पदसिध्द आयुक्त (उद्योग), मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ व अन्य विभागीय प्रतिनिधी यांची दि.१३ ऑक्टोबर, २०१० रोजी समितीपुढे साक्ष घेण्यात आली.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन १९९५-१९९६ ते सन २००६-०७ पर्यंतचे लेखा परीक्षण अहवाल सभागृहाला सादर करण्यात आलेले आहेत. प्रामुख्याने या अहवालांच्या संदर्भात ४-५ बाबी निदर्शनास आणावयाच्या आहेत बऱ्याच वेळा महालेखापाल यांच्याकडून आक्षेप घेण्यात आला किंवा त्याबद्दल टिप्पणी करण्यात आली आहे. त्याबाबत मंडळाकडून असा खुलासा करण्यात आला की, लेखांकन पध्दतीच्याबाबतीत (Accounting Procedure) महालेखापाल यांच्याकडून प्रत्येक वर्षाचे रोख तत्वावरुन भविष्यात प्राप्त होणाऱ्या देय असणाऱ्या तत्वास लेखांकनकरण्यात यावे असे सांगितले जाते. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ ही वाणिज्यीक संस्था नाही. परंतु त्यांनी काही व्यापारी घटक सुरु केले होते. मंडळाच्या अधिनियमातील कलम २५ नुसार लेखे रास्त पध्दतीवर ठेवण्याची तरतूद आहे यासंदर्भात बऱ्याच वेळा महालेखापाल यांच्याशी संपर्क साधण्यात आला होता. त्यांनी लेखे भविष्यात प्राप्त होणाऱ्या व देय होणाऱ्या व देय असणाऱ्या रकमात यांचा समावेश करण्यावर भर दिला आहे. तसेच त्यांनी या पध्दतीत काही

सुधारणा करण्यास सांगितले आहे. खादी व ग्रामोद्योग मंडळ ही केंद्र सरकारशी संबंधीत संस्था आहे. महालेखापाल यांच्याशी २००९ मध्ये शेवटचा संपर्क साधण्यात आला होता. जुलै, २०१० मध्ये केंद्र शासनाने अधिसूचना काढली आहे. त्यानुसार केंद्र सरकार प्राप्त व प्रदान लेखा ठेवील व आपण उत्पन्न आणि खर्चाचे लेखे ठेवणार आहोत. या पध्दतीचे लेखे ठेवण्याची सुरुवात सन २०१०-२०११ पासून होईल.

मुख्यत: खादी व ग्रामोद्योग आयोगाने बरेच युनिट्स सुरु केले होते. त्यामध्ये हातकागद केंद्र, पुणे हे युनिट सुरु करण्यात आले आहे. परंतु अमरावती व परभणी येथील युनिट्स बंद करण्यात आली आहेत. त्यांची मुख्य योजना पंतप्रधान रोजगार अनुदान कार्यक्रम ही आहे. त्याऐवजी २००६ मध्ये कायद्यात बदल करुन सुक्ष्म लघु आणि मध्यम व्यवसाय ही योजना सुरु करण्यात आली. सुक्ष्म लघु आणि मध्यम व्यवसाय हे वेगळे मंत्रालय केंद्र सरकारने सुरु केले आहे. पूर्वीच्या योजनेनुसार मायक्रो युनिटसाठी २५ लाख दिले जात होते. या योजनेचा जास्तीत जास्त फायदा कसा देता येईल, हे पाहिले जाते. ही योजना जिल्हा उद्योगकेंद्र, खादी व ग्रामोद्योग आयोग यांच्यामार्फत चालविली जाते.त्यातून त्यांना मागील २-३ वर्षात चांगला पैसा मिळाला होता आणि ते लाभार्थ्यांपर्यंत पोहोचले होते. या योजनेतून बारा बलुतेदारांच्या ११ सोसायट्या निर्माण झाल्या आहेत. दुसरे असे की, विशेष घटक योजनेंतर्गत देखील लाभार्थ्यांना पैसा दिला जातो. बँकांतर्फे त्यांना कर्ज दिले जाते. तसेच लाभार्थ्यांना अर्थसहाय्य दिले जाते. त्यानुसार मागील वर्षी १४ कोटींचे अर्थसहाय्य दिले आहे.

महालेखापालांचे काही आक्षेप याच बाबींशी संबंधीत आहेत. त्यांनी लेखांकनामुळे काही गोष्टी निर्माण होतात असा आक्षेप घेतला आहे. त्यात ताळमेळ घालणे बाबतचाही मुद्दा होता. पुढील वर्षापासून नवीन पध्दतीनुसार लेखांकन ठेवले जाणार आहे, अशी माहिती समितीला देण्यात आली. त्यावर समितीने अशी विचारणा केली की, मागील ७-८ वर्षांच्या लेख्यांबाबत विभागाने कोणता विचार केला आहे. त्यावर सचिव, उद्योग विभाग यांनी असा खुलासा केला की, त्याबाबत महालेखापाल यांच्याशी संपर्क साधला आहे. परंतु मागील लेखांकनामध्ये बदल करणे शक्य होणार नाही. खादी व ग्रामोद्योग आयोग लेखे व वाणिज्य लेखे एकाच वेळी ठेवणे शक्य होणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये दुहेरी नोंद लेखांकन अवलंबिण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. परंतु तेथेही पूर्ण उपर्जित तत्वावर लेखांकन आणणे शक्य झालेले नाही. या मंडळाला शासनाकडून अनुदान व कर्ज मिळते. उपर्जित तत्वानुसार लेखे ठेवण्याच्या दृष्टीकोनातून वाटचाल सुरु आहे.

याबाबत समितीने साक्षीचे वेळी महालेखाकारांना मत व्यक्त करण्यास सांगितले असता महालेखाकार यांनी असे मत व्यक्त केले की, आमचे मूळ आक्षेप लेखा पध्दतीबाबत असून जर त्यांनी पध्दत उपयोगात आणली तर ते सर्वांनाच सोयीचे हाईल. त्यावर सचिवांनी असा खुलासा केला की, We had done lot of correspondence with the Office of the Comptroller and Auditor General. They say that instead of following Cash Basis accounting pattern. You follow Accrual Basis Accounting Pattern. Commercial organzations follow Accrual Basis Accounting Pattern. Maharashtra State Khadi and Village industries Board is not a commercial organization. However, Board had started some commercial units in july, 2010. The Central Government has isued a Notification that they will keep Receipts and Payments Account and we will have to keep Income and Expenditure

Account. We are now going to apply this accounting procedure from 2010-11. It is not possible to change accounting procedure for earlier Accounts.

मंडळामार्फत बचत गट व बारा बलुतेदार यांना मदत केली जाते. त्या मागील उद्देश असा आहे की, त्यातून किती टक्के वसूली होते किंवा तुम्हाला काय अपेक्षित आहे अशी समितीने विचारणा केली असता सचिवांनी खुलासा केला की, वसुली अपेक्षित आहे. काही वर्षांमध्ये चांगली वसुली झालेली आहे. परंतु तरीही सरासरी २५ टक्क्यापेक्षा जास्त वसुली होत नाही.

मंडळाचा उद्देश असा होता की, राज्यात खादी व ग्रामोद्योग सुरु करणे व त्यासाठी प्रोत्साहन देणे, मदत करणे व विविध योजना राबविणे, संस्था, सहकारी संस्था व व्यक्तिगत उद्योजकांना कर्ज वाटप करणे तसेच इतर वित्तीय स्वरुपात मदत करणे, सहकारी सोसायटयांच्या स्थापनेस प्रोत्साहन देणे, लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे, कच्चा माल, हत्यारे व अवजारे पुरवठयाची व्यवस्था करणे, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था करणे. राज्यामध्ये एखाद्या जिल्ह्यामध्ये खादी ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून किती गावातील लोकांना स्वयंरोजगार मिळाला आहे, तसेच किती उद्योगधंदे सुरु केले आहेत, किती लोकांना हत्यारे दिली आहेत, यासंदर्भात मंडळ समाधानी आहे काय ? असा समितीने प्रश्न केला असता त्याबाबत मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी समाधानकारक खुलासा करुन शकले नाही.

समितीने विचारणा केली की, कोणतेही आर्थिक विकास महामंडळ असो, या महामंडळांकडून जे लाभार्थी कर्ज घेतात, त्यांची कर्जाची परतफेड न करण्याची प्रवृत्ती असते असे मत व्यक्त करुन समितीने अशी विचारणा केली की, याबाबत खादी ग्रामोद्योग मंडळाचा काय अनुभव आहे. यावर मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, ही प्रवृत्ती लाभार्थ्यामध्ये सर्वत्रच दिसून येते. ग्रामीण भागामध्ये ज्यांनी कर्ज घेतलेले आहे त्यांच्याकडून कर्ज माफ करण्याची मागणी केली जाते. त्यावर समितीने असे मत प्रदर्शित केले की, त्यांचे कर्ज माफ करण्यास हरकत नाही. ही रक्कम कोटीमध्ये फार मोठी अशी नाही. कारण या लाभार्थ्यांना नाममात्र रुपये १० हजार १५ हजार एवढे कर्ज दिले जाते. त्यातून त्यांना चांगला अनुभव मिळतो. लाभार्थी प्रशिक्षण घेत असतील, तर कालांतराने त्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता येते. याबाबत मंडळाचे अनुभव काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता याबाबत मंडळाचे कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, केंद्र सरकारची ही योजना आहे. या योजनेच्या माध्यमातून ज्या उद्योजकांनी उद्योग युनिट सुरु केले होते. त्यांच्या यशाचे प्रमाण चांगला आहे. औरंगाबाद येथे १०० उद्योजकांना त्यांच्या उत्पादनासहीत प्रदर्शनासाठी बोलविले होते. तेव्हा त्यांची उत्पादने खरोखरच चांगली असल्याचे दिसून आले. ३,७०,२०४ औद्योगिक युनिटसना आर्थिक सहाय्य दिलेले आहे, त्यापैकी २,७४,३०५ युनिटस चालू आहेत व हे प्रमाण ७५ टक्के आहे. त्यातून ९३६६०.८६ लाख इतके उत्पन्न मिळालेले आहे. काही ठिकाणी रक्कम कमी मिळते, त्यामुळे उद्योजकांना यश मिळत नाही. परंतु एकूणच विचार करता बऱ्याचशा उद्योजकांना या मंडळाच्या माध्यमातून फायदा झालेला आहे.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाकडे एकूण कर्मचारी वर्ग किती आहे, त्यांच्या पगारावर किती खर्च होतो, तसेच मंडळाचे अंदाजपत्रक किती रकमेचे आहे, या समितीच्या मुद्यांबाबत सचिवांनी

खुलासा केला की, एकूण १,२३६ कर्मचारी असून त्यांच्या पगारावर वार्षिक २५ कोटी एवढा खर्च होतो. राज्य सरकार व केव्हीआयसीकडून अनुदान मिळते. मागील वर्षी ३२ कोटी मिळाले होते. त्यापैकी राज्य सरकारकडून २६ कोटी रुपये इतका निधी प्राप्त झाला होता. शासनाकडून मिळालेला निधी पगार व आस्थापनेवर खर्च होतो आणि केव्हीआयसीकडून जो निधी मिळतो, तो जास्तीत जास्त योजनांवर खर्च होतो. राज्य व केंद्र सरकारकडून मिळणारा निधी पगाराच्या व्यतिरिक्त इतर बाबींवर खर्च होतो का, प्रशिक्षण देणे, पध्दती विकसीत करणे, रोजगार देणे यावर खर्च केला जातो का या मुद्दयांवर सचिवांनी खुलासा करतांना असे सांगितले की, मागील २-३ वर्षांची यासंबंधीची आकडेवारी वेगवेगळी आहे. सन २००६-०७ मध्ये ११.३६ कोटी इतका निधी प्राप्त झाला होता. सन २००७-०८ मध्ये १६.२० कोटी आणि सन २००८-०९ मध्ये ७९ लाख इतका निधी प्राप्त झाला होता. त्यावर्षी ग्रामीण रोजगार अनुदान कार्यक्रम योजना बंद करण्यात आली, त्याऐवजी पंतप्रधान रोजगार अनुदान कार्यक्रम योजना सुरु करण्यात आली होती.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि खादी व ग्रामोद्योग आयोग यांचे जाळे नेटवर्क तालुका पातळीपर्यंत पसरलेले आहे. त्यांचा कर्मचारी वर्ग, कार्यालये, दुकाने व मालमत्ता सर्वत्र पसरलेली असतांनाही तालुका पातळीवरील प्रत्येक लाभार्थ्याला यामधील सर्व योजनांचा प्रत्यक्ष लाभ होतो का? या योजनांच्या माध्यमातून कर्ज वाटप करण्याकरिता एखाद्या खाजगी संस्थेचा उपयोग होऊ शकतो. हे सर्व असतांना ज्या पध्दतीने या मंडळाचा तसेच, आयोगाचा प्रसार आणि प्रचार होऊन लाभार्थ्यांना लाभ होणे अपेक्षित आहे, त्या पध्दतीने तो होत नाही. तसेच खादी व ग्रामोद्योग मंडळ, खादी व ग्रामोद्योग आयोग या दोघांचे एवढे जाळे नेटवर्किंग आणि पायाभूत सुविधा असतांना जे उत्पादन तयार होते, त्याची विक्री निरनिराळया दुकानामधून होत असते. तसेच, यामध्ये एकूण १२३६ कर्मचारीही काम करीत आहेत. ही कर्मचा-यांची संख्या मोठी आहे. दरवर्षी पाच ते दहा उद्योजकांना, कारागीरांना आणि लाभार्थ्यांना यातून लाभ मिळून स्वयंरोजगाराचा लाभ त्यांना होतो का ? या मंडळाची व्याप्ती एवढी मोठी आहे की, उद्योजक आणि कारागीर मिळून एकूण १० ते १२ हजार लोकांचा तरी यामध्ये सहभाग नजीकच्या भविष्यकाळामध्ये अपेक्षित आहे असे समितीने मत व्यक्त केले. त्यावर सचिवांनी असा खुलासा केला की, सुरुवातीच्या काळापासून ते आतापर्यंत जिल्हानिहाय एकूण लाभार्थ्यांची सरासरी संख्या ३,७०,००० एवढी आहे.

उद्योजकांना खादी ग्रामोद्योग मंडळामध्ये येऊन अर्थसहाय्य मिळते, म्हणून ते उद्योजक तुमच्याकडे धावून येतात. परंतु या मंडळाचे मुख्य उद्दीष्ट ग्रामीण भागांत उद्योग वाढविणे हे असून ते उद्दीष्ट पूर्ण होणे, अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये ग्रामीण भागातील कारागीरांना मदत करुन, प्रशिक्षण देऊन त्यांच्या कलेला वाव देऊन त्यांना या योजनांच्या माध्यमातून स्वयंरोजगार मिळवून देणे हेही एक उद्दीष्ट आहे. हे उद्दीष्ट पूर्ण होत आहे का, असे समितीने विचारले असता सचिवांनी खुलासा केला की, या योजनांच्या अंतर्गत खादी व ग्रामोद्योग मंडळ बारा बलुतेदारांच्या मिळून अशा एकूण ३११ सोसायटया तालुक्या पातळीवर स्थापन केलेल्या आहेत. या सोसायटयांच्या माध्यमातून तालुक्यातील गावांगावांमधील कारागीरांना प्रशिक्षण आणि लाभ मिळवून देण्याचे काम या सोसायटया करीत असतात.

या खादी ग्रामोद्योग चळवळीमध्ये ग्रामीण भागातील उद्योगधंद्यामधील हक्काने व सहज करता येण्यासारखे अनेक उद्योग आहेत. ज्यामधून स्वयंरोजगार प्राप्त होऊ शकतो. या सर्वांची दखल घेऊन ग्रामीण पातळीवर स्वयंरोजगार वाढविण्याचा प्रयत्न मंडळाने केलेला आहे का ? खादी ग्रामोद्योगाला प्रोत्साहन मिळण्याकरिता मंडळ अर्थसहाय्य देते. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेमध्ये अजूनही पंरपरागत उद्योगधंद्यांना महत्व आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था अजूनही परंपरागत कुटीरोद्योग, ग्रामोद्योग यावर अवलंबून आहे. या खादी ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून ग्रामोद्योगांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न होत आहे का, या समितीने विचारलेल्या प्रश्नांवर माहिती देताना सचिवांनी असा खुलासा केला की, खादी ग्रामोद्योग मंडळाचे दुकाने उत्पादन घटक तालुका निहाय पातळीवर सुरु करण्यासाठी शासनाची परवानगी मिळालेली आहे. त्यामुळे खादी ग्रामोद्योग मंडळाचे अनेक केंद्र व दुकाने तालुका पातळीवर उभारण्यात आलेले आहेत. यामधून अनेक कारागीरांना प्रशिक्षण देऊन लाभांश देऊन त्यांना स्वयंरोजगार प्राप्त करुन देण्याचा स्तुत्य उपक्रम मंडळाच्या माध्यमातून होत आहे. या केंद्रामधून निर्माण होणा-या उत्पादनाची किंमत आणि विक्रीची किंमत यामधील जो फरक आहे, तो कारागीरांना व लाभार्थ्यांना देण्यात येतो. १४,०४२ युनिट्संना ९,८१,७७६.५३ कोटी रुपये सरासरी उत्पादन आहे. आता त्याची उलाढाल ७६ वरुन ९५ कोटीपर्यंत गेलेली आहे. तसेच खादी ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुढे असा खुलासा केला की, मधमाशी पालन केंद्रे आणि मध उत्पादन केंद्रे महाराष्ट्रामध्ये एकूण ९३ असून त्यांचे उत्पादन ३५ हजार किलोग्रॅम इतके आहे.

खादी व ग्रामोद्योग मंडळ आणि खादी व ग्रामोद्योग आयोग या परस्पर पूरक संस्था आहेत. खादी ग्रामोद्योग उद्योगाला काही प्रमाणामध्ये खादी व ग्रामोद्योग मंडळा कडूनही पैसा मिळतो. प्रत्येक जिल्हयामध्ये तालुका पातळीवर खादी व ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून निरनिराळया योजना राबविल्या जातात. या योजनांच्या माध्यमातून कारागीरांना आणि निरनिराळया बलुतेदार उद्योगांना नवीन व्यासपीठ मिळून स्वयंरोजगार मिळतो. तसेच, लाभार्थ्यांना लाभ मिळून ते स्वतःच्या पायावर उभे राहू शकतात. बारा बलुतेदारांच्या राज्यभरामध्ये एकूण ३११ सोसायटया स्थापन करण्यात आल्या असून या सोसायटयांकडे अर्ज करणा-या अर्जदारांना राष्ट्रीयीकृत बँकांकडून किंवा सहकारी बँकाकडून अत्यल्प व्याज दराने कर्जही देण्यात येते. खादी व ग्रामोद्योग मंडळ अशा अनेक प्रकारच्या कर्जवाटपाच्या योजना राष्ट्रीयीकृत बँकांच्या माध्यमातून लाभार्थ्यांकरिता स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्याकरीता राबविते. ज्या ठिकाणी स्थलांतराचे प्रमाण वाढते, उदरनिर्वाहाकरिता व रोजगाराकरिता ग्रामीण भागातून लोक शहराकडे स्थलांतर करु पाहतात. त्यांना अत्यल्प दराने कर्जवाटप, भांडवल उभारणीकरीता अर्ध सहाय्य अशा प्रकारच्या अनेक योजना राबवून शहराकडे होणारे ग्रामीण भागातील लोकांचे स्थलांतर कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. खादी ग्रामोद्योग राबविलेल्या योजनांच्या माध्यमातून लाभार्थ्यांचे एकूण ७५ केंद्र चालू अवस्थेत असून त्यामधून मोठया प्रमाणावर उत्पादन होत आहे. तसेच, हातकागद संस्थेला United National Development Programme अनुदानातून खादी आयोगाकडून २९.६६ लाख रुपये मदत प्राप्त झाली होती. त्यापैकी रु.२१.४३ लाखाची यंत्रसामग्री खरेदी केली. हात कागद संस्था, पुणे येथे संशोधन व प्रशिक्षण विभाग, तसेच उत्पादन विभाग कार्यरत असून, हे दोन स्वतंत्र विभाग आहेत. संशोधन व प्रशिक्षण विभाग सर्वसाधारण योजनेखाली येतो. तर उत्पादन विभाग हा मंडळाच्या स्वतःच्या मालकीचा आहे.

मध प्रक्रिया केंद्रांसाठी केलेले २.४९ लाखांचे केलेले बांधकाम स्थावर मालमत्तेमध्ये न दर्शविल्यामुळे तेवढया प्रमाणात स्थावर मालमत्ता कमी दिसून येते. मध केंद्रासाठी सर्वसाधारण योजनेचे मंडळाच्या जागेवर रु.२.४९ लाखाचे बांधकाम करण्यात आलेले आहे. त्याची नोंद सन २००६-२००७ च्या स्थावर मालमत्तेत घेतलेली आहे. खादी ग्रामोद्योग आयोगाच्या माध्यमातून महाबळेश्वर येथील मधमाशी पालन संस्था आणि मध उत्पादन संस्थानाही निधी पुरविला जातो. "मध माशी पालन संस्था" केंद्रांमध्ये सुरुवातीला मधमाशा पालन करण्याकरिता राज्याच्या अर्थसंकल्पातून निधी प्राप्त होतोच, परंतु खादी ग्रामोद्योग आयोगाकडूनही अशा प्रकारचा स्वयंरोजगार आणि रोजगार निर्माण करण्याकरिता निधी मिळतो. सुरुवातीलाच या मधमाशी पालन केंद्र व उत्पादन केंद्राच्या माध्यमातून वर्षाचे सरासरी उत्पादन १७ ते २० लाखापर्यंत गेले होते. उत्पादन केंद्र हे खादी व ग्रामोद्योग मंडळ असल्यामुळे त्यातील काही भाग खादी व ग्रामोद्योग मंडळाला प्राप्त झाला होता. मधमाशा पालनकेंद्रातील मध हे शुध्द व चांगल्या प्रतीचे असते. इतरत्र जे मध उत्पादन केंद्रातील मध बायोटेक्नॉलॉजीचा वापर करुन निर्माण केलेले असते. आणि ही वस्तुस्थिती आहे की, सबंध राज्यातून विशेषत: वन विभागामध्ये मधमाशी पालन आणि मध संकलनासाठी मोठया प्रमाणावर वाव आहे. मागील वर्षापासून यासंबंधीची एक योजना तयार करण्यात येत आहे. तसेच नियोजन विभागाने एप्रिल, २०१० मध्ये याबाबत एक शासन निर्णय देखील निर्गमित केला असून सर्व मध संकलन आणि मधमाशी पालनाच्या संदर्भात जे काम सुरु आहे, ते पाहून खादी ग्रामोद्योग मंडळालाच मध्यवर्ती संस्था म्हणून हे काम द्यावयाचे आहे असे ठरले.

समितीने अशी विचारणा केली की, खादी ग्रामोद्योग मंडळातर्फे ज्या योजना राबविल्या जातात त्या संपूर्ण ग्रामीण भागातच आहेत काय, तसेच आता १२ बलुतेदारांची व्याख्या जरा समजावून सांगावी व त्यांची यादी समितीला देण्याबाबत अशी मागणी केली असता प्रधान सचिव, उद्योग यांनी खुलासा केला की, पूर्वी १२ बलुतेदारांची जी संकल्पना होती त्याची व्याप्ती आता वाढलेली असून खादी ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात आता ११० ते १२० उद्योग चालू आहेत. त्यामुळे या बलुतेदारांची जी संकल्पना होती, त्या जुन्या संकल्पनेचाही यामध्ये समावेश होतो, आता मात्र त्यांची व्याप्ती वाढलेली आहे. जवळपास ११४ लघु उद्योग घोषित झालेले आहेत. या उद्योगाला शहरात वाव नसतो अशा छोटया धंद्यांना देखील आता उद्योग म्हणून मान्यता दिलेली आहे. बलुतेदारांमध्ये पूर्वी जे तेल गाळणारे होते, त्यांना ग्रामीण तेली, चर्मकार लोकांचा उद्योग असलेल्यांना चर्मकार, ताडगोळे, नीरा, सुतार, लोहार, चुनखडी, खादी वेत व बांबू, न्हावी अशा लोकांचा किंवा उद्योगांचा समावेश होतो. नाशिक जिल्हयामध्ये आदिवासी उपयोजनेचे एकूण ८ तालुके असून जिल्हयाची एकूण लोकसंख्या जवळपास १५ लाखाच्या आसपास आहे या भागात लघु उद्योग कोणकोणते आहेत या प्रश्नावर खादी ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, नाशिक जिल्हयातील ६ तालुक्यामध्ये ११ गावांत मध उद्योग सुरु असून एकूण ५९ युनिट्स आहेत. उद्योग न करणारे ६६६ युनिट्स आहेत या ११ गावांमध्ये एकूण मधाचे उत्पादन १३० किलो झाले आहे तसेच यावर्षी यासंबंधीची जाहिरात दिली असून त्या माध्यमातून आणखी ३० च्या आसपास लोक हा व्यवसाय करण्यास तयार झालेले आहेत. तालुकानिहाय माहिती समितीला देण्याचे आश्वासन देवून सुध्दा अद्याप उद्योग विभागाकडून समितीला माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

नाशिक जिल्हयात एकंदर १७२९३ इतक्या केद्रांना मदत केली असून १३८८३ युनिट सध्या कार्यरत आहेत त्यांचा उत्पादन खर्च ६६० असून ९९.६८ कोटी जवळपास खर्च झालेला आहे व ३१५६५ लोकांना रोजगार मिळाला आहे व त्यामधून २३ कोटीचे उत्पन्न मिळाले आहे. समितीने अशी विचारणा केली की, पूर्व विदर्भात धान उत्पादन मोठया प्रमाणात होते. त्या धानावर प्रक्रिया करण्यासाठी ग्रामोद्योग मंडळामार्फत एखादी खास योजना आहे काय ? खादी ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्याबाबत असा खुलासा केला की, सध्याच्या परिस्थितीत सुध्दा तालुका स्तरावर खादी ग्रामोद्योग आयोगाकडून पंतप्रधान रोजगार अनुदान कार्यक्रम योजना राबविली जाते. त्यामध्ये अशा छोटया उद्योजकांना अर्थसहाय्य दिले जाते. त्यात प्रामख्याने १५ ते ३५ टक्कयापर्यंत अनुदान दिले जाते, बाकीचे त्या उद्योजकाचे पत व सहभाग ५ ते १० टक्के अशी पध्दत आहे. ज्यांनी अर्ज केले, त्यांना राष्ट्रीयीकृत बँकेमार्फत मदत केली जाते. हे कर्ज वैयक्तिक दिले जात नाही तर युनिटसाठी देण्यात येते. मायक्रो युनिटची व्याख्या अशी आहे की, २५ लाखापर्यंत ही मदत दिली जाते मग केद्रांमध्ये कितीही लोक असले तरी तो लघु उद्योग म्हटला जातो. तसेच अशा उद्योगांना खादी ग्रामोद्योग मंडळाशिवाय शासनाच्या कार्यक्रमामधून देखील लाभ दिला जातो. असाही सचिवांनी खुलासा केला. समितीने अशी विचारणा केली की, ग्लोबल वॉर्मिंगमुळे भविष्यात जे संकट येऊ घातले आहे त्याचा विचार करता प्लास्टीकच्या पिशव्यांचा वापर बंद करुन कागदाच्या पिशव्या तयार करण्याचे काम महापालिकेच्या माध्यमातून सुरु करण्यात आले आहे अशा प्रकारचा उद्योग हा बचत गटांच्या माध्यमातून सुध्या सुरु आहे. परंतु त्यांच्यासाठी निधीचा पुरवठा करण्याची एकही योजना अस्तित्वात नाही. तसेच मोठया प्रमाणात मागणी घेण्यासाठी त्यांना खादी ग्रामोद्योग मंडळ अथवा खादी ग्रामोद्योग आयोग अथवा राज्यशासनाच्या एखाद्या योजनेतून सहकार्य करता येईल काय, यावर सचिवांनी खुलासा केला की, पंतप्रधान रोजगार अनुदान कार्यक्रमा मार्फत अशा बचत गटांना संघटीत केले तर अशा उद्योगासाठी मदत मिळू शकेल. पुण्यामध्ये अशा प्रकारे वर्तमानपत्रांच्या सहाय्याने कागदांच्या पिशव्या बनविण्याचे प्रशिक्षण जवळपास ८४ लोकांना दिले आहे. तेथून प्रशिक्षण घेतल्यानंतर ते स्वतःचे उत्पादन करतात. त्यात बचत गटाचे सुध्दा काही लोक होते.

समितीने अशी विचारणा केली की, बचत गटांच्या माध्यमातून जरी हे काम सुरु केले असले तरी एखाद्या मोठ्या मॉलची मागणी घेतली तरी त्यांना २ लाख ते ४ लाख पिशव्या पाहिजे असतात. एवढया मोठया प्रमाणात मागणीची पूर्तता करण्यासाठी त्यांच्याकडे मनुष्यबळ असते पण पैसे नसतात. त्यामुळे ते हा पुरवठा करु शकत नाही. त्यासाठी मंडळ काही करु शकते काय ? खादी ग्रामोद्योग मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत असा खुलासा केला की, अशा बचत गटांना दोन योजनांच्या माध्यमातून मदत करता येईल. पिंपरी चिंचवड परिसरात महापालिकेने अशा बचत गटांना १० लाख रुपये दिले. १५ लाख रुपये केंद्रशासनाकडून आणि १० लाख रुपये बँकेकडून कर्ज दिले. तसेच १५ लाख महिला बचत गटांचे स्वतःचे असे एकूण ५० लाखाचे भांडवल जमा करुन एक मशीन आणली एवढा खर्च करुन अशा पिशव्या बनविण्याचे काम शासनाने कोणाला दिले, पण या मध्ये महिला बचत गटांनी जे काम केले त्याचे प्रदान मात्र अद्यापही मिळत नाही म्हणून हे काम कोणाकडे आहे, त्याबाबत पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आयुक्तांनीही काही सांगता आले नाही. शासनाने हे काम कोणाला दिले आहे हे सुध्दा समजत नाही. यासंबंधीची माहीती घेऊन

महिला बचत गटांनी जे काम केले त्या कामाचा मोबदला ताबडतोब त्यांना देण्यात यावा अशी समितीने सूचना केली असता सचिवांनी असा खुलासा केला की, या दोन-तीन समांतर योजना आहेत त्यासाठी बँकेकडून कर्ज मिळते, महापालिकेचा हिस्साही त्यात असतो तसेच बचत गटांचा काही भाग त्यात असतो अशीही एक योजना आहे. दुसरी योजना म्हणजे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या माध्यमातून देखील अशा प्रकारचा आकृतीबंध अस्तित्वात आहे. त्याचबरोबर पंतप्रधान रोजगार अनुदान कार्यक्रम योजनेतून देखील असाच आकृतीबंध आहे. या योजनेची माहिती पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या आयुक्तांकडून स्वतंत्रपणे घेण्यात येईल.

खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत जे जे उद्योग चालतात त्यांची उभारणी जिल्हयाच्या ठिकाणी केली तर उद्योगांमार्फत तयार होणाऱ्या मालाला चांगला बाजार मिळू शकेल अशी संकल्पना होती. परंतू अजूनही त्या दृष्टीने काही प्रयत्न सुरु असल्याचे दिसत नाहीत प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारचे बाजार उभारण्यासंबंधीचा निर्णय ग्रामविकास विभागाने घेतलेला आहे. या समितीने उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत प्रधान सचिव, उद्योग यांनी खुलासा केला की ग्रामविकास विभागाकडे जिल्हा स्तरावर जी यंत्रणा आहे, ती फार मोठी आहे. तसेच त्यांच्याकडे अगोदरच अनेक योजना असल्याने त्यांना ते शक्य होईल आणि भरपूर बाजारभाव सुध्दा मिळू शकेल. याबाबतची वस्तुस्थिती अशी आहे की, शासकीय यंत्रणेसाठी काही वस्तुंची आवश्यकता असेल तर विशेषत: हस्त बनावटीच्या पिशव्या असतील, त्या मग कुठल्याही शासकीय अथवा निमशासकीय विभागाला कार्यालयाला खरेदी करावयाच्या असतील तर त्या खादी ग्रामोद्योग मंडळाकडून खरेदी कराव्यात तसेच ग्रामविकास विभागाने यांसबंधीचा निर्णय घेतल्याचा उल्लेख केला. त्या अनुषंगाने आपल्याला जिल्हा स्तरावर विपणनासाठी ग्रामविकास विभागाशी समजोता करता येईल. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, खादी ग्रामोद्योग मंडळाकडे पाहिजे तेवढे लक्ष दिलेले दिसत नाही. कारण या मंडळाचा पाहिजे तसा विकास झालेला नाही. तसेच उद्योगात ज्या प्रमाणात वाढ झाली पाहिजे, त्या प्रमाणात ती झालेली दिसत नाही. मंडळाचा मूळ उद्देश ग्रामीण तसेच शहरी भागात बेरोजगारांना व्यवसायाच्या माध्यामातून रोजगार/व्यवसाय पुरविणे असा आहे. त्याकरिता त्यांना राज्य व केंद्र शासनाकडून अनुदान मिळते. परंतु त्याचा योग्य वापर मंडळाने केला नसल्याचे समितीला दिसून आलेले आहे. समितीने अशी विचारणा केली की, मुंबई शहराला लागूनच जी गावे आहेत, त्या गावांमध्ये अनेक उद्योजक/लोक उद्योग करायला तयार आहेत. तसेच अनेक शहरे अशी आहेत की, ज्यांच्या आजूबाजूला ग्रामीण भाग आहे, तेथील लोक देखील करायला तयार आहेत. याबाबत सचिवांनी खुलासा केला की, यामध्ये मुख्य योजना जी आहे, ती म्हणजे पंतप्रधान रोजगार अनुदान योजना आणि त्यातून जिल्हा उद्योगकेंद्र आणि खादी व ग्रामोद्योग मंडळ अशा दोन योजना सुध्दा आहेत. त्यापैकी जिल्हा उद्योग केंद्रे च्या माध्यमातून आपल्याला अशा उद्योगांसाठी मदत मिळू शकेल. कारण ज्या भागात खादी व ग्रामोद्योग मंडळ मदत देऊ शकत नाही तेथे जिल्हा उद्योग केंद्र मार्फत मदत करता येते.

राज्य स्तरावर या मंडळाचे कार्यकारी मंडळ आहे काय, या समितीच्या प्रश्नाला उत्तर देतांना प्रधान सचिव, उद्योग यांनी असा खुलासा केला की, या मंडळामध्ये अशासकीय व्यक्तींची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात येते. बाकी या मंडळात सर्व शासकीय अधिकारी आहेत, तसेच महिला आर्थिक विकास महामंडळाचे

व्यवस्थापकीय संचालक हे समाजकल्याण विभागाचे आहेत. मागील कार्यकाळातील एकूण ४ प्रतिनीधी आहेत. सध्या मंडळाचे लोकनियुक्त मंडळ नाही.

समितीने साक्षीच्यावेळी अनुत्तरीत राहिलेल्या प्रश्नांबाबत प्रश्नावली विभागाकडे पाठविली असता विभागाने प्रश्नावलीच्या अनुषंगाने खालील प्रमाणे माहिती सादर केली आहे.

सन १९९६-९७

परिच्छेद क्र.५.२ :- मंडळाची हातकागद केंद्रे, अमरावती व परभणी ही निर्लेखित करणेबाबतच्या निर्णयाची सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागाने खुलासा केला की, मंडळाची उपरोक्त दोन्ही केंद्र ही तोटयात चालत असल्याने ती नोव्हेंबर, १९९७ पासून बंद करण्याबातचा निर्णय मंडळाने घेतला होता. मात्र सदरची केंद्रे निर्लेखित करुन त्यांचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये विलीन करण्याबाबत मंडळाने अद्याप निर्णय घेतलेला नाही. शासनाने मंडळावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती केल्यानंतर लवकरात लवकर निर्णय घेण्याबाबतची कार्यवाही मंडळाकडून करण्यात येईल.

सन १९९७-९८

परिच्छेद क्र.५.३ :- मंडळाच्या दिनांक ८-५-२०१० रोजीच्या पत्रान्वये व्याज उपदानाचे खादी आयोगास पाठविलेल्या दावा बाबतची सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस खुलासा केला की, परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या पत्राची तारीख ८-५-२०१० नसून ८-५-२००० ही आहे. सन २००७-०८ व २००८-०९ च्या अंदाजपत्रकामध्ये रु.११,९९,००,०००/- रक्कमेची मागणी मंडळाने खादी आयोगाकडे केली आहे. **(परिशिष्ट)-१** प्रत्येक वर्षाच्या अंदाजपत्रकाच्या चर्चेच्या वेळी या विषयावर खादी आयोगाबरोबर चर्चा करण्यांत आली आहे. तसेच खादी आयोगाने अद्याप मंडळास निधी उपलब्ध करुन दिलेला नाही.

परिच्छेद क्र.५.३.४ :- पणन विभागाच्या लेख्यांमध्ये मंडळाने सन १९९८-९९ मध्ये म्हणजे उशिराने समाविष्ट करण्यांची कारणे काय अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस खुलासा केला की, जिल्हा कार्यालयातील पणन विभागाचे लेखे अमरावती, औरंगाबाद, नागपूर व वर्धा हे जिल्हे वगळता मुख्य कार्यालयाच्या लेख्यांमध्ये सन १९९७-९८ या वर्षीच समाविष्ट करण्यांत आले आहेत. मात्र हया चार जिल्हयांचे लेखे उशिरा प्राप्त झाल्याने सदर लेखे सन १९९८ -९९ मध्ये मंडळाच्या लेख्यांमध्ये समाविष्ट केले गेले आहेत.

सन १९९८-९९

परिच्छेद क्र.५.१ :- खादी ग्रामोद्योग मंडळाकडून ३६ उद्योगांना कर्ज दिलेले आहे. नियमित व्याजाव्यतिरिक्त ५ टक्के दंडव्याज वसुल करणे क्रमप्राप्त असतांना ते न करण्याची कारणे काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीला असा खुलासा केला की, खादी आयोगाच्या निर्देशानुसार योजने अंतर्गत कारागिरांना देण्यांत आलेल्या कर्जावर दंडव्याज आकारण्यांत येत होते. कर्जाची वसुली

करताना व्याज व दंडव्याजासहीत कर्जाची वसुली करण्यांत येत होती. मात्र मंडळाचे लेखे रोख तत्वावर ठेवण्यांत येत असल्यामुळे येणे व्याज व दंडव्याज मंडळाच्या लेख्यात दर्शविण्यांत येत नाही.

सर्वसाधारण योजनेअंतर्गत खादी आयोगाने जा.क्र. फायनान्स/पॉलिसी०१/२२०२-०३, दि.२८-२-२००३ च्या परिपत्रकान्वये दंडव्याज माफ करण्यांबाबत मंडळास अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार थकीत कर्जदाराने मुद्दल व सरळव्याजाची रक्कम जर एक रकमी भरली असेल, तर अशा प्रकरणी मंडळाकडून दंडव्याज माफ केले जाते.

परिच्छेद क्र.५.२.४ :- अंबर चरखा केंद्राच्या संदर्भात मंडळाच्या सन १९९८-९९ च्या लेखा परीक्षण अहवालामध्ये चूक झाल्याचे लेखापालांनी लक्षात आणून दिल्यानंतर मंडळाने चरखा केंद्रांचे लेखे सन २००१-०२ मध्ये मंडळाच्या लेख्यामध्ये घेतले, तो पर्यंत सदर रक्कम लेख्याशिवाय बाजूला पडून राहिल्याबाबत झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ? अशी किती रक्कम होती व ती बाजूला ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यांत आली, तसेच याची माहिती सन २००८-०९ च्या ज्ञापनात विलंबाने घेण्याची कारणे काय आहेत. अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीला असा खुलासा केला की, अंबर चरख्यांच्या रक्कमांचे लेखांकन मंडळाच्या लेख्यांमध्ये सन १९९०-९१ पासून नियमितपणे केले जात होते व कोणतीही रक्कम लेख्यांशिवाय बाजूला पडून ठेवण्यात आली नव्हती. सन १९९०-९१ ते १९९८-९९ च्या ताळेबंद-पत्रकाची छायाप्रत सोबत सादर करीत आहोत. **(परिशिष्ट-२)** महालेखापालांचा मूळ आक्षेप प्रत्येक अंबर चरखा केंद्राकडून तपशिलवार लेखे प्राप्त करुन घेऊन त्याचे एकत्रिकरण करण्याविषयी आहे. योजना बंद झाल्यावर केंद्रप्रमुखाच्या सेवा त्वरित खंडीत करण्यात आल्या. त्यांनी असहकाराची भुमिका घेतल्यामुळे तपशिलवार लेखे प्राप्त करुन घेण्यांस मंडळाला अडचणी निर्माण झाल्याने सदरचे लेखे जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांमार्फत पूर्ण करुन घेऊन मंडळाच्या लेख्यांत उशिराने समायोजित करण्यात आले.

परिच्छेद क्र.५.३.३ :- मुख्य मुद्दा खरेदी व विक्रीचे रजिस्टर नसतांना खरेदी व विक्रीच्या रकमा लेख्यांमध्ये कशा घेतल्या, याबाबतचा खुलासा समाधानकारक नसून खरेदी व विक्रीची नोंदवही न ठेवता सदर रक्कमा खात्रीदायक कशा असतात याचा खुलासा करण्याबाबत समितीने सांगितले असता विभागाने समितीस पुढीलप्रमाणे खुलासा केला की, महालेखापालांचा मूळ आक्षेप खरेदी व विक्रीच्या नोंदी अपूर्ण असल्याबद्दल होता. विक्रीच्या नोंदी पूर्ण करण्यात येऊन महालेखापालांना नंतरच्या लेखापरीक्षणाच्या वेळी दाखविण्यात आल्या आहेत. लेख्यांमध्ये खरेदी व विक्रीच्या रक्कमा खरेदी व विक्रीच्या नोंदवहीमध्ये ज्या मूळ कागदत्रांवरुन म्हणजेच मूळ पुरवठा आदेश व चलन यावरुन निश्चित करुन लेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

सन १९९९-२०००

परिच्छेद क्र.५.१०.१ :- मंडळाचे लेखे कायद्यातील तरतूदीनुसार ठेवलेले आहेत. तथापि जमा व खर्च लेखे, मंडळातील रोख व्यवहाराची संक्षिप्त माहिती दर्शवितात. तथापि मंडळाचे उत्पन्न व खर्चासंबंधीत प्राप्त होणारी रक्कम लेख्यामध्ये समाविष्ट करण्यांत येत नाही. त्यामुळे मंडळाच्या आर्थिक स्थितीचे सत्य व बिनचूक चित्र स्पष्ट होत नाही. याचा खुलासा करण्याबाबत समितीने सांगितले असता समितीस असा खुलासा

केला की, मंडळाचे लेखे मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० मधील नियम क्र.२५ (१) व त्यामध्ये नोव्हेंबर, १९७७ मधील दुरुस्तीच्या आधारे आयव्यय पध्दतीने (Cash Basis) ठेवले जातात. मात्र महालेखापालांशी सल्लामसलत करुन शासनाने दिनांक २८ जुलै २०१० च्या अधिसूचनेअन्वये मंडळाला उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र तसेच Significant Accounting Policy चा समावेश लेख्यांमध्ये करण्याचे निर्देश दिले आहेत.

मंडळाने जमा खतावणी आणि खर्च खतावणी दाखविण्यासाठी वेगवेगळया नोंदवहया ठेवलेल्या आहेत. सदर नोंदवहयांमध्ये वर्षभरात प्राप्त झालेल्या व खर्च झालेल्या रक्कमांचा समावेश आहे. तथापि सदर नोंदवहयांमध्ये आरंभीची व अखेरची शिल्लक काढून दाखविण्यांत आली नाही. त्यामुळे तक्त्यामध्ये दाखविण्यांत आलेली आरंभीची शिल्लक, अखेरची शिल्लक या रक्कमांच्या सत्यतेची पडताळणी करणे शक्य होत नाही. या महालेखापालांच्या आक्षेपांचा खुलासा करण्याबाबत समितीने सांगितले असता, विभागाने समितीस असा खुलासा केला की, मंडळाने जमा खतावणी आणि खर्च खतावणी मध्ये आरंभीची शिल्लक व अखेरची शिल्लक दर्शविण्यास सन २००८-२००९ या वर्षापासून सुरुवात केली आहे. तसेच लेख्यांमध्ये बदल करण्यासाठी सर्वसाधारण नोंदी घेण्यास सुरुवात केली आहे.

परिच्छेद क्र.५.२.४ :- संचालक, रेशिम यांच्याकडून येणे असलेल्या रक्कमाबाबत काय कार्यवाही करण्यांत आली. व त्याची सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात खुलासा केला की, महाराष्ट्र शासन, उद्योग, उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.सीएसबी/१०९४/(६१५३)/उद्योग-७ मंत्रालय, मुंबई-३२ दि.२७ ऑगस्ट, १९९७ च्या शासन निर्णयान्वये रेशीम उद्योगाची पदे व मालमत्ता मंडळाकडून शासनाच्या सहकार विभागाकडे वर्ग करण्यांबाबत नमूद करण्यांत आले आहे. त्यामध्ये असे स्पष्ट करण्यांत आले आहे की, रेशीम उद्योगाच्या विकासासाठी वेळोवेळी निर्माण करण्यात आलेली सर्व साधन साम्रुगी/सुविधा/सोयी/उपलब्ध निधी/अखर्चित रक्कम/जमा रक्कमा/वाहने इ. संबंधितांनी स्वतंत्र रेशीम संचालनालयाकडे वर्ग करण्यांची कार्यवाही परस्पर करावी. त्यामुळे मंडळाने "वाई" जि.सातारा येथील जागा रेशीम संचालनालयास (सहकार विभाग) वर्ग केली आहे. तसेच रेशीम उद्योगास असलेले दायित्व सुध्दा रेशीम संचालनालयाकडे वर्ग करण्यात आले आहे. रेशीम संचालनालयास मंडळाने वर्ग केलेली मालमत्ता ही शसनाच्या अनुदानातून निर्माण झाली असल्याने रेशीम संचालनालयाकडून येणे म्हणून दर्शविण्यात आलेली नाही.

परिच्छेद क्र.५.२.५ :- वसुलीमधून लाभधारकांना वाटप केलेली रुपये ११२.३४ लाख रक्कम खादी आयोगास परत करावयाच्या एकूण रु.५८०२.९५ लाख रकमेशी समायोजित करणे बरोबर नाही. या लेखापालांच्या अभिप्रायांबाबत खुलासा करण्याबाबत समितीने सांगितले असता विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात असा खुलासा केला की, महालेखापालांचा आक्षेप योग्य असून मंडळास त्याबाबत लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याबाबत शासनाने निर्देश दिले होते. त्यानुसार मंडळाने सन २००४-०५ च्या लेख्यांमध्ये योग्य ती दुरुस्ती केली आहे.

सन २००१-०२

मंडळाकडील उपलब्ध तपशीलानुसार २४-ब पुणे येथील जमिनीची किंमत रुपये १.३७ लाख इतकी असून ती लेख्यांमध्ये न दर्शविण्यांची कारणे काय आहेत व या जागेवर सद्य:स्थितीमध्ये कोणते बांधकाम करण्यांत आले आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, जमिनीच्या किंमतीचा रु.१.३७ लाख रकमेचा लेख्यांमध्ये समावेश करण्यांत आला नव्हता. मात्र सदर जमिनीची किंमत सन २००३-०४ च्या लेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. २४-ब पुणे येथे कार्यालयाच्या इमारती, वसतीगृह, गोदाम, तसेच प्रशिक्षण व संशोधन इमारत अशी चार बांधकामे आहेत.

मंडळाने मालमत्तेची नोंदवही अद्यायावत केल्याचे महालेखापालांना कळविण्यात आले आहे काय, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस सादर केलल्या लेखी ज्ञापनात असा खुलासा केला की, मंडळाने सन २००३-२००४ मध्ये मालमत्तेची नोंदवही अद्ययावत केली असून मंडळाचे लेखे तपासणीसाठी आलेल्या महालेखापाल यांच्या तपासणी पथकास ती दाखविण्यांत आली आहे.

सन २००१-०२ च्या लेख्यांची रक्कम दि.३१-३-२००८ अखेर निलंबन लेखा शीर्षाखाली रु.९.०३ लाख एवढी शिल्लक असून ही रक्कम एवढया उशिराने दाखविण्याची कारणे काय आहेत, अद्यापर्यंत या रकमेचे समायोजन का करण्यांत आले नाही, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात असा खुलासा केला की, ज्या रक्कमाच्या बाबतीत लेखा शिर्षाचा तपशिल उपलब्ध होत नाही अशा रक्कमा निलंबन लेखा शीर्षाखाली दर्शविणे भाग पडते. जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या वसुलीच्या रक्कमांमध्ये, काही वसुलीच्या रक्कमांच्या बाबतीत लेखा शीर्षाचा तपशिल उपलब्ध नसल्याने निलंबन लेखा शीर्षाखाली प्रलंबीत आहेत. सदरच्या रक्कमा या खूप जुन्या कालावधीच्या असल्याने त्यांचा तपशिल मिळण्यात मंडळाला अडचणी येत आहेत. तरीही सदर रक्कमा लवकरात लवकर समायोजित करण्यासंबंधी मंडळाला निर्देश देण्यात येत आहेत. दिनांक ३१-३-२०१० अखेर या शीर्षाखाली रु.८.९४ लाख इतकी रक्कम प्रलंबित आहे.

परिच्छेद क्र.५.२.२ :- मंडळाने कर वसुलीच्या नियमानुसार ९७ थकबाकी दारांवर व इतर थकबाकी-दारांवरही सक्तीच्या वसुलीची कारवाई दाखल केली आहे. याबाबत सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीला पुढीलप्रमाणे खुलासा केला की दिनांक ३१-३-२०१० अखेर मंडळाने १०,९९७ प्रकरणांमध्ये रु.२३९९.३६ लाख रक्कमेच्या वसुलीसाठी दाखल केल्या आहेत.

सन २००२-०३

परिच्छेद क्र.२.१.२ :- मंडळाच्या स्थापनेपासून म्हणजेच सन १९६२ पासून महाबळेश्वर येथील बंगला क्रमांक १, ४, व ५ ही मंडळाची मालमत्ता असून, मंडळाने सदर मालमत्तेची किंमत अद्याप ठरविलेली नाही. व लेख्यांमध्येसुध्दा ती दर्शविली नाही. मंडळाने सदर मालमत्तेची किंमत जिल्हाधिकारी किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून ठरवून घेवून ती लेख्यांमध्ये दर्शविण्यांची कार्यवाही अद्याप पूर्ण न करण्याची कारणे काय आहेत अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की,

महाबळेश्वर येथील मालमत्तेची नोंद लेख्यांत समाविष्ट करण्यासाठी मंडळाला निर्देश देण्यात आले असून मंडळामार्फत जिल्हाधिकारी कार्यालय व सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडे पत्रव्यवहार सुरु आहे. **(परिशिष्ट-३)**

सन २००३-२००४

परिच्छेद क्र.२.१.६ :- खुप जुनी तसलमात शिल्लक तपशिलाशिवाय लेख्यांमध्ये दर्शविण्यांची कारणे काय आहेत व त्याची सद्य:स्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, या रक्कमा खूप जुन्या म्हणजे १९९६ पासूनच्या असल्याने त्या रक्कमाचे समायोजन योग्य त्या शीर्षाखाली करण्यासाठी मंडळाला अडचणी उदभवत आहेत. तरीही त्याचा निपटारा लवकरात लवकर करावा असे निर्देश मंडळाला देण्यात येत आहेत. दिनांक ३१-३-२०१० अखेर या शीर्षाखाली रु.१.०९ लाख इतकी रक्कम प्रलंबीत आहे.

परिच्छेद क्र.४.१.१ :- सन २००८-०९ चे लेखे अंतिम करतेवळी संकीर्ण ऋणकोकडून येणे असलेली सेवा आकाराची रक्कम यापुढे पणन विभागाच्या लेख्यांमध्ये दर्शविण्याबाबत सद्य:स्थितीत मंडळाकडून अंमलबजावणी करण्यात येत आहे काय, असल्यास त्याबाबत समितीला सविस्तर माहिती देण्याबाबत समितीस सांगितले असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, सन २००८-०९ चे लेखे अंतिम करतेवळी संकीर्ण ऋणकोकडून येणे असलेली सेवा आकाराची रक्कम सद्यस्थितीत पणन विभागाच्या लेख्यांमध्ये दर्शविली जात आहे. सन २००८-०९ व सन २००९-१० या वर्षीच्या लेख्यांची छायाप्रत सोबत जोडली आहे. **(परिशिष्ट-४)**

सन २००४-०५

परिच्छेद क्र.२.२.२.२ :- मुदत ठेव शीर्षकामध्ये ज्या कालबाहय रक्कमा आहेत, त्याबाबतची योग्य ती तपासणी अद्याप का करण्यांत आली नाही व त्याची सद्य:स्थिती काय आहे अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, ज्या कालबाहय असलेल्या रक्कमा मंडळाकडून वित्तीय वर्षाच्या अखेरीस संकीर्ण जमा या शिर्षाखाली वर्ग करुन राखीव निधीत वर्ग करणे अपेक्षित होते. मात्र २००९-१० या वर्षापर्यंत वर्ग करणे मंडळाकडून राहून गेले होते. सदर रक्कमा २०१०-११ या आर्थिक वर्षात संकीर्ण जमा शीर्षाखाली वर्ग करण्यांत आल्या असून वर्षाच्या शेवटी त्या रकमा राखीव निधीकडे वर्ग करण्यात येतील.

सन २००५-२००६

परिच्छेद क्र.२.१.२ :- प्रलंबित देणी लेख्यांमध्ये दर्शविण्याबाबतची लेखांकनाची विशिष्ट पध्दती काय आहे ? अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की महाराष्ट्र राज्य खादी मंडळाचे लेखे हे दोन पध्दतीत ठेवले जातात १) खादी आयोग, तसेच राज्य सरकारकडून मिळणाऱ्या अनुदानाचे लेखे हे रोख तत्वावर ठेवले जातात. त्यामध्ये प्रलंबित येणी-देणी पध्दतीने दर्शविली जात नाही.

२) व्यापारी तत्वावर मंडळाने चालवलेल्या केंद्रांचे लेखे हे लेखांकन पध्दतीने (Accrual Basis) ठेवले जातात.

परिच्छेद क्र.२.२.१ :- रुपये ६.९३ लाख या रु.६.४७ लाख हे सन १९६२ पूर्वीच्या रक्कमा निर्लेखित करण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही करण्यात आली, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, ह्या रक्कमा निर्लेखित करण्याविषयी मंडळाकडून अद्यापही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. सदर रक्कमा निर्लेखित करण्यासंबंधी मंडळाला सूचना देण्यात आल्या आहेत.

परिच्छेद क्र.२.२.५ :- गुजरात खादी मंडळाशी संपर्क साधून रु.०.५१ लाख थकीत कर्ज वसुल करणेबाबत काय कार्यवाही करण्यांत आली अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीला असा खुलासा केला की, सदर रक्कम खूप जुन्या कालावधीची असून त्यासंबंधीची कागदपत्र उपलब्ध होण्यांस अडचणी निर्माण होत आहेत सदर रक्कम सुध्दा निर्लेखित करण्यासंबंधी मंडळाला सूचना देण्यात आल्या आहेत.

परिच्छेद क्र.२.२.६ :- सन १९९६-९७ पासून जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांकडे शिल्लक असलेल्या रु.१.१२ लाख तसलमतच्या थकीत रक्कमांबाबत काय कार्यवाही करण्यात आली, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, या रक्कमा खूप जुन्या म्हणजे सन १९९६ पासूनच्या असल्याने त्या रक्कमाचे समायोजन योग्य त्या शीर्षाखाली करण्यासाठी मंडळाला अडचणी उद्‌भवत आहेत. तरीही त्याचा निपटारा लवकरात लवकर करावा असे निर्देश मंडळाला देण्यात येत आहेत. दिनांक ३१-३-२०१० अखेरच्या शीर्षाखाली रु.१.०९ लाख इतकी रक्कम प्रलंबीत आहे.

परिच्छेद क्र.२.२.७ :- केंद्राच्या प्रमुखांनी ऋणकोकडून स्विकृती पत्र घेतली आहेत काय, त्याबाबत सद्य:स्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, मध संचालनालय, महाबळेश्वर, हातकागद संस्था, पुणे, सुतारी लोहारी कार्यशाळा, गोकुळ शिरगांव, कोल्हापूर ही खातेनिहाय केंद्रे दरवर्षी ऋणकोंच्या येणे रक्कमासंबंधी कळवतात व त्यांचा त्यांवर काही आक्षेप असल्यास ठराविक मुदतीत कळविण्यांस सांगतात. त्यांनी त्यामुदतीत आक्षेप घेतला नाही तर ऋणकोनी खातेनिहाय केंद्रांने कळविलेली रक्कम स्विकारली आहे असे समजण्यांत येते.

परिच्छेद क्र.२.२.८ :- महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, पुणे यांचेकडून अग्रीम रक्कम रु.३.६१ लाख कशाप्रकारे वसुल करण्यांत येणार आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, संघ मर्या.पुणे ही संस्था जरी बंद असली तरी त्यांची काही मालमत्ता पुणे येथे असून त्यातून मंडळाचे येणे वसूल होण्याची अपेक्षा आहे.

परिच्छेद क्र.३.१.२.२ हातकागद संस्था, पुणे या युनिटला दिलेली अनामत रक्कम रु.१३.५८ लाख वसूल करणेबाबतची सद्य:स्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, हातकागद संस्था, पुणे येथील उत्पादन विभाग जून, २०१० पासून भाडेतत्वावर

चालविण्यांस देण्यात आला असून त्याचे भाडे दरमहा रु.३.५१ लाख इतके मिळते त्या भाडयातून हातकागद संस्था, पुणे यांना दिलेल्या अनामतीची वसूल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

परिच्छेद क्र.३.४.१ :- अंबर चरखा केंद्र, फायबर केंद्र, मध केंद्र या केंद्रांकडून कर्ज वसुली व्हावयाच्या रक्कमांबाबतची सद्य:स्थिती काय आहे, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, सन २००१-०२ ते सन २००९-१० या वर्षामध्ये सदर केंद्राकडून एकूण वसुली १०,६२,८४४/- इतकी झाली असून दि.३१-३-२०१० अखेर रुपये १,५९,२०४/- इतकी रक्कम येणे बाकी आहे.

परिच्छेद क्र.४.५ :- खादी आयोगाने वसूलीच्या रक्कमा परत वापरण्यांस दिल्याचे समायोजनाबाबत खुलासा करण्यास समितीने सांगितले असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, याबाबात खादी आयोगाबरोबर ताळमेळाचे काम पूर्ण झाले असून सदर फरक हा खादी आयोगाने मंडळाला वसुलीच्या रक्कमा परत वापरण्यास परवानगी दिली होती. त्यामुळे दिसून येतो. सदर रक्कमाचे समायोजन सन २०१०-२०११ या आर्थिक वर्षात करण्यासंबंधी मंडळाला निर्देश देण्यांत आले आहेत.

सन २००६-२००७

परिच्छेद क्र.२.२.३ :- खादी आयोगाकडून चरख्यांच्या स्वरुपात प्राप्त झालेले कर्ज रु.३८.२५ लाख खादी केंद्रांना व बलुतेदार संस्थांना वाटप केले, त्या संदर्भात खुलासा करण्यास समितीने सांगितले असता विभागाने समितीला असा खुलासा केला की, खादी आयोगाकडून रु.३८.२५ लाखाचे किंमतीचे चरखे वस्तुंच्या स्वरुपात कर्ज म्हणून दिले होते. चरखे खादी अंबर चरखा केंद्रांना व बलुतेदार संस्थांना चरख्याच्या स्वरुपात कर्ज म्हणून वाटप करण्यांत आले होते व या रु.३८.२५ लाखाच्या रक्कमा खातेनिहाय केंद्राच्या ताळेबंद पत्रकात मालमत्ता व येणे बाजूस वसूल पात्र कर्ज म्हणून दर्शविले असून भांडवल व देणे बाजूस खादी आयोगास देय कर्ज म्हणून दर्शविले आहे त्यामुळे हे रुपये रु.३८.२५ लाखाचे कर्ज भांडवल व मालमत्ता योग्य प्रमाणात दर्शविलेली आहे.

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी यांचेकडील तसलमत रक्कम रु.१.१२ लाख समायोजित करण्यांबाबत काय कार्यवाही करण्यांत आली, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, या रक्कमा खूप जुन्या म्हणजे सन १९९६ पासूनच्या असल्याने त्यारक्कमांचे समायोजन योग्य त्याशीर्षाखाली करण्यामध्ये मंडळाला अडचणी उदभवत आहेत. तरीही त्याचा निपटारा लवकरात लवकर करावा असे निर्देश मंडळाला देण्यात येत आहेत. दिनांक ३१-३.२०१० अखेर या शीर्षाखाली रु.१.०९ लाख इतकी रक्कम प्रलंबीत आहे.

रु.८.९४ लाख प्रलंबित रक्कमेबाबत काय कार्यवाही करण्यांत आली, अशी समितीने विचारणा केली असता विभागाने समितीस असा खुलासा केला की, ज्या रक्कमांच्या बाबतीत लेखा शीर्षाचा तपशिल उपलब्ध होत नाही, अशा रक्कमा निंलबन लेखा शीर्षाखाली दर्शविणे भाग पडते. जिल्हा ग्रामोद्योग अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी प्राप्त झालेल्या वसुलीच्या रक्कमांमध्ये काहींच्या बाबतीत लेखा शीर्षाचा तपशिल उपलब्ध नसल्याने निलंबन लेखा शीर्षाखाली प्रलंबीत आहेत. सदरच्या रक्कमा या खूप जुन्या कालावधीच्या असल्याने त्यांचा तपशिल मिळण्यात मंडळाला अडचणी येत आहेत. तरीही सदर रक्कमा लवकरात लवकर समायोजित

करण्यासंबंधी मंडळाला निर्देश देण्यात येत आहेत. दिनांक ३१-३-२०१० अखेर या शीर्षाखाली रु.८.९४ लाख इतकी रक्कम प्रलंबीत आहे.

अभिप्राय व शिफारशी :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या विविध वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवालांवर सर्वसाधारण लेखांकन तत्वाच्या तरतुदीनुसार संस्थेच्या आर्थिक बाबीची सत्य व रास्त वस्तुस्थिती जमा आणि खर्च लेखे, उत्पन्न व खर्च लेखे आणि ताळेबंद तयार करणे आश्यक आहे. मात्र मंडळामध्ये मुंबई खादी आणि ग्रामोद्योग अधिनियमाच्या तरतुदीनुसार जमा आणि खर्च लेखे व ताळेबंदपत्रक तयार करण्यात येते. जमा आणि खर्च लेखे प्रत्यक्ष रोख रक्कम व्यवहारावर तयार करण्यात येतात त्यामध्ये उत्पन्न व खर्चाचे अपेक्षित येणे/देणे व्यवहार समाविष्ट नसल्यामुळे मंडळाच्या लेख्यावरील आर्थिक स्थितीचे सत्यचित्र स्पष्ट होत नाही मंडळाच्या आर्थिक स्थितीचे सत्य बिनचूक चित्र स्पष्ट होण्याकरीता मंडळाने उत्पन्न व खर्च लेखे तयार करावेत असे महालेखापाल यांच्या कडून आक्षेप घेण्यात आला होता या संदर्भात समितीने विचारणा केली असता, महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ ही वाणिज्यिक संस्था नाही. परंतु त्यात काही व्यापारी घटक सुरु केले आहेत. मंडळाच्या अधिनियमातील कलम २५ मधील तरतुदीनुसार लेखे रोख पध्दतीवर ठेवण्याची पध्दत आहे. तथापि महालेखापाल यांची लेखे भविष्यात प्राप्त होण्याची व देय होणाऱ्या/ असणाऱ्या रकमांचा समावेश करण्याबाबत सुचविले आहे

केंद्र शासनाने जुलै, २०१० मध्ये निर्गमित केलेल्या अधिसूचनेच्या अनुषंगाने सन २०१०-२०११ या वर्षापासून मंडळ उत्पन्न व खर्चाचे लेखे ठेवणार आहेत असे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या कार्यालयाने सुचविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने त्यांच्या आर्थिक स्थितीचे सत्यचित्र स्पष्ट होण्यासाठी मंडळाने आयव्यय पत्रक तयार करताना त्यात अद्याप प्राप्त न झालेल्या, परंतु भविष्यात प्राप्त होणाऱ्या रकमांचा तसेच अद्याप खर्ची न टाकलेल्या परंतु भविष्यात खर्ची टाकाव्या लागणाऱ्या खर्चाच्या रक्कमा यांचा समावेश करुन व पारदर्शक लेखे तयार करण्याची कार्यपध्दती सुरु करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाचा मूळ उद्देश ग्रामीण तसेच शहरी भागात बेरोजगारांना व्यवसायाच्या माध्यमातून रोजगार/स्वयंरोजगार पुरविणे असा आहे. त्याकरिता त्यांना राज्य/केंद्र शासनाकडून अनुदान मिळते. परंतु, त्याचा योग्य वापर मंडळाकडून केला जात नसल्याने त्याबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. तसेच मंडळामार्फत महिला बचत गट व बारा बलुतेदार यांना मदत केली जाते. त्यातून रोजगार व स्वयंरोजगार उपलब्ध करुन दिला जातो. बरोबरचे वसुली होणेही अपेक्षित असते. परंतु, मंडळाची केवळ २५% एवढीच वसुली होते, त्यामुळे ज्या पध्दतीने या मंडळाच्या तसेच आयोगाच्या मार्फत प्रसार आणि प्रचार होऊन लाभार्थांना लाभ होणे अपेक्षित आहे. परंतु, त्या पध्दतीने तो त्यांना मिळत नाही. **मंडळाचा मुख्य**

उद्देश ग्रामीण भागात खादी व ग्रामोद्योग सुरु करणे, व्यक्तिगत उद्योजकांना कर्जवाटप करणे, सहकारी सोसायट्या स्थापनेस प्रोत्साहन देणे, अप्रशिक्षीत लाभार्थ्यांना प्रशिक्षण देणे, कच्चा माल, हत्यारे व अवजारे इ. पुरवठयाची व्यवस्था करणे, तज्ञांच्या मार्गदर्शनाची व्यवस्था करणे इत्यादीबाबतची माहिती मंडळाने समितीला साक्षीच्यावेळी दिलेली नसल्याने राज्यामध्ये किती जिल्हयांत, तालुक्यात व गांवात किती लोकांना रोजगार व स्वयंरोजगार मिळवून दिला आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी.

खादी ग्रामोद्योग मंडळाची वसुली ही कर्ज वाटपाच्या रकमेपेक्षा खूपच कमी असल्याचे दिसते. त्यामुळे **लाभार्थ्यांना व्यवसायासाठी कर्ज देताना या कर्ज वाटप प्रकरणी मंडळाने विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. तसेच लाभार्थ्यांना मंडळाने व्यवसायासाठी दिलेले कर्ज परत वसूल करण्यास कसूर केलेल्या संबंधीत अधिकारी/कर्मचाऱ्याची चौकशी करुन त्यांच्यावर योग्य ती कठोर करवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी शिफारस समिती करीत आहे.**

खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत ज्या योजना राबविल्या जातात, त्या संपूर्ण ग्रामीण भागातच आहेत. पूर्वी १२ बलुतेदारांची जी सकंल्पना होती, त्याची व्याप्ती आता वाढलेली असून खादी ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात आता ११० ते १२० उद्योग सुरु झालेले आहेत. या उद्योगाला शहरात वाव नसतो, अशा लहान उद्योग धंद्यांना देखील आता उद्योग म्हणून मान्यता देण्यात आलेली आहे. **शासनाने ग्रामीण भागात जे ११४ लघु उद्योग घोषित केलेले आहेत, अशा लघु उद्योगांची यादी समितीला देण्यात यावी व खादी ग्रामोद्योग मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात किती प्रशिक्षण केंद्र सुरु केली आहेत व त्याचा किती सुशिक्षित बेरोजगार युवकांनी फायदा घेतलेला आहे, खादी ग्रामोद्योग मंडळाने रोजगार व स्वयंरोजगार पुरविण्यासाठी व लोकाभिमुख योजना सुरु करुन त्यास मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी व त्याकरीता लागणाऱ्या आवश्यक निधी उभारण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

महिला बचत गटाने ५० लाख रुपयांचे भांडवल खर्च करुन कागदी पिशव्या बनविण्याच्या सुरु केलेल्या व्यवसायाकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे महिला बचत गटास अद्याप कामाचा मोबदला अदा न करण्यात येणे याबाबत तातडीने माहिती समितीला देण्यात यावी.

खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत जे जे उद्योग चालतात त्यांची उभारणी जिल्हयाच्या व तालुक्याच्या ठिकाणी केल्यानंतर त्या उद्योगांमार्फत तयार होणाऱ्या मालाला चांगली बाजारपेठ मिळण्यासाठी कोणतीही ठोस अशी उपाययोजना केलेली नसल्यामुळे होतकरु उद्योजक खादी ग्रामोद्योग मंडळामार्फत स्वयंरोजगार सुरु करण्यास तयार होत नसल्याचे दिसते. **त्यामुळे अशा लघु उद्योगांच्या माध्यमातून तयार होणाऱ्या उत्पादित मालासाठी चांगली बाजारपेठ मिळवून देण्याच्या दृष्टीने खादी ग्रामोद्योग मंडळाने जिल्हा व तालुका पातळीवर ग्रामविकास विभागाशी समन्वय साधून अशा लघु उद्योजकांना बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी भरीव सहकार्य करावे अशी समिती शिफारस करीत आहे.**

सन १९९६-९७

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाची "अमरावती" व "परभणी" येथील हातकागद केंद्रे, तोटयात चालत असल्यामुळे मंडळाने १९९७ पासून ती बंद करण्याचा निर्णय घेतला. मात्र सदरची केंद्रे निर्लेखित करुन त्यांचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये विलीन केलेले नाहीत. **केंद्रे निर्लेखित करुन त्यांचे लेखे मंडळाच्या लेख्यांमध्ये विलीन करण्यासाठी १४ वर्षाचा कालावधी लागणे ही खूपच गंभीर बाब आहे. शासनाकडून मंडळावर अशासकीय सदस्यांची नियुक्ती केल्यानंतर सदर केंद्रे निर्लेखित करण्याची कार्यवाही मंडळाकडून करण्यात येणार असल्याने यासंदर्भात कार्यवाही जलदगतीने करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

सन २००२-२००३

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या स्थापनेपासून म्हणजेच **सन १९६३ पासून महाबळेश्वर येथील बंगला क्रमांक १, ४ व ५ ही मंडळाची कायदेशीर मालमत्ता असून त्याची किंमत अद्याप निश्चित झालेली नाही तसेच मालमत्तेची नोंद देखिल मंडळाच्या मालमत्ता नोंदवहीत दर्शविण्यात न आल्याबाबत समितीने आश्चर्य व्यक्त केले. मालमत्तेची किंमत जिल्हाधिकारी किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्यापपर्यंत करण्यास झालेल्या विलंबाची कारणे समितीस ३ महिन्यांच्या आत कळविण्यात यावी तसेच या मालमत्तांची नोंद मंडळाच्या मालमत्ता नोंदवहीत घेवून त्याचा अहवाल देखिल समितीस ३ महिन्यात देण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

सन २००५-०६

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, पुणे यांचेकडून येणे असलेल्या रु.३.६१ लक्ष अग्रिमाची रक्कम सदर मंडळाच्या पुणे येथील मालमत्तेद्वारा वसुल करण्याची कार्यवाही शीघ्रगतीने करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी. तसेच हातकागद संस्था, पुणे या केंद्राला दिलेली अनामत रक्कम रु.१३.५८ लक्ष याची वसुली या संस्थेच्या पुणे येथील उत्पादन विभाग भाडेतत्वावर चालविण्यास देवून करण्यात येत असल्याने याद्वारे वसुल करण्यात आलेल्या रकमेचा अहवाल समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.

परिशिष्ट एक

Para 5.3.3.06 1998-99 परिशिष्ट - ९

परिशिष्ट-९

Phone-Office : 22617641-42-43
Fax No. : (022) 22696808
Maharashtra State Khadi & Village Industries Board,
19/21, Manoharadas Street, Fort,
MUMBAI - 400 001.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.

जावक क्र.

Desk-6/KVIB/BGT/2008-09/ 32224

दिनांक 5 FEB 2008

State Office Maharashtra
K. & V. I. C.
Date 06/02/08
Inward No. 6308

To,
The State Director(Mah.)
Khadi & Village Industries Commission,
Royal Insurance Bldg.,
4 th Floor, Churchgate,
Mumbai -400 020.

SUB - Budget Estimates for the year-2008-09.

REF - Your Office letter No.SOM/Khadi/Budget 2008-09/ 2007-08/5016 Dtd. 11-12-2007.

Sir,

With reference to the above cited subject I am submitting herewith Budget Estimates of the Maharashtra State Khadi & Village Industries Board, for the Year 2008-09 . The Budget comprises of the demand for 1) Margin Money Scheme through KVIB , 2) Grant for Publicity, Awareness Camps and Exhibitions 3) Grant for Hand made Paper Training 4) Bank Finance under Continuation Programme as per enclosed statement.

Thanking you,

Encl.As above.

Yours faithfully,

FOR CHIEF EXECUTIVE OFFICER

परिशिष्ट-२

(B)

(52)

MAHARASHTRA STATE KHADI AND VILLAGE INDUSTRIES BOARD, MUMBAI-1
BUDGET PROPOSAL FOR 2008-2009

Head of Expenditure	Particulars		Budget demand for 2008-2009
Hand made Paper, Training grant	Recurring & Non-recurring		30,70,500.00
Grant for Publicity	a) Awareness Camps		
	Board propose to organize 102 Awareness Camps in 33 District of the State.		6,60,000.00
	b) Exhibition		
	Every Year Board Organize a grant exhibition at Pandharpur, District Solapur on occasion of "Ashadhi Ekadashi" For organize the above said exhibition. Request to grant Special amount for the same.		1,00,000.00
	c) 33 District Level exhibition		33,000,000.00
	d) 1 State Level exhibition		5,00,000.00
	e) Printing of Brouchers The Brouchers will contain information about KVIC other scheme of State Government, addresses of KVIC, District Offices etc.		
	No. of copies	100000	
	Size	14" x 10"	
	Printing	Four colour offset	
	Paper	Maplitho 90 GSM	
	Artwork	will be prepared by Board.	
	Approximate cost Rs. 5.00 per copy		5,00,000.00
	f) Printing of Posters Poster will contain the feature of RUCP along with the illustrations of V.I. artisans.		
	No. of copies	50000	
	Size	30" x 20"	
	Printing	Offset Four colour	
	Paper	Maplitho 60 GSM	
	Cost	Rs. 6.50 each	3,25,000.00
Demand under Bank Finance	Demand under old Interest Subsidy Scheme		11,99,66,000.00

	Margin Money through State L.V.I. Board	For 2000 beneficiaries.		25,00,000-00
5	Grant for Training to entrepreneur under Margin Money	For 2000 beneficiaries @ Rs. 875/- lakhs per beneficiaries		17,50,000-00
			Total (Sr. 1,2,4,5)	26,02,05,500-00

Dy. Chief Executive Officer

(F)

31/1/08

Shumda-1

परिशिष्ट-२

MAHARASHTRA STATE KHADI AND KHADI AND VILLAGE INDUSTRIES BOARD BOMBAY
BALANCE SHEET FOR KHADI PRODUCTION AMBAR CHARKHA KENDRA AS ON 31-3-1991

Liabilites	1990-91 Rs. Ps.
A) M.S.K. & V.I. Board H.O. Bombay	6,15,000.00
B) Dist. & V. inds. Office, Sholapur	3,35,335.90
C) " Nanded	43,437.07
D) " Wardha	5,23,036.50
E) " Akola	1,35,984.81
F) " Gadchiroli	84,893.95
G) " Buldhana	11,50,712.55
H) Katai kamgarCocoons (Kosh)	7,383.86
I) Vinkar Hit Kosh	47,339.85
J) Labour Encourangement Fund	33,202.51
K) Weaver Sut Deposit	30,951.00
L) Depreciation of Tel Ghana	11,176.30
M) Washing Charges	25,733.85
N) Net Profit B/F.	67,759.30
	21,11,946

Assets		1990-91 Rs. Ps.
A) Dead Stock		3,726.75
B) Sundry Debtors on a/c of Sale of Khadi		
1) Bombay Khadi Gramo. Sanstha, Bombay		2,68,308.17
2) M. S. K. & V. I. Board, Bombay, (Marketing Div.)		2,49,490.75
3) khadi Mandir, Bombay		13,899.15
4) Saurashtra Khadi Parmagar, Bombay		56,865.65
5) M.S.K. & V.I. Board, Nasik		194.30
6) Marathwada Khadi Samit, Naded		7,90,168.25
C) Advances etc. recoverable		
1) State Fund M.S. K. & V. I. Board, Nagpur		10,310.51
2) Travelling Advance		1,000.00
D) Cash and Bank Balances		
1) Bank balance	11,489.68	
2) Cash on Hand	556.34	12,046.02
E) Closing Stock		
1) Tep Stock		1,125.70
2) Phoni Stock		1,381.40
3) Sut Stock		2,76,161.59
4) Khadi Cloth		4,27,268.41
		21,11,946.65

Sd/-
Sr. Auditors

Sd/-
Account & Audit Officer

MAHARASHTRA STATE KHADI AND KHADI PRODUCTION BALANCE SHEET

	LIABILITIES	1998-99 Rs.
		20,60,000.00
,000.00	IMPREST : MSK VIB BOARD, MUMBAI	-----
-----	KHADI PURCHASE DVIO, SOLAPUR	16,000.00
,000.00	MANAGEMENT GRANT	
	SUSPENCE ACCCUNT	1,11,162.17
,162.17	1) H. O. MUMBAI (KHADI SALE)	40,000.00
),000.00	2) DIST. OFFICE, BULDHANA	72,350.95
2,350.95	3) DIST. OFFICE, GADCHIROLI	25,000.00
5,000.00	4) DIST. OFFICE, BEED	36,394.27
3,394.27	5) DIST. OFFICE, WARDHA	26,199.52
6,199.52	6) DIST. OFFICE, AKOLA	
	YARN PURCHASE CREDITOR	------
------	DIST. VILLAGE INDS. OFFICE SOLAPUR	15,000.00
------	DIST. VILLAGE INDS. OFFICE WARDHA	----
10,000.00	DIST. VILLAGE INDS. OFFICE GADCHIROLI	3,36,238.13
36,238.13	DIST. VILLAGE INDS. OFFICE AMRAVATI	5,00,000.00
10,000.00	DIST. VILLAGE INDS. OFFICE YEOTMAL	
	AMOUNT PAYABLE TO LABOUR OF AMBAR	25,18[illegible]
24,063.68	1. KANTEEN KAMGAR WELFARE ACCOUNT	55,049.04
32,884.04	2. VINKAR KAMGAR WELFARE A/C.	33,014.[illegible]
21,901.37	3. KANTEEN WEAVERS INSENTIVE FUND 8.33%	22,108.00
24,220.00	4. WEAVERS YARN DEPOSIT	1,34,7[illegible]
17,896.72	5. TEL MAL DEPRECIATION FUND AMBAR CHARKHA UNIT	39,228.70
11,690.09	CLOTHE WASHING WAGES, RESERVE	25,[illegible]
26,931.00	LOAN REPAYMENT PROVISION	16,07[illegible]
621.70	COTTON RATE RESERVE	[illegible]
600.00	TUTION FEE (AMT. RECD. FROM KHURSAPUR 90-91)	6,100.[illegible]
[illegible],000	PLU DEPOSIT FROM D.R.D.A. (UMRED)	21,[illegible]
10,607.26	YARN COTTON	------
------	YARN POLY	
	STOCK FLUCTUATION RESERVE	[illegible]

VILLAGE INDUSTRIES BOARD, MUMBAI
DIVISION, NAGPUR
AS ON 31ST MARCH 1999

1997-1998 Rs.	ASSETS	1998-99 Rs.
5,758.90	CASH BALANCE	4,558.21
4,20,315.36	BANK A/C. 25604 (BANK OF MAH.)	44,392.94
8,415.93	BANK A/C. 25605 (BANK OF MAH.)	-----
20.00	AMBAR CHARKHA CENTRE, KHAPA	20.00
	KHADI SALES DEBTORS (SALES AT NAGPUR)	
5,13,371.17	MUMBAI KHADI GRAMO, MUMBAI	5,94,628.37
13,899.15	KHADI MANDIR, VILE PARLE, MUMBAI	13,899.15
3,24,636.65	SAURASHTRA RACHNATMAK SAMITI, WADALA	3,24,636.65
64,352.50	CENTRAL CLOTH DEPOT. (KHADI GR. SANGH, NAGPUR)	64,352.50
1,54,905.75	NAG. VIDHARBH, CHARKHA SANGH, SITABARDI, NAGPUR	1,54,905.75
26,336.70	DIST. VILLAGE INDS. OFFICER, MKT, NAGPUR	11,336.70
-----	DIST. VILLAGE INDS. OFIFICER, MKT., WARDHA	------
4,730.50	OFFICER ON SPL. DUTY, WARDHA	4,730.50
10,285.70	DIST. VILLAGE INDS. OFIFICER, PUNE	10,285.70
55,500.67	KHADI GRAMODYOG BHAVAN, NEW DELHI	22,500.67
26,284.20	DIST. VILLAGE INDS. OFIFICER, AMRAVATI	26,284.20
70,900.00	KHADI GRAMODYOG BHANDAR, AKOLA	70,900.00
2,878.20	SECRETARY, KAMALESHWAR VIKAS KHAND AUD.	2,878.20
37,249.70	APICULTURE CENTRE, MWAR	41,559.55
-----	DIST. VILLAGE INDS. OFIFICER, GADCHIROLI	-----
-----	DIST. VILLAGE INDS. OFIFICER, YEOTMAL	-----
23,206.92	KHADI SILK EMPORIUM DHAKURIYA, CULCUTTA	23,206.92
-----	KARNATAKA WORKS ASSOCIATION BANGLORE	------
10,000.00	KHADI GRAMODYOG SAH. SANGH. BAGERI, HUBLI	10,000.00
58,788.60	DHARWAD, TAL. SEVA SANGH DHARWAD, KARNATAKA	58,788.60
20,275.20	YUSUF MEHER ALI CENTRE, MUMBAI	46,737.55
1,68,678.75	SANEGURUJI GRAMVIKAS PRATISTHAN, KALYAN	1,68,678.75
-----	KHADI ASHRAM G.T. ROAD, PANIPAT	-----
1,55,920.10	MAH. STATE KHADI & V.I. BOARD, MUMBAI	1,55,920.10
13,452.65	MARATHWADA KHADI GRAMO. SAMITI, NANDED	13,452.65
5,995.20	D.V.I. O. BHANDARA	5,995.20
2,90,217.85	DEVIPUR SILK KHADI GRAMO SAMITI, DEVIPUR	2,90,217.85
13,061.00	KHADI GRAMO BHANDAR, AGAKHAN PALACE, PUNE	------
28,531.00	KHADI GRAMO. BHANDAR, Gandhi Gram	28,531.00
	DIST. VILLAGE INDS. OFIFICER, MKT.,	

MAHARASHTRA STATE KHADI AND KHADI PRODUCTION
BALANCE SHEET

	LIABILITIES		1998-99 Rs.
	COLOUR YARN WAGES EXPENDITURE		
1,90	KHADI CLOTH TEMP. ADVANCES		1,28,318.90
1,00	DIST. VILLAGE INDS. OFFICER, NAGPUR STATE FUND		1,100.00
-----	MUMBAI KHADI & V.I. SANGH, MUMBAI		------
0,00	DIST. VILLAGE INDS. OFFICER, BULDHANA		200.00
0,00	DIST. VILLAGE INDS. OFFICER, YEOTMAL		400.00
0,00	DIST. VILLAGE INDS. OFFICER, AMRAVATI		500.00
0,00	DIST. VILLAGE INDS. OFFICER, WARDHA		450.00
-----	NAGPUR (INCOME TAX DIDUCTION)		-----
3,09	KHADI RATE FLUCTUATION RESERVE		6,10,425.73
-----	TAX PAYABLE (N. M. C.)		13,556.00
	MATADOR REPAIRING		9,612.00
3,51	NET PROFIT (PRODUCTION)	1,14,283.51	
	ADD : 98-99	1,15,133.78	2,29,417.29

VILLAGE INDUSTRIES BOARD, MUMBAI
DIVISION, NAGPUR
AS ON 31ST MARCH 1999

1997-1998 Rs.	ASSETS	1998-99 Rs.
36,873.00	KERALA SARVODAYA SANGH, TIRUPNATPURAM	36,873.00
	KHADI AUG. SAMITI, NAGPUR	
27,511.38	MAHAROGI SEWA SAMITI, WARDHA (M.S.)	20,675.60
	TEP. DEBTORS	
------	DIST. VILLAGE INDS. OFFICER, YEOTMAL	-----
2,50,097.40	DIST. VILLAGE INDS. OFFICER, AMRAVATI	1,78,429.40
------	SECRETARY KAMLESHWAR VIKAS BLVS, KALMESHWAR	-----
	DEBTORS SALE OF YARN	
42,928.75	NAGVIDARBHA CHARKHA SANGH, SITABARDI	42,928.75
1,20,904.60	DEVIPUR SERI CULTURE K. V. I. B. SAMITI, DEVIPUR	1,20,904.60
	DEAD STOCK PURCHASE	
	ADVANCE FOR T. A.	
----------	SHRI GAJANAN BHEDARKAR, DRIVER, NAGPUR	--------
	ADVANCES	
1,082.80	MKT. DIV., DIST. OFFICE, NAGPUR	1,427.15
1,000.00	KUM. SANJEEVANI DHURU (SUPERVISOR) WARDHA	1,000.00
1,00,000.00	DIST. VILLAGE INDS. OFFICER, NAGPUR	20,000.00
1,00,000.00	DIST. VILLAGE INDS. OFFICER, AMRAVATI	1,00,000.00
1,00,000.00	KAMBAL PRODUCTION, UMRED	1,00,000.00
250.00	SHRI GAJANAN BHEDARKAR (DRIVER), NAGPUR	250.00
250.00	SHRI GANPATI PARTE	250.00
250.00	KUM. VIBHA SHETKAR	250.00
-----	SHRI S. P. WANKHEDE (SUPERVISOR), RATNAGIRI	-----
1,300.00	SHRI GAJANAN BHEDARKAR (DRIVER), NAGPUR	300.00
------	SHRI DIGAMBAR UKE, DRIVER, NAGPUR	------
60,426.15	DEAD STOCK & ETC.	60,611.15

MAHARASHTRA STATE KHADI AND
KHADI PRODUCTION
BALANCE SHEET

98 LIABILITIES Rs.	1998-99 Rs.
.21 TOTAL RS.	46,80,364.20

VILLAGE INDUSTRIES BOARD, MUMBAI
DIVISION, NAGPUR
AS ON 31ST MARCH 1999

1997-1998 Rs.	ASSETS		1998-99 Rs.
	CLOSING STOCK ACCOUNT		
1,18,108.80	TAPSLAIVER	51,854.40	
5,879.70	PELU (BOBEEN)	4,979.96	
4,71,398.50	YARN (COTTON)	3,03,838.46	
3,79,206.48	YARN (POLYSTER)	12,55,154.47	
1,91,125.30	KHADI CLOTH	1,87,239.55	18,03,066.84
44,36,561.21	TOTAL RS.		46,80,364.20

परिशिष्ट - ३

संचालनालय
महाराष्ट्र खादी-ग्रामोद्योग मंडळ
सरकारी बंगला नं. ५
महाबळेश्वर-४१२८०६

जा.क्र. मंडळ प्रोपर्टी/२००९-१०/ 1244 ते 1245 (A.B) दि. २०/९/०९

प्रति,
१- तहसिलदार,
कार्यालय तहसिलदार विभाग, (महसूल)
सातारा जि. सातारा

२- मा. जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
जिल्हा-सातारा

विषय- मंडळाच्या महाबळेश्वर येथील मालमत्तेचे सॅल्युएशन करून मिळणेबाबत.

संदर्भ:-१-प्रधान लेखापाल कार्यालय, महाराष्ट्र-१ लेखापरिक्षण अहवालातील आक्षेप
२- मंडळाचे मुख्य कार्यालयाचे पत्र क्र.कार्यालय-५/४८२०, दि.१५/६/०९

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रांच्या छायाप्रती सोबत जोडलेल्या आहेत. त्या कृपया आक्षेपाची खातमा महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची मालमत्ता पालन सेवा महाबळेश्वर जिल्हा सातारा येथे कार्यरत आहे. त्या विभागी मालमत्तेचे खालील यादीत मंडळाच्या ताब्यात आहेत.

अ.क्र.	यादीतील क्रमांक	सिटी सर्वे क्रमांक
१	१	४९
२	४	५५
३	५	६१,६२

वरील मालमत्ता ही मंडळ स्थापनेपूर्वी पासून मंडळाच्या ताब्यात असून तेव्हापासून त्याची नोंद मंडळाच्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात आलेली आहे. तसेच ही मालमत्ता मंडळ स्थापनेपासून मंडळाच्या वार्षिक लेखामध्ये दर्शविली जात आहे. तसेच सदर मालमत्तेचे सर्व शासन कर मंडळाकडून भरले जातात.

सदर मालमत्ता शासनाने मंडळास विनामूल्य हस्तांतरित केलेली असल्यामुळे मंडळाच्या वार्षिक लेखामध्ये त्याची किंमत शून्य दर्शविली जाते. ही मालमत्ता मंडळाच्या ताब्यामध्ये आहे व ती मंडळाच्या वार्षिक लेखामध्ये दर्शविली जात असल्यामुळे तिची किंमत शून्य न दर्शविता तिचे सॅल्युएशन करून जी किंमत येईल ती लेखामध्ये दर्शवावी असा आक्षेप मंडळाच्या वार्षिक लेखाचे लेखापरिक्षण करणा-या प्रधान महालेखापाल, मुंबई यांच्या तपासणी पथकाने घेतला असून मंडळाच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये त्या बाबतचा आक्षेप नोंदविला आहे.(सोबत लेखापरिक्षण अहवालाच्या आक्षेपाची प्रत जोडलेली आहे) तसेच सदर आक्षेपामध्ये महालेखापाल यांनी अशी सूचना केली आहे की, मंडळाने महाबळेश्वर येथील प्रश्न मालमत्तेचे सॅल्युएशन सार्वजनिक बांधकाम विभाग किंवा जिल्हाधिकारी कार्यालय, यांचेकडून करून घ्यावे असे अभिप्राय नोंदविले आहेत.

आपणांस विनंती करण्यात येते की,(सदर मालमत्तेच्या छायाप्रती सोबत जोडलेल्या आहेत.) तरी या मालमत्तेचे कृपया आपल्या कार्यालयाकडून सॅल्युएशन करून मिळावे म्हणजे प्रधान महालेखापाल यांचे आक्षेपाबाबत कार्यवाही करून सदर आक्षेप वगळून घेणे मंडळास शक्य होईल.

सोबत:-१ महालेखापाल यांचे आक्षेपाची प्रत
२ मालमत्तेच्या सर्वे क्र.
कागदपत्रे
३ मंडळाचे मुख्य कार्यालयाचे पत्र

आपला विश्वासू,
प्रभारी संचालक

Received On 17/09
Clerk to Collector, Satara

1-2-2009
CLERK
To Executive Engineer
(West) Dn. Satara.

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ मध संचालनालय महाबळेश्वर जि- सातारा

जा.क्र.मंडळप्रॉपर्टी/०९-१० १६ to २९ दि- ४/१/१०

प्रती,

१)मा. कार्यकारी अभियंता,
सार्वजनीक बांधकाम विभाग प.
सातारा

२) मा जिल्हाधीकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
सातारा

विषय- मंडळाच्या महाबळेश्वर येथील मालमत्तेचे व्हॅल्यूएशन करून मिळणेबाबत.

संदर्भ – या कार्यालयाचे पत्र जाक.मंडळप्रॉपर्टी/२००९-१० १२४४ ते१२४५ दि.१०.६.०९

महोदय,

कृपया वरील संदर्भीय पत्र अवलोकणी घ्यावे.महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळची मधमाशापालन संस्था महाबळेश्वर जि सातारा येथे कार्यरत आहे. त्याठिकाणी शासनाचे खालील बंगले मंडळाच्या ताब्यात आहे.

अ.क.	बंगला क्रमांक	सि.स.क्रमांक
१	१	४९
२	४	७७
३	५	६१-६२

वरील मालमत्ता ही मंडळ स्थापनेपूर्वी पासून मंडळाच्या ताब्यात असून तेव्हापासून त्याची नोंद मंडळाच्या मालमत्ता रजीस्टरला घेण्यात आलेली आहे. तसेच हि मालमत्ता मंडळ स्थापनेपासून मंडळाच्या वार्षीक लेख्यामध्ये दर्शविली जात आहे.तसेच सदर मालमत्तेचे सर्व शासन कर मंडळाकडून भरले जातात.

सदर मालमत्ता शासनाने मंडळास विनाशुल्क हस्तांतरीत केलेली असल्यामुळे मंडळाच्या वार्षीक लेख्यामध्ये त्याची किंमत शुन्य दर्शविली जाते ही मालमत्ता मंडळाच्या ताब्यामध्ये आहे व ती मंडळाच्या वार्षीक लेख्यामध्ये दर्शवली जात असल्यामुळे तीची किंमत शुन्य न दर्शविता तीची व्हॅल्यूएशन करून जी किंमत येईल ती लेख्यामध्ये दर्शवावी असा आक्षेप मंडळाच्या वार्षीक लेख्यांचे लेखापरिक्षण करणा-या मा. प्रधान महालेखापाल, मुंबई यांच्या तपासणी पथकाने घेतला असून मंडळाच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये त्याबाबतचा आक्षेप नोंदविला आहे. तसेच सदर आक्षेपामध्ये महालेखापाल यांनी अशी सुचना केली आहे की, मंडळाने महाबळेश्वर येथील सदर मालमत्तेचे व्हॅल्यूएशन सार्वजनीक बांधकाम किंवा मा. जिल्हाधीकारी कार्यालय, यांचेकडून करून घ्यावे असे अभिप्राय नोंदविलेले आहेत.

आपणास विनंती करण्यात येते की, या मालमत्तेची कृपया आपल्या कार्यालयाकडून व्हॅल्यूएशन करून मिळावे म्हणजे मा. प्रधान महालेखापाल यांच्या आक्षेपाप्रमाणे कार्यवाही करून सदर आक्षेप वगळून घेणे मंडळास शक्य होईल.

आपल्या विश्वासू

प्र. संचालक

प्रत माहितीस्तव सविनय सादर
१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ, मुंबई – १
२. जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ,
जिल्हा कार्यालय सातारा

यांनी कृपया सार्वजनीक बांधकाम विभाग कार्यालयास संपर्क साधून मंडळाच्या महाबळेश्वर येथील जागेचे व्हॅल्यूएशन त्वरीत करून मिळणेबाबत प्रयत्न करावेत.

प्र. संचालक

adm

22/10/10 03:44PM HP LASERJET FAX P.03

महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ मध संचालनालय महाबळेश्वर जि- सातारा

जा.क.मंडळ्यॉपर्टी/०९-१० /१०५४-१०५५ दि- १८.१०.१०

प्रती,
मा. अधिक्षक अभियंता,
सार्वजनीक बांधकाम विभाग व.
सातारा

मा. जिल्हाधीकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय,
सातारा

विषय- मंडळाच्या महाबळेश्वर येथील मालमत्तेचे व्हॅल्यूएशन करुन मिळणेबाबत.

संदर्भ - १. या कार्यालयाचे पत्र जाक.मंडळ्यॉपर्टी/२००९-१० १२४४ ते१२४७ दि.२०.६.०९
२. या कार्यालयाचे पत्र जाक.मंडळ्यॉपर्टी/२००९-१० २६ ते २९ दि.४.१.१०

महोदय,

उपरोक्त संदर्भीय विषयाची पत्र कृपया अवलोकणी घ्यावीत कि विनंती. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळचे महाबळेश्वर येथे मधसंचालनालय हे खाते निवास केंद्र असून महाबळेश्वर येथे कार्यरत आहे. खालील तिन बंगले मंडळाच्या ताब्यात व वापरात आहेत.

अ.क.	बंगला क्रमांक	चि.स.क्रमांक
१	१	४९
२	४	७७
३	५	६१-६२

वरील मालमत्ता ही मंडळ स्थापनेपूर्वी पासून मंडळाच्या ताब्यात असून तेव्हापासून त्याची नोंद मंडळाच्या मालमत्ता रजिस्टरला घेण्यात आलेली आहे. तसेच कि मालमत्ता मंडळ स्थापनेपासून मंडळाच्या वार्षिक लेख्यामध्ये दर्शविली जात आहे.तसेच सदर मालमत्तेचे रुर्व शासन कर मंडळाकडुन भरले जातात.

सदर मालमत्ता शासनाने मंडळास विनामुल्क हस्तांतरीत केलेली असल्यामुळे मंडळाच्या वार्षीक लेख्यामध्ये त्याची किमत शुन्य दर्शविली जाते . ही मालमत्ता मंडळाच्या ताब्यामध्ये आहे व ती मंडळाच्या वार्षीक लेख्यामध्ये दर्शवली जात असल्यामुळे तीची किमंत शुन्य न दर्शविता तीची व्हॅल्यूएशन करुन जी किमत येईल ती लेख्यामध्ये दर्शवावी असा आक्षेप मंडळाच्या वार्षीक लेख्याचे लेखापरिक्षण करणा-या मा. प्रधान महालेखापाल, मुंबई यांच्या तपासणी पथकाने घेतला असून मंडळाच्या लेखापरिक्षण अहवालामध्ये त्याबाबतचा आक्षेप नोंदविला आहे. तसेच सदर आक्षेपामध्ये महालेखापाल यांनी अशी सुचना केली आहे की, मंडळाने महाबळेश्वर येथील सदर मालमत्तेचे व्हॅल्यूएशन सार्वजनीक बांधकाम विभाग किंवा मा. जिल्हाधिकारी कार्यालय, यांचेकडुन करुन घ्यावे असे अभिप्राय नोंदविलेले आहेत.

आपणास विनंती करण्यात येते की, या मालमत्तेची कृपया आपल्या कार्यालयाकडून व्हॅल्यूएशन करुन मिळावी म्हणजे मा. प्रधान महालेखापाल यांच्या आक्षेपाप्रमाणे कार्यवाही करुन सदर आक्षेप वगळून घेणे मंडळास शक्य होईल.

कळावे ही विनंती , आभारपूर्वक.

आपला विश्वासु,
संचालक

जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ,
जिल्हा कार्यालय सातारा

आपणी कृपया उपरोक्त कार्यालयाशी संपर्क साधून मंडळाच्या महाबळेश्वर येथील जागेचे व्हॅल्यूएशन त्वरीत करुन मिळणेबाबत प्रयत्न करावेत ही विनंती.

प्रत माहितीस्तव सविनय सादर,
मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ,
मुंबई - १

संचालक

ADM

परिशिष्ट-४

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ (मुंबई)

पणन विभाग

मुंबई

व्यापारी व नफा-तोटा पत्रक —सन २००८-२००९

दिनांक ३१ मार्च २००९ अखेर

२००७-२००८ रु. पैसे	तपशील	२००८-२००९ रु. पैसे
[illegible]	खरेदी (नफा - तोटा खात्याकडे वर्ग)	७०५७६४०५.००
[illegible]८८४९.४०	एकूण	७०५७६४०५.००
....	छपाई व लेखन सामग्री	४४८२५.००
...	किरकोळ खर्च	[illegible]
१०००.००	ऑडीट फी	[illegible]
[illegible]४२१९.००	बँक कमिशन	[illegible]
[illegible]५९२.००	घसारा	[illegible]
[illegible]९८९.००	प्रोफेशनल फी	[illegible]
[illegible]९८९६.८०	ढोबळ नफा	[illegible]
[illegible]४८८.८०	एकूण	[illegible]

२००७-२००८ रु. पैसे	तपशील		२००[illegible] रु.
४१९३८८४९.४०	विक्री		७०५७६[illegible]
४१९३८८४९.४०	एकूण		७०५७६४[illegible]
६५५२८७.८०	कमीशन प्राप्त	१५५११३३.००	
	अधिक कमीशन येणे	५९२६५३.००	२१४३७[illegible]
१६५०२४.००	ठेवीवरील व्याज	२८७०३१.००	
	अधिक संभाव्य व्याज	+११९७९७.००	
		४०६८२८.००	
	वजा मागील वर्षे संभाव्य व्याज	(—) ७६१५३.००	३३०६[illegible]
	किरकोळ प्राप्ती		१६[illegible]
८३३४८८.८०	एकूण		२४७६०७[illegible]

परिशिष्ट-६

94

MAHARASHTRA STATE KHADI AND VILLAGE INDUSTRIES BOARD
MARKETING DIVISION
TRADING , PROFIT AND LOSS ACCOUNT AS ON 31ST MARCH, 2010

2008--2009	PARTICULARS	2009-2010	2008--2009	PARTICULARS		2009-2010
70,576,405.00	To Purchases	75,811,257.00	41,938,849.40	By Sales		75,811,257.00
70,576,405.00	**Total**	**75,811,257.00**	**41,938,849.40**	**Total**		**75,811,257.00**
44,825.00	To Printing &Stationary	16,350.00	2,143,786.00	By Commission	2453114.00	
10,000.00	To Audit Fees	10,000.00		Add -Commission Receivable	1228062.00	
9,843.37	To Depreciation	18,143.00	-		3681176.00	
1,500.00	To Misc Exp	0.00	330,675.00	Lass -Comm.08-09	962037.00	2,719,139.00
21,084.43	To Bank Commision Exp	5,629.57		By Interest Add -Accured Int 09-10	89844.00 102809.00	192,653.00
2,388,826.20	To Net Profit	2,861,669.43	1,618.00	By Misc Income		0.00
2,476,079.00	**Total**	**2,911,792.00**	**2,476,079.00**	**Total**		**2,911,792.00**

FINANCIAL ADVISER AND
CHIEF ACCOUNTS OFFICER

परिशिष्ट दोन

परिशिष्ट दोन
बुधवार, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१०

लोकलेखा समितीची बैठक विधान भवन, मुंबई येथे बुधवार, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० रोजी सकाळी ११.३० वाजता सुरू होउन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

उपस्थिती

समिती प्रमुख

१. श्री. गिरीश बापट, वि.स.स

समिती सदस्य

२. डॉ. नामदेव उसेंडी, वि.स.स
३. श्री. ए.टी. पवार, वि.स.स
४. श्री. नवाब मलिक, वि.स.स
५. श्री. विलास लांडे, वि.स.स
६. श्री. संजय सावकारे, वि.स.स
७. श्री. गिरीष महाजन, वि.स.स
८. श्री. सुर्यकांत दळवी, वि.स.स
९. डॉ. दिपक सावंत, वि.प.स

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

१. डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
२. श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव
३. श्री. रामनाथ काठे अवर सचिव (समिती)

निमंत्रित:

महालेखापालांचे कार्यालय, मुंबई

श्री. आर.के.सोळंकी, उपमहालेखापाल

वित्त विभाग

श्री. राजेश अग्रवाल, सचिव (ले.व को.)

साक्षीदार:

उद्योग, उर्जा व कामगार विभाग

१) श्री.ए.एम.खान, प्रधान सचिव (उद्योग)
२) श्री.संजय सेठी, सचिव, लघु व मध्यम उद्योग तथा पदसिध्द आयुक्त (उद्योग)

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे सन १९९५-९६ ते सन २००६-०७ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखापरीक्षण अहवालावर महालेखापालांचे मार्गदर्शन तसेच समिती उक्त लेखा परीक्षण अहवालावर उद्योग, उर्जा व कामगार(उद्योग) विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १९ एप्रिल, २०११
लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १९ एप्रिल, २०११ विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

सदस्य

२) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
३) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
४) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
५) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
८) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
९) श्री.एकनाथ शिंदे, वि.स.स.
१०) श्री.बाळा नांदगावकर, वि.स.स.
११) श्री. भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,

१) श्री भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
४) श्री. रामनाथ काठे, अवर सचिव (समिती)

समितीने चौथा प्रारुप अहवाल विचारात घेतला व फेरफारासह तो समंत केला.